म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ८५८

॥ श्रीराम ॥

# पाळ्यावरचें रामायण



गायक व प्रकाशक

## व्यंकटेश धोंडदेव मराठे

सब असिस्टंट सर्जन

विक्रयकार

ग एजन्सी

शहर

REFBK-0001566

किंमत १॥ रुपाया

काव्य 303

॥ श्रीसीतारामचंद्राय नमः ॥

# झोंपाळ्यावरचें रामायण

गायक व प्रकाशक

ब्यंकटेश धोंडदेव मराठे

सब असिस्टंट सर्जन

प्रस्तावनालेखक

रा. ब. चिंतामण विनायक वैद्य

एम्. ए. एलूएल्. बी.

माजी चीफ जज्ज ग्वाल्हेर.

शके १८४०

सन १९१८.

किंमत १॥ रुपाया

पुणें-धी प्रिंटिंग एजन्सीकरितां
मुद्रक-ल. भा. कोकाटे, 'हनुमान' छापखाना, ७२१ सदाशिव पुणें
प्रकाशक- व्यं. धों. मराठे, खडकी पालनजीची चाळ

# अर्पणपत्रिका

माझ्या कैलासवासी मातोश्री
तीर्थरूप वज्रचुडेमंडित
**सौभाग्यवती अंबिकादेवी मराठे**
यांच्या पवित्र आत्म्यास
हा ग्रंथ
अत्यंत भक्तियुक्त अंत:करणानें
अर्पण केला आहे.

—कर्ता

REFBK-0001566
REFBK-0001566
१५६६

# प्रस्तावना.

रामायणासारखें सुंदर काव्य व रामकथेसारखी उत्तम कथा पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याहि भाषेंत, अगर कोणत्याहि देशांत नाहीं, असें आम्हां आर्यांस पाश्चात्य लोकांचा आणि अर्वाचीन व प्राचीन भाषांचा परिचय झाल्यावरहि म्हणतां येतें ही गोष्ट खरोखरच अभिमानास्पद आहे. कवी आपल्या उदात्त कल्पनांनीं जितक्या उच्च व रम्य वातावरणांत भरारी मारूं शकतो, आणि नीतिमान् पुरुष जितकें पूज्यतम व उदात्त आचरण या जगांत आचरूं शकतो, तितकी उच्च कल्पना व तितकें उदात्त आचरण रामायणांतच सांपडेल, इतरत्र सांपडणार नाहीं. उत्तम पिता, उत्तम माता, उत्तम पुत्र, उत्तम बंधु, उत्तम पति, उत्तम पत्नी, उत्तम मित्र, उत्तम शत्रु, उत्तम राजा, उत्तम प्रजा, उत्तम स्वामी, उत्तम सेवक, सारांश सर्वच उत्तम संबंध रामायणांत कवीनें उत्तम कल्पनांनींच वर्णिले आहेत. दशरथाहून उत्तम पिता—ज्याचें पुत्रवियोगानें प्राणोत्क्रमण झालें—अन्यत्र सांपडणार नाहीं. कौसल्येसारखी उत्तम माता—जिनें १४ वर्षें वनवासाचे हाल सहन करून सुखरूप परत आलेल्या पुत्राचें मुख पहावें याच केवळ हेतूनें पतिनिधनानंतर प्राणधारण केलें—अन्यत्र सांपडणार नाहीं. श्रीरामासारखा राजा—जो प्रजेच्या समाधानाकरितां व लोकरंजनाकरितां जानकीत्यागास किंवा स्वप्राणदानास सुद्धां तयार झाला—अन्यत्र सांपडणार नाहीं. आणि अयोध्येंतील श्रीरामाच्या प्रजेसारखी प्रजाहि अन्यत्र सांपडणार नाहीं कीं जी केवळ आपल्या राजाच्या प्रीतीनें

घरदार, वित्त आणि आयुष्य यांचीहि परवा न करतां राजा रामचंद्राबरोबर स्वर्गारोहण करण्यास तयार झाली. भरतासारखा बंधु, सुग्रीवासारखा मित्र, हनुमानासारखा सेवक, व रावणासारखा शत्रुहि अन्यत्र सांपडणें कठीण. सारांश, सर्वच संबंध अतिशय उदात्त असे या अद्वितीय काव्यांत व कथेंत आले आहेत.

पण रामायणांतील पतिपत्नीच्या उदात्ततेची कल्पना सर्वाहून अतिशय उदात्त व कल्पनातीत आहे, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. श्रीराम व सीता यांच्या पतिपत्नीसंबंधाचें चित्र मनांत आणलें म्हणजे सर्व बाजूंनीं अत्यंत मनोहर व पवित्र असें चित्र आपल्या समोर उभें रहातें. शृंगाराची किंवा विलासाची झांकहि कोठें चुकून या चित्रांत दिसत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सीता म्हटली म्हणजे सीतामाई—मातोश्री सीता—अशीच भावना आपल्या हृदयांत जागृत होते. निरतिशय प्रेम आणि निरतिशय आदर हेंच सीतेच्या पत्नीत्वांत उत्कट दिसून येतें. पतिसमवेत अरण्य हाच स्वर्ग आणि पतिविरहित स्वर्ग हाच निरय अशी पत्नीत्वाची दिव्य कल्पना येथें आपल्यास मोहित करिते. पतीच्या पश्चात् अत्यंत कडकडीत ब्रह्मचर्य आणि सर्वसुखत्यागरूपी तप हेंच पत्नीचें कर्तव्य सीतेच्या चरित्रावरून दिसून येतें. पतिसमवेत असतां निरतिशय प्रेम व निरतिशय आदर हा स्त्रीचरित्राचा रम्य गाभा तिच्या चारित्रांत व्यक्त होतो. 'कातर्यादरविंदकुड्मलनिभो बद्धः प्रणामांजलिः' या चरणांत भवभूतीनें जें सुशील प्रेमळ व आज्ञाधारक पत्नीचें सुंदर शब्दचित्र रेखाटलें आहे, तेंच हिंदु स्त्रियांच्या हृत्पटलावर पूर्ण बिंबलें आहे. सारांश,

सीतेच्या व श्रीरामचंद्रांच्या पतिपत्नीत्वाच्या पवित्र कल्पनांनीं आमच्या हिंदु स्त्रियांचीं अंतःकरणें आज हजारों वर्षें भरलेलीं असून त्यांचें उदात्त आचरण, त्यांचें पत्नीत्वाच्या आचरणांतील समाधान, पतिप्रेम, पतीच्या दुःखाची समविभागिनी होण्याची त्यांची उत्सुकता, इत्यादि त्यांचे अनेक सद्गुण आपल्या हिंदुसमाजास भूषणभूत झाले आहेत. श्रीरामचंद्राचेंहि आचरण उत्तम पतीला साजेल असेंच होतें. अयोध्येंत आल्यानंतर सीतेचा त्याग हा एक वादग्रस्त विषय या संबंधांत आहे हें खरें; पण माझ्या मतें रामचंद्राचें आचरण येथेंहि उदात्तच ठरेल. आणि याची साक्ष, श्रीरामचंद्रानें सीतात्यागानंतर दुसरी पत्नी केली नाहीं. व 'अनन्यजानैः सैवासीद्भार्या तस्य हिरण्मयी' या कालिदासोक्तींत म्हटल्याप्रमाणें रामाच्या यज्ञसमयीं प्रत्यक्ष सीता भार्या सहधर्मचारिणी नव्हती तर तिचीच सोन्याची प्रतिकृती भार्या होती या एकाच गोष्टीनें पटणार आहे. पुराणांत वर्णन केलें आहे कीं, ब्रह्मदेवानें यज्ञसमयीं सावित्री वेळेवर आली नाहीं म्हणून दुसरी भार्या गायत्री तत्काळ केली ! पण रामचंद्रानें तसें केलें नाहीं. आपलें एकपत्नीत्व दीर्घ दुःखानेंहि ढळूं दिलें नाहीं. असो; कदाचित् रामाचें उत्तम पतित्व कोणी वादग्रस्त म्हणूं शकेल; पण सीतेचें उत्तम पत्नीत्व कोणासहि नाकारतां येणार नाहीं; आणि या उत्तम पत्नीचेंच पवित्र चरित्र आज हजारों वर्षें आमच्या हिंदु स्त्रियांस सन्मार्ग दाखवीत आहे.

वरील दृष्टीनें विचार करतां, आमच्या हिंदु स्त्रियांस— महाराष्ट्रांतील हिंदु स्त्रियांस—समग्र सीतारामचरित्र वाचकांच्या गोड गाण्यांत व छंदांत गातां यावें हा एक अति-

शय महत्त्वाचा लाभ होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. व याच कारणानें " झोंपाळ्यावरचें रामायण " जें रा. रा. व्यंकटेश धोंडदेव मराठे यांनीं रचून लोकांसमोर—विशेषतः आमच्या समाजांतील स्त्रियांसमोर—ठेवलें आहे, तें खरोखर अभिनंदनीय आहे यांत शंका नाहीं. स्त्रियांनीं झोंपाळ्यावर बसून एकटीनें किंवा अनेकींनीं तोंडपाठ किंवा पुस्तकावरून आपल्या विश्रांतीचे वेळीं हें काव्य गाण्यासारखें झालें आहें. यांतील वृत्त बायकांच्या नेहमींच्या म्हणण्यांतलें असून फार गोड आहे. अयोध्याकांडापासून पुढें कांहीं ओंव्या लांब चालीच्या म्हणजे २८ अक्षरी आहेत; परंतु त्याहि म्हणावयास गोड आहेत असें मी खात्रीनें म्हणूं शकतों. याच्यापुढें सुंदरकांडापासून २२ अक्षरी ओंव्या ग्रंथकर्त्यांनीं केल्या असून त्या स्त्रियांच्या नेहमींच्या ओंव्यांच्या धर्तीवर आहेत. तात्पर्य, या ग्रंथांतील वृत्त फारच गोड, व झोंपाळ्यावर म्हणण्यासारखें खरोखरच झालें आहे. याची भाषाहि गोड, सोपी, आणि भारदस्त अशीच आहे. त्यांत कृत्रिमपणा कोठेंच दिसत नाहीं. अश्लीलपणाहि कोठें नाहीं. स्त्रियांनीं उच्चारूं नये अगर उच्चारण्यास अडखळावें असे शब्दहि यांत नाहींत. एकाद्या ठिकाणीं क्वचित् एखादा शब्द चुकून राहिला आहे, त्याची दुरुस्ती ग्रंथकर्त्यांनीं दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं करावी. आणि तशी ती त्यांना सहज करतां येण्यासारखी आहे.

तिसरा मुद्दा विषयाचा. तो तर अतिशय, उदात्त आहे असें मीं आरंभींच म्हटलें आहे. श्रीरामकथेंतील अतिशय सुंदर भाग मूळ कथेंतील मुख्य मुख्य मुद्द्यांसह यांत आले असून ते सर्व स्त्रियांस माहित असावे असेच आहेत.

आणि वर्णनें व भाषणेंहि फारच मार्मिक, सुंदर व नवीन कल्पनांनीं सजविलेलीं अशीं आहेत, व तींहि स्त्रियांच्या पाठांत येण्यायोग्य आहेत. वाल्मीकि वगैरे संस्कृत व एकनाथ तुळसीदास रामदास वगैरे प्राकृत कवींनंतर रामायणांत नवीन कल्पना घालणें किती कठीण आहे याचा विचार केला म्हणजे ग्रंथकर्ता आपल्या बुद्धीनें लिहूं लागला म्हणजे कांहीं तरी नवीन लिहूं शकतो, ही गोष्ट या ग्रंथावरून वाचकांच्या प्रत्ययास येईल. उदाहरणार्थ, या ग्रंथांतील अंगदाचें शिष्टाईचें भाषण नवीन व जोरदार असें आहे. (पान ९५) याचप्रमाणें अरण्यकांडांतील सीतेचें व लक्ष्मणाचें भाषण. तसेंच श्रीरामाचा क्रोध व लक्ष्मणाचें शांतवनही (पान ३४-४०) नवीन व वाचनीय झालें आहे. सारांश, विषयविवेचन वर्णनें व भाषणें या बाजूनें तर हा ग्रंथ फार मनोरम झाला आहेच, पण विशेषत: स्त्रियांना हा ग्रंथ म्हणतां यावा व उपयोगी पडावा हा जो ग्रंथकर्त्याचा मुख्य हेतु त्या हेतूप्रमाणेंहि पहातां हा ग्रंथ वाचनीय व संग्रहणीय झाला आहे असें मला निःसंशय वाटतें.

तथापि, माझ्यामतें ज्या कांहीं उणीवा या ग्रंथांत आहेत त्यांचाहि निर्देश येथें करणें जरूर आहे. त्यांचा विचार पुढील आवृत्तीच्या वेळीं ग्रंथकर्त्यांनीं जरूर करावा. अशी त्यांस माझी सूचना आहे. पहिली गोष्ट अशी कीं, ग्रंथकर्ता कांहीं ठिकाणीं आपलें अस्तित्व स्पष्टपणें दर्शवीत आहे, आपल्या अडचणी, आपल्या उणीवा दाखवीत आहे, तें मला वाटतें नको होतें. उदाहरणार्थ, रामायणनिरीक्षणांत 'प्रास्ताविक विचार' किंवा 'श्रोत्यांस विनंती' हे विचार मुळींच आले नसते तर बरें होतें. सदर निरीक्षणांत दर्श-

रथादि निरनिराळ्या विभूतींचें गुणदोषवर्णन केलें आहे तें योग्य, सुंदर, कित्येक ठिकाणीं नवीन कल्पनांनीं सजविलेलें असें आहे, आणि तें स्त्रियांस जाणण्यायोग्य असेंच आहे. अशा प्रकारची चर्चा स्त्रियांनीं ऐकावी व करावी. सद्गुण कोणते, दुर्गुण कोणते. हें समजून घ्यावें, यांत माझा मतभेद नाहीं. पण हें करतांना ग्रंथकर्त्यानें आपलें अस्तित्व मुळींच न दाखवितां एकदम विषयास सुरवात करावयास पाहिजे होती असें मला वाटतें.

दुसरी गोष्ट अशी कीं, बालकांड, अयोध्याकांड, वगैरे कांडें थोडक्यांत वर्णिलीं असून युद्धकांड मात्र इतकें कां लांबलें हें ध्यानांत येत नाहीं. शूरवीरांना प्रोत्साहन देण्यासाठीं रामायणमहाभारतांतील युद्धवर्णनें फारच उपयोगी आहेत हें खरें, पण स्त्रियांकरितां म्हणून रचलेल्या या ग्रंथांत ग्रंथकर्त्यास हा भाग बराच कमी व योग्य प्रमाणांत वर्णितां आला असता असें मला वाटतें. पळपुट्या वानरसेनेला अंगदाचें प्रोत्साहन व रावणाचा आपल्या राक्षसांवरील राग हे भाग स्त्रियांकरतां रचलेल्या या ग्रंथांत फारसे शोभत नाहींत.

तिसरी व शेवटची गोष्ट अशी कीं, वाल्मीकिरामायणांतील कांहीं कांहीं अतिसरस भाषणें मला या ग्रंथांत कोठें दिसलीं नाहींत. स्त्रियांकरतां रचलेल्या या ग्रंथांत वाल्मीकी रामायणांतील सीतेच्या अत्युदात्त भाषणांपैकीं पुढील तीन भाषणें जरूर यावयास पाहिजे होतीं. पहिलें भाषण अयोध्याकांडांतील. रामाला वनवासाची आज्ञा झाल्यावर तो सीतेस भेटून तिचें मन अरण्यांतील भयंकर आपत्तींकडे लक्ष देऊन तिकडे न येण्याबद्दल वळविण्याचा प्रयत्न करतो, त्या वेळचें सीतेचें भाषण पतिव्रता स्त्रियांस--सर्व पतीचीं संकटें

सहभागित्वानें सोसण्यास तयार असणाऱ्या हिंदु स्त्रियांस-साजेल व प्रोत्साहन देईल असें आहे. तें या ग्रंथांत याव-यास पाहिजे होतें. दुसरें, युद्धकांडाच्या अंतीं, सीतेला सो-डवून आणल्यावर जेव्हां श्रीरामानें 'तूं पाहिजे तिकडे जा' असा कठोर निरोप तिला पाठविला, त्या वेळेस सीतेनें जें सणसणीत उत्तर दिलें तें पतिव्रता स्त्रीस व आर्यस्वभावास अनु-सरून आहे. अलीकडल्या मराठी कवींनीं भारती स्त्रियांस फारच नम्र केल्या आहेत. परंतु महाभारत व रामायणांत त्या तशा दिसत नाहींत. त्यांच्या अंगीं स्वतंत्रतेचें तेज पातिव्रत्य धर्मा-ला अनुकूलच असें दिसतें. कालिदासानें शकुंतलेला आप-ल्या नाटकांत अगदींच गरीब करून सोडली आहे. दुष्यं-तानें झिडकारल्याबरोबर ती मूर्च्छित होते. पण व्यासांची शकुंतला निराळी. तिनें लागलीच राजाची त्याच्या अस-त्यतेबद्दल कानउघाडणी केली, आणि 'सत्य पुत्राहूनहि श्रेष्ठ आहे' असें सांगून पुत्रास टाकून ती अरण्यांत तपश्चर्ये-साठीं जाऊं लागली ! द्रौपदी रुक्मिणी इत्यादि स्त्रिया पति-व्रता असून तेजस्वी आहेत. रामायणांत वाल्मीकींनीं या ठिकाणीं सीतेची तेजस्विता तिच्या भाषणानें व्यक्त केली आहे. तेंहि भाषण या ग्रंथांत अवश्य असावयास पाहिजे होतें. आणि, सीतेचें तिसरें भाषण, जेव्हां रामानें लोकाप-वादास भिऊन सीतेचा त्याग करून तिला गंगापार केली, त्या वेळचा तिनें लक्ष्मणाबरोबर रामास पाठविलेला निरो-पही या ग्रंथांत अवश्य हवा होता. 'वाच्यस्त्वया मद्वच-नात्स राजा' इत्यादि कालिदासाचे उद्गार कोणास आठवत नाहींत व कोणाच्या डोळ्यांत आंसवें आणीत नाहींत? सीतेचें चरित्र व स्वभावोदात्तत्व तिच्या अनेक भाषणांनीं

व्यक्त करावयास हवें. किंबहुना सीतेनें पृथ्वीच्या पोटांत जेव्हां स्वतांस गडप करून घेतलें तेव्हांचेंहि तिचें भाषण थोडकेंच पण मार्मिक आहे, तेंहि या ग्रंथांत असावयास पाहिजे होतें.

आतां मूळ कथेच्या फेरफारासंबंधानें विचार करूं. हे फेरफार तर मूळ वाल्मीकीच्या कथेंत भवभूती कालिदास वगैरे कवींनीं व एकनाथ तुळसीदास वगैरे संतांनीं ठिकठिकाणीं केले असून कोठें कोठें कथेंत भरहि टाकली आहे. पण यांत वावगें असें कोठेंच झालेलें दिसत नाहीं. मूळकथेच्या उदात्तत्वांत न्यूनता न येईल असा फेरफार करणें क्षम्य आहे. कदाचित् ऐतिहासिकदृष्ट्या असे फेरफार चिंत्य असतील, पण नीतीच्या किंवा भक्तीच्या परिपोषांत त्यामुळें कमीपणा येत नसल्यामुळें ते करण्यास प्रत्यवाय नाहीं. याचीं २।३ उदाहरणें देऊं. मूळ वाल्मीकिरामायणांत भरत आणि शत्रुघ्न हे सख्खे भाऊ नसून लक्ष्मण आणि शत्रुघ्न हे सख्खे भाऊ होत असें वर्णन आहे. कैकयीचा भाग घारीनें नेला ही कथा वाल्मीकीरामायणांत नाहीं. ती मागूनची असून त्या पायसभागानें मारुती जन्मास आला. या कथेंतहि कांहीं वावगें नाहीं. हीच कथा या ग्रन्थांत ग्रन्थकर्त्यानें ठेविली आहे. तसेंच. सुलोचनेची कथा वाल्मीकिरामायणांत मुळींच नाहीं. ती अर्वाचीन संतकवींनीं दिली असून सुलोचना ही एक उत्तम विभूति रामायणांत नवीन घातली आहे. त्यांतहि वावगें कांहीं नाहीं. सुलोचनेच्या आग्रहावरून इंद्रजिताचें शिर प्रथम मुळींच हंसेना. पण शेवटीं " जर हें मला ठाऊक असतें तर मीं आपल्या पित्याला आपल्या साहाय्यास बोलावलें असतें." असें तिनें

म्हणतांच शिर हंसलें अशी रम्य कथा एके ठिकाणीं आहे. प्रस्तुत ग्रंथांत ग्रंथकर्त्यांनीं ती तशी दिली नसून हंसण्याचा चमत्कार निराळ्या रीतीनें वर्णिला आहे, व त्यांतहि कांहीं वावगें नाहीं. श्रीरामकथेंत वाल्मीकींच्या वेळेपासून कित्येक फरक झाले आहेत ते कथेच्या उदात्तत्वाला पोषकच असल्यामुळें त्याविषयीं नापसंती दर्शविण्याचें कांहीं कारण नाहीं. असो.

शेवटीं, निरनिराळ्या व्यक्तींच्या स्वभावाचें व गुणदोषाचें जें उद्घाटण या ग्रन्थांत निरीक्षणभागांत केलें आहे तें सर्वच मार्मिक व स्त्रियांस अवश्य वाचण्यासारखें आहे हें मीं पूर्वीं म्हटलेंच आहे. त्यांतील कांहीं मुद्दे किंवा मतें भिन्न दृष्टींना पसंत पडणार नाहींत तथापि एकंदरींत ते मुद्दे नवीन व मौजेचे आहेत. एकाच मुद्द्यासंबंधानें माझा मतभेद मी शेवटीं नमूद करतों. श्रीरामाच्या चरित्राला वालीवधाचा कलंक आहे कीं नाहीं हा मुद्दा नेहमीं वादग्रस्त वाटतो, पण त्याचा निकाल माझ्या मतें महाभारतकार व्यासांनीं केला आहे. धर्मानें द्रोणाचा वध करविला ही जशी त्याच्या चरित्रावर काळिमा आली, तशीच श्रीरामाच्या अत्युदात्त चरित्रावर वालीवधाची काळिमा आहेच. आणि व्यासांनीं धर्माला या बाबतींत गर्हत्व 'रामो वालिवधादिव' आलें असें स्पष्ट म्हटलें आहे. रामाच्या म्हणण्याप्रमाणें वाली अपराधी होता. पातकी होता. आणि तो सुग्रीवाचा शत्रु—म्हणजे मित्रशत्रु—असल्यानें राजकीयदृष्ट्या त्याचा स्वतःचाहि शत्रु होता हें उघड आहे. पण दोन्हीहि परिस्थितींत त्यानें त्याला जागें करून मारिलें पाहिजे होतें. आडून मारणें योग्य नव्हतें. अपराध्याला मुद्दां जागें

करून ' तूं अमुक गुन्हा केलास तुझें काय म्हणणें आहे?" असें विचारावें लागतें; आणि शत्रूस तर समोर उभें राहून लढाई पुकारून त्याजवर हल्ला करावा लागतो. तसें येथें झालें नाहीं हें म्हणणें निरुत्तर आहे. पण ' एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः " या न्यायानें त्याचेकडे पहाणें नाहीं. किंबहुना हा कलंक श्रीरामाच्या एकंदर गुणचंद्राला शोभाच देतो. जसें एखाद्या स्त्रीच्या मुखचंद्राला तिच्या हनुवटीवर असलेला लहान काळा तीळ अथवा गोंदण्याचा डाग अथवा लहानशी मुसुरी शोभाच देते, त्याप्रमाणें श्रीरामाच्या एकंदर चंद्रिकाधवल चरित्राला हा वालिवधाचा एकटा दोष शोभाच देतो. प्रत्यक्ष देव आणि मनुष्यस्वभावाचा अवतार यांतील अंतर तें हेंच. काय रामाला समोरासमोर वालीला ठार मारतां नसतें आलें? तें मुळींच अशक्य नव्हतें. पण त्याच्या मनांत सुग्रीवाकडूनच त्याचें पारिपत्य करावयाचें होतें, आणि त्या झगड्यांत जेव्हां सुग्रीवाची बाजू पडलीशी दिसली, तेव्हां मनुष्यस्वभावाचें खरें चित्र रेखाटण्याकरितां, अत्युदात्त चरित्राच्या पुरुषालाहि घाईच्या प्रसंगीं स्वार्थ कसा बाजूला नेतो, हें यांत प्रभूंना दाखवावयाचें होतें. कदाचित् सुग्रीव या झटक्यांत मरेल या शंकेनें रामानें अवचित बाण मारून वालीस यमलोकास पाठविलें असेल.

असो; रामकथा किती मधुर आहे. सीताचरित्र किती रम्य आहे, दशरथ कौसल्या भरत लक्ष्मण इत्यादि उदार विभूतींनीं आपापले धर्म कसे निस्सीम पाळले, वगैरे हकीकत स्त्रियांच्या रम्य व गोड वृत्तांत या ग्रन्थांत वर्णिलेली स्त्रियांस अतिशय प्रिय होईल अशी मला आशा आहे. हा ग्रन्थ स्त्रियांना फार

आवडेल असा निःसंशय अंदाज आहे. सीतेनें लहानपणीं शिवधनुष्याचा घोडा केला हें जरी वाल्मीकी रामायणांत नाहीं, तरी सीता लग्नांत मोठी होती ही गोष्ट येथें ग्रन्थकर्त्यानें मान्य केली आहे. तसेंच, लग्नांत मुलगी कितपत मोठी अगर लहान असावी, याबद्दल जें मार्मिक विवेचन प्रस्तुत ग्रन्थांत केलें आहे, प्रौढ बाळपत्नीचे जे गुणदोष सांगितले आहेत, ते व इतर अनेक विचार स्त्रियांस पटतील. यांतील भाषा, यांतिल शब्दांची पुनरुक्ति सुद्धां उदात्त ग्रन्थास साजेशी असून वाचकांस गोड वाटेल असें मला वाटतें. हा ग्रंथ लोकादरास पात्र होईल अशी माझी खात्री आहे.

चिंतामण विनायक वैद्य.

# ग्रंथकर्त्याचें हृद्गत.

(१) **ग्रंथरचनेचा इतिहास**—मला तो दिवस अजून चांगला आठवतो. सुमारें ५ वर्षें झालीं. मी त्या वेळीं पुणें येथील वैद्यक पाठशाळेंत शिकत असून मे महिन्याच्या सुटींत घरीं कोंकणांत गेलों होतों. सकाळीं सुमारें आठ वाजण्याची वेळ. मी ओटीवर कायसें वाचीत बसलों असून समोर आमच्या घरांतील कांहीं मुली झोंपाळ्यावर बसून ओंव्या गात होत्या. गातां गातां रामकाकांची मुलगी सुंद्री 'देव झाले ग सुभद्रा' ही ओंवी घोळून घोळून गाऊं लागली. इतक्यांत काय असेल तें असो, माझें मन माझ्या पुस्तकावरून चटकन् तिकडे वेधलें गेलें! मीं यापूर्वीं झोंपाळ्यावरच्या ओंव्या कधीं ऐकिल्या नव्हत्या असें नाहीं, अगर उपरिनिर्दिष्ट ओंवींत कांहीं विशेष गूढ अर्थ भरला होता असेंहि नाहीं. पण सकाळची ती प्रशांत वेळ, व पोरीचा गोड व प्रेमळ आवाज यांच्या सुंदर मिलाफामुळेंच कीं काय कोण जाणे, माझें मन त्या ओंवीवर अगदीं तल्लीन झालें. याच चालीवर आपणहि कांहीं ओंव्या रचाव्या अशी अत्यंत प्रबळ इच्छा व स्फूर्ति तत्काळ मनामध्यें उत्पन्न झाली, आणि त्याबरोबर, सदर ओंव्या कोणत्या विषयावर, कोणाकरितां व किती रचावयाच्या, त्या छापावयाच्या कीं नाहीं इत्यादि बाबींचा विचार करण्यास बिलकुल न थांबतां मी एकदम गाऊंहि लागलों! कविता गाण्यांत मी अगदींच अनभ्यस्त होतों असें नाहीं. आर्या,

श्लोक, संवाद, फटके, आरत्या, इत्यादि वृत्तांत माझी बरीच कविता यापूर्वीहि टोपण अगर खऱ्या नांवानें निरनिराळ्या मराठी वृत्तपत्रांतून व मासिकांतून प्रसिद्ध झाली होती. पण ओंवीवृत्तांत रचना करण्याचा मात्र माझा हा पहिलाच प्रयत्न होता. झालें; ओंव्या रचायला मीं प्रारंभ केला, व प्रथम कांहीं देवतानमनपर ओंव्या रचल्या. त्यानें समाधान होईना. तेव्हां 'द्यूतविनोदा'वर ३०।४० ओंव्या रचल्या. तरी पण त्यानेंहि समाधान होईना. मग काय कारण झालें कोणास ठाऊक, एकदम श्रीरामचरित्रावर थोड्या ओंव्या रचाव्या अशी इच्छा मला झाली, व त्याप्रमाणें रचनाहि मी करूं लागलों. प्रथम सबंध रामायणावर एकंदर ३००।४०० ओंव्या रचाव्या असा बेत होता. पण पुढें तो बेत बदलून प्रत्येक कांडावर सुमारें १००-१५० ओंव्या रचावयाच्या असा बेत धरला, व तो पहिल्या ४ कांडांत बहुतेक अमलांतहि आणला. परंतु याहीपुढें रचनासौकर्य जसजसें वाढूं लागलें, श्रीरामचरित्रांत मति जसजशी अधिकाधिक गुंग होऊं लागली, व प्रस्तुत ग्रंथ छापण्याची शक्यता व इष्टता मनाला जसजशी पटूं लागली, तसतशी ओंव्यांच्या संख्येची संकल्पित मर्यादा अजिबात सुटून एकंदर ओंवीसंख्या अखेर ४५०० जवळ जवळ गेली! तथापि ओंवीसंख्या शक्य तितकी मर्यादित करण्याचा माझा प्रयत्न एकसारखा चालूच होता.

(२) **ग्रंथरचनेचा हेतु**—श्रीरामकथेवर असंभाव्य आख्यायिका, कोट्या, नकला, इत्यादि अनेकरूपांनीं चढलेला गंज काढून टाकून त्या कथेंतील मुख्य मुख्य विभूतींचीं शब्दचित्रें, त्यांच्या मूळच्या उज्ज्वल व ऐतिहासिक स्वरू-

पांत, मुख्यतः वाल्मीकिरामायणाला धरून पण स्वतंत्ररीतीनें, स्वतःच्या शब्दांत, भाविक पण आधुनिक काळाला रुचेल व पटेल अशा विचारसरणीनें, प्रौढ सोप्या स्पष्ट व उठावदार भाषेंत थोडक्यांत पण यथातथ्य रीतीनें रेखाटणें, आणि त्याचप्रमाणें श्रीमद्रामायणासंबंधीं सामान्य लोकांच्या मनांत असलेल्या विचारांत थोडीफार नाजुक तऱ्हेची खळबळ उडवून देऊन त्या विचारांना किंचित् नवीन व प्रस्तुत परिस्थितीला इष्ट असें वळण लावणें. हा दुहेरी उद्देश मूळपासूनच माझे दृष्टीसमोर होता असें नाहीं, पण पुढें पुढें सदर ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ठरल्यापासून तो उद्देश दृष्टीपुढें ठेवून अखेरपर्यंत मी रचना करीत गेलों.

(३) **ग्रंथाचें अंतरंग**---आतां वरील उद्देश साधण्याकरितां व श्रीरामकथेंतील महत्त्वाचा सर्व भाग थोडक्यांत आणण्याकरितां मला मूळकथेंत क्वचित् ठिकाणीं थोडा फरक करावा लागला आहे. उदाहरणार्थ, बिभीषणाची श्रीरामचंद्राशीं भेट वास्तविक अंगदशिष्टाईपूर्वी झाली असून ती त्या शिष्टाईनंतर झाल्याचें या ग्रंथांत दर्शविलें आहे, आणि ग्रंथरचनेच्या सोईसाठीं केलेला हा किंचित् कालविपर्यास पुढें युद्धकांडाचे अखेरीस पुष्पकविमानस्थ श्रीसीतारामचंद्रांच्या भाषणांत खरा प्रकार वर्णून तेथें दुरुस्त केला आहे. तसेंच, लक्ष्मणाला मूर्च्छित केल्यानंतर रावण लंकेंत परत गेला व पुन्हां दुसरे दिवशीं युद्धाला आला अशी वास्तविक मूळकथा असून, ग्रंथरचनेच्या सोईसाठीं, लक्ष्मण शुद्धीवर येईपर्यंत रावण एक रात्रभर रणांगणावरच एकीकडे आपल्या रथांत मूर्च्छित पडला होता असें या ग्रंथांत दाखविलें आहे. युद्धप्रसंग व संभाषणप्रसंगहि मीं बहुतेक

स्वतःच्या शब्दांनींच वर्णिले आहेत. अगदीं मूळ शब्दाला प्रतिशब्द व मूळ वाक्याला प्रतिवाक्य देऊन निवळ भाषांतर करण्याचें काम मीं पत्करिलें नाहीं, व तसें यापूर्वीहि कोणत्याच मराठी कवीनें पत्करल्याचें मला माहित नाहीं. परंतु, अशा रीतीनें हे प्रसंग मी वर्णित असतां, मूळ वाल्मीकिरामायणांतील, किंबहुना श्रीमद्भावार्थरामायण, श्रीरामविजय, इत्यादि प्राकृत ग्रंथांतीलहि विचारांची व वर्णनशैलीची स्पष्ट छटा माझ्या ग्रंथावर पडावी अशी मीं खबरदारी घेतली आहे. माझा क्रम असा असे कीं, प्रथम सटीक वाल्मीकिरामायणांतील सुमारें ५०।७५ पानें वाचावयाचीं. लगेच त्याच कथानकाचीं श्रीभावार्थरामायणांतील सुमारें १२५।१५० पानें वाचावयाचीं, आणि मग दोन्ही ग्रंथ बाजूस ठेवून, त्यांतून घेतलेल्या टिपणांच्या आधारावर स्वतःच्या शब्दांत ग्रंथरचना करावयाची. असो; आतां या ग्रंथाचे दुसरे सांगण्यासारखे किरकोळ विशेष म्हटले म्हणजे सीतेच्या लग्नमंडपांत रावणाचें आगमन, लवकुशांचें श्रीरामाशीं युद्ध, अहीमहींची व सहस्रमुखी रावणाची कथा इत्यादि कथानकांचे बाबतींत मीं मूळ वाल्मीकिरामायणाचाच अनुवाद केला आहे. म्हणजे हे प्रसंग मीं वर्णिले नाहींत. सेतुबंधकथेचा फक्त ३।४ ओंव्यांत उल्लेख केला आहे. रावणाच्या सेनापतींच्या वानरांशीं झालेल्या युद्धाची हकीकत १०।१५ ओंव्यांत आणिली आहे. महात्म्या रावणाचें शब्दचित्र, प्राकृत ग्रंथांतून जवळ जवळ नष्ट झालेलें श्रीरामकथेचें ऐतिहासिकत्व पुन्हां स्पष्ट करण्याकरितां, वाल्मीकीरामायणाच्या आधारानेंच पण मूळापेक्षांहि किंचित् जास्त भडक रंगांत रेखाटण्याचा प्रयत्न केला

आहे. भगवती सीतादेवीचें शब्दचित्र, एक अलौकिक तेजस्वी राजकारणी व पतिव्रता स्त्री या नात्यानें जरी सुंदरकांडांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, तरी उत्तम आदर्शभूत गृहिणी या नात्यानें तिचें शब्दचित्र मात्र या ग्रंथांत चांगलेंसें रेखाटलें गेलें नाहीं याबद्दल फार वाईट वाटतें. मुळीं ज्या कांडांत हें चित्र रेखाटावयाचें तीं कांडेंच-म्हणजे अयोध्याकांड व उत्तरकांड-ग्रंथ लवकर आटपण्याच्या माझ्या बेसुमार घाईमुळें अगदीं त्रोटक रीतीनें वर्णिलीं गेलीं. पण त्याला माझा इलाज नव्हता. आधुनिक मराठी कवितेच्या हल्लींच्या पोरक्या व निराश्रित अवस्थेंत, अगोदरच माझ्या मतें बराच विस्तृत झालेला हा ग्रंथ आणखी जास्त विस्तृत करण्यास माझें मन घेईना. व असा या ग्रंथाचा विस्तार झाला तर महाराष्ट्र त्याचा आदर करील, व माझा व्यवहारदृष्ट्या फायदा नाहीं तर नाहीं; पण नुकसान तरी होऊं देणार नाहीं असा मला भरंवसा वाटेना. अशा स्थितींत, एकाद्या बुभुक्षित मनुष्याला त्याचें जेवण पुरें होण्याच्या आधींच निर्दयपणें पंचपक्वान्नांनीं भरलेल्या पानावरून ओढावें त्याप्रमाणें निष्ठुर वस्तुस्थितीनें माझी अवस्था केली व त्यामुळें रामायणांतील कांहीं कांहीं विचाररत्नें-विशेषतः श्रीसीताचरित्र-या ग्रन्थांत योग्य रीतीनें गोंवण्याचीं राहिलीं. ग्रन्थाच्या दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास अयोध्याकांड व उत्तरकांड कदाचित् पुन्हां लिहिण्याचा मी प्रयत्न करीन.

( ४ ) **ग्रंथाचें बहिरंग**—या ग्रन्थांत ठिकठिकाणीं समर्पक चित्रें घालून, कागद जास्त चांगला वापरून, व इतरहि अनेक रीतींनीं हल्लींचाच मजकूर अधिक चित्ताकर्षक करण्याचा पूर्वीं माझा बेत होता. पण प्रस्तुतच्या

विलक्षण महर्गतेमुळें तसें करणें शक्य झालें नाहीं. प्रभूनें जास्त चांगले दिवस दाखविल्यास पुढील आवृत्तीच्या वेळीं या बाबतींत पुष्कळ सुधारणा करतां येईल.

( ५ ) **आभारप्रदर्शन**—रावबहादुर चिंतामणराव वैद्य या थोर व विद्वान् गृहस्थांनीं—त्यांची माझी पूर्वींची बिलकुल ओळख नसतांहि—सदर ग्रन्थ छापून झाल्यावर लक्षपूर्वक वाचून पाहिला, आपला अमूल्य वेळ मोडून माझे विनंतीवरून त्याला प्रस्तावना लिहून दिली, व इतरहि अनेक अत्यंत मार्मिक व उपयुक्त सूचना केल्या, याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें. तसेंच, रा. रा. रामकृष्णपंत पराडकर, (पुणें, प्रिंटिंग एजन्सीचे मालक), यांनीं ग्रन्थमुद्रणाच्या व प्रकाशनाच्या व्यवहारांत मला केवळ बंधुभावानें निरपेक्ष व बहुमोल मदत केली, याबद्दल त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य आहे. आणि नवीन 'हनुमान' छापखान्याचे मालक रा. कोकाटे व त्यांच्या छापखान्यांतील मंडळीं यांनीं या ग्रन्थाच्या छपाईचें काम मोठ्या आवडीनें व शक्य तितक्या लवकर करून दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मला मानिले पाहिजेत. खरोखर आज जवळ जवळ २॥ वर्षे मजजवळ पडून हा रामकथाग्रन्थ शेवटीं या बाल हनुमानानेंच मस्तकीं धारण करून जगापुढें आणावा हा योगायोग जसा अपूर्व तसाच मला स्वतःला आल्हादकारकहि वाटल्यावांचून राहिला नाहीं.

झालें ! माझें हृद्गत संपलें ! काय माझी पूर्वपुण्याई होती न कळे कीं त्यामुळें सदर ग्रन्थ अगदीं अनपेक्षित रीतीनें माझे हातून लिहिला जाऊन महाराष्ट्रीय बंधुभगिनींची व महाराष्ट्रभाषेची थोडी तरी सेवा या जन्मीं घडली. का-

रण, श्रीरामकथेची व कविता रचण्याची गोडी जरी मला पूर्वीपासून होती व आहे, तरी माझा व्यवसाय व माझे भोंवतालची परिस्थिति हीं काव्यरचनेला मुळींच अनुकूल नाहींत, उलट प्रतिकूळ आहेत. आणि त्यामुळें काव्यरचनेचा माझा प्रस्तुतचा प्रयत्न जसा पहिला तसाच शेवटचाहि होतो कीं काय अशी मला भीति वाटते. तरी माझ्या प्रिय बंधु-भगिनींना—विशेषतः भगिनींना—माझी एवढीच विनंति आहे कीं, या ग्रन्थांत जे कांहीं थोडे गुण असतील त्यांचा त्यांनीं हंसक्षीरन्यायानें स्वीकार करून दोषांकडे क्षमादृष्टीनें पहावें. पूर्ण असें या जगांत कांहींच नाहीं. तेव्हां या ग्रंथांतहि कळून अगर न कळत बरेच दोष राहिले असतील. तरी पण हा ग्रंथ लिहिण्यांत असलेला माझा शुद्ध व उदात्त हेतु ध्यानांत आणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष्य करावें. शेवटीं, भगवान् वाल्मीकी महर्षींच्या मुखगंगेंतून स्रवलेलें हें रामकथामृत महाराष्ट्रभाषेच्या सुवर्णकलशांतून रसिकांना पाजण्याचें महद्भाग्य ज्या प्रभूच्या कृपेनें माझ्या वांट्यास आलें, त्या परममंगल, परमकारुणिक श्रीरामचंद्राच्या चरणीं शतशः प्रणाम करून मी आपल्या प्रिय वाचकांची—अथवा हा श्राव्यग्रन्थ असल्यामुळें श्रोत्यांची—रजा घेतों.

व्यंकटेश धोंडदेव मराठे.

# अनुक्रमणिका


## १ बालकांड — पृष्ठांक १–१८

संतनमन १–२ कथारंभ २–३ रामजन्म ३–४ रघुकुमारांचें बाळपण ४–५ विश्वामित्राची मागणी ५ ताटिकावध व अस्त्रप्राप्ति ५–६ विश्वामित्र यज्ञरक्षण ६–७ अहल्येची कथा ७ अहल्येचीं शापमुक्तता ८ सीतेचा लग्नमंडप ८–९ सीतेचा वृत्तांत व धनुर्भंग ९–११ सीतेचा लग्नसमारंभ ११–१२ लग्नांतील मानपान १२ वरात १३–१४ क्षत्रकुळकाळ परशुराम व दाशरथी राम १४–१७ परशुरामांचें प्रयाण व वरातीची सुटका १७–१८.

## २ अयोध्याकांड — १९–२६

श्रीसीतारामचंद्राचें अयोध्येस आगमन १९–२० श्रीरामाचा राज्याभिषेकसमारंभ २० मंथरेची कैकेयीला चिथावणी २०–२१ कैकयीचा स्वार्थी जळफळाट २१ दशरथाची तळमळ व वचनबद्धता २१–२२ रामा! वनासी तूं जावें २२ लक्ष्मणाचा संताप व त्याची समजूत २२–२३ कौसल्येचें भोळें पुत्रवात्सल्य २३ अप्रतिम धैर्यशाली सुमित्रा २३ रामाचें वनवासगमन २३–२४ भरताचें अयोध्येस आगमन व शोक २४–२५ चित्रकूटीं भरतभेट २५–२६.

## ३ अरण्यकांड — २७–३९

श्रीरामाचें पंचवटीस गमन २७ शूर्पणखेची प्रेमकहाणी २७ शूर्पणखेची रावणाला चिथावणी २८ मायामृग २८ सीतेचा हट्ट २९ मायामृगाचें कपट २९ सीतेचा उतावीळपणा ३० लक्ष्मणाचा शांतपणाचा युक्तिवाद ३० सीतेनें केलेली लक्ष्मणाची निर्भर्त्सना ३०–३१ लक्ष्मणाचें खोंचदार उत्तर व प्रयाण ३१ रावणाचें आगमन ३२ भिक्षुरूपी रावणाची पृच्छा ३२ रावणाची दर्पोक्ति ३३ सीतेचें बाणेदार उत्तर ३३ सीताहरण व जटायूचा पराक्रम ३४ श्रीरामाचा शोक ३५–३६ श्रीरामाचा क्रोध व त्याचें सांत्वन ३६–३७ सीतेची वार्ता ३७ कबंध राक्षस व त्याचा सल्ला ३७–३८ पंपासरोवर ३८–३९.

## ४ किष्किंधाकांड — ४०–५३

पंपातीरावर श्रीरामलक्ष्मण ४०-४२ किष्किंधेचें राजकारण ४२-५३.

## ५ सुंदरकांड-पूर्वार्ध — ५४–७०

अशोकवनस्थ सीतादेवी ५४–५७ सीतेचें शोकगीत ५७–५८ सीतामुद्रिकासंवाद ५८–६० शिंशपावृक्षाचें गायन ६०–६१ सीतेची मारुतीशीं भेट ६१–६८ मारुतीचें लंकेंत प्रयाण ६८–७०.

## ६ सुंदरकांड-उत्तरार्ध — पृष्ठांक ७०-८४

मारुतीचें लंकानिरीक्षण ७०-७३ मारुतीच्या सहजलीला व राक्षसांशीं युद्ध ७३-७८ रावणसभेंत मारुती ७८-८० लंकादहन ८०-८२ मारुतीचें महेंद्र पर्वतावर प्रयाण ८३ श्रीराममारुतिभेट ८४.

## ७ युद्धकांड-पूर्वार्ध — ८५-१०९

प्रास्ताविक विचार ८५-९० अंगदशिष्टाई ९०-१०९.

## ८ युद्धकांड-उत्तरार्ध — १०९-२३०

लंकेवर हल्ला १०९-११२ इंद्रजितकृत नागपाशबंधन ११२-११६ दैत्यसेनापतींचा वध ११६-११७ कुंभकर्णाचा वध ११७-११८ इंद्रजिताचा अभिचारिक यज्ञ ११८-१२२ दुरात्मा इंद्रजित व महात्मा लक्ष्मण १२२-१२९ महासती सुलोचना १२९-१४९ रावणपर्व १४९-२१५ [ रावणाचें सैनिकांना प्रोत्साहन १५१-१५८ रावणास युद्धप्रयाणकाळीं अपशकुन १५८-१६२ रावणाचें युद्धाला प्रयाण १६३ वानरराक्षसांची सलामी १६३-१६५ रणभूमीवर रावणाचें आगमन १६५-१६७ अंगदाचें पळपुट्या वानरसेनेला प्रोत्साहन १६७-१६९ अंगद—रावण—युद्ध १७०-१७२ सुग्रीव—रावणाचें द्वंद्वयुद्ध १७२-१७६ रावणानें केलेली सुग्रीवाची निर्भर्त्सना १७६-१७७ रामरावणांची पहिली सलामी १७७-१८२ मयासुरदत्त शक्तीचा प्रयोग १८२-१८४ लक्ष्मणाची मूर्च्छा १८४-१८७ लक्ष्मणाची मूर्च्छा व प्रभूंचा विलाप १८७-१९१ लक्ष्मणाची मूर्च्छा व सुषेणाचा धीर १९१-१९२ द्रोणागिरीचें उच्चाटण! १९२-१९५ मारुतीचें द्रोणागिरिसह आगमन १९५-१९६ लक्ष्मणास शुद्धि १९६-१९७ रावणमूर्च्छानिवारण १९७ रावणानें केलेली सारथ्याची निर्भर्त्सना व त्याचें उत्तर १९७-२०१ रावणाचा निर्वाणयुद्धासाठीं रणप्रवेश व वानरांची वाताहात २०१-२०४ रामरावणांचें निर्वाणयुद्ध २०४-२१५ ] रावणवध २१५-२१७ रावणस्त्रियांचा शोक २१७-२१८ रावणवधानंतर बिभीषणाचें सांत्वन २१९ रावणाच्या उत्तरकार्यासंबंधीं श्रीराम_बिभीषणांचा संवाद २२०-२२२ रावणाची उत्तरक्रिया व बिभीषणास राज्याभिषेक २२२-२२३ जानकीचें लंकेंतून आगमन २२३-२२४ लंकेंतून आलेल्या सीतेचा धिक्कार २२४-२२५ सीतेचें दिव्य व तिचा स्वीकार २२५-२२६ विजयी वानरांना तैलाभ्यंग स्नानें २२६ पुष्पक विमानारोहण २२६-२२७ विमानस्थ सीताराम २२७-२२९ नंदिग्रामीं भरताची भेट २२९-३०

**९ उत्तरकांड** २३१–२३६

श्रीरामाच्या स्वागताची तयारी २३१ श्रीरामाचें स्वागत २३१–३२ श्रीरामचंद्रांची अयोध्येंतून मिरवणूक २३२ रामचंद्राचा गृहप्रवेश २३२-२३३ रामराज्याभिषेक २३३ पाहुण्यांचें प्रयाण २३३–२३४ रामराज्य २३४ सीतात्याग २३४–२३५ श्रीरामचंद्राचा यज्ञ व पुनर्मीलन २३५ सीतेचें दिव्य व भूप्रवेश २३५–६ श्रीरामाचें वैकुंठीं प्रयाण २३६.

**१० श्रीरामायणनिरीक्षण** पृष्ठांक २३७–३१०

प्रास्ताविक विचार २३७–२३८ श्रोत्यांस विनंति २३८ रामायणाकडे पहाण्याच्या द्विविध दृष्टी २३९ रामायणाकडे पहाण्याची आमची दृष्टी २४०–४१ रामायणनिरीक्षणाचे ३ भाग २४१-२४२.

**रामायणनिरीक्षण-भाग पहिला**

निरीक्ष्य विभूती १ महात्मा दशरथ २४२–२५३ निरीक्ष्य विभूती २ भगवती सीतादेवी २५३–२५९ निरीक्ष्य विभूती ३ वाली २५९–२६३ निरीक्ष्य विभूती ४ महासती सुलोचना २६३–२६९ निरीक्ष्य विभूती ५ प्रतापी इंद्रजित २६९–२७० निरीक्ष्य विभूती ६ बिभीषण २७०–२७१.

**रामायणनिरीक्षण-भाग दुसरा**

श्रीरामाला ईश्वरावतार कां म्हणतात? २७१–२७४ रावणचरित्राचें महत्त्व २७४ निरीक्षणांतर्गत रावणचरित्र २७४–२९७ [ कुलपरंपरा २७५ श्रीविष्णूचें सुमाली प्रमुख दैत्यांशीं युद्ध २७६–२७९ कुबेराची कुळकथा २७९ कुबेराला लंकाप्राप्ति २७९–२८० सुमालीची आपदा २८० सुमालीचा जळफळाट २८०–२८१ सुमालीचें कारस्थान २८१–२८२ रावणादि बंधूंचें जन्म व बाळपण २८२–२८३ सुमालीच्या बाणीचा रावणावर प्रयोग २८३–२८४ रावणाची बंधूंसह तपश्चर्या २८४–२८५ रावणाभोंवतीं राक्षसांचा जमाव व लंकाप्राप्ति २८५–२८६ रावणाचा अत्याचार व कुबेराचा उपदेश २८६ उमामहेश्वरांची क्रीडा व रावण २८६–२८९ रावणाचा जगभर धुमाकुळ २८९–२९० यमपुरीं रावण २९०–२९१ पाताळीं रावण २९१–२९२ सूर्यचंद्रलोकीं रावण २९२ रावण आणि रंभा २९३-२९४ रावण आणि वेदवती २९४–२९५ स्वर्गलोकीं रावण व इंद्राचा पराजय २९५–२९७ ] पूर्वविवेचनानुसंधान २९७ रावणाचें गुणदोषविवेचन २९८ रावणाचे दोष-अविचार २९८–२९९ रावणाची कामांधता २९९–३०१ रावणाचा खरा दुर्गुण व श्रीरामाचें कार्य ३०१–३०३ लक्ष्मणचरित्र ३०४–३०५ मारुतिचरित्र ३०५–३०८ [ बालपण ३०५ पुंडावा व शाप ३०६-३०७ मारुतीची वरयाचना ३०७–३०८.]

**रामायणनिरीक्षण-भाग तिसरा**

बोधग्रहण ३०८–३१० फलश्रुति ३१०–३११

१५६६

# झोंपाळ्यावरचें रामायण

## बालकांड

### संतनमन

बुद्धीचा चालक । विघ्नविनाशक ॥
वंदूं विनायक । ग्रंथारंभीं १
श्रीब्रह्मकुमरी । देवी वागीश्वरी ॥
स्मरूं या अंतरीं । शारदा ती २
ब्रह्मा विष्णु हर । त्रैलोक्या आधार ॥
करूं नमस्कार । त्यांना भावें ३
व्यासवाल्मीकींना । शुकशौनकांना ॥
वाग्सृष्टीविधींना । नमूं आतां ४
यांच्याचि ग्रंथासी । अनुवादायासी ॥
धरिली मानसीं । इच्छा आम्हीं ५
पुढें संस्कृतार्थ । प्राकृतीं वर्णीत ॥
नमूं तेही संत । आदरानें ६
साधु ज्ञानेश्वर । आदि कवीश्वर ॥
नमूं प्रेमादर- । युक्त मनें ७
भक्त तुकाराम । वैराग्याचें धाम ॥
शतशः प्रणाम । करूं त्यांना ८
संत तुळसीदास । आणि रामदास ॥
वंदूं या स्थळास । उभयांसी ९

वाल्मीकी साक्षात । ज्या तुजे म्हणत ।
नमूं एकनाथ । महाराज १०
महिपती श्रीधर । आणि मुक्तेश्वर ॥
करूं नमस्कार । मोरोपंतां ११
ज्ञात वा अज्ञात । तुजे रामभक्त ॥
असो प्रणीपात । सर्वांना त्या १२
बोबडीं बालकें । नेणतीं अर्भकें ॥
रामकथा मुखें । गाण्या इच्छूं १३
तुम्ही कृपावंत । मायबाप संत ॥
बालमनोरथ । पुरवावे १४
रसना ही खास । अर्पिली तुम्हांस ॥
बोलवा सरस । बोल आतां १५
लेखणी दऊत । तुम्हांसी अर्पीत ॥
लिहवा उचित । तेंचि आतां १६
प्रसाद अल्पही । आला कथे ठायीं ॥
तरी दुजी नाहीं । इच्छा मनीं १७

## कथारंभ

आतां श्रोतयांनीं । एकाग्र होउनी ।
रामकथा कानीं । परिसावी १८
रावण मातला । सद्धर्म बुडाला ॥
अधर्म माजला । चहूंकडे १९
रावण मातला । सत्त्वलोप झाला ॥
वाढाया लागला । तमोगुण २०
रावण मातला । ब्राह्मण गांजला ॥
यज्ञयाग झाला । लुप्तप्राय २१
रावण मातला । स्वर्लोक नाडला
महेंद्रा सुटला । चळकांप २२
रावण मातला । संहार वाढला ॥
रक्तानें नहाला । भूमिभाग २३

दुष्कृत्यें कष्टली । पृथ्वी गाय झाली ॥
ब्रह्मयापाशीं गेली । देवांसह २४
ब्रह्मा नारायण । स्तवितां आपण ॥
अंतरिक्षांतून । वाणी झाली २५
" कौसल्याउदरीं । अयोध्यानगरीं ॥
होईल सत्वरीं । जन्म माझा ' २६
मनुष्यरूपानें । रावणाकारणें ॥
वधीन युद्धानें । सैन्यासह " २७
अशी वाणी होतां । प्रभुचीच आतां ॥
त्रैलोक्या समस्तां । सुख झालें २८
ऋषी देव मनीं । अती आनंदुनी ॥
गेले परतुनी । निजस्थाना २९

## रामजन्म

इकडे पृथ्वींत । अयोध्यापुरींत ॥
प्रभु जन्म घेत । अविलंबें ३०
अयोध्येचा पति । दशरथ नृपती ॥
कष्टी निजचित्तीं । पुत्रासाठीं ३१
त्याच्या राण्या तीन । त्यां ठायीं जनन ॥
घेति नारायण । अंशरूपें ३२
रम्य चैत्रमास । शुद्ध नवमीस ॥
प्रभु या पृथ्वीस । जन्मा आले ३३
कौसल्याकुशीला । रामजन्म झाला ॥
सुमित्रेसी झाला । लक्ष्मण ३४
कैकेयी आपण । पुत्र दोघेजण ॥
भरत शत्रुघ्न । प्रसवली ३५
वार्ता ही फुटतां । त्रैलोक्यांत आतां ॥
जहाला समस्तां । अत्यानंद ३६
दुंदुभी वाजती । स्वर्लोकावरती ॥
आनंदले चित्तीं । ऋषीदेव ३७

गंधर्व चारण । करिती गायन ॥
अप्सरा नर्तन । करिताती ३८
अयोध्याजनांना । आबालवृद्धांना ॥
तर मोद मनां । सामावेना ३९
तोरणें लाविती । गुड्या उभारिती ॥
पौर रस्तोरस्तीं । आनंदानें ४०
मंगल गीतांचा । मंगल वाद्यांचा ॥
घोष तो जोराचा । चालू झाला ४१
'धन्य ! दशरथ ! । महा भाग्यवंत' ॥
उद्गार निघत । जेथें तेथें ४२
राया दशरथा । शब्द हे ऐकतां ॥
झाला निजचित्ता । अत्यानंद ४३
त्यानेंही आपण । अगणीत धन ॥
वेंचुनीयां जन । तृप्त केले ४४
भांडार फोडिलें । द्रव्याचें सगळें ॥
आणि सुखी केले । दीन जन ४५
वस्त्रं वा भूषणें । असंख्य गोदानें ॥
अर्पिली रायानें । याचकांना ४६
दरिद्री हृदयीं । असा कोणी कांहीं ॥
उरलाच नाहीं । अयोध्येंत ४७

## रघुकुमारांचें बालपण

पुढें दिनमास । होतां त्या पुत्रांस ॥
लागले वाढीस । चारी पुत्र ४८
सुकुमार शूर । तेजस्वी सुंदर ॥
बलाढ्य उदार । सर्व होते ४९
शस्त्रास्त्रनिष्णात । वेदपारंगत ॥
सर्वही दिसत । पूर्णत्वानें ५०
सर्वांचीच प्रीति । एकमेकांवरती ॥
निःसंशय होती । अतीशय ५१

परी त्या दोघांची । रामलक्ष्मणांची ॥
प्रीति नवलाची । सर्वां वाटे ५२
श्रीरामा लक्ष्मण । वाटे जीवप्राण ॥
लक्ष्मणा जीवन । राम झाला ५३
कार्य-अकार्यांत । वा सुखदुःखांत ॥
दोघेहि दिसत । एकरूप ५४
पुत्रांचे हे गुण । स्वनेत्रीं देखुन ॥
दशरथा प्राण । धन्य वाटे ५५

## विश्वामित्राची मागणी

पुढें विश्वामित्र । एकदां पवित्र ॥
श्रीराम सौमित्र । मागूं आले ५६
यज्ञरक्षणार्थ । आपुल्या मागत ॥
पुत्र ते त्वरित । रायापाशीं ५७
राव कष्टी झाला । पुत्र धाडायाला ॥
परंतु बोधिला । वसिष्ठानें ५८
मग उमजोनी । पुत्र त्यानें दोनी ॥
दिले संरक्षणीं । विश्वामित्रा ५९
विश्वामित्र धाले । कृतकार्य झाले ॥
राघवां चालले । घेउनीयां ६०

## ताटिकावध व अस्त्रप्राप्ति

चालतां वाटेस । करुषा प्रांतास ॥
ताटिका तयांस । आढळली ६१
ती घोर यक्षीण । ताटिका पापीण ।
आली खवळून । ऋषींवरी ६२
परी श्रीरामानें । तिज दक्षतेनें ॥
एक्याच बाणानें । संहारिलें ! ६३
संतोष वाटला । श्रीविश्वामित्राला ॥
श्रीरामयशाला । देखुनीयां ६४

मग त्या ऋषींनीं । श्रीरामालागुनी ॥
दिव्यास्त्रें अर्पुनी । धन्य केलें ६५
बला अतिबला । विद्या या सकला ॥
लाधल्या रामाला । बहुमोल ६६
वज्रास्त्र ब्रह्मास्त्र । श्रीपैतामहास्त्र ॥
हाही श्रेष्ठ अस्त्र- । लाभ झाला ६७
दुजींहि निर्वाणीं । घोरास्त्रें निर्मुनीं ॥
श्रीविश्वामित्रांनीं । रामा दिलीं ६८
श्रीराम तुष्टला । मनीं धन्य झाला ॥
ऋषीसवें गेला । सिद्धाश्रमीं ६९

## विश्वामित्रयज्ञरक्षण

तया आश्रमांत । स्वव्रतसिद्ध्यर्थ ॥
विश्वामित्र घेत । यज्ञदीक्षा ७०
श्रीराम लक्ष्मण । पांच रात्रदिन ॥
करिती रक्षण । यज्ञाचें त्या ७१
दिन उगवतां । सहावा तो आतां ॥
यज्ञा अवचिता । विघ्न आलें ७२
सुबाहु मारीच । राक्षस ते नीच ॥
शेवटीं आलेच । यज्ञघाता ७३
अदृश्य राहुनी । दैत्य ते गगनीं ॥
करिती वरुनी । रक्तस्राव ७४
श्रीराम कोपला । क्रोधें लाल झाला
हातांत घेतला । एक बाण ७५
दिव्य मानवास्त्र । योजुनी त्यावर ॥
मारीच तो दूर । भिरकाविला ७६
आणि आग्नेयास्त्र । सोडुनी दुर्धर ॥
सुबाहुही चूर । केला रणीं ! ७७
देव आनंदले । ऋषी श्रेष्ठ घाले ॥
कृतकार्य झाले । विश्वामित्र ७८

सर्वही स्वचित्तीं । संतोषुनी अती ॥
धन्यवाद देती । राघवांना ७९

## आहिल्येची कथा

पुढें आटोपून । यज्ञ ऋषीगण ॥
निघती तेथून । मिथिलेला ८०
लग्नमहोत्सव । तेथिंचा अपूर्व ॥
पहाया राघव । सर्व नेती ८१
मिथिलेनजीक । जातां त्यांना एक ॥
दिसे भयानक । शून्याश्रम ८२
गौतम सुव्रत । आहिल्येसहीत ॥
तप आचरीत । पूर्वी तेथें ८३
एकदां नसतां । आश्रमीं ते स्वतां ॥
इंद्र अवचितां । तेथें आला ८४
आणि छद्मवेष । घेऊनी देहास ॥
दुष्ट आहिल्येस । भ्रष्ट करी ८५
गौतम परत । येतां आश्रमांत ॥
इंद्र चांचरत । पळूं लागे ८६
परंतु ऋषींनीं । तत्कृत्य जाणुनी ॥
त्याला संतापुनी । शाप दिला ८७
" भगांकित काया । हो तुझी पापिया "॥
असा दिला तया । घोर शाप ८८
आणि पत्नीलाही । शापुनी ते ठायीं ॥
गेले हिमालयीं । गौतम ते ८९
त्या काळापासून । आहिल्या ती दीन ॥
अदृश्य राहून । काळ कंठी ९०
वायुचा आहार । रक्षेत विहार ॥
हाचि उपचार । होता तिज ९१
एक भव्य शिळा- । रूपेंच सकळा ॥
स्मरण जगाला । होय तिचें ९२

## अहिल्येची शापमुक्तता

परि पाय आतां । रामाचे लागतां ॥
हो शापमुक्तता । अहिल्येची ! ९३
तत्काल होऊन । दिव्यतेजपूर्ण ॥
सती सुप्रसन्न । प्रगटली ९४
कंठीं गहींवर । लोटुनी अपार ॥
पदीं ठेवी शिर । श्रीरामाच्या ९५
श्रीराम लक्ष्मण । हेहि प्रेमपूर्ण ॥
वंदिती चरण । अहिल्येचे ९६
दुंदुभी वाजती । स्वर्लोकावरती ॥
आनंदले चित्तीं । ऋषी देव ९७
"धन्य! रामराय । अहिल्येचें भाग्य" ॥
सर्व सविस्मय । उद्गारती ९८
मग तये वेळे । रामकृपाबळें ॥
गौतम भेटले । अहिल्येसी ९९
पुन्हां दोघेजण । सुशील संपन्न ॥
गेलीं तीं गढून । तपामध्यें १००
आणि विश्वामित्र । श्रीराम सौमित्र ॥
घेउनी सत्वर । पुढें गेले १०१

## सीतेचा लग्नमंडप

मिथिलेसी येतां । विश्वामित्र आतां ॥
जनकाच्या चित्ता । हर्ष वाटे २
तयानें जाऊन । सामोरा आपण ॥
धरिले चरण । गाधिजांचे ३
आणखी सत्कार । करुनीयां थोर ॥
आणी त्यां सत्वर । लग्नस्थळीं ४
लग्नमंडपांत । भूपाळ विख्यात ॥
ऋषींहि अमित । आले होते ५

मध्यें एक भलें । चाप सुटलेलें ॥
होतें ठेविलेलें । अंगणांत १०६
सीता पुष्पमाळ । घेउनी कोमळ ॥
जनकाजवळ । उभी होती ७
जनकें आपण । सीता-लग्न-पण ॥
होता उच्चारून । ठेविलेला ८
क्षत्रियप्रमुख । टाकुनी दिमाख ॥
होते अधोमुख । बसलेले ९
पण जिंकायास । तेज दावायास ॥
शक्यता कोणास । दिसेचना १०
अशा या स्थितींत । विश्वामित्र तेथ ॥
जातां ते विस्मीत । मनीं झाले ११
मग त्यांनीं आतां । कारण पुसतां ॥
जनक तो स्वतां । बोलूं लागे १२

## सीतेचा वृत्तान्त व धनुर्भंग

म्हणे " मी यज्ञार्थ । नांगरीतां शेत ॥
सीता भूगर्भात । सांपडली १३
मग मी नेऊनी । ही निजसदनीं ॥
कौतुकें करुनी । वाढविली १४
पुढें प्रौढपण । येतां ही आपण ॥
एक विलक्षण । कर्म करी १५
चाप हें अद्‌भुत । शंभुदेवदत्त ॥
होतें अंगणांत । एकीकडे १६
तेथें अवचीता । जाउनी ही सीता ॥
धनुष्याचा स्वतां । घोडा करी ! १७
कृत्य हें देखीलें । जेव्हां मीं सगळें ॥
तेव्हां थक्क झालें । मन माझें १८
मग त्याच वेळां । कन्या ही देण्याला ॥
पण मीं लाविला । अनुरूप ११९

जो वीर आपण । धनुष्या या गुण ।'
लावी त्या देईन । सीता माझी १२०
असा पण थोर । होतां धनुर्धर ॥
आले हे सत्वर । येथवरी २१
परंतु आजुनी । एकाहिकडुनी ॥
धनुष्य तोलुनी । धरवेना २२
म्हणुनीच आज । सर्वही सलज्ज ॥
बसले हे राज- । श्रेष्ठ सारे " २३
एवढें सांगून । जनक फिरून ॥
नृपां उद्देशून । बोलूं लागे २४
"वीरहो ! प्रचंड । हें शिवदोर्दंड ॥
पडलें अखंड । तुम्हांपुढें २५
सीता माझी येथ । माळ ही हातांत ॥
घेउनी तिष्ठत । उभी आहे २६
परंतु अजुनी । धनुष्या या कोणी ॥
गुण चढवोनी । दावाचना २७
मग धनुर्धर । कन्येजोगा वर ॥
नाहींच भूवर । कोणी काय ? २८
मग कां सकळ । हें उर्वीमंडळ ॥
जहालें निर्बळ । निःक्षत्रिय !! " २९
शब्द हे ऐकतां । जनकाचे आतां ॥
स्फुरण ये चित्ता । श्रीरामाच्या ३०
मृगेंद्राचा छावा । कांहीं डवचावा ॥
तशीच राघवा । स्थिती झाली ३१
मग धैर्यमूर्ती । उठुनी वरती ॥
चालला पुढतीं । चापाकडे ३२
मुनीवेषधर । बालक हा वर ॥
उठतांच थोर । थक्क झाले ! १३३

मुनी दचकती । राजे हडबडती ॥
टकमकां बघती । रामाकडे १३४
सीतेचेंही मन । मूर्ती ती पाहुन ॥
झालें स्नेहपूर्ण । अतीशय ३५
रामें प्रेक्षकांना । नमुनी सर्वांना ॥
केली प्रदक्षिणा । धनुष्यासी ३६
आणखी समस्त । असतां पहात ॥
चाप तें हातांत । उचलीलें ३७
प्रत्यंचा खेंचितां । मग राम स्वतां ॥
चाप अवचिता । दुभंगलें ! ३८
काडकाड ध्वनी । उठतां गगनीं ॥
थरथरा मेदिनी । डोलूं लागे ३९
दिशा अंतराळ । स्वर्मृत्यु पाताळ ॥
नादें त्या सकळ । दणाणलें ४०
कितीक बावळे । जन भेदरले ॥
मूर्छितहि झाले । कितीएक ४१
असो; ऐशा रीती । होतां पणपूर्ती ॥
सीता निजचित्तीं । आनंदली ४२
प्रेमातिशयानें । श्रीरामासी तिनें ॥
सुपुष्पमालेनें । भूषविलें ४३
आनंद लोटला । प्रेक्षकां सकळां ॥
धन्यवाद दिला । रामा त्यांनीं ४४

## सीतेचा लग्नसमारंभ

पुढें जनकानें । सोयऱ्यां त्वरेनें ॥
दिलीं आमंत्रणें । लग्नासाठीं ४५
राजा दशरथ । राण्यांसमवेत ॥
पावला त्वरीत । मिथिलेसी ४६
ते वसिष्ठादिक । वामदेव प्रमुख ॥
ऋषीहि अनेक । सर्व आले १४७

बंधु तो धाकुला । जनकाचा भला ॥
कुशध्वज आला । लग्नासाठीं १४८
आणिकही श्रेष्ठ । ऋषी तपोनिष्ठ ॥
भूपती बलिष्ठ । आले तेथें ४९
मग त्यां समस्तां । सुहृदां देखतां ॥
समारंभ आतां । चालू झाला ५०
रघुकुल भलें । वसिष्ठें वर्णिलें ॥
जनकें कथिलें । निजकुळ ५१
दोन्हीहि कुळांत । राजर्षींची होत ॥
मालिका अत्यंत । स्पृहणीय ५२
जनक हर्षला । कृतकार्य झाला ॥
संबंध हा भला । देखुनीयां ५३
मग आनंदून । तयानें आपण ॥
दिधलें वाग्दान । राघवांना ५४
ज्येष्ठ श्रीरामाला । जानकी कोमला ॥
लक्ष्मणा उर्मिळा । देऊं केली ५५
तंव तितुक्यांत । विश्वामित्र तेथ ॥
स्वहित सांगत । कुशध्वजा ५६
मग त्यानें आतां । त्याच्याहि दुहिता ॥
शत्रुघ्नभरतां । देऊं केल्या ५७
वधूवरें चारी । ऋषींनीं सत्वरीं ॥
बहुलीयावरी । आणवीलीं ५८
वधुपुरोहीत । शतानंद होत ॥
वरपुरोहीत । वासिष्ठ ते ५९
त्या ऋषिद्वयांनीं । समंत्रक अग्नी ॥
स्थंडिलावरुनी । सिद्ध केले ६०
आणखी क्रमानें । मग जनकानें ॥
केलीं कन्यादानें । अग्निसाक्ष १६१

सौंदर्याची खाणी । सीता ती सद्गुणी ॥
दिली संतोषुनी । रामा हातीं १६२
उर्मिला प्रेमळा । दिली लक्ष्मणाला ॥
तशी भरताला । मांडवी ती ६३
आणि श्रुतकीर्ती । महाभाग्यवती ॥
अर्पियेली हातीं । शत्रुघ्नाच्या ६४
आनंद लोटला । त्रैलोक्या सकला ॥
संबंध हा भला । पाहुनीयां ६५
हजारों मंगल । सुवाद्यें प्रेमळ ॥
लागलीं तत्काल । वाजावया ६६
गंधाक्षता थोर । पुष्पाचे संभार ॥
वधुवरांवर । कोसळती ६७
गंधर्व गाताती । अप्सरा नाचती ॥
मुखीं गात कीर्ती । राघवांची ६८
'धन्य ! धन्य ! धन्य !। जोडे असामान्य' ॥
असा ध्वनी होय । जेथें तेथें ६९

## लग्नांतील मानपान

नंतर चांगले । जनकानें केले ॥
ते सुखसोहाळे । राघवांचे ७०
विहीणी सगळ्या । आधीं गौरविल्या ॥
करवल्या केल्या । तुष्ट मनीं ७१
मानपान थोर । हौसेचे प्रकार ॥
केले भरपूर । जनकानें ७२
वऱ्हाडी मंडळी । दोंबाजूंकडली ॥
अत्यंत तुष्टली । मनामध्यें ७३

## वरात

मग सुमुहूर्तीं । संतोषित चित्तीं ॥
वर परतती । अयोध्येसी १७४

हत्ती घोडे रथ । दास असंख्यात ॥
जनक अर्पीत । वरांलागी १७५
हजारों सुंदर । सख्याहि चतुर ॥
कन्यांबरोबर । रायें दिल्या ७६
त्या सर्वा घेउनी । वरात तेथूनी ॥
अयोध्या लक्षुनी । चालू लागे ७७
ताशे कडाडती । नगारे झडती ॥
वरातीपुढती । मनोहर ७८
हत्ती थोर थोर । झुलती समोर ॥
घोडेहि चौफेर । नाचताती ७९
मिथिलाजनांना । आबालवृद्धांना ॥
तर हर्ष मनां । सामावेना ८०
गवाक्षांमधुनी । वा गृहांवरुनी ॥
बघती नयनीं । महोत्सव ८१
पुष्पवृष्टी थोर । करिताती पौर ॥
वधूवरांवर । आनंदानें ८२
अशा या थाटांत । शेवटीं सीमांत ॥
जनकें वरात । पोंचवीली ८३
आणखी मानस । होउनी उदास ॥
पुन्हां नगरीस । परतला ८४

## क्षत्रकुळकाळ परशुराम व दाशरथी राम

इकडे चालतां । वरात ती आतां ॥
विघ्न अवचिता । मार्गी आलें ८५
शिवचाप भग्न । झालें हें ऐकुन ॥
गेला खवळुन । परशुराम ८६
आणि क्रोधतप्त । होउनी अत्यंत ॥
ठाकला त्वरित । रामापुढें ८७
क्षत्रकुळकाळ । वीर हा प्रबळ ॥
पहातां सकळ । घाबरले १८८

कोणी चांचरले । ठायींच बैसले ॥
कोणी ते लपले । दुज्यामागें १८९
दशरथा तर । मूर्च्छा अनिवार ॥
येऊनी भूवर । पडला तो ९०
वसिष्ठादि सारे । ऋषीहि घाबरे ॥
झाले या प्रकारें । मनामध्यें ९१
इतुक्यांत वीर । भार्गव सत्वर ॥
श्रीरामा उत्तर । बोलूं लागे ९२
म्हणे " रघुनाथा ! । देउनीयां चित्ता ॥
प्रतिज्ञा ही आतां । ऐक माझी ९३
तूं क्षत्रियवीर । महाधनुर्धर ॥
आहेस भूवर । निःसंशय ९४
आजिचें अद्भुत । त्वत्कृत्य करीत ॥
अत्यंत चकीत । मजलाही ९५
परी क्षत्रियानें । वरचढ होणें ॥
कधीं न सहाणें । मना माझ्या ९६
जमदग्नी तात । असतां ध्यानस्थ ॥
वधिले उन्मत्त । क्षत्रियांनीं ९७
त्यावेळेपासून । त्यांचे ठायीं पूर्ण ॥
गेला भडकून । राग माझा ९८
भूगोल जे वेळां । निःक्षत्रिय केला ।
तेव्हांच रागाला । शांती आली ९९
मग पृथ्वीदान । कश्यपा देऊन ॥
केलें मीं प्रयाण । महेंद्रासी २००
तेथें ही ऐकतां । तव कृत्यवार्ता ॥
पातलों मी स्वतां । येथवरी १
चाप त्वां मोडिलें । तें जुनाट झालें ।
घे हें नवें भलें । विष्णुचाप २
या चापाला गुण । दाविशी लावून ।

तरी मी देईन । द्वंद्व मग २०३
कांहीं झालें तरी । माझी बरोबरी ॥
क्षत्रिया अखेरीं । होणें नाहीं " ४
शब्द हे बोलून । भार्गवें आपण ॥
रोखिले नयन । रामावरी ५
श्रीराम हांसला ! । आणि भार्गवाला ॥
बोलाया लागला । नम्रतेनें ६
म्हणे " सत्त्वगुण । ब्राह्मणलक्षण ॥
दिसतो लेश न । तुम्हा ठायीं " ७
अमानुष क्रौर्य । दावुनीयां गर्व ॥
केलेत क्षत्रिय । नष्ट तुम्हीं ८
अपराधी एक । असतां अनेक ॥
नृपति निःशंक । वधिलेत ९
परी हा नव्हता । राम तेव्हां स्वतां ॥
म्हणुनीच होता । प्रभाव तो १०
आतां काळ गेला । पूर्वींचा तो भोळा
मनु पालटला । निःसंशय ११
अवतारहेत । तुमचाहि खचित ॥
जहाला समाप्त । येथुनीयां १२
द्या आतां इकडे । चाप तें थोकडें ॥
आणि मजकडे । दृष्टी लावा १३
म्हणजे मी कोण । आहें हें संपूर्ण ॥
येईल दिसून । तुम्हांलाही ! " १४
शब्द रघुनाथ । बोलुनी त्वरीत ॥
विष्णुचाप घेत । हातांमध्यें १५
भार्गव खचले । ठायींच खुंटले ॥
उमखा न चले । हालवया १६
भीषण स्वरूप । जाउनी आपाप ॥
अति सौम्यरूप । काया झाली २१७

आवेश सगळा । अशेष जिरला ॥
परशुहि झाला । काष्ठवत २१८
अति जोरदार । शब्द तो खंबीर ॥
जाउनीयां स्वर । मृदु आला १९
हृदयींचें तेज । हल्हळु आज ॥
श्रीरामीं सहज । शिरूं लागे २०
त्रैलोक्य सगळें । आनंदित झालें ॥
जीवीं जीव आले । सर्वत्रांच्या २१
दुंदुभी वाजती । स्वर्लोकावरती ॥
पुष्पं वर्षताती । रामशिरीं २२
श्रीराम हातांत । चाप विष्णुदत्त ॥
घेउनी बोलत । भार्गवांना २३
म्हणे " पुरातन । ब्राह्मण म्हणून ॥
आहांत आपण । पूज्य मज २४
कांहीं झालें तरी । बाण प्राणहारी ॥
मज तुम्हांवरी । टाकवेना २५
परंतु निर्वाण । हाहि विष्णुबाण ॥
फुकट जाणें न । कल्पांतींहि २६
तेव्हां या बाणानें । तुम्हांसी खात्रीनें ॥
स्वर्लोका मुकणें । भाग आहे " २७

## परशुरामांचें प्रयाण व वरातीची सुटका

शब्द रघुनाथ । बोलतां निश्चित ॥
भार्गव मनांत । चरकले २८
मग सौम्यपणें । त्यांनां आदरानें ॥
श्रीरामा स्तुतीनें । गौरवीलें २९
आणखी नमन । तयासी करून ॥
गेले ते फिरून । स्वस्थानासी ३०
वऱ्हाड्यां सकळां । अत्यानंद झाला ॥
शुद्धीवरी आला । दशरथ २३१

पुत्राचा विक्रम । पाहुनी सप्रेम ॥
राव तो परम । संतोषला २३२
आणि ती तेथून । वरात निर्विघ्न ॥
चालली फिरून । अयोध्येला ३३
बालकांड हें समाप्त । कथा वर्णिली संक्षिप्त ॥
रघुवीरलीला गुप्त । ठाव कोणा ? २३४

## बालकांड समाप्त

# अयोध्याकांड

## श्रीसीतारामचंद्रांचें अयोध्येस आगमन

राम आले अयोध्येसी । सीता घालुनी पाठीसी ॥
हर्ष दशरथासी । सामावेना १
सीतारामदर्शनाला । लोकसंमर्द लोटला ॥
राजमार्ग बंद झाला । अयोध्येचा २
ताशे चौघडे वाजती । गुढ्या तोरणें लाविती ॥
नगर-नारी ओंवाळीती । सीतारामा ३
गृहीं आले सीताराम । सर्व मंगलांचें धाम ॥
पूर्ण पावती विश्राम । निजानंदें ४
लग्नसोहळा रामाचा । थेट तैसाच बंधूंचा ।
भेद मात्र तो नांवाचा । अन्य नाहीं ५
मुख सतेज कोमळ । छाती उन्नत विशाळ ॥
दीर्घबाहु हा प्रबळ । रामभद्र ६
राम होतां कोपयुक्त । यम चळचळां कांपत ॥
पृथ्वी थरथरां डोलत । रामभयें ७
वज्राहुनीहि प्रबळ । मातेसारिखें प्रेमळ ॥
पुष्पाहुनीहि कोमळ । राममन ८
सत्यव्रत शुचिर्भूत । राम ज्ञानी भाग्यवंत ॥
झाली प्रजा अनुरक्त । रामपायीं ८
राम दयेचा सागर । राम सत्वाचें आगर ॥
रामराज्यासी अधीर । प्रजा झाली १०
राम चुकतांच क्षण । येइ धांवत लक्ष्मण ॥
सज्ज राहुनी आपण । रक्षी राम ११

दुरावतां तो लक्ष्मण । रामा नावडे जीवन ॥
म्हणे सत्य दुजा प्राण । लक्ष्मण माझा १२
भरत आणि ते शत्रुघ्न । होते मातुलालागुन ॥
परी रामपदीं मन । अहोरात्र १३
बघुनि रामाचे सद्गुण । राजा दशरथ प्रसन्न ॥
म्हणे 'राज्य या अर्पून । वना जावें' १४

## श्रीरामाचा राज्याभिषेकसमारंभ

रामराज्याभिषेकाला । जन सर्व गोळा झाला ॥
ऋषी सर्व सिद्धतेला । करिती वेगें १५

## मंथरेची कैकयीला चिथावणी

दुष्ट कलीनें भारिली । कुब्जा मंथरा कोपली ॥
बोटें मोडित ती गेली । कैकयीसी १६
कुब्जा मंथरा पापीण । जणुं कापट्याची खाण ॥
मोही वक्तृत्वानें पूर्ण । कैकयीला १७
कुब्जा बोले कैकयीस । "मूढे! ऊठ! कां निजलीस? ॥
आग लागली घरास । कळेना कां?" १८
कुब्जा बोले कैकयीस । 'पतीगर्व वहात्येस ॥
मग राज्य कां रामास । मूढे ! बोल !" १९
कुब्जा बोले कैकयीस। "तुच्छ करिसी कौसल्येस ॥
मग राज्य कां रामास । मूढे ! बोल" २०
कैकयि बोलत्ये कुब्जेला। "राम ज्येष्ठ पुत्र भला ॥
नेम थोरांनीं घातला । ज्येष्ठा राज्य!" २१
कैकयि बोलत्ये 'गे! कुब्जे !। राम भरत पुत्र माझे ॥
रामीं वैर कां हें तुझें ?। सांग मज" २२
कुब्जा बोले कैकयीतें । "तुझें हित मी बोलत्यें ॥
जातां राज्य त्या रामातें । मग तूं कोण ?" २३
कुब्जा बोले कैकयीला । "जातां राज्य श्रीरामाला॥
सर्व मान कौसल्येला । दासी मग तूं !" २४

कुब्जा बोले दुष्टवाचा । " राग सुमित्रा पोराचा ॥
कैकयी ! द्वेष सवतीचा । सोसशी कां ? " २५
कुब्जा बोले ' गे कैकेयी ! । राम-पुत्र राज्य घेई ॥
मग भरताची सोई । काय आहे ? ' २६

## कैकेयीचा स्वार्थी जळफळाट

कुब्जामंत्रानें भारिली । कैकेयी ती स्वार्थी झाली ॥
आणि कोपयुक्त गेली । क्रोधशाळे २७
वस्त्रालंकार टाकुन । देई कैकेयी फेंकुन ॥
मग आरंभी रुदन । भूमीवरी २८

## दशरथाची तळमळ व वचनबद्धता

दशरथ श्रांत झाला । रामदर्शनें निवाला ॥
मग येई मंदिराला । कैकेयीच्या २९
कैकेयि लोळतां भूमीसी । राव दुःखित मानसीं ॥
म्हणे " जें जें तूं इच्छिसी । देईन तें ! " ३०
कैकेयि निर्लज्ज बोलते । " राज्य द्यावें भरतातें ॥
वनीं वास श्रीरामातें । शीघ्र व्हावा ! " ३१
राव पडे तो मूर्च्छित । कैकेयिशब्दवज्राघात ॥
हृदय राजाचें भेदित । क्षणामध्यें ३२
लागे कैकेयीच्या चरणीं । दशरथ दीनवाणी ॥
म्हणे ' प्रिये ! ही करणी । करूं नको ! ' ३३
राजा बोले ' गे कैकेयी ! । राम लीन तुझे पायीं ॥
त्यासी राज्य तूंचि देई । यशस्विनी ! ' ३४
राजा बोले कैकेयीस । " राज्य दे तूं भरतास ॥
परी रामा या वनास । धाडूं नको " ३५
कैकेयी बोले " दशरथ ! । कीर्ति तुझी व्यर्थ ! व्यर्थ ! ॥
वचन देउनीयां स्वार्थ । पहातोस ! " ३६
कैकयि बोले " महाराजा ! । ज्येष्ठ राम वैरी माझा ॥
कौसल्या ती तुझी भाजा । हितशत्रु " ३७

कैकेयि बोले दशरथा ! । आण तुझी घेत्यें आतां ॥
राम वनासी न जातां । प्राण ठेवींना मी ! ” ३८
दशरथ बोले “गे पापिणी ! । कैकेयि ! दुष्टत्वाचे खाणी॥
तुझी ऐशी ही करणी । मृत्यु मज ” ३९
राजा बोले कैकेयीस । “राम निघतांना वनास ॥
त्याचे आधींच स्वर्गास । गमन माझें ” ४०
कैकेयिवचनें तापला । दशरथ स्तब्ध झाला ॥
“पाहूं इच्छितों रामाला । आणा” म्हणे ४१
राम शीघ्र आला । राजासन्मुख ठाकला ॥
नमुनियां कैकेयीला । आज्ञा मागे ४२

## रामा ! वनासी तूं जावें

कैकेयि बोलत्ये रामाला । “ राजा भ्रांतचित्त झाला ॥
तरी त्याच्या या आज्ञेला । सांगेन मी ” ४३
कैकयि बोले दुष्ट भावें । “ रामा ! वनासीं तूं जावें ॥
राज्य भरतें भोगावें । राजाज्ञा ही ! ” ४४
राम “ तथास्तु ” म्हणोनि । लागे कैकेयीचरणीं ॥
म्हणे “ आत समजावोनी । शीघ्र जातों ” ४५

## लक्ष्मणाचा संताप व त्याची समजूत

लक्ष्मण रागानें तापला । म्हणे, “राजा भ्रांत झाला ॥
रामा ! बांधुनी तूं याला । राज्य भोग ! ” ४६
राम बोले लक्ष्मणासी । “ बाळा ! धर्म तूं नेणसी ॥
पूज्यपाद दशरथासी । कैसा बांधूं ? ” ४७
राम बोले “ रे लक्ष्मण ! । मज पित्राज्ञा प्रमाण ॥
मोडीना मी गेल्या प्राण । आज्ञा त्याची ” ४८
राम बोले “ रे लक्ष्मण ! । तात आज्ञा देतां जाण ॥
अग्निकाष्ठें मी भक्षीन । शंका नको ! ” ४९
राम बोले “रे लक्ष्मण ! । तात आज्ञा देतां जाण ॥
घोर विष मी प्राशीन । शंका नको ! ” ५०

## कौसल्येचें भोळें पुत्रवात्सल्य

बोले कौसल्या स्फुंदत । " रामा ! जातां तूं वनांत ॥
तेच क्षणीं माझा अंत । सत्य होय ! " ५१
बोले कौसल्या रामाशीं । " पतीप्रेम नाहीं मजशीं ॥
तुजवीण या सवतींशीं । कैशी राहूं ? " ५२
दुःखें कौसल्या विह्वळा । मिठी घाली रामगळां ।
म्हणे " वनीं येत्यें बाळा ! । तुझ्या संगें " ५३
राम बोले कौसल्येसी । " राजा असतां दुःखावेशीं ॥
माझ्या संगें तूं वनासी । कैसी येशी ? " ५४
राम बोले कौसल्येला । " पती-आज्ञा मान्य तुला ॥
पूज्य आपणां सर्वांला । दशरथ " ५५
कौसल्या माउली । रामशब्दें स्थिरावली ॥
आज्ञा कष्टानें दिधली । वनीं जाण्या ! ५६

## अप्रतिम धैर्यशाली सुमित्रा

वीरपत्नी धैर्यशाली । धन्य सुमित्रा माउली ! ॥
वीरमाता ती शोभली । जगीं तीच ॥ ५७
बोले सुमित्रा " लक्ष्मण ! । रामपदीं ठेवीं मन ।
तैसी सीता ही सुजाण । पूज्य मानीं " ॥ ५८
बोले सुमित्रा "लक्ष्मण ! । सीता माझे ठायीं मान ॥
वन अयोध्येसमान । मानीं बाळा ! " ॥ ५९

## रामाचें वनवासगमन

बंधु राम लक्ष्मण । सवें सीतेसी घेऊन ॥
सेवावया घोर वन । सिद्ध झाले ॥ ६०
कैकायि बाई दुष्ट किती । सीता देउनी सांगातीं ॥
कोमल राममूर्ती । वना धाडी ॥ ६१
कोमल राममूर्ती । तिहीं लोकीं झाली कीर्ति ॥
होण्या पितृवाक्यपूर्ती । वना जाय ॥ ६२

धन्य धन्य सीता सती। भूमंडळीं झाली ख्याती ॥
रघुवीराचे सांगातीं। वना जाय ६३
धन्य लक्ष्मणमूर्ती। अखंडित झाली कीर्ति ॥
बंधुप्रेम दावी जगतीं। अद्वितीय ६४
राम वनासी चालला। लोकव्यवहार थांबला ॥
जो तो धांवत निघाला। रामामागें ! ६५
राम वनासी चालला। हर्ष होय कैकेयीला ॥
दुःखावेग कौसल्येला। साहेचना ६६
राम वनासी चालला। यज्ञयाग बंद झाला ॥
अन्नपाण्याचें कोणाला। स्मरण कैचें? ६७
राम वनासी चालला। वृक्ष गाळीती पानांला ॥
धेनु टाकीती वत्साला। दुःखावेगें ! ६८
राम दृष्टीआड होत। दशरथ भ्रांतचित्त ॥
सीतारामनाम घेत। स्वर्गी गेला ! ६९
नगरीं हाहाःकार झाला। लोक सर्वही मिळाला ॥
म्हणती "राज्यरक्षणाला। भरत आणूं" ७०

## भरताचें अयोध्येस आगमन व शोक

भरत आला अयोध्येसी। देखे विपरीत चिन्हासी ॥
लोक उद्विग्न मानसीं। राजासाठीं ७१
भरत अयोध्येसि येत। कोणि सामोरे न जात ॥
ठायिं ठायिं स्तब्ध दिसत। सर्व लोक ७२
भरत सखेद मानसीं। जाय मातृदर्शनासी ॥
कैकेयि देखुनी तयासी। हर्षे बोले ७३
कैकेयि बोले भरतास। "गेला दशरथ स्वर्गास ॥
वनीं वास श्रीरामास। तुझ्यासाठीं" ७४
भरत धिक्कारी मातेसी। "आग लागो या जिव्हेसी ॥
माय नव्हेस तूं विवशी। वाटे मज" ७५
भरत बोले धिक्कारून। "कैकेयि नव्हे ही डांकीण ॥
पतिप्राणांचें हरण। करण्या आली" ७६

भरत बोले धिक्कारून । "रामा राज्य हें अर्पीन ॥
घोरवनीं मी जाईन । सत्य! सत्य!" ७७
धन्य! धन्य! तो भरत । महाज्ञानी भाग्यवंत ॥
रामपदीं मती रत । धन्य त्याची ७८
धन्य! धन्य! तो भरत । "स्वार्थत्याग" मूर्तिमंत ॥
आत्मयज्ञ-धडा देत । जगताला ७८
भरताज्ञेनें आनंदले । लोक सर्व सिद्ध झाले ॥
सीताराम पाहूं गेले । चित्रकूटीं ८०

## चित्रकूटीं भरतभेट

राम लक्ष्मण भेटले । भरतचित्त आनंदलें ॥
त्यानें लोटांगण घातलें । रामपायीं ८१
भरत बोले श्रीरामासी । "मातापिता बंधु होसी ॥
रामा! टाकुनी दीनासी । जाऊं नको!" ८२
भरत बोले "मी लेंकरूं । रामा! दूर नको सारूं ॥
मातेवीण बा! पांखरूं । कैसें जगे?" ८३
भरत बोले दीनवाचा । "ज्येष्ठ पुत्र तूं राजाचा ॥
योग्य स्वामी त्रैलोक्याचा । रामा! तूंच" ८४
राम बोले "बाळा! भरता! । सूक्ष्म दृष्टीनें पहातां ॥
तुझ्या माझ्यांत तत्त्वतां । भेद नाहीं" ८५
राम बोले "रे! भरत! । अती श्रेष्ठ सत्यव्रत ॥
त्यासि निश्चयें पाळीत । धन्य तोच" ८६
राम बोले भरताला । "हरिश्चंद्र डोंबें विकिला ॥
शिबी देत निजमांसाला । सत्यासाठीं" ८७
भरत बोधितो राघव । म्हणे "ऐक माझा भाव ॥
पित्राज्ञा ही माझी ठेव । भंगूं नये" ८८
राम भरता बोले भावें । "बाळा! वचनमुक्त व्हावें ॥
स्वर्गीं अढळपद द्यावें । दशरथानें" ८९
भरत पाहोनि सचिंत । ऋषि श्रेष्ठ येती तेथ ॥

त्यासि सांगती गूढार्थ । वनवासाचा ९०
ऋषि बोलती " बा भरता ! । सुखें राज्य भोगीं ताता ! ।
देवकार्य करणें आतां । राघवासी ९१
स्वयें वनालागीं जाणें । सीताहरण करविणें ॥
रावण ससैन्य मारणें । रामकार्य " ९२
भरतवीर संतोषला । ऋषिबोधें शांत झाला ॥
मग रामपादुकांला । मागतसे ९३
भरत बोले राघवासी । " जरी देवकार्या जासी ॥
तरी पादुका दे मजशीं । पूजीन मी " ९४
रामपादुका घेतल्या । भावें भरतें वंदिल्या ॥
सिंहासनीं स्थापियेल्या । पूज्य भावें ९५
भरत वल्कलें नेसला । नंदिग्रामांत राहिला ॥
ध्यात मनीं श्रीरामाला । अहोरात्र ९६
भरत झालासे विरक्त । सदां रामचरण ध्यात ॥
दिवस रात्रीहि मोजित । वनवासाच्या ९७
शुद्ध प्रेमाचा सागर ! । स्वार्थत्यागाचें आगर ! ॥
उच्च वृत्तींचें भांडार ! । भरत हा ९८
जितेंद्रिय दृढव्रत । रामभजनीं नित्य रत ॥
सर्व वासना जिंकीत । तो हा भरत ! ९९
अयोध्याकांड श्रेष्ठ । सर्व कांडांत वरिष्ठ ॥
उच्चनीच वृत्ती स्पष्ट । येथें झाल्या १००

अयोध्याकांड समाप्त

# अरण्यकांड

## श्रीरामाचें पंचवटीस गमन

चित्रकूट तो सोडूनी । राम निघे घोर वनीं ॥
सीता सुंदरी मागूनी । लक्ष्मण रक्षी १
दंडकारण्यांत आला । रामें विराध मारिला ॥
शरभंग महर्षीला । गती दिली २
ऋषि अगस्ती देखून । रघुवीर होय लीन ॥
म्हणे " वनीं या सुस्थान । दावा मज " ३
ऋषि अगस्ती बोलत । " पंचवटी ही विख्यात ॥
रामा ! वास तुज येथ । इष्ट वाटे " ४
पंचवटी क्षेत्र । रामदर्शनें पवित्र ॥
लीन सर्व प्राणिमात्र । रामभजनीं ५

## शूर्पणखेची प्रेमकहाणी

शूर्पणखा ते राक्षसी । लुब्ध होय श्रीरामासी ॥
म्हणे " टाकुनी सीतेसी । मजसीं वर " ६
राम विनोदें बोलत । " बाई ! मी तों विवाहित ॥
तुज योग्य भर्ता दिसत । लक्ष्मण हा ७
बंधु माझा हा लक्ष्मण । बहु कष्टी भार्येवीण ॥
शूर्पणखे ! याला वरून । सुखी हो तूं ! ! " ८
वीर नोवरा लक्ष्मण । नष्ट करी नाक कान ! ॥
रडत जाय ती पापीण । शूर्पणखा ९
रडत रडत गेली । रावणसभेंत ठाकली ॥
पडत आक्रोशें भूतळीं । शूर्पणखा ! १०

## शूर्पणखेची रावणाला चिथावणी

शूर्पणखा ती सक्रोध । म्हणे "रावणा तूं अंध !॥
खरदूषणांचा वध । नेणसी कां ? ११
रावण अतुर्बळी । बंधु असतां तूं जवळी ॥
राम विटंबी ही दुबळी । शूर्पणखा ! १२
बंधु खर भला । रामें 'निर्वैर' मारिला ! ॥
अंध कां रे ! तुम्ही बनलां । लंकावासी ? १३
थोर रावणा ! पुरुषार्थ । अप्सराही भोगिसी येथ॥
परी व्यर्थ ! रे ! हें व्यर्थ । सीतेवीण १४
त्रैलोक्याचा पति । रावण बोलती जगतीं ॥
तुज कां रे! सीतासती । तुच्छ करी !! १५
रावणा ! तूं भ्रष्ट ! । व्यर्थ म्हणविसी बलिष्ठ ॥
राजा राम वाटे श्रेष्ठ । त्रैलोक्यांत !" १६
शूर्पणखेनें चिडविला । रावण ईर्षेनें चालला ॥
मागे साह्य मारीचाला । सीताहरणीं १७

## मायामृग

मारीच राक्षस । घेई मायामृगवेष ॥
कपट दावुनी सीतेस । भुलवीतसे १८
शुद्ध सुंदर सोन्याचा । दिव्य अपूर्व देहाचा ॥
हरिणवेष मारीचाचा । अत्यद्भुत ! १९
चक्राकार गिरक्या घेत । हरिण स्वेच्छेनें नाचत ॥
टौकारूनि प्रेमें बघत । सीतेकडे ! २०
चरत चरत आला । हरिण सन्मुख ठाकला ॥
चकित होय सीताबाला । लीलेनें त्या २१
सीता सुंदरी निष्पाप । हरिण मूर्तिमंत पाप ! ॥
सती भुलत आपोआप । लीलेनें त्या २२
सीता बोले आनंदून । "काय दिव्य बाई हरिण !!॥
वाटे तुच्छ त्रिभुवन ! । याचेपुढें" २३

## सीतेचा हट्ट

सीता बोले "रघुवीर! । हरिण सोन्याचा सुंदर ॥
मज आवडे हा फार । आणाना कां?" २४
सीता बोले "रघुनंदन! । हरिण अयोध्ये नेईन ॥
सासूबाईना दावीन । कौतुकानें" २५
सीता बोले लडीवाळ । "हट्ट पुरवा एकवेळ ॥
गोंडस हा हरिणबाळ । मज द्यावा" २६
सीता मानिनी स्फुंदत । "ऐक राघवा! निश्चित ॥
हरिण हा न येतां येथ । प्राण ठेवीना मी!!" २७
सीता-हट्ट बाई पुरला । राम प्रेमानें जिंकिला ॥
पतिदुःखें कळवळला । राजा राम २८
राम जगजेठी । जाये मृगापाठीं ॥
सीता सुंदरी गोरटी । लक्ष्मण रक्षी २९

## मायामृगाचें कपट

प्राणभयें धांव घेई । राम जवळ धरूं जाई ॥
तेच क्षणीं गुप्त होई । मायामृग ३०
क्षणीं एक जवळीं येत । गुप्त क्षणामध्यें होत ॥
हरिण नेई भुलवीत । राजा राम ३१
माया राक्षसी जाणून । राम चापीं लावी बाण ।
हरिणप्राणांचें हरण । करण्या सोडी ३२
रामबाणीं विद्ध झाला । हरिण किंकाळीं लागला ॥
मृत्यु काळ जवळीं आला । मारीचाचा ३३
कपटपूर्ण तो राक्षस । त्यजी शीघ्र मायावेष ॥
रामवाणीनें सीतेस । हांका मारी ३४
"धांव! धांव! रे लक्ष्मण!। प्राणसंकट दारुण" ॥
रामवाणीनें त्या पूर्ण । हांका येती ३५

## सीतेचा उतावीळपणा

रामवाणी येतां कानीं । सीता घाबरली मनीं ॥
अश्रु गळती नेत्रांतुनी । जानकीच्या! ३६
सीता बोले "रे लक्ष्मण! । राम संकटीं दारुण ॥
घात राक्षसांनीं पूर्ण । केला वाटे ' ३७
सीता बोले लक्ष्मणासी । " प्राणसंकट रामासी ॥
वनीं जाउनी वेगेंसी । रक्षीं राम ३८
राम माझा प्राण । राम माझें ध्यान ॥
रामाविण एक क्षण । वांचेना मी ३९
लक्ष्मणा! तूं श्रीरामाचा । सखा बंधुहि पाठीचा ॥
मग कां रे! अंत त्याचा । पहातोसी? ४०
प्राणसंकटीं रघुनाथ । कां रे लक्ष्मणा! तूं स्वस्थ? ॥
बंधुप्रीतीचा गूढार्थ! । हाच कां रे?" ४१

## लक्ष्मणाचा शांतपणाचा युक्तिवाद

महाभाग तो लक्ष्मण । वदे जानकी वंदून ॥
"वनीं वीर रघुनंदन । सुखी आहे" ४२
लक्ष्मण बोले निश्चयेंसीं । "रामवाणी नाहीं ऐशी ॥
शुद्ध माया ही राक्षसी । जाण सीते!" ४३
लक्ष्मण बोलतो सीतेला । "राम अवध्य जगताला ॥
सर्वदेवदानवांला । अजिंक्य तो" ४४
लक्ष्मण बोले "गे जानकी! । राम श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥
कळिकाळातें हा जिंकी । राजा राम" ४५
लक्ष्मण बोलतो "गे सीते! । त्वरित भेटशी रामातें ॥
शीघ्र घेऊनी हरिणातें । येईल तो" ४६

## सीतेनें केलेली लक्ष्मणाची निर्भर्त्सना

सीता बोले "रे लक्ष्मण! । गुप्त शत्रु तूं दारुण ॥
रामभद्राचें मरण । वांछितोसी!" ४७

सीता बोले क्रोधवाणी । " दुष्ट लक्ष्मणा ! ही करणी ! ॥
कपटप्रेम तूं दावोनी । येसी येथें ! " ४८
सीता बोले " रे सौमित्र ! । दुष्ट भरताचा तूं मित्र ! ॥
आमुचा तूं वैरी मात्र । कळों आलें ! ! " ४९
सीता बोलते सक्रोध । " नीच लक्ष्मणा ! कामांध ! ॥
मज वांछिसी निर्वंध । रामामागें ! " ५०
सीता बोले संतापून । " उडी गंगेंत घेईन ॥
घोर विष मी प्राशीन । राम न येतां ! ! ५१
जा जा लक्ष्मणा ! रे दुष्टा ! । नको दर्शन पापिष्टा ! ॥
सांग भरता त्या नष्टा । मरण अमुचें ! ! " ५२

## लक्ष्मणाचें खोंचदार उत्तर व प्रयाण

थोर भाग्य सौमित्राचें । रचो पर्वत पुण्याचे ! ॥
त्वरित जाऊनी सीतेचे । पाय धरी ! ५३
लक्ष्मण बोलतो " गे सीते ! । माते ! आवरीं क्रोधातें ॥
नको निंदूं गे ! दीनातें । व्यर्थ मज " ५४
लक्ष्मण बोले " गे जानकी ! । स्त्रिया प्रसिद्ध या लोकीं ॥
धर्मशून्य अविवेकी । नारी जाण ५५
तीक्ष्ण चंचलवृत्ति । स्त्रिया भेद वाढविती ॥
पूर्णसाहसी या असतां । " लक्ष्मण बोले ५६
लक्ष्मण बोलतसे खिन्न । " यमदंड मी सोशीन ! ॥
परी जानकी ! हें वचन । सोसवेना ! " ५७
बोले सौमित्र उद्विग्न । " इंद्रवज्र मी भेदीन ! ॥
परी सीते ! तव वचन । सोसवेना ! " ५८
लक्ष्मण बोलतो सीतेला । " माते ! आवरीं शोकाला ॥
त्वरित आणितों रामाला । भिऊं नको ५९
राक्षसांनीं भरलें वन । सीते ! रहा सावधान ॥
जेथें वीर रघुनंदन । तिकडे जातों " ६०

## रावणाचें आगमन

लक्ष्मण चालला दुःखित। रावण दिसे हर्षयुक्त ॥
दिसे घोर रावणरथ। आकाशांत ६१
घोर रावणरथ। दिव्यास्त्रांहीं सज्ज दिसत ॥
खर जोडिले विख्यात। भयंकर ६२
घोर रावणरथ। दिसे आकाशमार्गांत ॥
झाला दंडकारण्यांत। हाहाःकार ६४
वृक्षपर्ण न हालत। गोदावरी स्तब्ध दिसत ॥
वनदेवता भयभीत। रावण येतां ६५
ऋषि सर्व चिंताक्रांत। राक्षस ते हर्षभरित ॥
मृग सैरावैरा पळत। रावण येतां ६६

## भिक्षुरूपी रावणाची पृच्छा

भिक्षुरूपें आला। सीतेसन्मुख ठाकला ॥
दावी पूर्ण निजमायेला। रावण तो! ६७
उग्ररूप भिक्षु दिसतो। छाटी भगवी पांघरितो ॥
करीं कमंडलु शोभतो। रावणाच्या ६८
नेत्र दिसताती आरक्त। मुख पूर्णक्रोधयुक्त ॥
ओंठ थरथरां हालत। रावणाचे ६९
रावण बोले पापवाणी। "कां गे! एकटी तूं विपिनीं ॥
विष्णुपत्नी कीं इंद्राणी। सांग मज ७०
वनीं राक्षस ते फिरती। श्वापदेंही क्रूर असती ॥
कां गे! वाटेना तुज भीति"। रावण पुसे ७१
सीता बोले "यतिवर!। भर्ता माझा रामवीर ॥
लक्ष्मण वीर धनुर्धर। दीर माझा ७२
बंधु रामलक्ष्मण। दशरथाचे पुत्र जाण ॥
सीता सती मी सुजाण। रामभार्या" ७३

## रावणाची दर्पोक्ति

रावण बोलतो " गे सीते ! । राज्यभ्रष्ट दुर्भाग्यातें ॥
कां गे ! मूढ त्या रामातें । भुललीस तूं ? ७४
त्रैलोक्याचा पति । मज रावण म्हणताती ॥
देव चळचळां कांपती । धाकें माझ्या ! ७५
देव दानव गंधर्व । दास केले मीं हे सर्व ॥
रणीं होती ते हतगर्व । माझेपुढें ७६
कुबेर जिंकून । आणीं पुष्पक विमान ॥
देवेंद्र तो होय लीन । माझेपुढें ७७
स्वर्ग पाताळीं घालीन । पाताळ तो स्वर्ग करिन ॥
मृत्यु क्षणांत जिंकीन । रावण मी ! ७८
जिंकिल्या मीं देवांगना । भोगितों मी अप्सरांना ॥
भूवरच्या सर्व ललना । माझ्याच या ! ! " ७९
रावण बोलतो सीतेला । " भोग राज्यवैभवाला ॥
होय सर्व राक्षसांला । स्वामिनी तूं " ८०

## सीतेचें बाणेदार उत्तर

सीता दिसे क्रोधाविष्ट । पातिव्रत्यतेज स्पष्ट ॥
रावण घाबरे गर्विष्ठ । तेजानें त्या ! ८१
सीता थोर पतिव्रता । रावण क्षणीं भस्म होता ! ॥
परी जाणुनी गूढार्था । शापीना ती ८२
सीता बोलत्ये " रे दुष्टा ! । मूर्खा ! रावणा गर्विष्ठा ! ॥
कां न झडे रे पापिष्ठा ! । जिव्हा तुझी ? " ८३
सीता बोले " राम एक । सर्व जगताचा बाप ॥
त्याच्यापुढें क्षुद्र मशक । रावणा ! तूं " ८४
सीता बोले " रामभद्र । देवेंद्राचाहि तो इंद्र ॥
त्याच्यापुढें केवळ क्षुद्र । रावणा ! तूं " ८५
सीता बोले " रे रावण ! । रामपदीं जडलें मन ॥
अप्राप्य मी सत्य जाण । त्रैलोक्याला ! " ८६

## सीताहरण व जटायूचा पराक्रम

सीता रावणें उचलिली। त्वरित रथीं बैसविली।
शीघ्र लंके चालविली। बलात्कारें ८७
सीता रावणें उचलिली। स्वर्गीं दुंदुभी वाजली॥
देवमंडळी हर्षली। रावणकृत्यें ८८
रावण नेतां सीतासती। वनदेवता कोपती॥
ऋषि सर्व धिक्कारीती। रावणाला ८९
रावण नेतां सीतासती। तेजोहीन तो गभस्ति॥
दाही दिशा पूर्ण भरती। अंधकारें ९०
रावण नेतां सीतासती। पशू ढळढळां रडती॥
सर्व वनचरें शापिती। रावणाला ९१
सीता रडे खिन्नवदन। "धांव! धांव! रे लक्ष्मण!॥
पापमूर्ति हा रावण। मजला नेतो" ९२
सीता ओरडते दीन। "धांव! धांव! रघुनंदन!॥
दुष्टवृत्ति हा रावण। मजला नेतो" ९३
सीतारुदन ऐकून। आला जटायु धांवून॥
रथ रावणाचा भग्न। केला त्यानें ९४
रावण दिव्यास्त्रसंपन्न। जटायु तो वृद्ध पूर्ण॥
भग्नशरीर होऊन। पडला खालीं! ९५
होय जटायु मूर्छित। मृतप्राय सह्लादित॥
रामनाम उच्चारीत। काळ कठी! ९६
गगनमार्गीं तो रावण। सीता चालला घेऊन॥
ऋष्यमूकीं वानरगण। सीता देखे ९७
सीता आकाशमार्गांत। कपि पहाती विस्मित॥
रावणासि धिक्कारीत। सर्वजण ९८
वस्त्रंभूषणें सुंदर। टाकी जानकी भूवर॥
हर्षयुक्त कपिवीर। पहाताती ९९
सीता रावणानें नेली। लंकापुरींत ठेविली॥

दुष्ट रावण ते वेळीं । हर्षयुक्त १००

## श्रीरामाचा शोक

महावीर तो लक्ष्मण । आला राघव घेऊन ॥
आश्रम तो सीताहीन । पाहताती ! १
राम आश्रमासी येतां । कोठें दिसेना ती सीता ॥
खेद राघवाच्या चित्ता । अनिवार २
राम जगजेठी । करी शोक सीतेसाठीं ॥
दुःख दुःसह तें पोटीं । सामावेना ३
राम लोकपाळ । सीतावियोगें विह्वळ ॥
अश्रु येती घळाघळ । नेत्रांतूनि ४
सीतावियोगें तापला । राजा राम भ्रांत झाला ॥
पुसे वन्य त्या वृक्षांला । सीतावृत्त ! ५
राम पुसे लोकत्राता । "सांग भुजंगा ! रे ! आतां ॥
भुजंगवेणी सीता । ठावी तुज का ?" ६
राम विश्वशास्ता । म्हणे " सांग चंद्रा ! आतां ॥
चंद्रमुखी माझी कांता । ठावी तुज का ?" ७
राम शोकाकुल । म्हणे "सांग रे मृगबाळ ! ॥
सीता मृगाक्षी कोमल । ठावी तुज का ?" ८
राम बोलतो सिंहाला । "सख्या! सांगशी का मला ?॥
सिंहकटी जनकबाळा । कोठें गेली ?" ९
राम बोलतो हंसाला । " सख्या! सांग सांग मजला॥
हंसगती सीताबाला । ठावी तुज का ?" १०
" हाय! हाय! राजदुहिते! । सीते । थोर पतिव्रते !॥
मज टाकुनी दीनातें । कोठें जाशी ? ११
सांगूं काय कौसल्येला । कसा भेटूं भरताला ॥
सीतेवीण अयोध्येला । कैसा जाऊं ? १२
" महेंद्राचें तें वैभव । लोकपालांचा गौरव ॥
तुच्छ मानितो राघव । सीतेवीण !" ११३

राम बोले साशंकित । "चंद्रसूर्यांच्या देखत ॥
सीता सुंदरी ती गुप्त । कैशी व्हावी ? ११४
पंचभूतें निजलीं काय ? । ऋषितेज लुप्त होय ॥
देव झाले का निर्वीर्य । सीता नेतां ?" १५
राम बोले लक्ष्मणासी । "झालों दीन वनवासी ॥
म्हणुनि कां रे ! माझी ऐसी । अवज्ञा ही !" १६
राम बोले "रे लक्ष्मण ! । क्षमाशील जे सज्जन ॥
लोक मानिती ते दीन । तिरस्कार्य" १७

## श्रीरामाचा क्रोध व त्याचें सांत्वन

राम दिसे क्रोधयुक्त । प्राणिमात्र भयभीत ॥
प्रळयकाल त्वरित । आला वाटे १८
राम झालासे संतप्त । नेत्र दिसताती आरक्त ॥
बाहू थरथरां स्फुरत । राघवाचे १९
दीर्घ निःश्वास टाकितो ! । जटाभार सांवरी तो ॥
वाटे क्षणीं भस्म करितो । त्रैलोक्य हें २०
राम चापीं लावी बाण । म्हणे "बोल रे लक्ष्मण ! ॥
इंद्र आणूं का बांधून । बाणानें या ?" २१
राम चापीं लावी बाण । म्हणे "सागर शोषीन ॥
वायुगति मी रोधीन । क्षणामध्यें !" २२
राम बोले संतापून । "सूर्यतेज संहारीन ॥
पृथ्वी सागरीं घालीन । सीतेसाठीं" २३
रुद्ररूपी भयंकर । देखुनियां रघुवीर ॥
लक्ष्मण धांवुनी सत्वर । पाय धरी ! २४
लक्ष्मण बोले नम्र वाणी । "रामा ! त्रैलोक्याचा धनी ॥
रक्षकही तुजवांचोनी । अन्य कोण ?" २५
सत्त्वगुणें तूं पाळिशी । क्रोधगुणें संहारिसी ॥
जग सर्व हें शासीसी । रामा ! तूंच" १२६
पंचभूतें लोकपाळ । निरपराधी हे केवळ ! ॥

तुज सर्व अनुकूल । रामा दिसती" १२७
लक्ष्मण बोले "रघुवीर! । नृप जगाचा तूं थोर!॥
सर्व लोकांसी आधार । रामा! तूंच" २८
"नृप जरी दुष्टवृत्ति । लोक तैसेच वागती ॥
धर्मलोप होई जगतीं" । लक्ष्मण बोले! २९
"भग्न रथ हा सोन्याचा । सत्य एकाच व्यक्तीचा ॥
वाटे अन्याय एकाचा । रामा मज ३०
शत्रु एक असतां सांग । कां रे! भस्म करिसी जग? ॥
रामा! आवरीं आवेग । क्रोधाचा हा" ३१
लक्ष्मण बोले "रघुपति! । मृग दक्षिणेस पळती ॥
मार्ग सीतेचा सांगती । आम्हां वाटे" ३२
लक्ष्मण बोलतो रामासी । "चला जाऊं दक्षिणेसी ॥
घोर शासन शत्रूसीं । शीघ्र करूं" ३३
रघुवीर शांत झाला । दक्षिण दिशेस चालला ॥
वीर जटायु भेटला । मार्गामध्यें ३४

## सीतेची वार्ता

प्राण झाले कंठगत । रामनाम उच्चारीत ॥
वाट जटायु पहात । राघवांची ३५
बोले जटायु कष्टानें । "सीता नेली रावणानें ॥
दिव्य शस्त्रांच्या योगानें । मृत्यु मज" ३६
तीव्र दुःखानें मूर्छित । होय जटायु तो मृत ॥
रामलक्ष्मणांदेखत । स्वर्गी गेला! ३७

## कबंध राक्षस व त्याचा सल्ला

सीताशोधार्थ चालला । रामें कबंध मारिला ॥
दिव्यरूपें तो लागला । रामचरणीं ३८
बोले कबंध रामासी । "त्वरित जाउनी पंपेसी ॥
कपिश्रेष्ठ सुग्रीवासीं । सख्य करीं १३९

सुग्रीव वानर । थोर सत्त्वधीर ॥
करील सत्वर । कार्य तुमचें १४०
सुग्रीव राघव । समदुःखी एकजीव ॥
पूर्ण ठेवुनी हा भाव । सीता शोधा !” ४१
जाय कबंध स्वर्गांत । राम झाला शोकमुक्त ॥
बंधु लक्ष्मणासमवेत । पंपे आला ४२

## पंपासरोवर

धन्य ! पंपासरोवर । भाग्यवंत वनचर ॥
ऋष्यमूक नगवर । धन्य ! धन्य ! ४३
पंपासरोवर । जल शुभ्र तें सुंदर ॥
ऋषी देव थोर थोर । स्नाना येती ४४
रम्य पंपातीर । स्वच्छ वाहती निर्झर ।
गगनचुंबित ते थोर । वृक्ष दिसती ४५
दिव्य पंपातीर । मृग खेळताती स्वैर ॥
उड्या मारिती वानर । वृक्षावरुनी ४६
पक्षी आनंदानें गाती । शुक सारिका बोलती ॥
मोर थयथयां नाचती । पंपातीरीं ४७
भृंग गुंजारव करिती । पुष्पगंधें वेडे होती ॥
सर्प निर्भय डोलती । पंपातीरीं ४८
एक वानर वनांत । धरुनी वानरीचा हस्त ॥
मधुप्राशनें उन्मत्त । क्रीडा करी ४९
देखुनीयां रघुवीर । दावि वांकुल्या वानर ॥
पुच्छ उभारूनी थोर । पाहातसे ५०
राम खदखदां हांसत । म्हणे “वनचर समस्त ॥
माझे मित्र तुम्ही आप्त । प्राणाधिक !” ५१
राम झालासे प्रसन्न । शोकमुक्त झालें मन ॥
करूं मग इच्छी स्नान । पंपाजळीं १५२

अरण्यकांड सरलें । शोकरसानें हें भरलें ॥
नारीचांचल्यहि झालें । स्पष्ट येथें १५३

## अरण्यकांड समाप्त

# किष्किंधाकांड

## पंपातीरावर श्रीरामलक्ष्मण

रम्य पंपातीर । राजा रघुवीर ।।
लक्ष्मणांकावर । शयन करी १
भव्य जटाभार । दिव्यवल्कलधर ।
त्रैलोक्यसुंदर । रघूत्तम २
सुहास्यवदन । हातीं चापबाण ।।
जानकीजीवन । रघूत्तम ३
विशालनयन । ओष्ठ रक्तवर्ण ।।
दिव्यतेजपूर्ण । रघूत्तम ४
भव्यवक्षःस्थळ । दिव्यबाहुबळ ।।
कृपाळू प्रेमळ । रघूत्तम ५
पित्राज्ञापाळक । सद्धर्मरक्षक ।।
अधर्मनाशक । रघूत्तम ६
सुमित्रानंदन । उर्मिळाजीवन ।।
राघवाचा प्राण । लक्ष्मण ७
रणरंगधीर । धर्मज्ञ उदार ।।
शुद्ध सत्त्वधीर । लक्ष्मण ८
जितेंद्रिय शुद्ध । रामप्रेमबद्ध ।।
विवेकी सुबुद्ध । लक्ष्मण ९
राम लक्ष्मण । सीतेवीण दीन ।।
बैसती ते मौन । पंपातीरीं ! १०
वायु वाहे मंद । शीतळ सुगंध ।।
राघवांचा खेद । हरावया ११

सूर्य तो दुःखित । सौम्य प्रकाशत ॥
राघवांचें चित्त । तोषावया १२
धरित्री तरुवर । वनश्री सुंदर ॥
दावी रघुवीर । तोषावया १३
ससैन्य मदन । आला सावधान ॥
राघवांचें मन । हर्षावया १४
गंधर्व गाताती । अप्सरा नाचती ॥
जानकीचा पति । सुखवावया १५
दिव्य फणीवर । येउनी सत्वर ॥
रामशिरावर । छत्र धरी ! १६
राम बोले "रे लक्ष्मण ! । भरतबंधु माझा दीन ॥
वनवास हा संपून । पाहूं का रे ! १७
उदारचरित । माझे ठायीं रत ॥
प्रेमळ भरत । पाहूं का रे ? १८
कोण ती विरक्ति ! । राज्यीं अनासक्ति ! ॥
माझे ठायीं भक्ति । भरताची रे ! १९
निर्दय मी पूर्ण । वाटे रे लक्ष्मण ! ॥
भरत तो सोडून । येथें आलों " २०
राम बोले लक्ष्मणासी । "दुःख वाटते मानसीं ॥
भरतभेट दुर्भाग्यासी । कैंची मज !" २१
राम बोले "रे लक्ष्मण ! । दुःखमय हें जीवन ॥
सीतावियोगा साहून । कैसें कंठूं ? २२
शोकानें व्याकुळ । जानकी कोमळ ॥
जीवित दुर्मिळ । ठेवील का ? २३
रावणानें नेली । दुःखमग्न झाली ॥
सीता ती ये काळीं । कोठें आहे ! ! २४
कैशी सीता चाले । काय सीता बोले ॥
सर्वहि ये वेळे । आठवतें ! २५

कोठें ती सुंदरी । सीता सहचरी ॥
दुःखसीमा खरी । लक्ष्मणा ! ही " २६
अश्रु घळघळां । येती रामडोळां ॥
दुःखित जाहला । दीनबंधु २७
विवेकी लक्ष्मण । करी समाधान ॥
बोधी राममन । प्रेमभावें २८
लक्ष्मण आधार । राघवासी थोर ॥
वनवास घोर । भासों नेदी २९
आज्ञाधारक लक्ष्मण । रामवात्सल्यानें पूर्ण ॥
बंधुप्रेमाची ही खूण । लोकमान्य ३०
राम शांत झाला । बोले लक्ष्मणाला ॥
"शीघ्र सुग्रीवाला । भेटूं आतां" ३१
सुग्रीव वानर । भयभीत थोर ॥
ऋष्यमूकावर । थारेचना ! ३२
सुग्रीव दुःखित । मनीं साशंकित ॥
राघवहृद्गत । जाणेचना ३३
सुग्रीव मानसीं । कष्टी अहर्निशीं ॥
वालीसामर्थ्यासी । भिऊनीयां ३४

## किष्किंधेचें राजकारण

ज्येष्ठ बंधु वाली । किष्किंधा सांभाळी ॥
सुग्रीवाचे भाळीं । वनवास ३५
सुग्रीव तो वाली । होते एके काळीं ॥
वानरांचे मेळीं । सख्यत्वानें ३६
वाली बंधु ज्येष्ठ । सुग्रीव कनिष्ठ ॥
प्रेम एकनिष्ठ । दोघांमध्यें ३७
वाली तो सुग्रीव । बंधु एकजीव ॥
मनीं दुजा भाव । असेचना ३८

पुढें एक दिवस । मायावी राक्षस ॥
आला किष्किंधेस । युद्धासाठीं ३९
बाहेरी उद्धत । राहुनी गर्जत ॥
वालीसी मागत । युद्धदान ४०
वीर तो दुर्धर । वाली भयंकर ॥
निघाला बाहेर । किष्किंधेच्या ४१
सुग्रीव चित्तांत । होय साशंकित ॥
निघाला त्वरित । वालीमागें ४२
वाली वीर श्रेष्ठ । देखुनीयां रुष्ट ॥
मायावी तो दुष्ट । पळतसे ! ४३
पळत चालला । विवरांत गेला ॥
निर्भय भासला । मायावी तो ४४
वाली क्रोधावेशीं । बोले सुग्रीवासी ॥
" विवरद्वारासी । रक्षीं बाळा ! ४५
विवरीं जाईन । मायावी मारीन ॥
शीघ्र परतेन । भिऊं नको ! " ४६
विवरांत गेला । वत्सर लोटला ॥
वाली न भेटला । सुग्रीवासी ! ४७
रक्त फेनयुक्त । विवरद्वारांत ॥
सुग्रीव दुःखित । पहातसे ४८
दैत्यांची आरोळी । विवरांत झाली ॥
सुग्रीवा वाटली । हर्षयुक्त ! ४९
जयशब्द थोर । करी वाली वीर ॥
सुग्रीववानर । ऐकेचना ५०
सुग्रीव दुःखित । रडे शोकतप्त ॥
वानर समस्त । येती तेथें ५१
वालीचा प्राणान्त । वाटला निश्चित ॥
वानरां समस्त । किष्किंधेच्या ५२

किष्किंधानगरी । शोकमग्न सारी ॥
वालीची वैखरी । आठवूनी ५३
राज्यरक्षणाला । प्रार्थी सुग्रीवाला ॥
आग्रहें ते वेळां । कपिसैन्य ५४
निरुपाय झाला । वानरीं स्थापिला ॥
सुग्रीव बैसला । सिंहासनीं ५५
मायावीचा अंत । व्हावया निश्चित ॥
विवरद्वारांत । शिळा ठेवी ५६
सुग्रीव वानर । पापभीरु थोर ॥
राज्यासनीं स्वैर । वागेचना ५७
वाली आठवुन । अश्रु गाळी दीन ॥
निर्लोभ तें मन । सुग्रीवाचें ५८
पुढें कांहीं दिवस । होतां या गोष्टीस ॥
विवरद्वारास । वाली आला ५९
मायावी उन्मत्त । वधुनी रणांत ॥
वाली आनंदित । परतला ६०
तंव त्या विवर- । द्वारीं भयंकर ॥
शिळा वाली वीर । दृष्टीं देखे ! ६१
सुग्रीवाकारितां । हांकाहि मारितां ॥
तयाचाहि पत्ता । लागेचना ! ६२
वाली संतापला । फोडुनी ती शिळा ॥
बाहेरी निघाला । विवराच्या ६३
आणि क्रोधतप्त । भूमि दणाणीत ॥
पातला त्वरित । किष्किंधेसी ६४
आला किष्किंधेला । वाली तोंच त्याला ॥
सुग्रीव दिसला । सिंहासनीं ! ६५
बंधु तो जिवंत । दिसतां पुढयांत ॥
सुग्रीव चित्तांत । आनंदला ६६

आणखी सानंद । वंदी वालीपद ॥
दुष्ट सत्तामद । टाकुनियां ६७
सुग्रीव कपीश । थोर सत्ताधीश ॥
सर्वथा वालीस । दुर्जय तो ६८
सुग्रीव कपीश । प्रिय जनतेस ॥
होता त्या वालीस । दुर्जय तो ६९
पूर्ण सत्ताहीन । संपत्तीविहीन ॥
राज्यभ्रष्ट दीन । वाली होता ! ७०
धन्य ! तो सुग्रीव । दावुनी सद्भाव ॥
राज्याचें वैभव । तुच्छ मानी !! ७१
शुद्ध भावें वागे । वालिपदीं लागे ॥
क्षमादान मागे । सुग्रीव तो ७२
वाली मतिमंद । अविचारी शुद्ध ॥
सुग्रीवा क्रोधांध । अवमानी ७३
सुग्रीवाची भार्या । रुमानामें आर्या ॥
आत्मघात व्हाया । वाली भोगी ७४
सुग्रीवाची भक्ती । वानरां ज्या होती ॥
त्यासी तो दुर्मती । वाली छळी ७५
राज्यभ्रष्ट दीन । हिंडे रानोरान ॥
वालीला भिऊन । सुग्रीव तो ७६
ऋष्यमूकावर । सुग्रीव वानर ॥
चिंतातुर थोर । दिसतसे ७७
राघवां देखून । सुग्रीव तो खिन्न ॥
म्हणे "वीर कोण । धनुर्धर ?" ७८
सुग्रीव सचिंत । म्हणे "वालीआप्त ॥
करावया घात । आला वाटे !" ७९
अंजनीनंदन । मग हनुमान ॥
धाडी सावधान । राघवांसीं ८०

दिव्य राममूर्ती । लक्ष्मणांकावरती ॥
सानंद मारुती । पहातसे ८१
श्रीराम देखिला । मारुती हर्षला ॥
सद्भावें दाटला । कपिकंठ ८२
श्रीरामचरण । मुक्तीचें साधन ॥
मारुतीचें मन । लीन होय ८३
श्रीरामचरण । योगियांचें ध्यान ॥
मारुतीचें मन । लुब्ध होय ८४
श्रीराम मारुती । सद्भावें भेटती ॥
प्रेमपूर चित्तीं । लोटतसे! ८५
श्रीराम मारुती । सप्रेम भेटती ॥
दुर्जन कांपती । चळचळां ८६
श्रीराम मारुती । एकरूप होती ॥
ब्रह्मानंदस्थिति । अनुभविती ८७
राघवांचें वृत्त । ऐकुनी दुःखित ॥
मारुती संतप्त । मनीं झाला ८८
मारुती बोलत । "एकनिष्ठ भक्त ॥
सुग्रीवाचा दूत । राघवा! मी ८९
सुग्रीव वानर । संकटांत घोर ॥
तुम्हांसी आधार । करूं इच्छी ९०
सुग्रीव कृतज्ञ । उदार धर्मज्ञ ॥
उपकार सुज्ञ । फेडील तो ९१
होतां वालीवध । जानकीचा शोध ॥
रावण तो बद्ध । करूं आम्ही!" ९२
सुग्रीवाची कथा । मारुती सांगतां ॥
क्रोध आला चित्ता । श्रीरामाच्या ९३
श्रीराम सक्रोध । म्हणे "हतबुद्ध ॥
वाली तो मदांध । वधीन मी ९४

सुग्रीवाचें प्रिय । तेंचि माझें ध्येय ॥
दुर्जनांचा क्षय । करणें मज" ९५
सुवेळाचलांत । सुग्रीवा भेटत ॥
राजा रघुनाथ । मित्रत्वानें ९६
वृक्षशाखेवर । सुग्रीवासमोर ॥
राजा रघुवीर । बैसलासे ९७
अग्नीचे संन्निध । सुग्रीव सुबुद्ध ॥
होय स्नेहबद्ध । राघवांसी ९८
सुग्रीव राघव । होती एकजीव ॥
मनीं भेदभाव । उरेचना ९९
राघवबळासीं । देखुनी विश्वासीं ॥
सुग्रीव वालीसीं । युद्धा बाहे! १००
वाली श्रेष्ठ वीर । किष्किंधेबाहेर ॥
येतसे सत्वर । युद्धालागीं १
इंद्रदत्तमाळा । घाली वाली गळां ॥
तेणें तो आगळा । वीर जगीं २
सुग्रीव युद्धांत । होय पराभूत ॥
अशुद्ध ओकत । पळतसे ३
सुग्रीव वानर । देखोनी लाचार ॥
राजा रघुवीर । बाण योजी ४
बाण रामनामांकित । हृदय वालीचें भेदित ॥
बाणप्रभावें मूर्च्छित । वाली झाला! ५
दिव्यमूर्ती रघुनंदन । दिव्य हातीं चापबाण ॥
क्रोधसंतप्त वदन । वाली पाहे ६
वाली आसन्नमरण । चहूंकडे पाहे दीन ॥
शत्रुमंडळीं आपण । जाणतसे ७
वालि बोले मरणोन्मुख । "भला भला रे! धार्मिक ॥
रामा! भूपति तूं एक । शोभतोस! १०८

दुष्टा! वंचका! राघवा!। शिष्य वसिष्ठाचा बरवा॥
धन्य! क्षत्रियाचा छावा। शोभतोस! १०९
राम शुद्ध धर्ममूर्ति। लोक सर्व वाखाणिती॥
त्याची हीच का प्रचीति। मजला यावी!! १०
बंधु सुग्रीवासीं युद्ध। देत असतां मी सक्रोध॥
गुप्तपणें कां रे! वेध। नीचा! केला? ११
राजा दशरथ स्वर्गांत। माझा पुसेल वृत्तान्त॥
त्यास कसा करिशी तृप्त। राघवा! तूं? १२
वाली मिळे पंचत्वाला। रामा! गती तीच्च तुला॥
परी निंद्य या लोकांला। रामनाम!" १३
राम हांसोनी बोलत। "वाली! वल्गना ही व्यर्थ!॥
मतिभ्रंश वाटे खचित। तुज झाला" १४
राम बोले सत्यव्रत। "पृथ्वी सर्व सागरांत॥
ब्रह्मदेव पूर्वी देत। इक्ष्वाकूंना १५
भरत इक्ष्वाकुवंशास। राज्य करी अयोध्येस॥
बंधु आम्ही त्याचे दास। येथें आलों १६
भरतदास मी सत्त्वस्थ। धर्म जाणितों यथार्थ॥
कां रे! निंदिसी तूं व्यर्थ। मूढा मज? १७
वीर क्षत्रिय मी शुद्ध। कुल जगांत प्रसिद्ध॥
क्षुद्र वानरा! रे युद्ध। तुजसीं कैचें?" १८
राम बोले भूशासक। "दुष्ट परस्त्रीहारक॥
वाममार्गीहि निःशंक। वधावे ते!" १९
राम बोले भूशासक। "दुष्ट परराज्यहारक॥
न्यायान्यायेंहि निःशंक। वधावे ते! २०
राम बोले भूरक्षक। "नीच सद्धर्मनाशक॥
वाममार्गीहि निःशंक। वधावे ते!" २१
राम बोलतो वालीस। "पापमुक्त तूं झालास॥
सुखें जाय बा! स्वर्गास। मदाज्ञेनें" १२२

शुष्क होय वालीवदन । अश्रुपूर्ण ते नयन ॥
हळुहळू खिन्नवदन । वाली रडे १२३
वाली तळमळे भूमीस । प्राण झाले कासावीस ॥
सांगू इच्छितो रामास । कांहीं एक २४
राम जगाची माउली । वालीस्नेहार्द्र ती झाली ॥
वीर वालीला कवटाळी । प्रेमभरें २५
वाली बोलतो सद्गद । " पृथ्वीपते ! रामभद्र ! ॥
बाळ माझा हा अंगद । रक्षीं प्रेमें २६
पूर्ण सुखांत वाढला । बाळ अंगद हा भला ॥
तुझ्या पदीं म्यां घातला । रघूत्तमा ! २७
रावण वधील । सीता सुंदरी आणील ॥
रामा ! तुज तुष्टवील । बाळ माझा " २८
कपी सर्व सद्गदित । राम पाहतो दुःखित ॥
वाली सर्वांच्या देखत । स्वर्गी गेला ! २९
महेंद्रविमान । येई गगनांतून ॥
वालीला घेऊन । स्वर्गी जाय ३०
सुग्रीव वानर । राज्यासनीं थोर ॥
राजा रघुवीर । स्थापितसे ३१
युवराजपद । भोगितो अंगद ॥
अंतर्बाह्य शुद्ध । वर्तूनीयां ३२
होतां राज्यप्राप्ति । सुग्रीव भूपति ॥
राम सीतापति । विसरला ! ३३
जानकीचा शोध । रावणाचा वध ॥
सुग्रीव कामांध । विसरला ! ३४
पूर्ण कामाधीन । सुग्रीवाचें मन ॥
राघववचन । विसरला ! ३५
सुग्रीव वानर । विषयांत चूर ॥
किष्किंधेबाहेर । पडेचना १३६

मारुतीचा बोध । राघवाचा क्रोध ।
सुग्रीव मदांध । मानीचना ! १३७
सीतेसाठीं राम । संतप्त परम ॥
सुग्रीवाचा भ्रम । ओसरेना ! ३८
श्रीराम उद्विग्न । आज्ञापी लक्ष्मण ॥
सुग्रीवाचें मन । बोधावया ३९
लक्ष्मण संतप्त । आला किष्किंधेंत ॥
वानर पळत । धाकें त्याच्या ४०
वेगानें चालला । राजद्वारीं आला ॥
लक्ष्मण भासला । मृत्युरूप ४१
सुग्रीवाचे दूत । जोडुनीयां हात ॥
लक्ष्मणा समस्त । मार्ग देती ! ४२
सुग्रीवांतःपुर । रम्य मनोहर ॥
लक्ष्मण वीर । पहातसे ४३
गीतवाद्यध्वनी । लक्ष्मणाचे कानीं ॥
अंतर्गृहांतूनी । ऐकूं आला ४४
तोरड्यांचा नाद । कामिनीसंवाद ॥
लक्ष्मण क्रोधांध । ऐकतसे ४५
निष्पाप लक्ष्मण । लज्जित होऊन ॥
अंतर्गृहांतून । मागें वळे ! ४६
उच्चकार्या परम । लक्ष्मणाचा जन्म ॥
लाथाडीला काम । पायातळीं ! ४७
अंतर्मुख वृत्ती । दिव्य कार्यस्फूर्ती ॥
पापभीरु मती । लक्ष्मणाची ४८
कामज्वरव्यथा । दुर्बळांच्या चित्ता !॥
लक्ष्मणा सर्वथा । शिवेना ती ! ४९
लक्ष्मण सत्वर । येउनी बाहेर ॥
टणत्कार घोर । करीतसे १५०

लक्ष्मण देखतां । भय कपीचित्ता ॥
सुग्रीवासी वार्ता । सांगताती १५१
सुग्रीव येऊन । देइ आलिंगन ॥
करी समाधान । लक्ष्मणाचें ५२
सुग्रीव बोलत । "देशोदेशीं दूत ॥
धाडिले आहेत । लक्ष्मणा! मीं ५३
कोट्यवधी शूर । गोलांगुल थोर ॥
आजचि सत्वर । येतील ते! ५४
गोलांगुल आले । किष्किंधे पातले ।
मार्ग रुद्ध झाले । किष्किंधेचे! ५५
किष्किंधा नगरी । गजबजली सारी ॥
वानरसंचारीं । क्षुब्ध होय ५६
नगप्राय भव्य । ऋक्ष कपी दिव्य ॥
राघवसहाय । करूं आले ५७
वानरांचे थवे । नित्य नवे नवे ॥
किष्किंधे बरवे । लोटताती ५८
वानरांचें मन । उत्साहानें पूर्ण ॥
तुच्छ तो रावण । मानीताती ५९
बोले कपी एक । "रामस्त्रीहारक ॥
रावण निःशंक । भाग माझा!" ६०
दुजा बोले वीर । "इंद्रजित क्रूर ॥
थापटीनें चूर । करीन मी!!" ६१
"रावण बापुडें । क्षुद्र घुंघुरडें! ॥
काय आम्हांपुढें" । कपी म्हणती ६२
जानकीशुद्धीस । सांगण्या रामास ॥
सर्वेही दिशांस । कपी गेले ६३
विश्वासें मानसीं । राम मारुतीसी ॥
म्हणे "जानकीसी । शोधील हा" १६४

आत्मनामांकित । राम मुद्रा देत ॥
मारुति हर्षित । मनीं झाला १६५
वानरां घेऊन । निघे हनुमान ॥
"सीतेसाठीं प्राण । वेंचूं" म्हणे ६६
पर्वत धुंडिले । घोर वनीं गेले ॥
वानर कष्टले । सीतेसाठीं ६७
गुहा घोर दरी । शोधिल्या वानरीं ॥
जानकी सुंदरी । आढळेना ६८
कपीसैन्य दीन । हिंडे रानोरान ॥
रावणाचें स्थान । सांपडेना ६९
विंध्याद्रीपर्वतीं । कपी मग येती ॥
सागर पहाती । मार्गामध्यें ! ७०
विस्तीर्ण सागर । अफाट दुस्तर ॥
नेत्रीं पैलपार । दिसेचना ७१
जातां किष्किंधेस । क्रोध सुग्रीवास ॥
जीविताची आस । वाटेचना ७२
कपी सर्व दीन । दुःखित होऊन ॥
त्यागावया प्राण । सिद्ध झाले ७३
तंव अकस्मात । संपाती तो येत ।
वानरां सांगत । सीताशुद्धि ७४
जानकीची वार्ता । संपाती सांगतां ॥
हर्ष कपींचित्ता । अनिवार ७५
मग लंघायाला । समुद्र मधला ॥
मारुति वाढला । क्रोधयुक्त ! ७६

## मारुतीचें भीमरूप व लंकेला उड्डाण

मारुति वाढला । भीमरूपी झाला ॥
महेंद्रनगाला । थरकांप १७७
मारुति वाढला । गगनांत गेला ॥

सूर्य अडवीला । मस्तकानें ! १७८
मारुति वाढला । गगनांत गेला ॥
मार्ग रुद्ध झाला । सिद्धांचा तो ७९
हनुमान वीर । पाहुनीयां क्रूर ॥
प्राणी वनचर । त्रस्त झाले ॥ ८०
सिंह गर्जताती । व्याघ्र दडताती ॥
मृग ते धांवती । सैरावैरा ८१
दैत्य जलचर । गर्जती दुर्धर ॥
हनुमंत वीर । अडवावया ८२
देव विमानांत । सिद्ध गगनांत ।
पाहती विस्मित । रामदूत ८३
त्रैलोक्यव्यापार । बंद क्षणभर ॥
अंजनीकुमार । पहावया ८४
वीर आतुर्बळी । बजरंगबली ॥
भूमि हादरिली । पुच्छाघातें ८५
भुभुःकार थोर । करी कपी वीर ॥
प्रक्षुब्ध अंबर । सर्व होय ८६
लंका ती लक्षून । उत्साहानें पूर्ण ॥
मारुती उड्डाण । करूं पाहे ८७
किष्किंधाकांड थोर । राजा रघुवीर ॥
राजकारण प्रकार । येथें दावी १८८

किष्किंधाकांड समाप्त

# सुंदरकांड

## अशोकवन

अशोकवनांत । रामरूपीं रत ॥
जानकी ध्यानस्थ । दिसतसे १
जनकनंदिनी । राजारामपत्नी ॥
अनाथ ही वनीं । दिसतसे २
अयोध्यास्वामिनी । तेजस्वी मानिनी ॥
अनाथ ही वनीं । दिसतसे ३
पातिव्रत्यखाणी । सीता तपस्विनी ॥
असहाय वनीं । दिसतसे ४
जीर्णवस्त्र ल्याली । क्षीणकाया झाली ॥
राक्षसीं वेढिली । सीतादेवी ५
प्रशांत वदन । नेत्र अश्रुपूर्ण ॥
रामरूपध्यान । सीता करी ६
राम देखे मनीं । जागृतीं स्वप्नीं ॥
आसनीं शयनीं । सीतादेवी ७
मानस रंगलें । रामरूपी झालें ॥
राम पाहों गेलें । सर्वां ठायीं ८
मागें पुढें राम । भूमितळीं राम ॥
अंतरिक्षीं राम । सीता देखे ९
मृगांतरीं राम । वृक्षामध्यें राम ॥
राक्षसींत राम । सीता देखे १०
अचलाचलांत । अदृश्यादृश्यांत ॥
रामचि दिसत । जानकीला ११
ज्ञानेंद्रियें सारीं । सीतेचीं सत्वरीं ॥
रामरूपावरी । लुब्ध झालीं ! १२

रामकथेवीण । ऐकतीना कान ॥
नेत्र रामावीण । देखतीना १३
शुद्धांतःकरण । जानकीचें पूर्ण ॥
अन्य रामावीण । ध्यानीं येना १४
स्वानंदीं रंगली । ध्यानमग्न झाली ॥
सीता विसरली । देहभान १५
अचला राहिली । स्थिर दृष्टी झाली ॥
समाधि लागली । रामरूपीं ! १६
तेजस्वी अत्यंत । सीतामूर्ती दिसत ॥
प्रकाशें भरीत । सर्व वन ॥ १७
रोमरोमांतूनी । गात्रगात्रांतूनी ॥
रामनामध्वनी । उठतसे १८
वायु पुण्यवंत । सीतास्पर्श घडत ॥
पावन करीत । सर्व वन १९
भाग्य त्या वनाचें । फळा आलें साचें ॥
सान्निध्य सीतेचें । म्हणुनी घडे २०
भाग्यवंत थोर । सर्व वनचर ॥
जानकीचा वर । भजताती २१
स्थावर जंगम । सभाग्य परम ॥
प्रेमें गाती नाम । राघवाचें २२
वृक्षशाखांतूनी । रामनामध्वनी ॥
मंद स्पष्ट कानीं । ऐकूं येई २३
झरे झुळझुळ । वहातां निर्मळ ॥
गाताती मंजुळ । रामगीत २४
भूमिगर्भांतूनी । अंबरामधुनी ॥
रामनामध्वनी । गर्जतसे २५
अशोकवनिका । भाग्यवंत देखा ॥
रामनामें एका । भरलीसे ! २६

पशुपक्षी सारे । वन्य वनचरें ॥
रामनामभरें । धन्य होती २७
जातिवैर गेलें ! । वैरी एक झाले ॥
रामनामें हरिलें । द्वैत सर्व ! २८
धेनु व्याघ्र दोनी । एकत्र मिळोनी ॥
रामनामश्रवणीं । दंग होती २९
नकुल फणीवर । सोडुनीयां वैर ॥
रामभजनीं स्वैर । गुंगताती ३०
पक्षि वेडावले ! । चारा विसरले ॥
मोहित जाहले । रामनामें ३१
हरिण वेडावले ! । नादलुब्ध झाले ॥
धांवत चालले । सीतेकडे ! ३२
टौकारूनी कान । एकाग्र होऊन ॥
रामनामगान । ऐकताती ! ३३
रामनामगोडी । खलां मोह पाडी ॥
मृगें तीं बापुडीं । निष्पापचि ! ३४
रामनामगोडी । कालपाश तोडी ॥
राक्षसें बापुडीं । तेथें किती ! ३५
राक्षसी वनांत । होत्या छळणार्थ ॥
त्याहि गुंग होत । रामनामीं ! ३६
तेजें दिपावल्या । राक्षसी मोहिल्या ॥
छळ विसरल्या । जानकीचा ३७
राक्षसी विस्मित । राहुनी तटस्थ ॥
पाहती समस्त । सीतेकडे ३८
ध्यान विसर्जिलें । चित्त स्थानीं आलें ॥
स्थितिस्मरण झालें । जानकीला ! ३९
रावणाचें पाप । राक्षसींचा ताप ॥
जानकी निष्पाप । स्मरतसे ॥ ४०

रघुपतीहून । भिन्नत्वें आपण ॥
चित्तीं एक क्षण । आठवलें ४१
चित्त गहींवरलें । शोकमग्न झालें ॥
घळघळां लोटले । अश्रुपात ! ४२
कंठ सद्गदित । जानकीचा होत ॥
नाथ रघुनाथ । आठवतां ४३
सद्भाव दाटले । मानस गुंगलें ॥
रोमांच उठले । सीतादेहीं ४४
होउनी विनीत । जोडुनीयां हस्त ॥
सीता आरंभीत । शोकगीत ४५

## सीतेचें शोकगीत

"कौसल्यानंदना । पतीतपावना ! ॥
दीनेच्या रक्षणा । या हो ! वेगें ४६
चापबाणधर ! । दाशरथे ! वीर ! ॥
दीनेचा उद्धार । करा वेगें ४७
दीनांचा कैवारी । कीर्ति चराचरीं ॥
कां हो ! मजवरी । उबगलां ? ४८
हट्ट वेडा धरिला । नाथ कष्टवीला ॥
म्हणुनि का हो झाला । रोष रामा ! ? ४९
अपराध केला । लक्ष्मण गांजिला ॥
म्हणुनी का हो झाला । रोष नाथा ! ? ५०
दुष्टलंकानाथ- । ठाव ना कळत ॥
म्हणुनी का हो नाथ ! । स्वस्थ तुम्ही? ५१
तापसांना योग्य । शांतवृत्ती होय ॥
शस्त्रत्याग काय । म्हणुनी केला ? ५२
व्रत पूर्वजांचें । दीनरक्षणाचें ॥
दुष्टशासनाचें । त्यजिलें काय ? ५३
कां मन रमलें । कार्यव्यग्र झालें ॥

स्मरण माझें गेलें । म्हणुनी का हो !? ५४
सीता हीन दीन । अप्रिय अजाण ॥
म्हणुनी का स्मरण । विसरलेती? ५५
किंवा राज्यस्वप्नीं । अयोध्याचिंतनीं ॥
सीता अभागिनी । विसरली ? ५६
किंवा असहाय । वनीं रघुराय !॥
मजसाठीं काय । हिंडतसां ? ५७
हाय ! माझी वार्ता । कोण सांगे नाथा ?॥
अबलेसी त्राता । कोण मज? ५८
योजनें शंभर । सागर दुस्तर ॥
कोण जगीं वीर । उलंघील ? ५९
वनीं या येऊन । राक्षसी मोहून ॥
राघवाची खूण । कोण सांगे ?" ६०
चमत्कार झाला !। हर्षभर आला ॥
मुखेंदु फांकला । जानकीचा! ६१
आश्चर्यचकित । होउनी विस्मित ॥
जानकी पहात । आनंदानें ६२
रामनामांकित । सुरत्नखचित ॥
मुद्रिका पडत । सीतेपुढें ! ६३
हर्षे उचलिली । मुद्रा भूवरली ॥
आदरें वंदिली । जानकीनें ६४
राघवाची खूण । मुद्रिका घेऊन ॥
मुद्रिकेला प्रश्न । सीता करी ६५

## सीतामुद्रिकासंवाद

"ये ! गडे मुद्रिके !। संतापहारिके ॥
स्वागत हें सखे !। तुज असो ६६
प्रिय रघुनाथा । होसि तूं सर्वथा ॥
त्याची प्रिय वार्ता । सांग गडे ! ६७

नाथ रघुनाथ । लक्ष्मणासहीत ॥
दंडकारण्यांत । सुखी ना गे ! ६८
कोणीं गे ! धाडिलें । कोणीं आणियेलें ? ॥
काय सांगीतलें । राघवानें ? ६९
माझी आठवण । कधीं एक क्षण ॥
राघवभूषण । करितो का गे ! ७०
लक्ष्मण गांजिला । ऐकुनी वार्तेला ॥
काय गे ! बोलला । नाथ मज ? ७१
लंकानाथ बळें । स्पर्शी या अबले ॥
काय गे ! वाटलें । राघवातें ? ७२
मी अशी दुःखित । रडत्यें वनांत ॥
राघवांतें विदित । होय का गे ! ७३
कां गे ! ना बोलसी । मुद्रिके ! तूं मशीं ॥
राघववार्तेसी । बोल गडे ! ७४
बोलसी ना तरी । वैरिण तूं खरी ॥
फेंकुनि गे ! दुरी । देईन मी ! ७५
रघुपतीवीण । तुच्छ त्रिभुवन ॥
वस्तु सर्व हीन । त्याज्य मज " ७६
सीता संतापून । दुःशब्द बोलून ॥
मुद्रिका फेंकून । देई वेगें ! ७७
मुद्रिका फेंकिली । पाठ फिरविली ॥
' शिंशपीं ' वळली । सीतादृष्टि ! ७८
शिंशपावृक्षांत । चैतन्य भासत ! ॥
वाणी वाटे फुटत । वृक्षराजा ! ७९
समूळ हालला । वृक्ष थरारला ! ॥
सळसळाट झाला । पानांमध्यें ! ८०
क्षणैक थांबूनी । वदे दिव्यवाणी ॥
धन्य ! वृक्षाग्रणी । शिंशपा तो ८१

मोह रामकथा । पाषाणांच्या चित्ता ! ॥
वृक्षराज गातां । शंका नको ! ! ८२
गान आरंभिलें । वृक्षराजें भलें ॥
मोहित जाहलें । सीताचित्त ! ८३

## शिंशपावृक्षाचें गायन

" सूर्यवंशीं दशरथ । त्याचा पुत्र रघुनाथ ॥
पितृवाक्यपालनार्थ । वनीं जाय ८४
जानकी लक्ष्मण । राघवामागून ॥
सेवावया वन । सिद्ध झाले ॥ ८५
दंडकारण्यांत । दुष्ट लंकानाथ ॥
कापट्यें हरीत । सीतादेवी ८६
सुग्रीवा सहाय । करी रघुराय ॥
दुष्टवालिक्षय । करावया ८७
वाली निर्दाळूनी । राम चापपाणी ॥
स्थापीं सिंहासनीं । सुग्रीवाला ८८
सुग्रीवें त्वरित । देशोदेशीं दूत ॥
धाडिले शोधार्थ । जानकीच्या ८९
एक त्या दूतांत । नामें हनुमंत ॥
यावया लंकेत । सिद्ध झाला ९०
अफाट दुस्तर । योजनें शंभर ॥
लंघुनी सागर । येथें आला ९१
शिंशपीं बैसून । राघवाची खूण ॥
मुद्रा दे टाकून । सीतेपुढें ! " ९२
सीता चपापली ! । उठोनी ठाकली ॥
दृष्टि रोंखियेली । वृक्षावर ९३
प्रचंड दुर्धर । एक कपीवीर ॥
दिसे वृक्षावर । जानकीला ! ९४
मर्यादातिक्रम । वाटला अधम ॥

कोपली परम । सीतादेवी ! ९५
नेत्र लाल झाले ! । ओंष्ठ थरारले ! ॥
वाटे भस्म झाले । मारुतीचें ! ! ९६
शापावया वृथा । यत्न करी सीता ॥
वदनीं सर्वथा । शब्द न ये ! ! ९७
वाक्य उमटेना ! । अर्थ ध्याना ये ना ! ! ।
शाप देववेना । मारुतीला ! ९८
हृदय पाझरलें ! । प्रेम उद्भवलें ! ॥
दयेनें द्रवलें । सीताचित्त ! ९९
स्तब्ध उभी ठेली ! । निश्चल राहिली ॥
कौतुकें लाविली । दृष्टी वृक्षीं ! १००

## सीतेची मारुतीशीं भेट

मारुती उतरून । वंदी सीताचरण ॥
म्हणे "हनुमान । मीच माये ! १
वृक्षपर्णांतून । मुद्रा दे टाकून ॥
तो मी हनुमान । सीता माये ! २
मुद्रिका सुरेख । देउनीयां देख ॥
खूणगोष्ट एक । राम सांगे ३
रामलक्षुमण । तुजला घेऊन ॥
सेवाया जैं वन । सिद्ध झाले ४
वल्कलें कैकयी । आणुनी त्या ठायीं ॥
नेसावया बाई । तुज करी ५
बालिका कोमल । अज्ञ तूं केवळ ॥
नेससी वल्कल । उफराटें ! ६
श्रीराम हांसला । दयेनें द्रवला ॥
नेसवी तुजला । वल्कल तें !" ७
खूणगोष्ट पटली ! । सीता आनंदली ॥
हर्षाश्रुंनीं न्हाली । सीतादेवी १०८

मारुतीवरून । करुनि निंबलोण ॥
बंधुभावें प्रश्न । सीता करी ॥ १०९
"नाथ रघुनाथ । किष्किंधापुरांत ॥
लक्ष्मणासहीत । सुखी ना रे ! ? १०
माझ्या वियोगास । सोसुनी दुःखास ।
श्रीराम उदास । नाहीं ना रे ! ? ११
घोर अपराध । रावणाचा सिद्ध ॥
नाथ माझा क्रुद्ध । होतो ना रे ! ? १२
दुष्ट लंकानाथ । कराया निःपात ॥
सिद्ध रघुनाथ । आहे ना रे ! ? १३
रावण बापुडें । क्षुद्र घुंघुरडें ॥
राघवांच्या पुढें । हीन दीन । १४
लक्ष्मण सहाय । होतां बंधुराय ॥
त्रैलोक्याचा क्षय । शक्य क्षणीं ! १५
बाबा ! हनुमंता ! । मजविषयीं आतां ॥
लक्ष्मणाच्या चित्ता । काय वाटे ? १६
लक्ष्मण भोळा । व्यर्थ त्यां गांजिला ! ॥
खातसे मनाला । रात्रंदीन ! १७
कोण रे ! ती भक्ति । रामपदासक्ति ॥
बंधुप्रेम नीति । लक्ष्मणाची १८
एकएक कथा । मारुते ! सांगतां ॥
शोकपूर चित्ता । माझ्या लोटे ! १९
लक्ष्मणवीर । श्रेष्ठ धनुर्धर ॥
त्याचे उपकार । किती वानूं ? २०
लक्ष्मणबळास । टाकितां विश्वास ॥
तुच्छ वनवास । वाटे आम्हां २१
साधु लक्ष्मण । सावध राहून ॥
रक्षी रात्रंदीन । आम्हांलागीं ॥ १२२

मज आठवतें ! । मारुते ! आतां तें
वधी राक्षसातें । राम जेव्हां १२३
दंडकारण्यांत । होतां आम्ही स्वस्थ
तेथ ये दुर्वृत्त । शूर्पणखा २४
राघवा भाळली । शूर्पणखा भोळी ॥
क्रोधें विटंबिली । लक्ष्मणानें २५
मग ती रडत । जाउनी संतप्त ॥
बंधूंना धाडीत । आम्हांवरी २६
राक्षस दुर्धर । चवदा सहस्र ।
धांवती सत्वर । आम्हांवरी २७
रामें आज्ञापीलें । मज लपवीलें ॥
आपण चालले । युद्धासाठीं २८
एक त्या गुहेंत । लक्ष्मणासहीत ।
थोर भयभीत । राहिल्यें मी ! २९
घोर टणत्कार । धनुष्याचा थोर ॥
होतसे बाहेर । ऐकों आम्ही ३०
शिर तटातट । राक्षसांचीं स्पष्ट ।
पडतीं निकट । आम्हांपुढें ३१
राक्षस गर्जती । आरोळ्या मारिती ॥
बाहु थरारती । लक्ष्मणाचे ३२
एकला श्रीराम । पावतांच श्रम ॥
लक्ष्मण परम । घाबरला ३३
लक्ष्मणवीर । होतसे अधीर ॥
जावया बाहेर । रामसाह्या ३४
परि जाववेना । मज सोडवेना ॥
आज्ञा मोडवेना । राघवाची ३५
क्रोधें मुसमुसला । परि स्वस्थ ठेला
मंत्रानें बांधिला । नाग जैसा १३६

मूर्ती लक्ष्मणाची । स्पष्ट त्या काळींची ॥
मन्नेत्रांपुढची । हालेचना ! १३७
अशाही साधूला । मारुते ! म्यां छळिला ॥
दुर्वचें ताडीला । व्यर्थ ! व्यर्थ ! ३८
त्याचें प्रायश्चित्त । मिळालें त्वरित ॥
दुष्ट लंकानाथ । हरी मज ३९
रावणें जैं हरिल्यें । अनुतप्ता झाल्यें ॥
व्यर्थ ओरडल्यें । सुटावया ४०
कोण माझी वार्ता । सांगे माझ्या नाथा ।
एकच ही चिंत्ता । जाळी मज ४१
सुवर्णालंकार । टाकिले भूवर ॥
पांच कपीवीर । पाहुनीयां ४२
त्यां पांचां कपींत । मारुते ! तूं तेथ ॥
होतासी निश्चित । वाटे मज ! ४३
कशी रे ! कळली । वार्ता माझी भली ॥
कोणीं सांगितली । राघवांना ? ४४
सख्य सुग्रीवासीं । वैर त्या वालीसीं ॥
काय कारणासी । नाथ करी ? ४५
सुग्रीवाची सेना । समुद्रोल्लंघना ॥
राक्षसदमना । कैशी शके ? ४६
तूं तरी मारुती ! । कसा रे निश्चितीं ॥
घोर सरित्पती । तरलास ? ४७
काय तुझी शक्ती ! । कोण रे ! ही भक्ती ? ॥
किती थोर धृति ! । हनुमंता ! ४८
एकला लंकेसी । कसा रे ! तूं येशी ? ॥
राक्षस वधिसी । माझ्यासाठीं ४९
किती उपकार । झाले आम्हांवर ! ॥
काय मी पामर । वर्णूं वाचें ? १५०

सर्व त्रिभुवन । टाकूं ओंवाळून ॥
किंवा पंचप्राण । ओंवाळूं हे ? १५१
चर्मपादत्राण । आंगिचें करून ॥
टाकूं का देऊन । बंधुराया ! ५२
वर्णूं तरी काय ? । देऊं तरी काय ? ॥
होऊं उतराय । कैशी बापा ! ५३
पातिव्रत्यपुण्य । माझें असामान्य ॥
वर देत्यें मान्य । स्वीकारीं हा ५४
अमर वज्रदेही । हनुमंता ! होईं ॥
अढळ पद घेईं । जगतांत ५५
जरा मृत्यु दुःख । व्याधि भय शोक ॥
तुज क्षण एक । न बाधोत ! ५७
शंभुचा त्रिशूळ । विष्णुचक्र प्रबळ ॥
होवोत विफळ । तुजपुढें ! ५८
अकुंठित गती । अमर्याद शक्ती ॥
नांदोत निश्चितीं । तुझ्या देहीं ५९
चंद्रार्क जोंवरी । नांदती अंबरीं ॥
कीर्ति चराचरीं । तुझी नांदो ६०
गोड रामायण । चाललें गायन ॥
तेथें तुझें गमन । नित्य घडो ! ६१
कलियुगांतरीं । प्रजा दुबळी सारी ॥
ब्रह्मचर्य-थोरी । त्यांना सांग ६२
दुर्बळां अन्याय । जेथें जेथें होय ॥
तेथें तूं सहाय । करीं बापा ! " ६३
सद्गदीत झाली । जानकी माउली ॥
स्तब्ध ती राहिली । क्षण एक ६४
मारुतीनें धरिलें । आदरें वंदिलें ॥
प्रेमाश्रूंनीं धुतलें । सीतापद १६४

बोलें कपिवीर । "कोण बडीवार ! ॥
किती गे ! विस्तार । केला माये ! १६५
मी एक मर्कट । पालाखाऊ स्पष्ट ॥
किती गे ! उत्कट । वर्णितेस ! ६६
म्हणसि जरी घोर । तरलों सागर ॥
'रामकृपा' थोर । फळा आली ! ६७
शक्ति माझी किती ! । किती अल्प मती ! ॥
बाप रघुपति । सांभाळीतो ६८
वानर एकेक । मजसीं अधिक ॥
आहेत निःशंक । रामापाशीं ! ६९
कपी वीरमणी । तरती कैसेनी ॥
चिंता कां गे ! मनीं । करित्येस ? ७०
रामतेजापुढें । समुद्र बापुडें ॥
मार्ग क्षणीं पुढें । देईल गे ! ७१
नातरी वानर । रामबाणावर ॥
बैसुनी सागर । तरतील ! ! ७२
किंवा हें कशाला ?। माते मीं एकला ॥
लंका जाळायाला । शक्त आहें ! ७३
आज्ञा देसी तरी । एक क्षणांतरीं ॥
वधितों समरीं । रावणाला ! ७४
किंवा पाठीवरी । बैससी तूं तरी ॥
नेईन सत्वरीं । रामापाशीं ७५
मग हा निःपात । दुर्बळांचा घात ॥
घोर रक्तपात । कांहीं नको ! !" ७६
जानकी हांसली ! । क्षणैक थांबली ।
उत्तर बोलली । मारुतीला ७७
"मारुते ! वदसी । सत्य तें करिसी ॥
परि विवेकासी । करीं बापा ! १७८

समर्थ दुर्धर । कपींद्र तूं थोर ॥
क्षणीं दशशिर । वधिशील १७९
परि लंकानाथा । वधितां तूं आतां ॥
यश रघुनाथा । कैसें मिळे? ८०
एकला रावण । वधितां तूं जाण ।
भूभार हरण । कैसा होय ? ८१
आमुचा हा वैरी । रावण दुराचारी ।
वधितां तूं थोरी । आम्हां काय ? ८२
स्वामी रघुनाथ । काय आज्ञापीत ॥
तेंहि तूं चित्तांत । आणीं बापा ! ८३
आणीक हें गूज । सांगत्यें मी आज ॥
ध्यानांत सहज । येईना जें ८४
हनुमंता ! मनीं । पाहें विचारुनी ॥
धर्म न्याय जनीं । किती आहे ? ८५
राक्षसांमाझारीं । धर्म नाहीं जरी ॥
वानरांत तरी । किती आहे ? ८६
राक्षस उन्मत्त । अन्यायें वर्तत ॥
आहे हें विदित । जगताला ८७
वानरांमध्येंहि । कांहीं पापदेही ॥
आहेत, संदेहीं । पडूं नको ८८
बाबा ! जगतांत । सर्वहि देशांत ॥
अधर्म निश्चित । वाढतसे ! ८९
अधर्म मोडणें । साधूंना तारणें ॥
दुष्ट संहारणें । रामकार्य ९०
कपीराक्षसांचा । नाश हा व्हायाचा॥
तेथें बा ! कोणाचा । यत्न आहे ? ९१
श्रीराम येऊं दे ! । सागर लंघूं दे ॥
ससैन्य मारूं दे । रावणाला ! १९२

वीर झगडोत । रणीं पहुडोत ॥
मुक्त ते होवोत । रामबाणीं १९३
रावण पडतां । अधर्म मोडतां ॥
भेटेन मी नाथा । सन्मानानें ! ९४
हेंचि मज प्रिय । हनुमंता ! होय ॥
आणीक उपाय । कांहीं नको ! ९५
सांग रघुनाथा । ' वनीं तव कांता ॥
पूर्ण स्वस्थचित्ता । नांदतसे ! ९६
ध्यानीं रघुराया । धरुनि तव पायां ॥
सीता शुद्धकाया । नांदतसे ९७
विजय होण्या सोपा । राघवा ! निष्पापा ॥
सीता तीव्र तपा । आचरीत्ये ! ९८
यश तुम्हीं घ्यावें । रावणा वधावें ॥
शीघ्र मज न्यावें । इच्छित्यें मी !' " ९९
जानकीचें तेज । वाढलें सहज ॥
नाथ रघुराज । संबोधीतां २००
क्षणैक थांबली । निःशब्दा राहिली ॥
स्वस्थचित्ता झाली । सीतादेवी १
मणि तेजपूर्ण । सीता दे काढून ॥
राघवासी खूण । कळावया २

## मारुतीचें लंकेंत प्रयाण

मारुतीगमन । आठवतां पूर्ण ॥
जानकीचें मन । गहिंवरलें ३
नेत्र आर्द्र झाले । अश्रूंनीं भरले ॥
चित्त बावरलें । जानकीचें ४
अवसान पूर्ण । आलें होतें क्षण ॥
परी आतां मन । कष्टी झालें ! २०५
मारुतीची स्थिती । तीच झाली होती ॥

शांतवाया सती । स्थैर्य कोणा ? २०६
दोघें टकमक । बघती एकमेक ॥
शब्द कोणा एक । बोलवेना ! ७
दृष्टी ती भूतळा । लावुनी निश्चळा ॥
मारुती ढळढळां । रडतसे ! ८
ब्रह्मचारी भोळा । मदनावेगळा ॥
मारुती ढळढळां । रडतसे ! ९
बाळपणीं सहज । झांकी सूर्यतेज ॥
तो हा कपिराज । रडतसे ! १०
होतां वज्राघात । न ढळे किंचित ॥
तो हा हनुमंत । रडतसे ! ! ११
ज्याच्या भयें सुर । कांपती थरथर ॥
तो पहा वानर । रडतसे ! १२
ज्या बळें सुग्रीव । तुच्छ मानी विभव ॥
तो कापिपुंगव । रडतसे ! १३
सीता उमजली । शांतचित्ता झाली ॥
आज्ञा कष्टें दिली । मारुतीला १४
मारुती निघाला । रडत चालला ॥
कष्टी बहू झाला । मनामध्यें १५
मग एके स्थानीं । कपिवीराग्रणी ॥
उदासीन मनीं । बसतसे १६
आवरुनी मन । विवेकानें पूर्ण ॥
पावे समाधान । हनुमंत १७
मानसीं विचार । करी कपिवीर ॥
" श्रेष्ठ लंकापुर । निरीक्षावें " १८
रावणाचें बळ । सुमंत्रीमंडळ ॥
बघुनि एक वेळ । मग जावें २१९
विचार ठरला । मारुतीचा भला ॥

लंकेंत जायाला । सिद्ध झाला २२०

पूर्वार्ध समाप्त

---

# सुंदरकांड

## ( उत्तरार्ध )

---

### मारुतीचें लंकानिरीक्षण

अंगुष्ठप्रमाण । आकृती धरून ॥
जाय हनुमान । लंकेमध्यें १
अस्तमान झाला । निशाकाल आला ॥
मारुती चालला । लंकेतूनी २
लखलखाट थोर । राजमार्गावर ॥
देखे कपिवीर । कौतुकानें ३
मार्ग स्फटिकयुक्त । सुरत्नखचित ॥
मारुती देखत । लंकेमध्यें ४
केशराचे सडे । दिले चहूंकडे ॥
गंध सारीकडे । पसरला ५
गुलालमिश्रित । गंधाक्षतायुक्त ॥
स्वर्णपुष्पें दिसत । ठायीं ठायीं ६
मुक्तरत्नहार । पडलेले स्वैर ॥
दिसती मार्गावर । लंकेमध्यें ७
भव्य दैत्यवीर । बलिष्ठ दुर्धर ॥
मार्गांतूनी स्वैर । हिंडताती ८
कोणी रथारूढ । कोणी अश्वारूढ ॥
कोणी गजारूढ । हिंडताती ९

सुरत्नभूषणें । सुवर्णकंकणें ॥
कोणी आभरणें । मिरविती १०
दुतर्फा रांगांत । रम्य रत्नखचित ॥
प्रासाद दिसत । राक्षसांचे ११
तोरणें सुंदर । ध्वज मनोहर ॥
सर्व घरोघर । दिसताती १२
सुस्वर गायन । अप्सरानर्तन ॥
मृदंगवादन । ऐकूं येई १३
सारंगी-सतार-। वीणा-ध्वनि थोर ॥
टाळही सुस्वर । वाजताती १४
पैंजणांचा नाद । आलाप सुखद ॥
'वा! वहावा!' शब्द । ऐकूं येई १५
उच्च हास्यध्वनि । कडकडाट मधुनी ॥
मारुतीचे कानीं । ऐकूं आला १६
वेश्यांचीं मंदिरें । मद्यपानागारें ॥
निकट वानरें । देखीयलीं १७
मद्यमदोन्मत्त । विषयीं आसक्त ॥
राक्षस दिसत । ठायीं ठायीं १८
मद्यपानीं रमले । राक्षस भ्रमले ॥
म्हणति 'घ्या! हो! पेले' । एकमेकां १९
अभद्र भाषण । करिताती कोण ॥
'दारू माझा प्राण' । गाती कोणी २०
सर्वेच उन्मत्त । बनुनी संतप्त ॥
दैत्य आपसांत । भांडताती २१
लाथाबुक्या देती । कुशब्द बोलती ।
पुनःपुनः करिती । मद्यपान ! २२
खदखदां हांसती । कामचेष्टा करिती ।
सज्जन घालिती । माना खालीं ! २३

मारुती कोपला । क्रोधें लाल झाला ! ॥
हात ऊगारीला । संतापानें २४
परी विवेकून । स्वकार्य जाणून ॥
जाय हनुमान । पुढें पुढें २५
तों एका सभेंत । पंडित जमत ॥
फुललें समस्त । सभास्थान २६
शास्त्रार्थ गहन । विषय घेऊन ॥
पंडित कसून । भांडताती २७
शास्त्रार्थ दाविती । व्याजोक्ती बोलती ॥
सर्वेंच हांसती । तुच्छतेनें ! २८
पंडित मी श्रेष्ठ । सभेंत वरिष्ठ ॥
वाटतसे स्पष्ट । प्रत्येकाला २९
शिष्य तो एकही । सभेमध्यें नाहीं ॥
गुरुच सर्वही । दिसताती ! ३०
विनम्र भाषण । तत्त्वार्थग्रहण ॥
सद्‌गुरुसेवन । कोणा नको ३१
भक्तीचा जिव्हाळा । स्नेहाचा उमाळा ॥
वाणीही प्रेमळा । कोठें नाहीं ३२
विवाद वितंड । कुतर्क पाखांड ॥
माजवीती बंड । लंकेमध्यें ३३
दयाक्षमा शांती । समाधानवृत्ती ॥
कोठें न दिसती । लंकेमध्यें ३४
प्रपंचीं विरक्ती । ईशध्यानासक्ती ॥
कोठें न दिसती । जनामध्यें ३५
वैर आपसांत । प्रत्यक्ष बंधूंत ॥
देखे हनुमंत । लंकापुरीं ३६
हकाचा उच्चार । करी सानथोर ॥
कर्तव्यविचार । कोणा नको ३७

संपत्तिरक्षण । विषयसेवन ॥
सुखाचें साधन । सर्वां वाटे ३८
स्वार्थपरायण । झाले सर्वजण ॥
उच्च ध्येय क्षण । कोणा नको ! ३९
पुण्यबळ नाहीं । कर्मनिष्ठा नाहीं ॥
नीतिधैर्य नाहीं । कोणामध्यें ४०
सर्वथा अन्याय्य । सीताहरणकार्य ॥
बोलावया धैर्य । कोणा नाहीं ! ४१
करुनि स्तुतिपाठ । रावणाचा स्पष्ट ॥
जाळीताती पोट । मंत्रिगण ! ४२
स्पष्ट बोधायास । राजा रावणास ॥
लंकेंत कोणास । इच्छा नाहीं ४३
मारुती मनांत । होतसे दुःखित ॥
राक्षसांचा घात । जाणुनीयां ४४
उद्विग्न मानस । होउनी निराश ॥
जाय सावकाश । हनुमंत ४५
हळुहळू चालला । लंकेंतूनी गेला ॥
कपी स्वस्थ ठेला । वनामध्यें ४६
मनीं विचारून । पाहे हनुमान ॥
जानकीवचन । आठवलें ४७
राक्षसांचा घात । ठरला निश्चित ॥
जाणे हनुमंत । मनामध्यें ४८
राक्षस निमाले । ' अधर्मे ' मारिले ॥
आधींच दिसले । मारुतीला ! ४९
निमित्ताचा धणी । राम चापपाणी ॥
मारुतीला मनीं । कळों आलें ! ५०

## मारुतीच्या सहजलीला व राक्षसांशीं युद्ध

उद्विग्न वानर । मग वृक्षावर ॥

बसुनीयां स्वैर। क्रीडा करी ! ५१
वृक्ष एक भला। सहज उपटीला ॥
सवेंच फेंकिला। दुज्यावर ! ५२
पडति फळें थोर। टपटपां भूवर ॥
वेंची कपिवीर। स्वच्छंदानें ५३
होउनीयां तृप्त। हिंडतो वनांत ॥
स्वच्छंदें क्रीडत। हनुमान ५४
जलस्थ मंदिर। रावणाचें थोर ॥
तेथें हा वानर। क्रीडा करी ! ५५
जलांत डुंबतो। कमळें नाशीतो ॥
वांकुल्या दावितो। वनचरां ५६
भुभुःकार घोर। पुच्छाघात थोर ॥
उल्हासें वानर। करीतसे ५७
रक्षक कोपले। शीघ्र जागे झाले ॥
त्वेषानें चालले। कपीवर ५८
' धांवा ! रे ! सत्वर। धरा रे ! वानर ' ॥
हांका देती थोर। एकमेकां ५९
खड्ग शूळ बाण। हातांत घेऊन ॥
क्रुद्ध रक्षोगण। धांवताती ६०
शूळ फेंकिताती। बाण विंधिताती ॥
वज्र हाणिताती। मारुतीला ६१
घेउनी पर्वत। करिती आघात ॥
मारुती संतप्त। मनीं झाला ६२
देह वाढवीला। कपीनें आपुला ॥
नगप्राय झाला। क्षणामध्यें ! ६३
अक्राळ विक्राळ। संतप्त विशाल ॥
मारुती प्रबळ। दिसतसे ६४
नेत्र वटारीले। केश थरारले ! ॥

पुच्छ हापटीलें । आवेशानें ६५
गर्जना गंभीर । करी कपिवीर ॥
सर्व लंकापुर । दणाणलें ६६
सवेंच आपण । गदा उगारून ॥
युद्धा हनुमान । उभा राहे ! ६७
वज्रपाणी इंद्र । शूलपाणी रुद्र ॥
त्याहुनी कपींद्र । घोर भासे ६८
कृतांतासमान । आकृती देखून ॥
रक्षक भिऊन । पळताती ! ६९
होउनी अधीर । पळपुटे वीर ॥
एकमेकांवर । आदळती ! ७०
पायीं चेंगरती । 'मेलों ! रे !' म्हणती ॥
गडबडां लोळती । कितीएक ७१
मागुती उठून । वस्त्रें आवरून ॥
शस्त्रें सांवरून । पळताती ! ७२
कोणाचीं कंकणें । कोणाचीं भूषणें ॥
मारुतीच्या भेणें । गळतातीं ७३
बलभीममूर्ती । देखण्या ही पुरती ॥
एकालाहि चित्तीं । धैर्य येना ! ७४
सुसाट धांवती । कोणा नावरती ॥
जीव वांचाविती । आपापले ७५
पळत चालले । लंकेमध्यें गेले ॥
वृत्त कळवीलें । रावणाला ७६
रावण कोपला । ऐकुनी वार्तेला ॥
युद्धा आज्ञापीला । इंद्रजित ७७
इंद्रजित वीर । अखयाकुमार ॥
जावया सत्वर । सिद्ध झाले ७८
दैत्य जंबुमाळी । ये सेना सगळी ॥

कपी आतुर्बळी । जिंकावया ७९
वीर वनीं गेले । घोर युद्ध झालें ॥
कपीनें मारिलें । सैन्य बहु ८०
अक्ष जंबुमाळी । क्रोधानें ते काळीं ॥
रणांत निर्दाळी । हनुमान ८१
इंद्रजित वीर । कोपुनी सत्वर ॥
युद्धचमत्कार । मग दावी ८२
सूर्यास्त्र नागास्त्र । दिव्य वारुणास्त्र ॥
घोर पर्वतास्त्र । सोडीतसे ८३
शस्त्रें हातां आलीं । अस्त्रें जीं सुचलीं ॥
योजी तीं सगळीं । इंद्रजित ! ८४
घोर मायाजाळ । गारुड्याचा खेळ ॥
दावितो सकळ । इंद्रजित ! ८५
शस्त्रें तीं गळालीं ! । अस्त्रें फोल झालीं ! ॥
माया व्यर्थ गेली । कपीपुढें ! ८६
ज्या अस्त्रें जिंकित ! इंद्र इंद्रजित ॥
विफल तीं होत । कपीपुढें ! ८७
ज्या बळें जिंकिला । यम पळवीला ॥
शूळ तोहि गेला । व्यर्थ येथें ! ८८
मायेचा प्रभाव । जिंकियेले देव ॥
तीहि आतां सर्व । मावळली ! ८९
इंद्रजित मनीं । पाहे विचारुनी ॥
दृष्टी अंतर्ज्ञानीं । लावुनीयां ९०
' अमर हनुमंत ' । कळलें निश्चित ॥
मनीं इंद्रजित । भेदरला ! ९१
गयावया करी ! । ब्रह्मपद धरी ॥
विजय सत्वरी । साधावया ९२
मनांत कोपला । ब्रह्मदेव भोळा ॥

परी तो गुंतला । वचनांत ! ९३
भविष्य जाणुनी । ब्रह्मदेवें मनीं ।
इंद्रजित रणीं । आश्वासीला ९४
आपण विधाता । प्रार्थी हनुमंता ॥
" ब्रह्मपाशीं आतां । बद्ध व्हावें ! ९५
माझी वरदोक्ती । सत्य करावी ती ॥
करितों विनंती । कपिराया ! " ९६
ब्राह्मणाचा मान । ठेवी हनुमान ! ॥
पाशांत आपण । बद्ध झाला ९७
वानर बांधिला । ऐकुनी वार्तेला ॥
वीर गोळा झाला । एकुणेक ! ९८
पळपुटे वीर । मिळाले सत्वर ! ॥
बद्ध कपिवीर । देखुनीयां ९९
कोणी धक्के देती । थापट्या मारिती ॥
फरफरां ओढिती । कितीएक ! १००
दगड हातीं घेती । सर्वांग ठेचिती ॥
दुरुक्ती बोलती । कितीएक ! १
एक विसरभोळा । राक्षस बोलला ॥
' यानेंच नाशीला । बाग माझा ! ' २
दुजा बोले वीर । ' काल हा वानर ।
उडे घरोघर । देखिला म्यां ! ' ३
' येउनी निकट । काल हा मर्कट ॥
दांत दावी स्पष्ट ' । कोणी बोले ४
सैनिक गांजिती । दुःशब्द बोलती ॥
हांसला मारुती । मनामध्यें ! ५
पाशांत बंधन । पावुनी आपण ॥
श्रीरामस्मरण । करीतसे १०६
सभेंत गमन । रावणा भाषण ॥

लाभ हाचि पूर्ण । मानीतसे १०७
घट्ट आवळीला । हनुमंत भोळा ।
राक्षसांनीं नेला । सभेमध्यें ८

## रावणसभेंत मारुति

श्रेष्ठ सिंहासन । रावणाचें स्थान ॥
पुढें हनुमान । बसवीती ९
सभाजन वीर । जमुनी सत्वर ।
आश्चर्यें वानर । पहातातो १०
रूप मदनाहूनी । तेज सूर्याहूनी ॥
श्रेष्ठ ये दिसोनी । वानराचें ११
प्रभा पसरली । सभेंत फांकली ॥
क्षणैक दिपली । सभा सर्व १२
सर्व सभाजन । निःशब्द राहून ॥
रावणवचन । आयकती १३
रावणें आपुला । मंत्रि आज्ञापीला ॥
वृत्त पुसायाला । वानराचें १४
आपुला वृत्तान्त । इच्छी लंकानाथ ।
जाणुनी बोलत । हनुमान १५
" रावणा ! धरून । शांतवृत्ति पूर्ण ॥
हें हितवचन । ऐक माझें १६
श्रीरामाचा दूत । तो मी हनुमंत ॥
बोधाया निश्चित । तुला आलों १७
श्रीरामाची भार्या । सीतानामें आर्या ॥
अशोकवनीं या । देखिली त्यां १८
रामभार्या थोर । केला अपहार ॥
अन्याय हा घोर । किती राया ! ? १९
आतां तरी मनीं । सावध होऊनी ॥
सीता परतोनी । अर्पी रामा १२०

घोर अपराध । मानुनी हा सिद्ध ॥
रामपद शुद्ध । वंदीं बापा ! १२१
राक्षसाचा घात । घोर रक्तपात ॥
आपुला देहान्त । टाळीं राया ! ” २२
रावण कोपला । क्रोधें लाल झाला ! ॥
शीघ्र आज्ञापिला । दूतगण २३
“ मर्कट उन्मत्त । येउनी सभेंत ॥
निंदी यथास्थित । मजलागीं २४
दुर्बळ परम । क्षुद्र याचा राम ॥
त्याचे हा विक्रम । येथें वानी ! २५
देहान्तशासन । यथेष्ट ताडण ॥
सर्वही मिळून । याला करा ! ” २६
रावणाज्ञा होतां । सभा विसर्जितां ॥
राक्षसांच्या चित्ता । हर्ष वाटे ! २७
राक्षस मिळाले । कपीपाशीं आले ॥
घेऊन चालले । वधावया २८
एक म्हणे ‘ न्यावा । सागरीं लोटावा ’
‘ जिवंत जाळावा ’ । म्हणे एक ॥ २९
‘ घोर विद्युत्पात । करुनी देहान्त ॥
करा याचा अंत ’ । म्हणे कोणी ३०
एक बोले दुष्ट । कपी हा उद्धट ॥
शीघ्र कडेलोट । याचा करा ! ३१
‘ वानराला प्रिय । पुच्छ त्याचे होय ॥
जाळूं हें निर्भय ’ । म्हणे कोणी ३२
विचार पटला । सर्वां शेवटला ! ॥
पुच्छ जाळायाला । सिद्ध झाले ! ३३
चिंध्या बांधिताती । पुच्छाचे भोंवतीं ॥
ओतिती वरतीं । तेल तूप ! १३४

वह्निस्पर्श केला । अग्नि धडाडला ! ॥
मारुती तापला । सर्वांगांत १३५
मारुती जो शांत । होता तोंपर्यंत ॥
तो आतां संतप्त । मनीं झाला ३६
पुच्छ हापटीलें । नेत्र लाल झाले ! ॥
राक्षस लोटीले । एकीकडे ३७
कपी संतापला । उडत चालला ॥
अग्नि पसरला । लंकेमध्यें ! ३८

## लंकादहन

ज्या ज्या घरावर । उडे तो वानर ॥
गृह तें सत्वर । पेट घेई ३९
सुरम्य नगर । लंकापुरी थोर ॥
भडकलें सत्वर । चोहोंकडे ४०
अग्निनारायण । विक्राळवदन ॥
लंकेंत थैमान । घालीतसे ! ४१
आगीचा तो लोळ । भेदी अंतराळ ॥
धूम्रही सकळ । दिशा व्यापी ४२
वांसे कडाडती । तुळया धडाडती ॥
धडाके उडती । चोहोंकडे ४३
कृष्णवर्ण भिंती । कोसळूनी पडती ॥
खिंडारें दिसती । ठायीं ठायीं ४४
अग्नीनें व्यापिला । अंतर्भाग सगळा
बाहेर येण्याला । वाव नाहीं ४५
लाल जळजळित । मार्ग सर्व होत ॥
जावया घरांत । वाट नाहीं ४६
कोंडलेले जीव । ओरडती सर्व ॥
करिती धांवाधांव । प्राणासाठीं ! १४७
' वांचवा हो ! प्राण । कोणी दयाघन ' ॥

किंकाळ्या आंतून । ऐकूं येती ! १४८
बाहेरील जन । विमूढ होऊन ॥
व्यर्थ रस्त्यांतून । धांवताती ४९
धांवाधांव व्यर्थ । करिती समस्त ॥
सुचेना उचित । मार्ग कोणा ५०
हें गृह पेटलें ! । तें पेटूं लागलें ! ॥
ओरडती सगळे । आपसांत ५१
' आला रे ! वानर ' । हांका देती थोर ॥
कोणी घेती ऊर । बडवूनी ५२
कोणी शंख करिती । ' पाणी आणा ' म्हणती ॥
गडबडा लोळती । कितीएक ५३
चित्तीं भेदरती । ठायींच बैसती ॥
फळफळां मुतती ! । कितीएक ५४
गेलें हो ! गेलें हो ! । सर्वस्व गेलें हो ! ॥
एकच हा लाहो । घेती कोणी ५५
आक्रोशें रडती । कपाळें पीटिती ॥
कोणी शापिताती । रावणाला ५६
' सीतेचें हरण । अन्याय दारुण ॥
तेणें आलें विघ्न ' । म्हणती ' हें ' ५७
एक बोलताती । ' प्रार्थावा मारुती ॥
तेणेंच या शांती । विघ्ना होय ' ५८
परि हनुमंत । कोठें न दिसत ॥
गेला तो निश्चित । लंकेंतूनी ५९
इकडे हुताशन । आहुत्या घेऊन ॥
सावकाश पूर्ण । शांत झाला ! ६०
कल्लोळ माजला । लंकेंत सगळा ॥
जन गोळा झाला । ठायीं ठायीं ! १६१
सुस्कारे टाकिती । अश्रु ढाळिताती ॥

कोणी शांतवीती । एकमेकां १६२
भस्माचे पर्वत । ठायीं ठायीं दिसत ! ॥
अग्नि डोकावीत । कोठें कोठें ६३
सुवर्णाचे गोळे । सर्वत्र बनले ॥
हिरे विखुरले । चहूंकडे ! ६४
चैनीचे पदार्थ । संचित वित्तार्थ ॥
सर्व भस्म होत । अग्निसंगें ६५
दारुड्यांचीं घरें । वेश्यांचीं मंदिरें ॥
सर्व एकसरें । दग्ध झालीं ! ६६
उद्यानें उध्वस्त । मद्यागारें फस्त ॥
सर्वत्र दिसत । लंकेमध्यें ६७
लंकानगरींत । एकाही घरांत ॥
सज्जनाचा घात । झाला नाहीं ! ६८
स्त्रियाअर्भकांना । साधुसज्जनांना ॥
अग्नि तो स्पर्शेना । कांहीं केल्या ६९
अंध पंगु जनां । वृद्धदुर्बळांना ॥
अग्नि पीडा देना । कांहींएक ७०
मुकीं जनावरें । ग्राम्य पक्षी सारे ॥
सर्व एकसरें । निभावलीं ! ७१
लोक बोलताती । ' लंका जळाली ती ' ॥
परी विवेकान्तीं । सत्य न हें ७२
मदांधतागुण । जाळुनी संपूर्ण ॥
शीघ्र हनुमान । परतला ! ७३
ईशशक्ति प्रबळ । राक्षस दुर्बळ ॥
कथुनी एक वेळ । कपी गेला ७४
हनुमंत गेला । सागरीं पातला ॥
अग्नि विझवीला । जळामध्यें १७५

## मारुतीचें महेंद्रपर्वतावर प्रयाण

मागुती उड्डाण । करुनी हनुमान ॥
जाय परतून । महेंद्रासी १७६
सिंहनाद थोर । करी कपिवीर ॥
महेंद्रीं वानर । ऐकताती ७७
' आला ! आला ! ' म्हणती । उंच उड्या घेती ॥
वानर गर्जती । आनंदानें ७८
वृद्ध जांबुवान । अंगद सुषेण ॥
भेटले संपूर्ण । मारुतीला ७९
मारुतीभोंवतीं । कपी गोळा होती ॥
वार्ता विचारिती । जानकीची ८०
' जानकी भेटली । वनांत एकली ' ॥
वार्ता कळवीली । मारुतीनें ८१
आनंदगजर । करिती वानर ॥
नादित अंबर । सर्व होय ८२
आनंदें नाचती । ' धन्य ! धन्य ! ' म्हणती ॥
कोणी आलिंगीती । हनुमंता ८३
वारा घालिताती । ' भागलास ' म्हणती ॥
कोणी पाय चुरिती । मारुतीचे! ८४
फलपुष्पभार । आणुनीयां थोर ॥
कोणी देतो वीर । कपीलागीं ! ८५
मारुती तोषला । मनीं धन्य झाला ॥
म्हणे ' जाऊं चला । रामाकडे ' ८६
वानर निघाले । गर्जत चालले ॥
मार्गांत नाशीलें । मधुवन ८७
प्रस्रवणख्यात । रोखुनी पर्वत ॥
जाय हनुमंत । सर्वांपुढें १८८

## श्रीराम–मारुती–भेट

श्रीरामा देखून । तेथें हनुमान ॥
प्रेमें लोटांगण । घालीतसे १८९
जानकीचें वृत्त । ऐकतांच होत ॥
कंठ सद्गदित । राघवाचा ९०
मग मारुतीला । रामें उठवीला ॥
हृदयीं धरिला । प्रेमभरें ९१
भक्ताशीं मीलन । देवा होय पूर्ण ।
येथेंच आपण । वंदूं यांना ! ९२
सुंदर सुंदरकांड । काव्यमय खंड ॥
भक्तिप्रीतीचा उदंड । लाभ झाला १९३

सुंदरकांड समाप्त

# युद्धकांड

## ( पूर्वार्ध )

—:०:—

### प्रास्ताविक विचार

युद्धकांड आलें । जें नको तें झालें ॥
अनिष्ट पातलें । वर्णावया १
रम्य युद्धकथा । दुरुनी ऐकतां ॥
दुर्जनांच्या चित्ता । सुख वाटे २
शूरांची कत्तल । ऐकतां बेताल ॥
दुर्जन सकल । सुखावती ३
रक्ताचे ते पाट । वहावले स्पष्ट ॥
ऐकतांच दुष्ट । नाचताती ४
'मुंडक्यांची रास' । ऐकतां शब्दांस ॥
येतसे दुष्टांस । हर्षभर ५
इच्छा परी ऐशा । दुर्जनां साजेशा ॥
स्त्रिया आम्ही तैशा । नसों मुळीं ६
दयालुत्वगुण । आमुचें भूषण ॥
वाखाणीती जन । सर्वकाळ ७
दिव्य प्रेमामृत । आमुच्या चित्तांत ॥
नित्य अखंडित । वास करी ८
रम्य नंदनवन । स्मशानीं भयाण ॥
लागतां न क्षण । निर्मू आम्ही ९
मार्दव सगळें । जगीं जें निर्मिलें ॥
ईशें तें ठेविलें । आम्हाठायीं १०
त्या या आम्ही नारी । प्रेमळ अंतरीं ।
जावया समरीं । सिद्ध नसों ११

परि जें अप्रिय । सर्वथैव त्याज्य ॥
तेंही कधीं कार्य । अंगीं जडे १२
आनंदाचा कंद । प्रभु हा गोविंद ॥
त्यालाहि हें युद्ध । करणें पडे १३
प्रेमाची जो मूर्ति । लक्ष्मीचा पति ॥
त्याला शस्त्र हातीं । घेणें पडे १४
उन्मत्त प्रबळ । पशुवृत्ती खळ ॥
जेव्हां हें भूतळ । व्यापीताती १५
सात्त्विक परम । सज्जन सद्धर्म ॥
जेव्हां हे अधम । गांजिताती १६
बलाची महती । सत्तेचीच स्तुति ॥
जेव्हां या जगतीं । वाढूं पाहे १७
धर्म नीति न्याय । ईश्वराचें भय ॥
जेव्हां जगीं लय । पावतसे १८
देवाच्या हेतूचा । धर्माच्या अर्थाचा ॥
विपर्यास साचा । जेव्हां होई १९
ही जाति वरिष्ठ । ती जाति कनिष्ठ ॥
जेव्हां हे पापिष्ठ । बरळती २०
साधु तो दुर्बळ । दुष्ट तो प्रबळ ॥
जेव्हां हा सकळ । भ्रम वाटे २१
सुख सज्जनांना । दुःख दुर्जनांना ॥
जेव्हां या विधाना । ग्लानी येई २२
ऐश्वर्यसंपन्न । दुष्टांना देखून ॥
जेव्हां ते सज्जन । भांबावती २३
देव कोठें आहे ? । न्याय कोठें आहे ? ॥
जेव्हां जगतीं हे । प्रश्न येती २४
धर्मी अविश्वास । स्वार्थीच विश्वास ॥
जेव्हां जनतेस । वाटूं लागे २५

धर्मग्लानी थोर । देखुनी भूवर ॥
जेव्हां संतवीर । अवतरती २६
त्यागुनीयां मोक्ष । दुर्बळांचा पक्ष ॥
संत निरपेक्ष । जेव्हां घेती २७
व्हाया दीनोद्धार । दुष्टांचे प्रहार ॥
संत शिरावर । जेव्हां घेती २८
असह्य ते क्लेश । पडतां संतांस ॥
करुणा प्रभूस । जेव्हां येई २९
दुर्बळांचें काज । पुण्यबळें सहज ॥
जेव्हां तें सतेज । दिसूं लागे ३०
दुर्जन बलिष्ठ । सुविवेकनष्ट ॥
सदाचारभ्रष्ट । जेव्हां होती ३१
पापानें मारिले । शापानें जाळीले ॥
दुष्ट अर्धमेले । जेव्हां होती ३२
तेव्हां नारायण । दयार्द्र होऊन ॥
स्वस्थान सोडून । जगीं येई ३३
तेव्हां हा श्रीपती । खळबळूनी चित्तीं ॥
अवतार जगतीं । घेऊं म्हणे ३४
जन्म प्रभु घेत । जेव्हां जगतांत ॥
उल्हास सृष्टींत । वाटतसे ३५
ही सृष्टिदेवता । प्रभुजन्मवार्ता ॥
जाणुनी स्वागता । सिद्ध होई ३६
आधीं भगवंत । दृष्टीं कोणा येत ॥
ही चंद्रसूर्यांत । स्पर्धा लागे ! ३७
आनंदें गर्जती । मेघ गडगडती ॥
कोसळूनी पडती । पृथ्वीवर ३८
ही पृथ्वीसुंदरी । तृणांकुर करीं ॥
येतसे सामोरी । नारायणा ३९

दिव्य पुष्पहार । दिव्य फळें थोर ॥
प्रभूला आहेर । वृक्ष देती ४०
वायु वाहे मंद । शीतळ सुगंध ॥
प्रभूचा आनंद । वाढावया ४१
समुद्र मर्यादा । लंघुनी एकदां ॥
नारायणपदा । पाहूं इच्छी ४२
समुद्रच काय । लोकसमुदाय ॥
दिव्य प्रभुपाय । वंदूं इच्छी ४३
बाललीला करी । प्रभु साध्या जरी ॥
लोकांना सत्वरीं । मोह पडे ४४
‘काय हो ! अमूप । दिव्य याचें रूप !’ ॥
उद्गार अपाप । तोंडीं येती ! ४५
प्रभु टाकी पद । प्रभु बोले शब्द ॥
लोकांचा आनंद । उचंबळे ४६
प्रभुगुणगान । किंचित ऐकून ॥
कोट्यवधी जन । वेडावती ४७
प्रभूचें दर्शन । होतां एक क्षण ॥
याच्यासाठीं प्राण । द्यावा वाटे ४८
एक शब्द तरी । बोलेल हा जरी ॥
मृत्युमुखांतरीं । जावें वाटे ४९
संसारासीं लाथ । मारुनी निश्चित ॥
साधावा कार्यार्थ । याचा वाटे ५०
स्त्रीपुत्र त्यागुन । सुखें फेटाळून ॥
गोळा होती जन । याचेपाशीं ५१
सुवेळपर्वतीं । कपी पहा किती ॥
श्रीरामकार्यार्थीं । गोळा झाले ! ५२
अबब ! हें काय । गर्दी किती होय ॥
ठेवावया पाय । रीघ नाहीं ५३

लंकानगरीला । चारहि बाजूला ॥
वेढा पूर्ण पडला । वानरांचा ५४
मुख्य मुख्य द्वारें । रोखुनी निर्धारें ॥
युद्धाच्या विचारें । सर्व उभे ५५
काय चमत्कार ! । कां हो ! हे वानर ॥
मरण्या अधीर । रामासाठीं ? ५६
सुग्रीवानें काय । किंवा रामें काय ॥
यांचें मोठें प्रिय । केव्हां केलें ? ५७
सुग्रीवाची भीति । यांना काय होती ॥
खावया एकांतीं । फळेंमुळें ? ५८
स्त्रियाअर्भकांना । सोडुनी मित्रांना ॥
कां हो ! कष्ट नाना । भोगिती हे ? ५९
राक्षस एकेक । देवांही अधिक ॥
यांना का क्षणैक । भान नाहीं ? ६०
दिव्यास्त्रसंपन्न । इंद्रजित पूर्ण ॥
याचें का स्मरण । यांना नाहीं ? ६१
रावण उन्मत्त । त्रैलोक्य जिंकित ॥
हें का हो ! माहीत । यांना नाहीं ? ६२
काळाच्या मुखांत । मृत्यूच्या दाढेंत ॥
कां हो ! हे शिरत । आनंदानें ? ६३
सर्वांचें कारण । राम दयाघन ॥
आधार संपूर्ण । त्याचा यांना ६४
श्रीराम बोलला । 'चला हो ! लंकेला' ॥
वानर धांवला । लंकेवरी ६५
श्रीराम बोलला । 'बांधा ! हो सेतूला' ॥
सेतु सिद्ध झाला । क्षणामध्यें ! ६६
संपूर्णावतार । राजा रघुवीर ॥
प्रताप हा थोर । सर्व त्याचा ६७

वानर सकळ । खेळणीं केवळ ॥
खेळतसे खेळ । रघुपाति ६८
वानर ते सर्व । केवळ निर्जीव ॥
त्यांत घाली जीव । रघुपाति ६९
घालुनी जीवना । लंकानिर्दाळणा ॥
सिद्ध कपिसेना । राम करी ७०
बहुत दिवस । देवांना जी आस ॥
ती आज फळास । आली वाटे ७१
रावणाचें पाप । तापसांचे शाप ॥
फळा आपोआप । आले वाटे ७२
म्हणुनी दुस्तर । लंघुनी सागर ॥
राजा रघुवीर । येथें आला ७३
म्हणुनी वानर । एका पायावर ॥
युद्धासी तयार । दिसती हे ७४
तयारी सगळी । युद्धाची जहाली ॥
खोटी फक्त झाली । रामाज्ञेची ७५

## अंगद–शिष्टाई

हा पहा सेनेंत । राजा रघुनाथ ॥
वानरवेष्टित । दिसतसे ७६
वानरनायक । प्रमुख प्रमुख ॥
दिसती अनेक । रामापाशीं ७७
सुग्रीव लक्ष्मण । वीर हनुमान ॥
अंगद सुषेण । दिसती येथें ७८
बोधावा रावण । युद्धाआधीं पूर्ण ॥
याला सर्वजण । मान्य झाले ७९
धाडाया लंकेंत । योग्य कोण दूत ॥
विचार सर्वांत । चालतसे ८०
कपी संबोधून । राम दयाघन ॥

हांसोनी भाषण । करीतसे ८१
" मारुतीची प्रीति । मजवरी अती ॥
कार्य हा निश्चितीं । नासवील ८२
अधिकउणा शब्द । ऐकतांच क्रुद्ध ॥
लंका पुन्हां दग्ध । करील हा ८३
सुग्रीवा ! तूं राजा । आम्हां धीर तुझा ॥
तुला दूतकाजा । धाडूं नये ८४
मंत्रि जांबुवान । वैद्य हा सुषेण ॥
आम्हांपाशीं दोन । पाहिजेत ८५
सेनापति नील । स्वकार्यीं कुशळ ॥
त्यावरी सकळ । सैन्यभार ८६
योग्य दूतकार्या । रावणा बोधाया ॥
अंगदावीण या । कोणी नाहीं ८७
वक्तृत्वाचे गुणीं । बृहस्पतीहुनी ॥
श्रेष्ठ वाटे मनीं । अंगद हा ८८
नेमस्त चतुर । कार्यकर्ता शूर ॥
धर्मवेत्ता थोर । बाळ माझा ! ८९
अंगदा ! त्वां जावें । रावणा बोधावें ॥
हृद्गत सांगावें । माझें त्यास ९०
चिडेल रावण । हट्टाला पेटून ॥
असें तूं भाषण । करूं नको ९१
किंवा दुर्बलता । माझी दीनावस्था ॥
रावणाच्या चित्ता । भासों नेदीं ९२
क्षमा करायाला । तसा दंडायला ॥
सिद्ध मी, हें त्याला । कळूंच दे ! ९३
आणीक विनंती । एक तुजप्रती ॥
सावधानचित्तीं । वागें बापा ! ९४
एकला जातोसी । अंगदा ! लंकेसी ॥

आपुल्या प्राणांसी । रक्षीं बाळा ! ९५
रावण मदांध । अविचारी शुद्ध ॥
सर्वदा सावध । वागावें तूं ९६
अपाय तुजला । तो मृत्यु आम्हांला ॥
सांगणें हें तुला । पुनःपुनः ९७
जा ! यशस्वी होईं । स्वकीर्ति वाढवीं ॥
परतोनी येईं । शीघ्र बाळा ! " ९८
दृढ आलिंगन । अंगदा देऊन ॥
राम दयाघन । स्फुंदतसे ९९
श्रीरामपदाला । प्रणिपात केला ॥
अंगद चालला । लंकापुरीं १००
अंगदासंगतीं । सर्व चालताती ॥
'यशस्वी हो !' म्हणती । पुनःपुनः १०१
कष्टें बोळवीला । अंगद लंकेला ॥
राघव फिरला । सुवेळेसीं २
रामकार्य शुद्ध । कैसें व्हावें सिद्ध ॥
चिंतीत अंगद । पुढें जाय ३
कसा लंकापति । वळेल निश्चितीं ॥
अंगदाला चित्तीं । चिंता वाटे ४
तों रत्नखचित । सुवर्णभूषित ॥
प्रासाद दिसत । रावणाचा ५
सभा घनदाट । ऐश्वर्याचा थाट ॥
प्रासादांत स्पष्ट । दिसतसे ६
सभासद सगळे । भूषणीं सजले ॥
रांगेनें बैसले । सभेमध्यें ७
कोणी पीठावर । शुभासनावर ॥
कोणी भूमीवर । बैसलेती १०८
प्रधान प्रहस्त । पुत्र इंद्रजित ॥

बिभीषण दिसत । डावीकडे १०९
स्वकार्यकुशल । सुमंत्रिमंडळ ॥
दिसतें सकळ । उजवीकडे १०
मध्यें सिंहासन । रावणाचें स्थान ॥
दिव्यतेजपूर्ण । दिसतसे ११
शुभ छत्र थोर । अत्यंत सुंदर ॥
शोभे शिरावर । रावणाच्या १२
स्त्रिया रूपवती । चवऱ्या ढाळीती ।
रावणावरती । हळूहळू १३
रावण सम्राट । गर्जूनी उद्भट ॥
बोलतसे स्पष्ट । सभेमध्यें १४
सर्व सभाजन । एकाग्र होऊन ॥
रावणवचन । ऐकताती १५
श्रीराम कोपला । युक्ती काय याला ॥
विचार चालला । सभेमध्यें १६
आपापली युक्ती । मंत्री सांगताती ॥
होण्या यशप्राप्ति । रावणाला १७
तों चित्तीं सावध । राहुनी अंगद ॥
शिरला निर्वेध । सभेमध्यें १८
रावणासमोर । पुच्छासनावर ॥
अंगद गंभीर । बैसलासे ! १९
खळबळ उडाली । सभेंत सगळी ॥
जो तो हात घाली । शस्त्राकडे ! २०
अंगदासीं डोळे । सर्वांचे लागले ॥
चळों न शकले । क्षणमात्र २१
अपमान झाला । पहातां आपला ॥
क्रोधें लाल झाला । लंकानाथ १२२
'धरा ! रे ! मर्कट । मूर्ख हा उद्धट'

रावण सम्राट । गर्जतसे १२३
लक्ष तलवारी । म्यानाचे बाहेरीं ॥
निघाल्या सत्वरीं । सभेमध्यें ! ! २४
गर्दी एक झाली । शस्त्रांची सगळी ॥
मानेभोंवतालीं । अंगदाच्या २५
ज़री अंगदाला । हात लावायाला ॥
सभेंत एकाला । धैर्य नाहीं ! ! २६
राक्षस सगळे । तेजानें दिपले ॥
पहात राहिले । रावणासी ! २७
अंगद हांसला ! । हांसोनी बोलला ॥
म्हणे " मी युद्धाला । आलों नाहीं ! २८
श्रीरामाचा दूत । वालिराजसुत ॥
अंगद विख्यात । नाम माझें २९
युद्ध शमवाया । तें न चेतवाया ॥
सभामंदिरीं या । पातलों मी ३०
शांतीचें निशाण । क्षमेचें भूषण ॥
हृदयीं धरून । येथें आलों ३१
सत्य तें बोलेन । पथ्य तें सांगेन ॥
श्रीरामाची आण । वाहुनीयां ३२
सत्य वदतां येथ । भिववी कृतान्त ॥
तरी त्या किंचित । मानीना मी ! ! ३३
महर्षिकुलासी । रावणा ! जन्मसी ॥
वेद पढलासी । चतुर्विध ३४
शास्त्रार्थ गहन । जाणसी संपूर्ण ॥
राजनीतिज्ञान । थोर तुझें ३५
कल्प संवत्सर । तपश्चर्या घोर ॥
करूनी शंकर । पूजिला तूं १३६
परी दुष्टाचरणें । त्रैलोक्य गांजणें ॥

हेंचि काय देणें। शंभु देई? १३७
सर्व जगभर। संपादावें वैर॥
हाच काय वर। पावलास? ३८
आज या जगांत। वांछि तुझें हित॥
कोण ऐसा आप्त। राया! तुज? ३९
देव त्वां जिंकिले। यक्ष पळवीलें॥
वैर संपादीलें। गंधर्वांचें ४०
सिद्धचारणांना। आणि किन्नरांना॥
छळिलेंस नाना। प्रकारें तूं ४१
बापुडे तापसी। शुद्ध वनवासी॥
त्यांशींहि धरिसी। वैरभाव ४२
पतिव्रता नारी। शुद्ध सदाचारी॥
त्याही बलात्कारीं। भोगिल्यास ४३
विषाद अत्यंत। वाढला लोकांत॥
आधीं या उन्मत्त। वर्तनानें ४४
आणखी सीतेस। आणुनी केलास॥
त्यावरी कळस। रावणा! तूं ४५
परी या कृत्यांचा! परिणाम दूरचा॥
काय झाला याचा। शोध करीं ४६
आज रघुनाथ। सुवेळाचलांत॥
तुजसीं युद्धार्थ। उभा आहे ४७
रणीं जिंकी काळ। ऐसें कपिदळ॥
आहे उतावीळ। रामसाह्या ४८
जेव्हां आतुर्बळी। वानरमंडळी॥
लंकेची रांगोळी। उडवील ४९
जेव्हां थोर थोर। लंकेतील वीर॥
मरोनी सत्वर। पडतील १५०
तेव्हां या संकटीं। राखे तुझी पाठी॥

कोण ऐसा सृष्टी-। मध्यें आहे? १५१
कोण जगीं वीर। धांवुनी सत्वर ॥
साह्य करी थोर। तुजलागीं? ५२
सर्व त्वां छळिले। रणीं विटंबिले ॥
सर्व दुखविले। मनामध्यें ५३
देव जळफळती। यक्ष तळमळती ॥
रावणा! वांछिती। मृत्यु तुझा ५४
ऋषी श्रेष्ठ श्रेष्ठ। दिव्यतपोनिष्ठ ॥
तेहि झाले रुष्ट। तुझ्यावरी ५५
भ्रष्ट केल्या सती। त्यांचे शाप किती ॥
रावणा! लोंबती। तुझ्या शिरीं? ५६
तपाचा खग्रास। पुण्याचा विध्वंस ॥
झाला आहे खास। राया! तुझ्या ५७
आतां तरी मनीं। सावध होउनी ॥
सीता परतोनी। अर्पी रामा ५८
आणि अपराध। मानुनी हा सिद्ध ॥
रामपद शुद्ध। वंदीं बापा! ५९
श्रीराम रावण। एकत्र पाहून ॥
जग हें संपूर्ण। सुखी होवो ६०
घोर रक्तपात। प्राण्यांचा निःपात ॥
टळो हा त्वरित। आतां तरी! ६१
रावणा! जें गमलें। योग्य तें कथिलें ॥
मानणें राहिलें। तुजकडे! ६२
येथें दिसतात। मंत्रि जे विख्यात ॥
तेही तुला हित। सांगतील ६३
तुम्ही सर्वजण। विचार करून ॥
संधि होय पूर्ण! ऐसें करा!" १६४
अंगद थांबला!। निःशब्द राहिला ॥

रावणवचनाला । ऐकूं इच्छी १६५
तोंच बिभीषण । सभेंत उठून ॥
चालला रावण । वंदावया ६६
रावणचरण । भक्तीनें वंदून ॥
बंधु बिभीषण । बोलूं लागे ६७
" रावणा ! धर्मज्ञ । विवेकी तूं सुज्ञ ॥
तुज जगीं प्राज्ञ । वाखाणिती ६८
स्वपरबळाबळ । योग्यायोग्य काळ ॥
जाणसी सकळ । राजनीते ६९
शत्रु बेसावध । असतां निर्वेध ॥
आरंभावें युद्ध । कालज्ञानें ७०
कीं रिपु एकला । शत्रूंनीं नाडिला ॥
तोहि बा ! युद्धाला । योग्य काळ ७१
किंवा दैवहत । स्वरिपु दिसत ॥
तोहि काळ युक्त । युद्धासाठीं ७२
परि हें एकहि । छिद्र रामाठायीं ॥
दिसों येत नाहीं । लंकानाथा ! ७३
श्रीराम सावध । सर्वदा सुबुद्ध ॥
जितेंद्रिय शुद्ध । वागतसे ७४
शत्रुत्व कसलें ! । प्राणिमात्र झाले ॥
श्रीरामीं सगळे । स्नेहबद्ध ! ७५
दैवाची कृपाहि । आज त्याचे ठायीं ॥
न्यून दिसत नाहीं । लेशमात्र ७६
हातीं जें जें धरी । आरंभ ज्या करी ॥
कार्य तें सत्वरीं । सिद्ध होय ७७
शिवाय सर्वांत । वरिष्ठ खचित ॥
एक गोष्ट दिसत । रामाकडे १७८
सत्य समाधान । न्यायाचें भूषण ॥

दिसतें संपूर्ण । त्याचे ठायीं १७९
सुनीतीचें बळ । सुकृतीचें फळ ॥
दिसतें सकळ । त्याचेकडे ८०
श्रीरामासीं रण । करण्या दारुण ॥
नीतिधैर्य पूर्ण । आम्हां नाहीं ८१
शुद्ध अन्यायाचा । पक्ष हा आमुचा ॥
जाच हा मनाचा । कैसा चुके ? ८२
थोड्यासाठीं घोर । संपादिलें वैर ॥
हेंच वारंवार । डवचेल ८३
पाठीशीं घातली । शूर्पणखा भोळी ॥
हीच चूक झाली । आम्हांकडे ८४
त्यांतहि सीतेस । आणितां लंकेस ॥
चुकीचा कळस । झाला वाटे ८५
असो, जें घडलें । तें गत जहालें ॥
पहावें अ पुढें । हित आतां ८६
आपुलाच दोष । सुधारावयास ॥
इच्छितां आम्हांस । लाज काय ? ८७
सख्य रघुनाथा । जोडितां सर्वथा ॥
त्यांत ती हीनता । कोठें आहे ? ८८
सीता परतोनी । राघवा अर्पूनी ॥
सख्य होतां हानी । आम्हां काय ? ८९
उलट नीतिधैर्य । दावितां निर्भय ॥
रावणा ! विजय । त्यांत आहे ९०
सीता परतूं दे । सन्मानें जाऊं दे ॥
मित्रत्व जोडूं दे । राघवासीं ९१
सीतेसाठीं रण । केलें हें दारुण ॥
ऐसें हें दूषण । आम्हां नको १९२
प्राणनाश केला । परस्त्रीप्राप्तीला ॥

ऐसा राया ! तुला । डाग नको १९३
सीताप्राप्तीहुनी । श्रेष्ठ शतगुणी ॥
आहेत अजुनी । कार्यं जगीं ९४
त्या कार्यी निमग्न । राहुनीयां पूर्ण ॥
सुखसमाधान । भोग राया ! ९५
जन्म आपणास । एकाच कुशीस ॥
म्हणुनी मानस । तुटतें हें ! ९६
रावणा ! वाढलों । एकत्र खेळलों ॥
सुखी दुःखी झालों । एकत्रचि ९७
तुझें माझें हित । भिन्न न दिसत ॥
प्रेम पूर्ण होत । दोघांमध्यें ९८
तुझें हित होय । तें मज कर्तव्य ॥
म्हणुनी निर्भय । बोललों मी ९९
कोठें चूक झाली । अल्पज्ञता दिसली ॥
पाहिजे दाविली । क्षमा तरी ” २००
प्रणिपात केला । रावणपदाला ॥
स्वस्थानीं बैसला । बिभीषण १
मग तो गर्विष्ठ । सुविचारभ्रष्ट ॥
इंद्रजित दुष्ट । बोलूं लागे २
“ ताता ! बिभीषण । राघवा भिऊन ।
गर्भगळित पूर्ण । झाला आहे ! ३
भ्याड हा मुळांत । आमच्या कुळांत ।
दुर्दैवानें प्राप्त । झाला वाटे ४
आमुचा उत्कर्ष । पहावेना यास ॥
म्हणुनि ऐसें खास । बरळतो हा !
आप्तांची ही रात । अशीच जगांत ॥
बंधु वैभवांत । पहावेना २०९
मिळतां वैभव । वांटा घेती सर्व ॥

दैव फिरतां घाव । व्रणीं देती ! २०७
सर्प कवटाळावे । व्याघ्रही पाळावे ॥
परि हे टाळावे । कुलांगार ! ८
नीच कुलांगार । बिभीषण दूर ॥
जाऊं दे सत्वर । कोठें तरी ! ९
आम्हां याचेवीण । कांहीं नाहीं न्यून ॥
आम्हांला हा क्षण । येथें नको ! १०
दुष्टा बिभीषणा ! । कां रे ! क्षणक्षणां ॥
व्यर्थ या रावणा । भिवावितोस ? ११
पुत्र जगज्जेता । साह्य मी असतां ॥
कसली रे ! चिंता । याला आहे? १२
क्षणांत जाळीन । सर्व त्रिभुवन ॥
पालथी घालीन । वसुंधरा ! १३
शेषाचें मस्तक । एकटा मी एक ॥
फोडीन निःशंक । याचेसाठीं ! १४
देव स्वर्गांतून । दैत्य भूमींतून ॥
आणीन खेंचून । याचेपुढें ! १५
मज वीरापुढें । श्रीराम बापुडें ॥
क्षुद्र घुंघुरडें । भासतसे ! १६
छेदुनी सत्वर । राघवाचें शिर ॥
आणीन समोर । रावणाच्या १७
सुग्रीव लक्ष्मण । वधुनी संपूर्ण ॥
चिंता मी हरीन । रावणाची १८
परि बिभीषण । हा जीव घेऊन ।
जाऊं दे पळून । कोठें तरी ! १९
या ठायीं हा दुष्ट ! लागतां न कष्ट ॥
आम्हांमध्यें फूट । संपादील ! २२०
करुनि कळकळीचें । ढोंग सद्बोधाचें ॥

तेजही आमुचें । हरील हा !" २२१
बोलुनी थांबला । इंद्रजीत बसला ॥
कडकडाट झाला । सभेमध्यें !! २२
राक्षस गर्जती । आनंदें डोलती ॥
'शाबास !' म्हणती । 'इंद्रजिता !' २३
रावणही मनीं । धन्यता मानुनी ॥
खों खों खों करुनी । हांसतसे ! २४
बिभीषणमूर्ती । सर्व पहाताती ॥
सर्वेच हांसती । तुच्छतेनें ! २५
तें नव्हे हांसणें । च्छेष्टेनें बघणें ॥
वाटे बोलावणें । मृत्युलाच !! २६
हास्यध्वनी थोर । थांबतां गंभीर ॥
रावण उत्तर । बोलूं लागे २७
"अंगदा ! आलासी । सख्य जोडायासी ॥
परि हें मुळासीं । शक्य नाहीं २८
शत्रुत्व आमुचें । रामरावणांचें ॥
हें आजकालचें । मुळीं नाहीं २९
ब्रह्मा पूर्वी गेला । विष्णु प्रार्थायाला ॥
मज वधायाला । साह्य मागे ३०
क्षीराब्धीमधून । विष्णु प्रगटून ॥
ब्रह्मदेव पूर्ण । आश्वासीला ३१
वृत्त हें ऐकिलें । दूतीं सांगितलें ॥
तेव्हां चरकलें । मन माझें ! ३२
नित्य सावधान । मी तेव्हांपासून ॥
मानसीं राहून । वर्ततसें ३३
देशोदेशीं दूत । चतुर विख्यात ॥
शत्रूच्या शोधार्थ । पाठवीले २३४
कौसल्याकुशीला । रामजन्म झाला ॥

जेव्हां या वार्तेला । आयकीलें २३५
तेव्हांच सत्वर । विष्णु-अवतार ॥
झाला भूमीवर । जाणीलें मी ! ३६
नातरी हे देव । कां रे! करिते सर्व
पुष्पांचा वर्षाव । बाळावरी? ३७
दुंदुभी वाजती । कां स्वर्गावरती ॥
जेव्हां रघुपती । जन्म पावे ? ३८
राम रावणहंता । राम रावणहंता ॥
पसरल्या वार्ता ! कां रे ! जगीं? ३९
यज्ञाच्या रक्षणा । टाकुनी थोरांना ।
राघवबालांना । कां रे ! नेती ? ४०
याहि पुढची गोष्ट । अंगदा ! अनिष्ट ।
जळतसे स्पष्ट । माझ्या मनीं ! ४१
सीतालग्ना म्हणुन । मज बोलावून ॥
केला अपमान । जनकानें ४२
भर मंडपांत । स्त्रियांच्या देखत ॥
हांसती समस्त । राजे मज ४३
अंगदा ! रे ! दांत । पाडुनी हातांत ।
देतों मी क्षणांत । प्रत्येकाच्या ! ४४
परी शांत झालों । उगाच राहिलों ! ।
काळ उमजलों । अनुचित ४५
त्याहीवरी जई । राम वनीं येई ॥
तेव्हां कोण घाई । ऋषींमध्यें ! ४६
सामोरे जातांनी । मेजवान्या देती ॥
गुजगोष्टी करती । रामापाशीं ४७
थेरड्या ऋषींना । रामलक्ष्मणांना ॥
बघतांच पान्हा । फुटे जणु ! ! २४८
गुलगुल बोलती । राघवासांगातीं ॥

त्याला चिथाविती । दैत्यवधा २४९
हाही मूर्ख पोर । शेफारूनी 'थोर ॥
राक्षस सत्वर । वधूं' म्हणे ! ५०
पंचवटीगमन । ऋषींना सोडून ॥
युद्धार्थीच पूर्ण । राम करी ! ५१
वैर हें आमुचें । ऋषी-राक्षसांचें ॥
त्यांत या रामाचें । काय गेलें ! ५२
ऋषी यज्ञाहुती । देवांना देताती ॥
तेणें बळावती । निज शत्रु ! ५३
म्हणुनी मोडतों । यज्ञ विध्वंसितों ॥
ऋषींना गांजितों । दैत्य आम्ही ५४
त्यांत या रामाला । मध्यें पडायाला ॥
कोणीं सांग केला । उपदेश ? ५५
ऋषींचें रक्षण । स्वतांसीं घेऊन ॥
दैत्यांशीं भांडण । कां हा करी ? ५६
शूर्पणखा भोळी । असेल भाळली ॥
कां रे ! विटंबिली । रामें परी ? ५७
स्त्रीजाती अबला । अयोग्य दंडाला ॥
हेंहि काय याला । कळूं नये ? ५८
मागुती दिमाख । दावुनी निःशंक ॥
वधिले रक्षक । रामें माझे ५९
अस्त्रज्ञानहीन । राक्षस वधून ॥
त्यांत हा भूषण । राम मानी ! ६०
आणी आतां सगळें । नगर हें वेढीलें ॥
निमित्ता धाडीलें । येथें तुज ! ! ६१
परि हा रावण । मेला नाहीं अजुन ॥
नीचता ही पूर्ण । नेणावया ! ! २६२
लंका माझी सगळी । कपीमय झाली ॥

आतां रे! कसली । स्नेहवार्ता ? २६३
माकडें मजला । येती बोधायाला ॥
आतां रे! कसला । युक्तिवाद ? ६४
युक्तिवाद रणीं । कंठनाळ चिरुनी ॥
एकमेकां कानीं । सांगू आतां ! ६५
प्रेमाचा सुकाळ । स्नेहाचा गोंधळ ॥
स्वर्गीच सकळ । घालूं आतां ! ६६
शांतीचें हें ढोंग । पुरें आतां सोंग ॥
युद्धाचा उद्योग । करूं लागा ६७
'सीता रघुनाथा । अर्पीन' ही वार्ता ॥
मृत्युवीण आतां । शक्य नाहीं ! ६८
शिर शत्रूपुढतीं । लववी लंकापति ॥
गोष्ट ही कल्पांतीं । घडेचना ६९
शिरें हीं छेदिलीं । शंभूला वाहिलीं ॥
परि न लववीलीं । अंगदा ! मीं ७०
अशींच हीं ताठ । राहतील नीट ॥
जग जों हें नष्ट । झालें नाहीं ७१
असाच निर्भय । शत्रुशिरीं पाय ॥
वर्मस्थानीं घाय । देईन मी ! ७२
अशाच जगतीं । सुंदर युवती ॥
त्रिभुवनपति । भोगीन मी ७३
भोग्य जें सुंदर । त्रिभुवनावर ॥
मज अधिकार । भोगाया तें ! ७४
एक कीं शंभर । येऊं रघुवीर ॥
रावणा माघार । घेणें नाहीं ! ! ७५
मृत्यु कः पदार्थ । मानितों यथार्थ ॥
अंगदा ! निश्चित । जाण मनीं २७६
तूं मात्र हताश । होउनीयां खास ॥

राघवाचा दास । बनलासी २७७
मूर्खा ! तुझा बाप । मारिला निष्पाप ॥
त्याचा तुला कोप । कां रे ! न ये ? ७८
राम तुझा वैरी । असुनी निर्धारीं ॥
साह्य परोपरी । होसी त्याला ७९
लांगूलचालन । राघवा दावून ॥
तद्दूत बनुन । येसी येथें ८०
असो; जाय आतां । सांग रघुनाथा ॥
रक्तपात आतां । टळणें नाहीं ८१
हा मी लंकानाथ । राक्षससेनेंत ॥
सुसज्ज युद्धार्थ । उभा आहे ८२
तूंहि नरवीर । क्षत्रियकुमार ॥
साजेलसें घोर । युद्ध करीं ८३
पेटला वैराग्नी । अनिवार मनीं ॥
रक्तानेंच रणीं । शांत होवो ८४
युद्धदेवतेला । घालूं मध्यस्थीला ॥
तीच आपणाला । न्याय देवो ! ८५
जगज्जेता कोण । राम कीं रावण ॥
युद्धानेंच पूर्ण । ठरेल तें ८६
तुमच्या साह्याला । कुलकलंक्याला ॥
त्या बिभीषणाला । वाटे तरी ८७
कोणापुढें काय । बोलावें निर्भय ॥
हें कांहींच भय । याला नाहीं ८८
बंधु झाला म्हणुन । आम्हां उद्देशून ॥
अप्रिय भाषण । करतां नये! ८९
हा तों या सभेंत । सर्वांच्या देखत ॥
निंदी यथास्थित । मजलागीं २९०
दुजा असता कोणी । तरी याच क्षणीं ॥

दुखंड होऊनी । पडता येथें ! २९१
बंधु हा म्हणून । दिलें जीवदान ॥
आतां तरी वदन । काळें करो ! " ९२
रावण थांबला ! । क्षुब्धचित्त झाला ॥
घुमसत राहीला । सभेमध्यें ९३
सुमंत्री प्रधान । उठुनी संपूर्ण ॥
करिती सांत्वन । रावणाचें ९४
यश आपापलें । वर्णिती सगळे ॥
रावणा ते वेळें । उद्देशूनी ९५
वल्गना बाष्कळ । करिती सकळ ॥
युद्धा उतावीळ । होउनीयां ९६
तोंच बिभीषण । सर्वां थांबवून ॥
रावणचरण । वंदूं जाय ९७
मानस पोळलें । सद्गदीत झालें ॥
खळखळां लोटले । अश्रुपात ॥ ९८
स्फुंदत स्फुंदत । बिभीषण वदत ॥
बंधु लंकानाथ । उद्देशूनी ९९
"बाबा ! लंकानाथा ! । कां रे ! तुझ्या चित्ता ॥
अवदशा आतां । आठवली ? ३००
हिताचें भाषण । कर्तव्यकथन ॥
तुला एकक्षण । आवडेना १
पोकळ वल्गना । फुकाच्या कल्पना ॥
पूर्ण तुझ्या मना । पटताती ! २
राया ! या सभेंत । वांच्छी तुझें हित ॥
ऐसा न दिसत । कोणी मज ३
बालीश हा पोर । इंद्रजीत कुमर ॥
तुझा खरोखर । शत्रू आहे ! ३०४
मंत्रीहि सगळे । कालवश झाले ॥

मराया ठाकले । रणांगणीं ३०५
कार्य कीं अकार्य । न्याय कीं अन्याय ॥
कळेना समय । कांहीं यांना ६
असो; जें होणार । अवश्य होणार ॥
त्याला टाळणार । कोण जगीं ? ७
अप्रिय जें चित्ता । परी पथ्य हिता ॥
तया श्रोता वक्ता । दुर्लभचि ! ८
राया ! लंकानाथा ! । चाललों मी आतां ॥
सुखी हो सर्वथा । माझेवीण ९
स्त्रीपुत्रादिकांना । आप्तसुहृदांना ॥
तुझ्याच रक्षणा । ठेवितों मी १०
बोललों अप्रिय । तुज जें निर्भय ॥
होऊनी सदय । क्षमा करीं" ११
बिभीषण उठुनी । जातसे गगनीं ॥
वाट पाहे मनीं । अंगदाची १२
अंगद संतप्त । उठुनी सभेंत ॥
रावणा गर्जत । बोलूं लागे १३
" मदांधा रावणा ! । कुलनिर्दाळणा ! ॥
निर्वाणवचना । ऐक आतां १४
तुझा सर्वनाश । मज अपयश ॥
ठरलेंच त्यास । टाळी कोण ? १५
मूर्खा ! रामबाण । वज्राहुनी तीक्ष्ण ॥
जेव्हां लंका पूर्ण । जाळितील १६
जेव्हां थोर थोर । लंकेंतील वीर ॥
तुझ्याच समोर । मरतील १७
जेव्हां हा उन्मत्त । मूर्ख इंद्रजित ॥
रणीं तडफडत । पहुडेल ३१८
तेव्हांच तूं पूर्ण । शुद्धीला येऊन ॥

माझें हें वचन । स्मरशील ३१९
माझी निंदा व्यर्थ । कां रे ! करिसी येथ ॥
स्वतांचा निःपात । नेणूनीयां ? २०
वाली मज प्रिय । प्राणांहुनी होय ॥
परी धर्म प्रिय । त्याचेहुनी २१
धर्माला विरुद्ध । नव्हता वालीवध ॥
म्हणुनीच स्तब्ध । राहिलों मी २२
शुद्ध प्रेमामुळें । रामपद धरिलें ॥
प्राणभयामुळें । केव्हां नाहीं ! २३
असाच राहीन । रामपदीं लीन ॥
जोंवरी हा प्राण । देहीं आहे २४
तूं मात्र ही स्पष्ट । लंका पहा नीट ॥
आप्तांनाहि भेट । कडकडुनी २५
जप तप दान । कांहीं होणें पूर्ण ॥
तेंहि उरकून । घेई आतां २६
स्त्रियाहि सकळ । पहा एक वेळ ॥
पुनः ऐसा काळ । येणें नाहीं ! २७
श्रीरामासीं गांठ । पडतांच थेट ॥
पुन्हां लंकाभेट । होणें नाहीं ! २८
पुन्हां हें उन्मत्त । शिर जगतांत ॥
कोणाला जिवंत । दिसणें नाहीं ! २९
लौकरच रणीं । तुकडे होऊनी ॥
गृध्रभक्ष्यस्थानीं । पडेल हें !" ३०
अंगद चालला ! । पाहुनी कोपला ॥
क्रोधें खवळला । लंकानाथ ३१
सभा विसर्जिली । रावणाज्ञा झाली ॥
अंगदा झोंबली । दैत्यसेना ३३२
आपापलें बळ । लावुनी सकळ ॥

ओढिती प्रबळ । अंगदाला ३३३
कपि आतुर्बळी । उडे अंतराळीं ॥
पडले ते खालीं । दैत्य सारे ३४
कोणी मंडपांत । पडती कण्हत ॥
कोणी कोसळत । मार्गामध्यें ३५
वाताहात केली । दैत्यांची सगळी ॥
अंगदें ते काळीं । कोपुनीयां ३६
आणखी घेऊन । सवें बिभीषण ॥
श्रीरामचरण । वंदूं जाय ३७
बिभीषण वीर । देखतां समोर ॥
राजा रघुवीर । तुष्ट झाला ३८
त्यासीं आलिंगन । देऊनी आपण ।
लंकाराज्यार्पण । राम करी ३९
वानर हर्षती । आनंदें गर्जती ॥
धन्यवाद देती । रामराया ३४०

पूर्वार्ध समाप्त

# युद्धकांड

## ( उत्तरार्ध )

—:०:—

### लंकेवर हल्ला

शिष्टाई-शेवट । पाहुनी अनिष्ट ॥
कपी क्रोधाविष्ट । सर्व झाले १
स्वकार्यसिद्ध्यर्थ । युद्धाचाच्च वेत ॥
सर्वांना पसंत । पडतसे २

युद्धार्थी सगळे । कपी गोळा झाले ॥
त्वेषानें चालले । लंकेवर ३
प्रचंड पाषाण । वृक्ष उपटून ॥
धांवती संपूर्ण । लंकेकडे ४
लंकेसभोंवार । दुर्ग भयंकर ॥
स्वनेत्रीं वानर । देखिताती ५
दुर्गद्वारावरती । दैत्यसेनापती ॥
सावध दिसती । रात्रंदीन ६
खंदक विस्तीर्ण । जळपरिपूर्ण ॥
दिसती दारुण । भोंवतालीं ७
क्षणांत सगळे । खंदक भरिले ॥
तटाभोंवताले । वानरांनीं ८
हजारों हजार । भव्य कपीवीर ॥
धांवती सत्वर । द्वाराकडे ९
वृक्ष फेंकिताती । पाषाण हाणीती ॥
फोडाया झटती । दुर्गद्वार १०
मुष्टी वज्रप्राय । वळुनी निर्भय ॥
कोणी देती घाय । द्वारावरी ११
लाथा झटाझट । हाणिती उद्धट ॥
करावया पिष्ट । दरवाज्याचें १२
द्वार खिळखिळें । होतांना पाहिलें ॥
कांहीं कपी चढले । तटावर १३
दुवार जोराचा । मारा करायाचा ॥
हेतु स्पष्ट त्यांचा । दिसतसे १४
जावया सत्वर । उंच तटावर ॥
उड्या घेती थोर । आवेशानें १५
एकमेकां हात । देऊनी साह्यार्थ ॥
सरसरां चढत । तटावरी १६

परी तेथें घोर । शस्त्रांचा प्रहार ॥
होय शिरावर । वानरांच्या १७
मारा शतघ्नींचा । वर्षाव बाणांचा ॥
होय निकराचा । तटावरुनी १८
कपी कोसळती । धडधडां पडती ॥
भडभडां ओकिती । रक्त मुखीं १९
मागुतीं उड्डाण । करुनि कांहींजण ॥
दैत्यसेनेंतून । प्रवेशले २०
पोंचतां सैन्यांत । मांडिला अनर्थ ॥
कपींनीं उन्मत्त । होउनीयां २१
तोंडें बुझावलीं । यंत्रांचीं सगळीं ॥
पाचर ठोकिली । शतघ्नींत २२
अश्वगज वधिले । रथ चूर्ण केले ॥
तुकडे उडवीले । धनुष्यांचे २३
फरफरां ओढिती । राक्षसांना हातीं ॥
धडधडां फेंकिती । खंदकांत २४
हात पाय भग्न । शिर शतचूर्ण ॥
राक्षस होऊन । कोसळती २५
जिह्वा लळलळीत । मुखांतुनी येत ॥
भेसूर दिसत । दैत्यमुखें २६
रक्तानें नहाला । दुर्ग तो सगळा ॥
घोर वस्त्र ल्याला । रक्तवर्ण ! २७
लाल भडक झाले । खंदक सगळे ॥
खेंचून भरले । मुंडक्यांनीं २८
केश मांस हाडें । दिसती चहूंकडे ॥
मांसेच्छु गिधाडें । धांवावती ! २९
युद्ध ऐसें घोर । लंकाद्वारावर ॥
पूर्ण दोन प्रहर । चालतसे ३०

होतां सायंकाळ । कपींनीं विशाळ ॥
फोडिलीं सकळ । लंकाद्वारें ३१
लाखों कपीवीर । 'जय' शब्द थोर ॥
करित किल्ल्यावर । प्रवेशले ३२
युद्ध निकराचें । घोर आवेशाचें ॥
कपी-राक्षसांचें । चालूं झालें ३३
'हाणा ! मारा ! ठोका । चूर्ण करुनी टाका ॥'
याच येती हांका । चोहोंकडे ३४
रथांचा विध्वंस । ध्वजांचा विनाश ॥
होतसे अशेष । रणांगणीं ३५
घोडे खिंकाळती । हत्ती चीं चीं करिती ॥
सैरावैरा पळती । सैन्यामध्यें ३६
प्रचंड दुर्धर । राक्षस वानर ॥
करिती प्रहार । एकमेकां ३७
मुष्टी वज्रप्राय । हाणुनी निर्भय ॥
एकमेकां घाय । वर्मी देती ३८
घोर शिळाघात । होतां मस्तकांत ॥
पडती कण्हत । दैत्यवीर ३९
शरीरांत बाण । रुततां दारुण ॥
होती मूर्च्छापन्न । कपीगण ४०
रक्तानें माखले । सैनिक सगळे ॥
परी न ढळले । लेशमात्र ४१
तोंच इतुक्यांत । सर्वांचेंच चित्त ॥
वीर इंद्रजित । वेधीतसे ! ४२

## इंद्रजितकृत नागपाशबंधन

होतां निशाकाळ । चढलें तत्काळ ॥
अत्यद्भुत बल । राक्षसांला ४३
अति अनावर । इंद्रजित वीर ॥

होऊनी दुर्धर । बाण सोडी ४४
घोर रामबाण । वज्राहूनी तीक्ष्ण ॥
तेहि करी चूर्ण । रणांगणीं ४५
तीक्ष्णशस्त्रघाव । दिव्यास्त्रवर्षाव ॥
होतसे अपूर्व । कपीशिरीं ४६
वानर सगळे । पळाया लागले ॥
हताश ते वेळे । होऊनीयां ! ४७
पराभव अपुला । पाहुनी कोपला ॥
क्रोधें खवळला । अंगद तो ४८
इंद्रजितरथीं । उडुनी वरती ॥
वधिला सारथी । क्षणार्धांत ४९
रथ चूर्ण केला । ध्वज कोसळीला ॥
घोडा उधळीला । चोहोंकडे ५०
आणि इंद्रजित । उचलुनी नभांत ॥
अंगद पहात । आपटाया ५१
तोंच तो कपटी । करुनी आटापेटी ॥
नभीं उठाउठीं । गुप्त झाला ! ! ५२
अदृश्य राहून । भयंकर बाण ॥
वानरांलागून । हाणीतसे ५३
कोणा पांच सात । कोणा एक शत ॥
कोणा असंख्यात । बाण हाणी ५४
शब्द काढायाची । हात हलवायाची ॥
पाय उचलायाची । सोय नाहीं ! ५५
हात उगारावा । हळुच उचलावा ॥
तोंच तो उडावा । आकाशांत ! ५६
कोणी धीरवान । उचली जों मान ॥
तोंच ती तुटुन । यावी खालीं ! ५७
असा हा आकान्त । पाहुनी सेनेंत ॥

कपी भयभीत । सर्व झाले ५८
कोठूनी येताती । बाण स्वतांवरती ॥
कोणाला निश्चितीं । कळेना हें ५९
अंधारीं भ्रमले । वानर सगळे ॥
राक्षसां चढलें । घोर बळ ६०
तोंच शब्द घोर । इंद्रजित वीर ॥
करुनी दुर्धर । बाण काढी ६१
ब्रह्मदत्त बाण । धनुष्या लावून ॥
नागास्त्र दारुण । जपतसे ६२
घोर विषयुक्त । नाग असंख्यात ॥
पातले त्वरित । नभांतुनी ६३
सर्व वळवळत । गेले उड्या घेत ॥
जिभल्या चाटीत । रामापाशीं ६४
आणखी वंदन । प्रभूला करून ॥
मागताती पूर्ण । अभयदान ६५
प्रभूनें जाणीलें । लक्ष्मणा कथीलें ।'
'जाण हें सगळें । ब्रह्मवच ! ६६
ब्रह्मवरदान । मानूं हें आपण ॥
नातरी तो मान । काय त्याचा !" ६७
जाणुनी हे सगळे । नाग आश्वासिले ॥
कडकडा झोंबले । सर्व मग ६८
वर्मीं दंश घेती । नाग वेढे देती ॥
सर्वांग फोडिती । राघवांचें ६९
दोघे धाडकन । पडती मूर्च्छापन्न ॥
विकलांगपूर्ण । होऊनीयां ७०
मुठी फुटताती । रक्तानें माखती ॥
धनुष्यें पडती । बाजूकडे ७१
सर्वांगीं जोराचा । उष्ण रुधिराचा ॥

प्रवाह वेगाचा । चालू झाला ७२
हातपाय सुंद । श्वासोच्छ्वास मंद ॥
नाडीहि ती बंद । झाली वाटे! ७३
वानर सगळे । राघवांसीं आले ॥
ढळढळां लागले । रडावया! ७४
हात फिरवूनी । राघवांवरूनी ॥
कपाळें पिटूनी । रडताती ७५
तोंच इंद्रजित । गुप्त आकाशांत ॥
सिंहनाद करित । आनंदानें! ७६
राघव निमाले । गतप्राण झाले ॥
ऐसेंच वाटलें । राक्षसाला ७७
कृतार्थ होऊनी । मग परतोनी ॥
जावयाला मनीं । दैत्य इच्छी ७८
जातां जातां तीव्र । हाणुनीयां त्राव ॥
कपी त्यानें सर्व । विद्ध केले ७९
मारुतीला दोन । सुग्रीवाला तीन ॥
रागें रागें तीक्ष्ण । बाण हाणी ८०
बिभीषण वीर । देखुनी समोर ॥
बाणांनीं जर्जर । त्याला करी ८१
आणखी हें कार्य । करुनी निर्भय ॥
इंद्रजित जाय । परतोनी ८२
नगरीं पातला । रावणा भेटला ॥
आनंद लोटला । लंकापुरीं ८३
दवंडी पिटली । राक्षसांच्या मेळीं ॥
प्राणहानी झाली । राघवांची ८४
इकडे वानर । रामासाठीं घोर ॥
काळजी अपार । करिताती ८५
या प्रसंगीं काय । कोणता उपाय ॥

योजावा निर्भय । कळेना हें ८६
हात कपाळाला ॥ लावुनी बैसला ॥
जो तो चूर झाला । चिंतेमध्यें ८७
तोंच झंझावात । सुटला अद्भुत ॥
वृक्ष उन्मळत । धरेवरी ८८
लाटा उसळती । सागरावरती ॥
वेगें आपटती । तीरावर ८९
महात्मा गरुड । अंधःकारीं गाढ ॥
करुनी तांतड । प्रवेशला ९०
तो येतां सगळे । पाश ढिले झाले ॥
पळोनीयां गेले । नाग सर्व ! ! ९१
रक्ताचा प्रवाह । खुंटे निःसंदेह ॥
सुखावले देह । राघवांचे ९२
हळुहळू डोळे । रामें उघडीले ॥
प्रेमानें देखीले । कपीगण ९३
लक्ष्मणदेहांत । चैतन्य निश्चित ॥
हळुहळू येत । पुनरपी ९४
दोघे वीर भले । उठोनी बैसले ॥
वानर हर्षले । सर्व मनीं ९५
श्रीरामचरण । आदरें वंदून ॥
गरुड उडून । नभीं गेला ९६
घोर भुभुःकार । करिती वानर ॥
सर्व लंकानगर । दणाणलें ९७
आनंदें नाचती । उंच उड्या घेती ॥
कपी आलिंगिती । एकमेकां ९८
घोर कपीशब्द । ऐकतां सावध ॥
रावण तो क्षुब्ध । मनीं झाला ९९
श्रीराम उठला । ऐकतां वार्तेला ॥

खेद होय त्याला । अनिवार १००
पाचारूनी थोर । श्रेष्ठ दैत्यवीर ॥
धाडी त्यां सत्वर । युद्धासाठीं १
परी ते एकेक । त्रैलोक्यछळक ॥
रणकुंडीं खाक । सर्व झाले! २
प्रहस्त दुर्धर । महोदरवीर ॥
रणभूमीवर । नील वधी ३
वीर अकंपन । धूम्राक्ष दारुण ॥
रणीं हनुमान । नष्ट करी ४
तो त्रिशिरावीर । देवांतक शूर ॥
हनुमान चूर । रणीं करी ५
वज्रदंष्ट्र श्रेष्ठ । नरांतक दुष्ट ॥
रणीं करी पिष्ट । अंगद तो ६
मकराक्ष दारुण । घोर युद्ध करुन ॥
पावला मरण । रामहस्तें ७
वानरांपैकींही । लाखों दिव्यदेही ॥
रणकुंडाचे ठायीं । भस्म झाले! ८
प्राणनाश झाला । अनिवार त्याला ॥
वर्णितां वाणीला । दुःख वाटे ९
दुःख हो आम्हांला । परी त्या दुष्टाला ॥
राजा रावणाला । दया नाहीं १०

## कुंभकर्णाचा वध

पुन्हां उठवून । बंधु कुंभकर्ण ॥
देई त्या धाडून । रणांगणीं ११
अज्ञाननिद्रेंत । होता तो निद्रिस्त ॥
करिती जागृत । दैत्य त्याला १२
हजारों कर्कश । समरवाद्यांस ॥
वाजवितां त्यास । शुद्धी आली ! ११३

लक्षावधी हत्ती । देहीं चालवीती ॥
तेव्हां ये जागृती । कुंभकर्णा ! ! ११४
मग युद्ध घोर । केलें यानें थोर ॥
असंख्य वानर । वधुनीयां १५
शेवटीं श्रीराम । कोपूनी परम ॥
वधी हा अधम । रणांगणीं ! १६
बापुडा हा प्राणी । उठुनि निद्रेतूनी ।
मरायाच रणीं । आला वाटे! १७
'महत्त्वाकांक्षिला' । नाहीं हा जन्मला
अज्ञानीं बुडाला । रात्रंदीन १८
सुप्त किंवा दुष्ट । म्हणूं हा वलिष्ठ ॥
निर्णय हा स्पष्ट । होत नाहीं १९
रावण आणीत । जानकी लंकेंत ॥
कधीं हें पसंत । नव्हतें याला २०
परी नीतिशुद्ध । रावणा विरोध ॥
करावया सिद्ध । नव्हता हा २१
खावें प्यावें ल्यावें । यथेच्छ झोंपावें ॥
'दादां'चें ऐकावें । कळे याला २२
देहसामर्थ्याचें । बुद्धिमांद्यतेचें ॥
उदाहरण याचें । खासें आहे ! २३

## इंद्रजिताचा अभिचारिक यज्ञ

कुंभकर्ण पडतां । रावणाच्या चित्ता ॥
अति घोर व्यथा । जडतसे २४
पुत्र बोलावून । त्यासंगें दारुण ॥
उपाय रावण । योजीतसे २५
उपाय ठरला । स्थान निकुंभिला ॥
इंद्रजित गेला । यज्ञासाठीं १२६
यज्ञ 'अभिचारिक' । शत्रुविनाशक ॥

आरंभीं निःशंक । इंद्रजित १२७
वटवृक्षाखालीं । भुयाराचे तळीं ॥
इंद्रजीत बळी । प्रवेशला २८
रक्ताचें सिंचन । सर्वत्र करून ॥
मध्यें हुताशन । पेटवीला २९
समोर देवीची । क्रुद्ध कंकाळीची ॥
मूर्ति लोखंडाची । स्थापीयेली ३०
उष्ण नररक्त । भरूनी पात्रांत ॥
ठेविलें त्वरित । उजवीकडे ३१
मुंडक्यांच्या राशी । रचूनि रांगांशीं ॥
डावे हातापाशीं । सांठविल्या ३२
मग प्रेतासन । त्यामध्यें घालून ॥
इंद्रजित हवन । करूं लागे ! ३३
केश पिंजारीले । मोकळे सोडीले ॥
रक्त चोपडीलें । सर्वांगाला ३४
रक्तवर्ण माळा । घालुनीयां गळां ॥
शिरीं रक्तटिळा । लावीयेला ३५
हृदयाशीं हात । धरुनी इंद्रजित ॥
मंत्र पुटपुटत । हवन करी ३६
जिवंत बोकड । करितां तडफड ॥
करूनी तांतड । चिरियेला ३७
उष्ण उष्ण रक्त । धरूनी पात्रांत ॥
ओती इंद्रजित । अग्नीमध्यें ३८
नरमुंडाहुती । असंख्य हाडें तीं ॥
पडतच होतीं । अग्निमुखीं ३९
असें तें हवन । करितां दारुण ॥
इंद्रजित ध्यान-। मग्न झाला १४०
वार्ता ही फुटली । राघवां कळली ॥

तांतडी लाविली । बिभीषणें १४१
म्हणे "रघुनाथा ! । हवन हें संपतां ॥
दैत्य हा सर्वथा । आटोपेना ४२
अग्नीचे बाहेरीं । विजयरथ ये तरी ॥
त्रैलोक्याला भारी । होईल हा !" ४३
मग तें वचन । ऐकुनी लक्ष्मण ॥
करावया रण । सिद्ध झाला ४४
क्रुद्ध हनुमान । वीर बिभीषण ॥
करिती गमन । त्याजसवें ४५
घोर कपीदळ । अत्यंत प्रबळ ॥
चालले सकळ । तिघांमागें ४६
निकुंभिलास्थान । बघती संपूर्ण ॥
प्रवेश कठीण । वाटतसे ४७
चौक्या होत्या चार । गुहामार्गावर ॥
अत्यंत दुर्धर । ठेवीयेल्या ४८
दैत्य मदोन्मत्त । मद्यपानासक्त ॥
दिसाया लागत । सर्वां आधीं ४९
राजा बिभीषण । देखतां दुरून ॥
राक्षस शरण । सर्व आले ५०
पुढें कांटवन । लागलें भयाण ॥
देवतांनीं पूर्ण । व्यापीयेलें ५१
लक्ष्मणमूर्ती । देखतां पुढती ॥
सर्व वेडावती । वनदेवी ! ५२
पुढें झंझावात । सुटला अद्भुत ॥
वानर उडत । नभामध्यें ५३
परी हनुमंता । सन्मुख पहातां ॥
वायु त्याचा पिता । तुष्ट झाला ! १५४
पुढतीं उरग । अडवीती मार्ग ॥

धांवती सवेग । अंगावरी १५५
शेषअवतार । लक्ष्मणासमोर ॥
सर्व सर्प घोर । लीन झाले ५६
या रीतीं सकळ । चौक्या त्या विफळ ॥
होतां कपीदळ । पुढें झालें ५७
पुढें एक घोर । भीषण भुयार ॥
ये दृष्टीसमोर । वानरांच्या ५८
सर्व भुयारांत । पहाती चकीत ॥
देखावा अद्भुत । दिसतसे ५९
मध्यें हुताशन । पेटला दारुण ॥
ज्वाला त्या गगन । भेदों जाती ६०
दुष्ट इंद्रजित । राहुनी ध्यानस्थ ॥
आहुत्या टाकीत । हळूहळू ६१
दिव्य रथ घोर । सशस्त्र दुर्धर ॥
अग्नीचे बाहेर । अर्धा आला ६२
सारथी निघाला । अश्व प्रगटला ॥
दिसाया लागला । दिव्य ध्वज ६३
देखावा पाहून । क्रुद्ध हनुमान ॥
सक्रोध उड्डाण । करीतसे ६४
हाणूनीयां लाथ । चूर्ण केला रथ ॥
अग्नि तो उध्वस्त । सर्व झाला ६५
पात्रें लवंडिलीं । हाडें भिरकाविलीं ॥
कंकाळी फेंकिली । कोपऱ्यांत ६६
मागुती कोपून । क्रुद्ध हनुमान ॥
करित ताडण । इंद्रजिता ! ६७
दंडानें धरिला । वेगीं आसुडीला ॥
फरफरां ओढीला । भूमीवरी १६८
घोर मुष्टीघात । करली छातींत ॥

मारुती देहान्त । करूं पाहे ! १६९
तोंच दैत्य मनीं । सावध होऊनी ॥
स्वशत्रु नयनीं । देखतसे ७०
यज्ञाचा विध्वंस । पाहुनी हताश ॥
दैत्याचें मानस । पूर्ण झालें ७१
तसाच तो हात । सोडवुनी त्वरित ॥
निघे जळफळत । गुहेंतुनी ७२
रथ तेथें सज्ज । होता जो सहज ॥
त्यावरी हा आज । आरूढला ७३
दिव्य चिलखत । घालुनी अंगांत ॥
युद्धा इंद्रजित । सिद्ध झाला ७४

## दुरात्मा इंद्राजित व महात्मा लक्ष्मण

बिभीषणा शरण । गेले जे भिऊन ॥
दैत्य पुन्हां रण । करूं आले ७५
पुन्हां घनघोर । संग्राम दुर्धर ॥
रणभूमीवर । चालू झाला ७६
पुन्हां वीरध्वनी । उठला गगनीं ॥
कानठळ्या कानीं । बसों जाती ७७
एकमेकां चूर्ण । करण्या विदीर्ण ॥
वीर ते कसून । झगडती ७८
प्रचंड पर्वत । फेंकुनी आघात ॥
वानर करीत । दैत्यांवरी ७९
दैत्यही ते बाण । धनुष्यां लावून ॥
वानरां विदीर्ण । करिताती ८०
कल्लोळ माजला । रणांत सगळा ॥
रक्तानें नाहला । वीर सर्व ८१
शिरें तटातट । तुटती निकट ॥
असृक्ताचे पाट । वाहताती १८२

कबंधें नाचतीं । रणांगणावरती ॥
आवेशीं हाणीतीं । एकमेकां १८३
कळप गृध्रांचे । श्वानसूकरांचे ॥
आशेनें मांसाचे । हिंडताती ८४
इंद्रजिता आज । घोर चढे तेज ॥
तोंड कोणा सहज । काढूं देना ८५
एकेका बाणानें । कपी सहस्रानें ॥
आज तो लीलेनें । वधीतसे ८६
बाण वर्मस्थानीं । घुसतां जावोनी ॥
कपी भोवंडोनी । कोसळती ८७
पूर्ण वाताहात । वानरसेनेंत ॥
होतां हनुमंत । संतापला ८८
इंद्रजीतबाण । सोसुनीयां तीक्ष्ण ॥
गेला हनुमान । रथापाशीं ८९
रथाचे दांडीला । धरुनी खेंचिला ॥
आणि भोवंडीला । इंद्रजीत ९०
म्हणे, " रे पापिष्ठा ! । दैत्यकुळनष्टा ! ॥
नीट पहा दुष्टा! । आतां मज ९१
तुझा मी कृतान्त । पहा हनुमंत ॥
तुझें ब्रह्मदत्त । काढीं आतां ! ९२
मूर्खा ! ब्रह्मदत्त । माझें शिवदत्त ॥
वल्गना या व्यर्थ । कां रे ! तुझ्या ? ९३
तुज निर्दाळणा । नये माझ्या मना ॥
तोंच या वल्गना । तुझ्या सर्व ! " ९४
म्हणुनि मारुतीनें । घोर आवेशानें ॥
रथ तो लाथेनें । चूर्ण केला ! ९५
सारथी मारिला । ध्वज झुगारिला ॥
घोडा उधळीला । रणांगणीं १९६

तोंच इंद्रजीत । देखुनी प्राणान्त ॥
तत्क्षणीं नभांत । गुप्त झाला १९७
दुजा आणवून । रथ तेच क्षण ॥
तयांत आपण । आरूढला ९८
आणि गुप्तपणीं । कंकपत्रबाणीं ॥
हनुमान रणीं । विद्ध करी ! ९९
बाण झणाणत । घुसतां देहांत ॥
कपी विह्वळत । पडे खालीं २००
पुन्हां सात बाण । मारुनीयां तीक्ष्ण ।
वीर बिभीषण । आसुडीला १
लक्ष्मणावरती । बाण हाणी किती
याला कांहीं मिती । नव्हतीच २
घोर भल्ल बाण । घुसतां जाऊन ॥
लक्ष्मण फुलून । गेला सर्व ३
परी इंद्रजीता । वेध कैसा आतां ॥
करावा हें चित्ता । उमजेना ४
लक्ष्मणाचे बाण । शत्रूला सोडून ।
व्यर्थ नभांतून । भटकती ५
गुप्त एके क्षणीं । स्पष्ट दुजे क्षणीं ॥
इंद्रजित रणीं । दिसतसे ६
भूमीसी क्षणांत । क्षणीं गगनांत ॥
क्षणांत रथस्थ । दिसतसे ७
क्षणांत पूर्वेस । क्षणीं पश्चिमेस ॥
क्षणीं उत्तरेस । दृष्टी पडे ८
क्षणांत मार्जार । क्षणांत सूकर ॥
इंद्रजीत वीर । बनतसे ९
मायेचा प्रभाव । पाहुनी अपूर्व ॥
ऋषी देव सर्व । घाबरले २१०

मृत्यू इंद्रजीता । कैसेनी ये आतां ॥
हीच सर्वां चिंता । वाटतसे ११
तोंच तें पाहून । लक्ष्मणाचें रण
हनुमान पूर्ण । खवळला १२
म्हणे, "बा लक्ष्मणा ! । दिव्यास्त्रप्रेरणा ॥
शंका तुझे मना । काय वाटे ? १३
दिव्यास्त्रें हा खळ । वधी कपीदळ ॥
तुला हें सकळ । दिसेना का ? १४
महाधनुर्धर । असुनी तूं थोर ॥
कशी पिरपीर । लाविशी ही ? १५
असुनी जरी तुज । दया ये सहज ॥
तरी मीच आज । वधितों याला !" १६
बोलुनी या बोला । मारुती धांवला ॥
परी आवरीला । लक्ष्मणानें १७
म्हणे "बंधुराया ! । यश हातांना या ॥
येवो हीच दया । दावीं मज १८
आज हा उन्मत्त । दुष्ट इंद्रजीत ॥
माघारा लंकेंत । जात नाहीं ! १९
आज माझे बाण । वज्राहुनी तीक्ष्ण ॥
शिर याचें चूर्ण । करितील २०
पूर्वी झाली नाहीं । पुन्हा होणें नाहीं ॥
ऐशी रण घाई । करीन मी ! २१
ऋषी देव सर्व । वीर्य अभिनव ॥
देखोत अपूर्व । माझें आतां" २२
बोलुनी हें वचन । महात्मा लक्ष्मण ॥
कृतान्तासमान । खवळला २३
तपस्वी हा भोळा । तेजानें आगळा ॥
क्रोधानें तापला । सर्वांगांत २४

भव्य जटाभार । बांधुनी सत्वर ॥
ठाण दिलें घोर । माहेश्वरी २२५
बाहु थरारले । नेत्र वटारीले ॥
स्फुरण चढलें । सर्वांगाला २६
तसा मुसमुसत । जोडूनीयां हात ॥
वंदिले समस्त । ऋषीगण २७
श्रीरामस्मरण । होतांच तत्क्षण ॥
मायाजाळ पूर्ण । मावळलें ! २८
दिशा उजळल्या । प्रकाशें भरल्या ॥
माया गुप्त झाल्या । जागेवरी २९
इंद्रजीतरथ । स्वच्छ आकाशांत ॥
लागला त्वरीत । दिसावया ! ३०
स्वशत्रु समोर । देखुनी दुर्धर ॥
लक्ष्मण वीर । खवळला ३१
एक दिव्य बाण । शत्रुरथीं पूर्ण ॥
सारथी लक्षून । सोडीतसे ३२
सारथ्याचें शिर । उडूनीयां वर ॥
पुन्हां रथावर । आदळलें ! ३३
सारथी मरतां । इंद्रजीत स्वतां ॥
सारथ्यपटुता । दावीतसे ! ३४
रज्जु एक्या हस्तें । चाप दुज्या हस्तें ॥
धरुनी जगातें । थक्क करी ३५
अजुनिही बाणीं । शतसहस्रांनीं ॥
लोळवीले रणीं । कपी त्यानें ३६
परी आतां मन । झालें भ्रांतीपूर्ण ॥
अस्त्रेंही संपूर्ण । विसरलीं ! ३७
दृष्टिरोध झाला । नेम भरकटला ॥
बाण व्यर्थ झाला । एकएक २३८

अश्वगती मंद । बाहुस्फूर्ती बंद ॥
जग सर्व धुंद । भासतसे २३९
स्वमृत्यूचा काळ । पातला जवळ ॥
इंद्रजितें सकळ । ओळखीलें ४०
कंठ दुःखें भरला । हात ढिला झाला ॥
कंपही सुटला । सर्वांगास ४१
सुलोचना पत्नी । आठवली मनीं ॥
रावणही ध्यानीं । प्राप्त झाला ४२
मंदोदरीवचन । आठवतां पूर्ण ॥
दुष्ट मटकन । बैसे खालीं ४३
तोंच लक्ष्मणानें । नाराच बाणानें ॥
कवच जोरानें । उडवीलें ४४
ध्वज कोसळीले । अश्व संहारीले ॥
धनुष्य तोडीलें । हस्तासह ४५
हस्त जो उडाला । शीघ्र गुप्त झाला ॥
कोठें तो कोणाला । न कळतां ४६
पुन्हां इंद्रजीत । आवेशें रणांत ॥
चालला धांवत । शत्रूवरी ४७
जातां जातां त्यानें । एकयाच हस्तानें ॥
कपी आवेशानें । चूर्ण केले ! ४८
आतां मात्र पूर्ण । तापुनी लक्ष्मण ॥
निर्वाणीचा बाण । सज्ज करी ४९
यमदत्त बाण । धनुष्या लावून ॥
ऐंद्रास्त्र दारुण । जपतसे ! ५०
पृथ्वी डळमळली । नक्षत्रें ढळलीं ॥
सागरें लंघिली । निजसीमा ५१
वायूचें वहाणें । सूर्य प्रकाशणें ॥
बाणप्रभावानें । बंद झालें २५२

भूतमात्र त्रस्त । होउनी समस्त ॥
प्राणार्थी धांवत । दाही दिशा २५३
श्रेष्ठ ऋषीगण । जमुनी संपूर्ण ॥
जगाचें कल्याण । वांच्छीताती ५४
महात्मा लक्ष्मण । बाण तो मंत्रून ॥
वचन निर्वाण । त्यासी वदे ५५
म्हणे, " एकबाणी । आणि एकपत्नी ॥
राम त्रिभुवनीं । जरी नांदे ५६
श्रीरामाविषयीं । प्रेम माझे ठायीं ॥
अवाच्य हृदयीं । असे जरी ५७
तरी त्वां जाऊन । इंद्रजितप्राण ॥
घेऊनी फिरून । परतावें " ५८
कोटि सूर्यांहुनी । तेज उसळे गगनीं ॥
बाण चापाहूनी । चालू झाला ५९
आकाश पाताळ । पिळुनी सकळ ॥
बाण तो प्रबळ । धांवतसे ६०
तेजानें सगळे । नेत्र दीपावले ॥
मूर्च्छितही झाले । कितीएक ६१
इंद्रजीतें अपुली । छाती ताठ केली ॥
दृष्टी रोखीयेली । बाणावर ६२
बाण धडधडत । घुसतां छातींत ॥
इंद्रजीत पडत । भूमीवरी ! ६३
शिर उसळूनी । पडतां धरणीं ॥
झालिलें कपींनीं । आनंदानें ६४
आनंदगजर । करिताती सुर ॥
नादित अंबर । सर्व होय ६५
गंधर्व गाताती । अप्सरा नाचती ॥
दुंदुभी वाजती । स्वर्गावर २६६

पुष्पांचा वर्षाव । शिरावरी सर्व
करिती अपूर्व । लक्ष्मणाच्या २६७
लक्ष्मणा देऊन । घट्ट आलिंगन ॥
वीर हनुमान । नाचतसे ६८
कपीहि गर्जती । उंच उड्या घेती ॥
सर्वांचि लोटिती । एकमेकां ६९
कोणी वीर धीट । शिर धरुनी नीट ॥
एकमेकां भेट । देती त्याची ७०
इंद्रजीतशिर । देखतां समोर ॥
अजुनी वानर । धाक घेती ! ७१
यावरी लक्ष्मण । रक्तानें माखून ॥
श्रीरामदर्शन । घेऊं जाय ७२
घट्ट आलिंगीला । बंधुराज भोळा ॥
प्रेमें कुरवाळीला । श्रीरामानें ७३
इंद्रजीतशिर । देखतां समोर ॥
राजा रघुवीर । संतोषला ७४
वीरां धन्यवाद । देऊनी सानंद ॥
श्रीराम अगद । आणूं सांगे ७५
सुषेणें आपण । औषध लावून ॥
वीर क्षतहीन । सर्व केले ७६
आनंदुनी थोर । करिती वानर ॥
जयजयकार । लक्ष्मणाचा ७७

## महासती सुलोचना

पतीविजयदाना । सती सुलोचना ॥
आज शिवार्चना । करितां दिसे ७८
शुभ्र वस्त्र ल्याली । भूषणें त्यजिली ॥
व्रतस्थ बैसली । सती आज २७९
समोर शंभूची । पिंडी स्फटिकाची ॥

नजर सतीची । वेधीतसे २८०
फुलें सुवासिक । हारीनें एकेक ॥
लाविलीं सुरेख । पिंडीवरी ८१
बिल्वदळें थोर । पवित्र सुंदर ॥
शिवपिंडीवर । शोभताती ८२
धूप जळताती । दीप तेवताती ॥
पिंडीचे भोंवतीं । मनोहर ८३
सती सुलोचना । शिवरूपध्याना
आज यत्न नाना । करीतसे ८४
पूजाद्रव्यें थोर । हार मनोहर ॥
लावी वारंवार । परतोनी ८५
पुनःपुनः वात । सारूनी दिव्यांत ।
सती यत्न करित । ध्यानासाठीं ८६
परी इंद्रजीतां । मानस गुंततां ॥
शंभुदेव चित्ता । कैसा यावा ? ८७
इंद्रजितीं मन । लागतां संपूर्ण ॥
शिवरूपध्यान । कैसें व्हावें ? ८८
मग शंभु त्यजुनी । इंद्रजितध्यानीं
सुलोचना रमणी । गुंग झाली ८९
इंद्रजितरूप । घोर त्याचें तप ॥
सती ती निष्पाप । स्मरतसे ९०
पराक्रम थोर । आवेश दुर्धर ॥
सती वारंवार । स्मरे त्याचा ९१
दिव्यास्त्रांचें ज्ञान । मायासंपादन ॥
सती साभिमान । त्याचें स्मरे ९२
परी या सर्वांत । ' धर्म ' न दिसत
हेंहि सतीचित्त । विसरेना ! २९३
आपल्या पतीस । सीताछळदोष ॥

यावा हें सतीस । आवडेना २९४
तिनें यापूर्वीही । सीतेच्याविषयीं ॥
योग्य सल्ला कांहीं । दिला होता ९५
परी मतिभ्रष्ट । इंद्रजित दुष्ट ॥
बोध तिचा स्पष्ट । ऐकेचना ९६
परी या सर्वांचा । शेवट दुःखाचा ॥
होय हा सतीचा । भाव नाहीं ९७
तिला वाटे " नाथ । पूर्ण पराभूत ॥
होतील रणांत । फार तरी ९८
श्रीराम येईल । जानकी जिंकील ॥
युद्ध हें संपेल " । वाटे तिला ९९
विचार हा करुनी । बैसतां ती ध्यानीं ॥
शिवरूप मनीं । येईचना ! ४००
अत्यंत उदास । बनलें मानस ॥
कारण तियेस । कळेचना १
लक्ष तें कोठेंही । लागेना मुळींही ॥
धडकी हृदयीं । भरतसे २
कंठीं गहींवर । लोटे अनावर ॥
चिंब झाला पदर । भिजूनियां ३
अशा या स्थितींत । असतां ती तेथ ॥
डोळा तो लागत । अर्धवट ४
तपस्वीकुमार । एक धनुर्धर ॥
आपुल्यासमोर । सती देखे ५
क्रोधें खवळला । कुमार तापला ॥
पाश धरियेला । हातांमध्यें ६
घालुनी कंठांत । पाश इंद्रजित ॥
फरफरां ओढीत । भूमीवरी ! ३०७
दीन बापुडवाणा । इंद्रजित आपणा ॥

वळुनि पुनःपुनः । पहातसे ! ३०८
कृती ही देखिली । सती दचकली ॥
किंकाळी फोडिली । दुःखभरें ९
घाम दरदरूनी । येइ अंगांतूनी ॥
बोबडी वदनीं । वळतसे ! १०
तशीच अबला । धावुनी ते वेळां ॥
भयानें शंभूला । कवटाळी ११
दुःख अनावर । होउनी दुर्धर ॥
लोटे अश्रुपूर । शंभुशिरीं १२
तोंच इतुक्यांत । सतीच्या कानांत ॥
ध्वनी ऐकूं येत । भयंकर ! १३
धाडकन ध्वनी । आदळतां कानीं ॥
सती दचकोनी । उभी राहे ! १४
कांपरें सुटलें । सर्वांगां भरलें ॥
पाय ते थिजले । जागेवरी १५
डोळ्यांपुढें पूर्ण । अंधारी येऊन ॥
मार्ग पुढ्यांतून । दिसेचना १६
परी कशीबशी । घोर दुःखावेशीं ॥
सती अंगणासी । प्राप्त झाली १७
इंद्रजीतहस्त । देखतां पुढ्यांत ॥
सती किंकाळत । कोसळली १८
सख्यांनीं धांवून । पडतां ती दीन ॥
कष्टानें धरून । सांवरीली १९
वारा घालिताती । पाणी थापटीती ॥
कोणी द्रव्यें देती । हुंगावया २०
हळुहळु चेतना । येऊनी गात्रांना ॥
सती सुलोचना । शुद्धी पावे ३२१
हस्त कवटाळूनी । हृदयां धरूनी ॥

धाय मोकलूनी । सती रडे ३२२
स्वपतीचे गुण । मनीं आठवुन ॥
आक्रोशें रुदन । करीतसे २३
क्षणांत कर्माला । क्षणांत देवाला ॥
क्षणांत दैवाला । दोष लावी २४
हांसे एक्या क्षणीं । रडे दुज्या क्षणीं ॥
विह्वल होउनी । सुलोचना २५
सतीशोक घोर । बघुनी अनावर ॥
फत्तरां पाझर । फुटतसे ! २६
अंगणीं सगळे । वृक्ष कष्टी झाले ॥
गाळाया लागले । पर्णफळें ! २७
पशुपक्षी सारे । पाळीव वांसरें ॥
तींहि एकसरें । आक्रंदती ! २८
सख्याहि सकळ । पूर्ण दुःखाकुळ ॥
रडुनी गोंधळ । घालिताती २९
असा हा आकान्त । चालतां गृहांत ।
एक अत्यद्भुत । गोष्ट घडे ३०
हस्त अचेतन । होता तो आपण ॥
हळुहळू स्फुरण । पावूं लागे ! ३१
रडणें थांबलें । सर्वांचे सगळें ॥
हातानें वेधिलें । लक्ष सर्व ३२
हस्त तो ठेवूनी । खालीं सर्वजणां ॥
पाहती दुरुनी । त्याजकडे ३३
हस्तानें अंगुली । मिटुनी ते काळीं ॥
तर्जनी लाविली । आंगठ्यास ३४
डावे बाजूकडुन । आरंभ करून ॥
रेघ ओढी पूर्ण । उजवीकडे ३३५
सख्या त्या चतुर । उमजूनी सत्वर ।

भूर्जपत्र थोर । आणिताती ३३६
लेखणी दऊत । मिळतां हातांत ॥
हात पत्र लिहित । भूर्जावरी ! ३७
" सुलोचने ! दयिते ! । चातुर्यसरिते ! ॥
समरवार्तेतें । ऐक आतां ३८
आज मी कसून । करितां घोर रण ॥
पावलों मरण । लक्ष्मणहस्तें ३९
देह रणांगणीं । शिर रामचरणीं ॥
हस्त हा धाडुनी । दिला तुज ४०
प्रवास संपला । जगांत आपुला ॥
प्रिये ! तूं शोकाला । करूं नको ४१
अशीच त्वरीत । घेउनी हा हात ॥
जाय तूं रणांत । रामाकडे ४२
त्यासी विनवूनी । पत्र हें दावूनी ॥
मस्तक मागूनी । घेई माझें ४३
तुजवीण थोर । झालों मी अधीर ॥
लाडके ! उशीर । लावूं नको ४४
आतां रडूं नको । मनीं भिऊं नको ॥
जाण्या शंकूं नको । रामाकडे ४५
मृत्यूबरोबर । वैराची अखेर ॥
राजा रघुवीर । मानील गे ! " ४६
पत्र हें वाचिलें । हृदयीं धरिलें ॥
सतीनें वंदिलें । आदरानें ४७
स्वपतिसंदेश-। ऐकतां मानस ॥
अत्यंत उल्हास-। युक्त झालें ४८
निरवानिरव । उल्हासें अपूर्व ॥
करुनी सर्वस्व । दान करी ३४९
जाण्या रघुनाथा । रावणाज्ञा मिळतां ॥

हर्ष तिच्या चित्ता । फार वाटे ३५०
तशीच हातांत । घेऊनी तो हात ॥
सुलोचना निघत । रणाकडे ५१
नख जिचें किंचित । सूर्य ना देखत ॥
ती आतां रणांत । चालतसे ! ५२
झेलावया थुंकी । हजारों बटकी ॥
ती आतां एकाकीं । रणीं धांवे ! ५३
पतिप्रेमासाठीं । सती उठाउठी ॥
सर्व सुखगोष्टी । विसरली ५४
रक्तमांसचिखल । तुडवुनी सकळ ॥
पतिशिरकमळ । आणूं जाय ५५
हजारों दुर्धर । दैत्य कपीवीर ॥
नमविती शिर । सतीपुढें ! ५६
सैनिक सगळा । मध्यें दुभंगला ॥
द्यावया सतीला । वाट रणीं ! ५७
सर्वत्रांचे डोळे । सतीसीं लागले ॥
चळों न शकले । क्षणमात्र ५८
कोण ही कोठली । कशाला चालली ॥
पृच्छा न सुचली । कोणासही ५९
तशीच ती थेट । सती महाधीट ॥
राघवांनिकट । पोहोंचली ६०
आदरें वंदून । श्रीरामचरण ॥
पतिशिरदान । सती मागे ६१
नामकार्य अपुलें । सतीनें कथिलें ॥
पत्रही ठेविलें । रामापुढें ६२
पत्रवृत्तकथन । ऐकतां संपूर्ण ॥
कपी खों खों करुन । हांसताती ३६३
म्हणती " ही भावडी । अशिक्षित वेडी ॥

फसविली बापुडी । कोणी तरी ! ३६४
कोणी हें चेटूक । लावुनी निःशंक ॥
ही फसवणूक । केली इची ! ६५
हात हा तों पूर्ण । मृत अचेतन ॥
पत्राचें लेखन । कैसें वडे !" ६६
कोणी म्हणती "ज्यांत । आम्हां न कळत ॥
उठाठेव त्यांत । कशाला ही ? ६७
क्षुद्र घुंघुरडीं । माकडें बापुडीं ॥
कां घ्यावी ही उडी । खोलामध्यें ? ६८
मानितां प्रमाण । सतीचें वचन ॥
आम्हां नुकसान । काय आहे ! ६९
बापुडी पतीचें । शिर नेतां वेंचें ॥
आम्हां वानरांचें । त्यांत काय ?" ७०
विचार करून । भाविक हा पूर्ण ॥
शीघ्र वादांतून । परतले ७१
परी जे आग्रही । होते दुराग्रही ॥
ते हा वाद कांहीं । सोडीतना ! ७२
सुलोचनाप्रश्न । बाजूला ठेवून ॥
वाद घेती, कोण । चमत्कार ! ७३
साधक बाधक । प्रमाणें अनेक ॥
मांडिती एकेक । सर्वांपुढें ७४
अहिल्योद्धारण । कोणी दाखवून ॥
स्वपक्षमंडण । करिताती ७५
विरुद्ध बाजूचे । त्या मायामृगाचें ॥
कृत्य स्वपक्षाचें । सांगताती ७६
शेवटीं जोरांत । वाद होत होत ॥
ठरला सिद्धान्त । एकमतें ३७७
चमत्कार कांहीं । नित्य होत नाहीं ॥

मात्र संतांठायीं । शक्य आहे ३७८
आतां संत कोण ! । सती आहे कीं न ॥
हाच एक प्रश्न । उरे येथें ७९
सतीचें संतत्व । कळण्या अपूर्व ॥
कथिताती सर्व । निजमार्ग ८०
एक म्हणती " हात । राहूं दे हा येथ ॥
पत्र कैसा लिहित । पुन्हा पाहूं ! " ८१
दुजे शंकेखोर । होते जे वानर ॥
त्यांना हा विचार । पटेचना ! ८२
म्हणति " या हातांत । आम्हां न कळत ॥
जादूटोणा गुप्त । असेल कीं ! ८३
छे ! हा मार्ग कांहीं । योग्य मुळीं नाहीं ॥
सिद्ध होत नाहीं । कांहीं यानें ! ! ८४
शिर आम्हांकडचें । हंसवी पतीचें ॥
संतत्व सतीचें । तरी मानूं ! ८५
विचार हा ठरला । सर्वां मानवला ॥
प्रार्थिती प्रभूला । तैशापरी ८६
सतीवाक्याठायीं । शंकाप्रवृत्ती ही ॥
मानवली नाहीं । राघवाला ८७
परी रघुनाथ । फक्त आग्रहार्थ ॥
सती विनवीत । आदरानें ८८
म्हणे " माये ! वचन । तव वृत्तकथन ॥
मी स्वतां संपूर्ण । सत्य मानीं " ८९
तुझें हें सात्त्विक । निष्कपट मुख ॥
बघतां निःशंक । जहालों मीं ९०
परी वानरांना । या वावदूकांना ॥
चमत्कारदाना । द्यावेंस तूं ३९१
प्रेमाचा प्रभाव । जगीं जो अपूर्व ॥

आतां यांना सर्व । कळूंच दे ! ३९२
अपमान कांहीं । यांत माये ! नाहीं ॥
आहेत सर्वही । बंधु तुझे" ९३
बोलुनी हें वचन । श्रीरघुनंदन ॥
देई आश्वासन । सतीलागीं ९४
सती सावचित । नमुनी रघुनाथ ॥
जातसे त्वरीत । शिरापाशीं ९५
शिर अस्ताव्यस्त । देखतां पुढ्यांत ॥
भडभडोनी येत । सतीलागीं ९६
पूर्वआठवणी । हजारों ते क्षणीं ॥
सतीअंतःकरणीं । उसळल्या ९७
परि तो प्रसंग । जाणुनी सवेग ॥
सती करी मग । घट्ट मन ९८
संशयनिवृत्ती । व्हावया पुरती ॥
अघटित कृती । सती दावी ९९
वानरांना पूर्ण । व्हाया समाधान ॥
अपूर्व विंदान । सती योजी ५००
कर्णी सर्वजण । भघतां निक्षून ॥
प्रतिज्ञावचन । सती बोले १
"कायीक वाचीक । जरी मानसीक ॥
पतिपदीं एक- । निष्ठा माझी २
पतिगुण मनीं । पतिरूप स्वप्नीं ॥
अहोरात्र ध्यानीं । जरी माझ्या ३
देह मात्र दोन । परी जरी प्राण ॥
पतीशीं संलग्न । पूर्ण माझे ४
पतिसान्निध्याला । तुळितां भाग्याला ॥
स्वर्ग म्यां मानीला । तुच्छ जरी ४०५
संतती संपत्ति । जरि राज्यप्राप्ती ॥

तरी सेवेपुढतीं । त्याज्य मज ४०६
जप तप दान । मुक्तीचें साधन ॥
जरी पतीवीण । नाहीं मज ७
पतीचे चरण । सर्वस्व मानून ॥
जरी त्यासी प्राण । अर्पिला मी ८
तरी त्या दुष्कर । व्रताची त्रिवार ॥
निर्जीव हें शिर । साक्ष देवो ! ९
तरी ही दुर्धर । आण माझी थोर ॥
त्रिवार त्रिवार । सत्य होवो ! !” १०
सति स्तब्ध झाली ! । वानरमंडळी ॥
पहाया लागली । उत्कंठेनें ११
कोणी आदरानें । कोणी संशयानें ॥
कोणी कुचेष्टेनें । पहाताती ! १२
तोंच इतुक्यांत । अत्यंत अद्भुत ॥
चमत्कार तेथ । घडतसे ! १३
सतीनें स्वतेज । दावुनी सहज ॥
सृष्टिक्रम आज । फिरवीला ! १४
सृष्टिसूत्र गुप्त । अज्ञेय अनंत ॥
सतीहांक तेथ । पोहोंचली ! १५
सृष्टीचें जें मूळ । दावी विश्वखेळ ।
संवेदनाकुळ । तेंहि झालें ! १६
तेथूनी चालना । मिळतां सर्वांना ।
अतर्क्य घटना । घडतसे ! १७
इंद्रजितप्राण । गेले जे निघून ॥
आले परतून । साक्ष द्याया ! १८
पंचभूतं झालीं । जीं निरनिराळीं ॥
तीं पुन्हा जुळलीं । सतीसाह्या ! ४१९
बघतां बघतां । सर्वांच्या देखतां ॥

शिर सजीवता । दावूं लागे ! ४२०
चलन वलन । रक्ताभिसरण ॥
शिरांशिरांतून । चालूं झालें २१
हळुहळूं डोळे । शिरें उघडीले ॥
सक्रोध लाविले । कपींकडे ! २२
घोर युद्धावेश । पूर्वींच्यासरस ॥
प्रत्यक्ष शिरास । दिसे आज ! २३
क्रुद्ध भयंकर । इंद्रजितशिर ॥
बघतां वानर । गडबडले ! २४
भीषण आकृती । पहातां पुढतीं ॥
कपी थरारती । मनामध्यें ! २५
खळबळ उडाली । सेनेंत सगळी ॥
जो तो हात घाली । शस्त्राकडे ! २६
बलाढ्य दुर्धर । सेनापती थोर ॥
तोहि चिंतातुर । मनीं झाले २७
म्हणती " कोठून । प्राप्त झालें विघ्न ॥
काय होष्यमाण । घडे आतां ! " २८
कपी चिंताग्रस्त । मात्र रघुनाथ ॥
पूर्ण शांतचित्त । दिसतसे २९
स्वस्थ व्हावयाला । धैर्य धरायाला ॥
संकेत सर्वांला । करीतसे ३०
तों शिरें आपुले । नेत्र वळवीले ॥
सप्रेम लाविले । सतीकडे ! ३१
स्वशत्रूपुढतीं । जाऊनी मागुती ॥
शुद्धभावें सती । शिर देखे ३२
तत्काल प्रसन्न । शिर तें होऊन ॥
सुहास्यवदन । शोभूं लागे ! ! ४३३
क्रोध हरपला ! । वैरभाव गेला ॥

प्रेमभाव आला । शिराठायीं ४३४
कंठ सद्गदित । होऊनी अत्यंत ॥
शिर सावचित । हालूं लागे ! ३५
सतिवाक्या साक्ष । द्यावया प्रत्यक्ष ॥
शिर तें समक्ष । डोलूं लागे ! ! ३६
एकदोनवार । इंद्रजितशिर ॥
निःशंक त्रिवार । थरारलें ! ३७
आणखी मागुती । अचेतना स्थिती ॥
पावूनीयां क्षितीं । ढांसळलें ! ३८
चमत्कार झाला । सर्वांनीं पाहिला ! ॥
संशय नुरला । कोणासहि ३९
पूर्वी ना देखीलें । कोणी न ऐकीलें ॥
तें आजि दिसलें । सर्वत्रांना ४०
तत्काळ गंभीर । जय शब्द थोर ॥
उठला सत्वर । सैन्यांतुनी ! ४१
" धन्य ! धन्य ! सती । धन्य ! तिची ख्याती "॥
वानर गर्जती । एकसरें ४२।
"आश्चर्य ! आश्चर्य ! । अत्यद्भुत कार्य !"
कपी सविस्मय । उद्गारती ४३
आनंदें नाचती । धन्यवाद देती ॥
लोटांगणें घेती ! । सतीपायीं ४४
रामहि चित्तांत । अति सद्गदीत ॥
सतीलागीं देत । धन्यवाद ! ४५
सतीसन्मानार्थ । आज रघुनाथ ॥
युद्ध थांबवीत । सर्वांठायीं ४६
" आजच्या या दिनीं । निर्वैर होऊनी ।
रहावें सर्वांनीं" । राम बोले ४४७
तत्काळ सगळे । वानर ते वेळे ॥

निःशस्त्र जाहले । रामाज्ञेनें ४४८
क्रोध आवरूनी । कपी वीरमणी ॥
सतीगुणगानीं । दंग झाले ४९
वार्ता ही ऐकिली । रावणें जे वेळीं ॥
त्यानेंही वारिली । दैत्यसेना ५०
मग दैत्यवीर । आनंदानें थोर ॥
कपींत सत्वर । मिसळले ५१
अहिनकुलांपरी । वैर ज्या अंतरीं ॥
त्या दैत्यवानरीं । सख्य झालें !! ५२
काय हो ! अद्भुत । हें सतीचरित ॥
शत्रु झाले आप्त । क्षणामध्यें ! ५३
सतीप्रेमयष्टी । फिरतां निकटीं ॥
सर्व वैरगोष्टी । मावळल्या ५४
रथखडखडाट । शस्त्रखणखणाट ॥
बंद झाला स्पष्ट । क्षणामध्यें ५५
उल्हाटयंत्रांचा । वृक्षपाषाणांचा ॥
वर्षाव बाणांचा । ऐकूं येना ५६
'घे घे मार !' थोर । आरोळ्या भेसूर ॥
दीन आर्तस्वर । बंद झाले ५७
रक्ताचे ते पाट । धुळीचा तो लोट ॥
क्षणार्धांत स्पष्ट । शांत झाला ! ५८
प्रशांत होऊन । सर्व वातावरण ॥
दिव्य प्रेमपूर्ण । दिसतसे ५९
प्रेमाच्याच भेटी । सुखाच्याच गोष्टी ॥
सर्वत्र निकटीं । ऐकूं येती ६०
युद्धासी सगळे । वीर जे जमले ॥
ते सांगूं लागले । गूजगोष्टी ! ४६१
उद्यांच जी मान । टाकावी तोडून ॥

ती आतां प्रसन्न । डोलतसे ! ४६२
ज्यांच जें शिर । उडवावें वर ॥
तेंचि प्रेमें वीर । हुंगिताती ! ६३
ज्यां ज्या छातींत । करावा आघात ॥
वीर आलिंगीत । आतां तीच ! ६४
ऐसें हें अपूर्व । दिव्य प्रेमपर्व ॥
टिके अभिनव । अर्धादिन ६५
सायंकाळ होतां । सुलोचना आतां ॥
सहगमनार्थी । सिद्ध झाली ६६
सर्व लंकाजन । दुःखशोकपूर्ण ॥
सतीचें दर्शन । घ्याया आले ६७
गर्दी एक झाली । रणांत सगळी ॥
सतीसी ते काळीं । पहावया ६८
आकाशांत तर । सुरांचे संभार ॥
लोटले त्या पार । नाहीं मुळीं ! ६९
स्वर्गीय ललना । जोडुनी वाद्यांना ॥
सतीयशगाना । सिद्ध झाल्या ७०
गंधर्व चारण । किन्नरांचे गण ॥
सतीचें दर्शन । घेण्या आले ७१
सिद्ध योगेश्वर । ऋषी थोर थोर ॥
पातले सत्वर । सतिस्थळीं ७२
युद्धवेष सगळा । त्यागूनी आपुला ॥
रावणहि आला । सतिस्थानीं ७३
अत्यंत विषण्ण । मनानें आपण ॥
स्फुंदतां रावण । दिसे आज ! ७४
रावणाचे पाठीं । सतीभेटीसाठीं ॥
आले उठाउठी । मंत्री सर्व ४७५
क्षणांत सगळा । वीर दुभंगला ॥

सिद्ध मध्यें केला । चितानल ४७६
काष्ठें सौगंधिक । रचुनी अनेक ॥
चिता समंत्रक । सिद्ध केली ७७
मृत इंद्रजित । वाद्यगजरांत ॥
ठेवीला त्वरीत । चितेवरी ७८
मंत्राग्नी पेटला । प्रज्वलीत झाला ॥
ज्वाला गगनाला । भेदूं जाती ७९
सुहास्यवदना । सती सुलोचना ॥
ये सहगमना । करावया ८०
अत्यंत भीषण । पेटला कृशान ॥
सती सुप्रसन्न । तेथें आली ८१
शुभ्र वस्त्रें ल्याली । भूषणें त्यजिलीं ॥
सती गुंग झाली । पतिध्यानीं ८२
शुद्ध सत्त्वमूर्ती । प्रत्यक्ष विरक्ती ॥
आत्मयज्ञज्योती । सती दिसे ८३
ही प्रेमदेवता । सतीरूपें आतां ॥
प्रत्यक्ष जगता । आली वाटे ८४
अत्युच्च उदात्त । वृत्ति ज्या जगांत ॥
सतींत साक्षात । दिसती त्या ८५
कथाकथांतरीं । पतिव्रता नारी ॥
त्यांहुनीहि थोरी । सत्य इची ! ८६
अपूर्व तत्त्वांस । योजुनी द्रव्यांस ॥
ओती इची मूस । विधी वाटे ! ८७
भाग्य त्या लंकेचें । लंकासुंदरींचें ॥
सान्निध्य सतीचें । तेंच घडे ८८
असंख्य सुंदरी । लंकापुरनारी ॥
ओंवाळीती हारी । सतीलागीं ४८९
अखंड वायनें । सौभाग्यभूषणें ॥

सतीसी हारीनें । अर्पितातीं ५९०
कोणी भाव चित्तीं । धरूनी एकान्तीं ॥
नवस बोलती । आपापले ९१
पुत्र वांझोट्यांना । आयुष्य बाळांना ॥
आरोग्य रोग्यांना । मागतातीं ९२
विजय पतींना । सौभाग्य आपणा ॥
मागतातीं नाना-। प्रकारांनीं ! ९३
सती सुलोचना । निरोपूनी त्यांना ॥
चिताप्रदक्षिणा । करूं लागे ९४
ऋद्धि सिद्धी मुक्ती । योगबलप्राप्ती ॥
बोळंगणें घेती । सतीपायीं ! ९५
प्रत्येक पदाला । प्रति पदार्थाला ॥
सुयशफलाला । सती लाधे ! ! ९६
प्रदक्षिणा होतां । सतीची ती आतां ॥
लोटला समस्तां । गहींवर ! ९७
दुरात्मा दुर्मती । दुष्ट पापमूर्ती ॥
रावणही चित्तीं । गहींवरला ! ९८
सती मंदोदरी । वृद्धलंकानारी ।
त्याही एकसरी । आक्रंदती ९९
कल्लोळ उडाला । सेनेंत सगळा ।
अश्रु ढळढळां । गाळीतातीं ६००
म्हणती " हें निधान । पृथ्वीचें भूषण ॥
आम्हांला सोडून । आतें कीं हो ! १
आत्मसंतर्पण । असें हें कठीण ॥
पुन्हां कधींही न । देखों आम्हीं ! " २
ऐसे हे उद्गार । काढूनीयां वीर ॥
हळहळती फार । सतीसाठीं ६०३
सती सुलोचना । संबोधूनी जना ॥

आतां सहगमना । करूं पाहे ६०४
श्रीराम-रावण । ससैन्य वंदून ॥
निर्वाणवचन । सती बोले ५
म्हणे, " मी सासुरां । जातें माझ्या घरा ।
लोभ आतां पुरा । असों द्यावा ! ६
कठीण वचन । कधीं दुर्भाषण ॥
केलें मीं चुकून । क्षमा करा ! ७
उदार सदय । तुम्ही बाप माय ॥
कन्येचा अन्याय । पोटीं घाला ! ८
जीवित मानून । स्वधर्माचरण ॥
राहिल्यें जपून । आजवरी ९
सर्व धर्म कर्म । पतीच परम ॥
मानूनीयां जन्म । घालवीला १०
इच्छा हीच आतां । शिवसायुज्यता ॥
मिळूनी मागुता । जन्म नको ! ११
हे पहा तांतडी । प्रति घडोघडी ॥
लाविती निकडी । शिवदूत १२
ही पहा ! भेटाया । इंद्रजीतकाया ॥
उत्सुक नेत्रीं या । दिसे मज १३
आतां लवलाहीं । जाणें मज बाई ! ॥
उशीर क्षणही । आतां नको १४
वीरांनो ! शूरांनो ! । रामरावणांनो ! ॥
शस्त्रास्त्रधाऱ्यांनो ! । ऐका आतां ! १५
झगडा ! झगडा ! । नेटानें झगडा ! ॥
यशाचा निवाडा । लावावया १६
रक्ताचे ते पूर । वाहूं द्याच स्वैर ॥
मदाढ्यता थोर । जंव आहे ! ६१७
जळणारें चित्त । वळणारे हात ॥

थैमान घालोत । स्वैरगती ! ६१८
परि हें भाषण । निश्चयवचन ॥
हृदयीं जपून । ठेवा माझें ! १९
विजयाचें मूळ । धर्मचि केवळ ॥
आणीक ते फोल । सर्व गुण ! २०
धर्म तेथें जय । धर्म तेथें जय ॥
येविषयीं संशय । नाहीं नाहीं ! ” २१
क्षणही जों न गेला । नेत्रही न लवला ॥
सतीदेह झाला । अंतर्धान ! २२
फक्त एक क्षण । जडत्वलक्षण ॥
भस्मसात पूर्ण । देह झाला २३
फक्त एक क्षण । अज्ञान लोपून ॥
ज्ञानसूर्य पूर्ण । प्रगटला २४
फक्त एक क्षण । संसृतिबंधन ॥
तुटुनी शिवमग्न । सती झाली २५
फक्त एक क्षण । अशाश्वतांतून ॥
शाश्वतीं गमन । सती करी ! २६
क्रोध अनिवार । दुर्मद मत्सर ॥
क्षणांत साचार । निवटीला २७
झेंडा विजयाचा । अत्युग्र तपाचा ॥
लागला सतीचा । क्षणार्धांत ! २८
तोंच चितेंतून । प्रत्यक्ष कृशान ॥
सतीला घेऊन । प्रगटला ! २९
बनुनी दिव्यदेह । निजपतीसह ॥
सती निःसंदेह । प्रगटली ! ३०
धांदल उडाली ! । शिवगणां सगळीं ॥
विमान जवळी । आणावया ६३१
वीर इंद्रजीत । सुलोचनेसहित ॥

दिव्य विमानांत । आरूढला ६३२
जय शब्द थोर । अत्यंत गंभीर ॥
उठला सत्वर । नभांतुनी ! ३३
हजारों हजार । स्वर्गवीणे थोर ॥
लागले सुस्वर । वाजावया ३४
पुष्पांचा वर्षाव । दिव्य अभीनव ॥
होतसे अपूर्व । दोघांवरी ! ३५
गंधर्व चारण । करिती गायन ॥
अप्सरा नर्तन । करिताती ! ३६
दिव्य देवांगना । दिव्य पात्रें नाना ॥
घेऊनी दोघांना । ओंवाळीती ! ३७
अशा या मानांत । वीर इंद्रजित ॥
जाय पत्नीसहित । शिवपदीं ३८
सुरासुर सगळे । प्रेक्षक जमले ॥
तेही परतले । स्वस्थानासी ३९
लंकायुद्धस्थानीं । आज वीरमणी ॥
उदास स्वमनीं । दिसताती ४०
आज रात्रभरी । सतीनामगजरीं ॥
कोणा तिळभरी । झोंप नाहीं ४१
सतीचे सद्गुण । पुनश्च स्मरून ॥
सद्गदीतमन । सर्व होती ४२
सती काय बोले । सती कैशी चाले
हें सर्वां लागलें । ध्यान आज ! ४३
सतीचे उद्गार । स्मरुनी वारंवार ॥
चिंतनांत चूर । सर्व होती ४४
उदात्त अत्यंत । हें सतीचरीत ॥
ऐकावें अभ्रांत । मनानेंच ! ६४५
दिव्य सतीरूप । पवित्र निष्पाप ॥

पहावें अकल्प । मनानेंच ६४६
सतीवृत्तमेवा । मनानें हा घ्यावा ॥
चाखावा सेवावा । मनानेंच ४७
येथें संशयाचें । वादविवादाचें ॥
तर्ककुतर्कांचें । काम नाहीं ! ४८
भाविक प्रेमळ । मनाचा हा खेळ ॥
वादाचा विटाळ । याला नको ! ४९
विवाद वितंड । कुतर्क पाखांड ॥
यां सर्वांचें तोंड । काळें होवो ! ! ५०
धन्य ! हे भारती । धन्य ! आर्यजाती ॥
ही आर्यसंस्कृती । धन्य ! धन्य ! ५१
धन्य ! आर्यबाला । शुद्ध सत्त्वशीला ॥
कोमला प्रेमळा । धन्य ! धन्य ! ५२
पवित्र परम । सुलोचनेसम ॥
आमुचे प्रणाम । असो त्यांना ५३

## रावणपर्व

भानु उगवला ! । दिन बदलला ॥
रंग पालटला । युद्धस्थळीं ५४
सतीप्रेमपटल । जातांच सकळ ॥
वृत्तीही समूळ । पालटल्या ! ५५
प्रेमाच्या त्या भेटी । सुखाच्या त्या गोष्टी ।
सर्व उठाउठीं । बंद झाल्या ! ५६
दिव्य भ्रातृभाव । प्रेमळ स्वभाव ॥
मावळले सर्व । क्षणाधात ५७
संपूर्ण लोपून । शुद्ध सत्त्वगुण ॥
तामसथैमान । चालू झालें ! ५८
पुन्हां तो द्वेषाग्नी । प्रगट होऊनी ॥
भडकला मनीं । सर्वत्रांच्या ६५९

सूडाची लालसा । विजयाची आशा ॥
सर्वांच्या मानसा । पुन्हां लागे ६६०
पुन्हां घनघोर । कराया समर ॥
राक्षस वानर । सिद्ध झाले ६१
पुन्हां देवघेव । प्राणांची अपूर्व ॥
करूं जाती सर्व । आवेशानें ६२
स्थान आपापलें । रोखूनी बैसले ॥
वानर सगळे । रामाज्ञेनें ६३
राक्षसही सगळे । परतोनी गेले ॥
जुळोनी ठाकले । युद्धासाठीं ! ६४
आज घनघोर । अति भयंकर ॥
संग्राम दुर्धर । होय वाटे ६५
पुत्रशोकतप्त । क्रुद्ध लंकानाथ ॥
करील कल्पान्त । वाटे आज ६६
वाटे प्रळयाग्नी । पेटतां हा रणीं ॥
जाळील मेदिनी । क्षणार्धांत ६७
अस्त्रज्ञान पूर्ण । दावूनी रावण ॥
करील निर्वाण । रणीं आज ६८
हा पहा लंकेंत । रावणाचा रथ ॥
लागला मार्गांत । दिसायाला ६९
भाट बंदीजन । मिळूनी संपूर्ण ॥
रावणस्तवन । करिताती ७०
हे पहा ब्राह्मण । उच्चस्वरपूर्ण ॥
देती आशीर्वचन । रावणाला ७१
मंत्राक्षता थोर । पुष्पांचे संभार ॥
झांकिताती शिर । रावणाचें ७२
या पहा बाजूनीं । लंकासुवासिनी ॥
रावणा हारींनीं । ओंवाळीती ६७३

गीतें सुमंगळ । स्फूर्तिद सकळ ॥
हीं पहा ! प्रेमळ । चालू झालीं ६७४
हा ऐका गंभीर । जयशब्द थोर ॥
उठला सत्वर । सेनेंतूनी ७५
'विजयी हो रावणा !' । 'विजयी हो रावणा !'॥
या पहा गर्जना । ऐकूं येती ७६
बाल वृद्ध तरुण । एकाग्र होऊन ॥
हे पहा रावण । न्याहाळीती ! ७७
स्वजनांची प्रीति । पाहुनीयां अती ॥
राजा लंकापती । गहींवरला ७८
थांबवूनी रथ । मग लंकानाथ ॥
स्वजना किंचित । बोलूं इच्छी ७९
महात्मा रावण । चित्त कवळून ॥
लोकां उद्देशून । बोलूं लागे ८०
क्षणांत तत्काळ । सर्व कोलाहल ॥
लोकांचा प्रेमळ । बंद झाला ! ८१
सर्वत्रांचे डोळे । रावणीं लागले ॥
चळों न शकले । लेशमात्र ८२
उत्कंठीत मन । करूनीयां जन ॥
रावणवचन । आयकती ८३
रावण सम्राट । वाणीनें उद्भट ॥
घडघडां स्पष्ट । बोलूं लागे ८४

## रावणाचें सैनिकांना प्रोत्साहन

"मित्रहो ! शत्रूंनीं । जें जें केलें रणीं ॥
तें तुम्हीं सर्वांनीं । पाहिलेंच ८५
कसा सत्यानास । झाला या लंकेस ॥
सांगणें तुम्हांस । नको तोंहि ६८६
मित्र बंधु आप्त । तुमचे रणांत ॥

तुम्हांच देखत । नष्ट झाले ६८७
आतां कोठें कांहीं । सौख्याचा लेशही ॥
उरला तो नाहीं । आम्हांपुढें ८८
तेव्हां सोक्षमोक्ष । काय तो समक्ष ॥
लावाया प्रत्यक्ष । चाललों मी ८९
आतां तुम्ही आम्ही । भेटूं किंवा नाहीं ॥
कोणाला हें कांहीं । सांगवेना ९०
रणकुंडावरती । कोणाची आहुती ॥
केव्हां पडेल ती । कळेचना ९१
तरी या समयीं । तुम्हां शब्द कांहीं ॥
बोलावें हें घेई । मन माझें ९२
अत्यंत उद्विग्न । व्यग्र माझें मन ॥
विशेष बोलेन । ऐसें नाहीं ९३
परी जिव्हाळ्याचे । हे चार प्रेमाचे ॥
शब्द शेवटचे । ऐका माझे ९४
पुढें होवो कांहीं । जा रहा कोठेंही ॥
परी हें क्षणही । विसरूं नका ९५
सुमालीचे वेळीं । लंका ही सगळी ॥
राक्षसां दिधली । विधात्यानें ९६
अमित वत्सर । राक्षसांनीं थोर ॥
पुरी ही सुंदर । रक्षीयेली ९७
सर्व त्रैलोक्यांत । धरी त्यांचा हात ॥
नव्हता दिसत । कोणी ऐसा ९८
यक्ष वा गंधर्व । सुरासुर सर्व ॥
झाले हतगर्व । त्यांचेपुढें ९९
त्यांची पायधूळी । दिसतां तत्काळीं ॥
होय पळापळी । त्रैलोक्याला ! ७००
पुढें काळ फिरला ! । विष्णुविक्रमाला ॥

भिउनी रसातळा । दैत्य गेले ७०१
सुरम्य सुंदर । हें लंकानगर ॥
व्यापीलें समग्र । यक्षांनीं त्या २
राक्षसांचीं स्थानें । रम्य उपवनें ॥
यक्ष ते गर्वानें । भोगूं जाती ३
राक्षसांना मान । सर्व लंकेंतून ॥
कोठें तिळही न । राहीयेला ४
शत्रूंना त्रिकाळीं । सेवावें हें भाळीं ॥
लिहिलें ते काळीं । त्यांच्या वाटे ५
मान तो शत्रूंना । यशही तयांना ॥
कष्ट मात्र नाना । राक्षसांसी ६
सत्ता वा संपत्ती । सर्व शत्रूहातीं ॥
राक्षसांना चित्तीं । जळफळाट ! ७
आजोबा सुमाली । वीर आतुर्बळी ॥
स्थिति त्यांना झाली । दुःसह ही ८
मी मोठा अमळ । होतांच तत्काळ ॥
कथिलें सकळ । त्यांनीं मज ९
राक्षसां सुस्थिती । आणावी हें अंतीं ॥
ठसवीलें चित्तीं । त्यांनीं माझ्या १०
सोडूनी तत्काळ । बाल्यांतील खेळ ॥
वनासी विकळ । पातलों मी ! ११
झिजवूनी शरीर । अत्यंत दुर्धर ॥
तपश्चर्या घोर । केली तेथें १२
हजारों वर्षांनीं । बहुत कष्टांनीं ॥
देव शूलपाणी । वश झाला १३
सुरम्य सुंदर । शिवमूर्ति थोर ॥
मज ' माग वर ' । ऐसें बोले ७१४
राक्षस हो ! मुक्ती । मागतों तरी ती ॥

क्षणांत मिळती । तेव्हां मज ! ७१५
ब्रह्म्याच्या पदास । मागतो स्वतांस ॥
तरी तेंही खास । मिळतें मज ! १६
परि नाहीं ! नाहीं ! । दैत्यांची दैना ही ॥
मजला नेत्रांहीं । पहावेना ! १७
दैत्यांच्या हितार्थ । कळवळूनी चित्त ॥
स्वहितासी लाथ । मारिली मीं ! १८
कष्टें बहुवस । जोडिल्या तपास ॥
दैत्यांच्या कार्यास । वेंचियेलें ! १९
'दैत्यशत्रूंवरती । जय दे निश्चितीं' ॥
हेंचि शंभूप्रती । प्रार्थिलें मीं २०
'दैत्यशत्रूपाशीं । अभय दे मशीं' ॥
हेंचि मीं शंभूसी । विनवीलें ! २१
पुढें वरदान । हातीं येतां पूर्ण ॥
हें लंकाभुवन । जिंकीलें मीं २२
लंकानगरीस । लंकेच्या राज्यास ॥
पुन्हां दैत्यवंश । चालू झाला २३
लंकापुरवतीं । सुरम्यस्थानें तीं ॥
राक्षसांच्या हातीं । पुन्हां आलीं २४
स्वराजा लाधला । सुराज्याचा भला ॥
लाभ पुन्हां झाला । राक्षसांना २५
आनंदी आनंद । सर्वत्र आनंद ॥
होय या सुखद । प्रसंगानें २६
मी मात्र हें पूर्ण । सार्थक मानून ॥
स्वस्थ क्षणही न । चित्तीं झालों ! २७
साम्राज्य दैत्यांचें । जगीं स्थापायाचें ॥
हीच इच्छा नाचे । माझ्या मनीं ! ७२८
दैत्यांच्या तंत्रानें । जगानें वागणें ॥

हीच इच्छा मनें । केली माझ्या ! ७२९
दैत्याज्ञेवांचून । जगीं एक पान ॥
कधीं हलावें न । मला वाटे ! ३०
पुढें या कार्यांत । सिद्धी व्हाया प्राप्त ॥
प्राण संकटांत । लोटिले मीं ३१
स्वर्मृत्युपाताळ । धुंडूनी सकळ ॥
जिंकीले समूळ । तिन्ही लोक ३२
महेंद्र वरुण । कुबेर भास्वान ॥
सर्व ते शरण । मला आले ३३
इतर काय कथा । खुद्द वैवस्वता ॥
रणांत मी स्वतां । लोळवीलें ! ! ३४
लोळलोळवीले । घोळघोळवीले ॥
रडरडवीलें । त्रैलोक्य मीं ! ३५
परी हे विजय । अत्यद्भुत कार्य ॥
केले मी निर्भय । दैत्यांसाठीं ! ३६
जगताशीं वैर । अति हानिकर ॥
बांधिलें मी स्वैर । दैत्यासाठीं ! ३७
पुण्यपाप कांहीं । केलें मीं कोठेंही ॥
तें सर्व सर्वही । दैत्यांसाठीं ! ! ३८
वृद्धांनो ! बालांनो !। तरुण वीरांनो ! ॥
दैत्य सैनिकांनो !। तुम्हांसाठीं ! ! ३९
लंकादेवतांनो !। लंकेच्या दुर्गांनो ! ॥
वृक्षपाषाणांनो !। तुम्हांसाठीं !!! ४०
चला तर मग । वीर हो ! सवेग ॥
स्वशत्रूचा मार्ग । रोधावया ! ४१
मरूं तर लागूं । शिवपदीं लागूं ॥
जिंकूं तर भोगूं । राज्यभोग ७४२
प्रत्यक्ष संप्रती । विष्णु पक्षपाती ॥

आलासे युद्धार्थी । जाणीतों मी ७४३
येऊं द्या येऊं द्या । विष्णु हा येऊं द्या ॥
जिष्णुही येऊं द्या । वाटे तरी ! ४४
प्रत्यक्ष कृतान्त । असतां मीं येथ ॥
कोणाला किंचित । भीत नाहीं ! ४५
इंद्रजित गेला । प्रहस्त निमाला ॥
आतां तो उरला । पाश काय ? ४६
गेले सर्व बंधु । तोडूनी संबंधु ॥
आतां आशाबिंदु । कोठें आहे ? ४७
जगणें वा मरणें । जिंकणें वा हरणें ॥
हेंचि तों करणें । आजि मज ४८
अति भयंकर । आजि मी दुर्धर ॥
करीन समर । शंका नको ४९
शस्त्रास्त्रांचें ज्ञान । दावूनी संपूर्ण ॥
शत्रु मी जाळीन । तृणवत ५०
पूर्वी झाली नाहीं । पुन्हां होणें नाहीं ॥
ऐशी रणघाई । उडवीन मी ५१
मात्र राक्षसांनीं । प्रेक्षक बनूनी ॥
यावें रणांगणीं । मजसवें ! ! ५२
जरी थोडा फार । पूर्वी उपकार ॥
झाला तुम्हांवर । माझ्या हस्तें ५३
कर्तव्य म्हणून । तुमचें रक्षण ॥
केलें जरी पूर्ण । आजवरी ५४
जरी तुम्हांसाठीं । तुमच्या मुलांसाठीं ॥
प्राणही संकटीं । लोटिले मीं ५५
तरी सर्वत्रांनीं । एकत्र मिळूनी ॥
यावें रणांगणीं । मजसवें ७५६
तरी लंकेतून । प्रत्येक जवान ॥

येऊं दे धांवून । रणांगणीं ! ! ” ७५७
दुःखानें भरला । रावणाचा गळा ॥
निवांत राहीला । क्षणभरी ५८
राक्षसहि सगळे । दुःखानें दाटले ॥
गाळाया लागले । उष्ण अश्रु ! ५९
रावण प्रेमळ । बापचि केवळ ॥
वाटला सकळ । राक्षसांना ६०
म्हणति, “ लंकानाथा ! । प्रसंगीं या आतां ॥
अशी दीन वार्ता । बोलूं नको ! ६१
तुझे आम्ही दास । तुझ्याच कार्यास ॥
वेंचूं स्वप्राणास । तुझे पायीं ६२
आज्ञेचा उशीर । तत्काळ हें शीर ॥
घेऊं हातावर । तुझ्यासाठीं ६३
बिंदुमात्र रक्त । असे तोंपर्यंत ॥
झगडूं खचित । तवाज्ञेनें ६४
पाप पुण्य कांहीं । न्याय अन्यायही ॥
आम्हां ठावा नाहीं । तुझेवीण ६५
सुख स्वर्गाधिक । वा घोर नरक ॥
आम्हां दोन्ही एक । तुजसवें ! ६६
राघवाची कथा । कायसी रे ! आतां ॥
क्षणांत सर्वथा । जिंकूं आम्ही ६७
तूं प्रतिकृतान्त । कोपतां रणांत ॥
जग हें क्षणांत । जाळिशील ६८
श्रीराम बापुडें । भरुनी हुडहुडें ॥
पडेल धडपुडें । तुझ्या पायीं ६९
तुझे वज्रबाण । भेदितां दारुण ॥
जाईल मरून । लक्ष्मण तो ! ७७०
इतरांची होळी । आम्ही एकमेळीं ॥

क्षणांत सगळी । करूं राया !" ७७१
रावण हांसला ! । पौरुष कथेला ॥
ऐकुनी तोषला । मनामध्यें ७२
सवेंच मागुती । स्वस्थ पुढतीं ॥
हांकाया सारथी । आज्ञापीत ! ७३
जयजयकारांत । दैत्यांच्या गर्दींत ॥
रावणाचा रथ । चालूं झाला ७४
सैनिक रांगेनें । सर्वही शिस्तीनें ॥
चालती बाजूनें । रावणाच्या ७५
रणवाद्यें थोर । अत्यंत गंभीर ॥
लागलीं सुस्वर । वाजावया ७६
ऐकतां सुखद । रणवाद्यनाद ॥
रणश्रीचा मद । सर्वां चढे ७७
बाहू फुरफुरले । वीर फुशारले ॥
अस्मान जहालें । ठेंगणें त्यां ! ७८
अनेक दर्पोक्ती । स्वबलाची ख्याति ॥
वीर वर्णिताती । आपसांत ७९
दंड थोपटीती । खड्‍ग पाझरीती ॥
भूमी दणाणीती । पदाघातें ८०

## रावणास युद्धप्रयाणकाळीं अपशकुन

तोंच अकस्मात । धरित्री समस्त ॥
थरथरां लागत । डोलावया ! ८१
अति तेजःपुंज । सूर्य तोहि आज ॥
लागला निस्तेज । दिसावया ! ८२
दिशा धुंद झाल्या ! । अंधारें भरल्या ॥
वावटळी सुटल्या । रणांगणीं ८३
रक्ताचा पाऊस । लागे पडायास ॥
उल्का धरणीस । कोसळती ७८४

भालू अमंगळ । रडूनी कल्लोळ ॥
मांडिती सकळ । रथापुढें ! ७८५
एक घुबड थोर । अत्यंत भेसूर ॥
बसे ध्वजावर । रावणाच्या ८६
कोणाला भिईना । हांकिल्या जाईना ॥
शब्द काढी नाना । अमंगळ ! ८७
अश्वही खुंटती । ठार्यीच बैसती ॥
अश्रु ढाळिताती । भूमीवर ८८
रावणाचा डोळा । तो डावीकडला ॥
लागे लवायाला । वारंवार ८९
तोंचि कोणी वदला । 'शर्नी दडपीला ॥
तो करूं लागला । चुळबुळ ! !' ९०
उत्पात सगळे । पाहुनी ते वेळे ॥
दैत्य चरकले । मनामध्यें ९१
लढण्यालागुनी । जावयाला रणीं ॥
पाय पुढें कोणी । टाकीचना ९२
दर्पोक्ती सगळ्या । ठार्यीच जिरल्या ॥
वढाया पावल्या । अंतर्धान ! ९३
मोठे मोठे शूर । रणबहाद्दर ॥
तेही झाले चूर । चिंतेमध्यें ९४
काळाकाळाभोर । प्राणी भयंकर ॥
त्यांना वारंवार । भेडसावी ! ! ९५
तेव्हां त्यांत प्रमुख । होते जे सैनिक ॥
गेले ते साशंक । रावणासीं ९६
रावणचरण । त्रिवार वंदून ॥
बोलती वचन । त्याजप्रती ९७
म्हणाति " महाराज ! । विफळ स्वकाज ॥
होईल तें आज । आम्हां वाटे ७९८

हे पहा शकुन । किती भीतिपूर्ण ॥
आपण संपूर्ण । देखिलेच ! ७९९
शकुन अनर्थांना । सुचवीती नाना ॥
धिःकारूनी त्यांना । जाऊं नये ८००
आज एकवार । घेऊनी माघार ॥
उद्यांच सत्वर । येऊं पुन्हां ! ! " १
शब्द हे ऐकिले । रावणें जे वेळे ॥
तत्काळ कोपलें । चित्त त्याचें २
नेत्र लाल झाले । ओंठ थरारले ॥
सर्वांग लागलें । पिचावया ! ३
इंगळासमान । डोळे वटारून ॥
रावण वचन । बोलूं लागे ४
म्हणे, " रे भ्याडांनो । क्षुद्र दांभिकांनो ! ॥
जा ! जा ! रे मूर्खांनो ! । चालते व्हा ! ५
कोठें कांहीं करा । जगा किंवा मरा ॥
परी काळें करा । येथूनीयां ! ६
कसलें रे ! विघ्न । कसले शकुन ॥
बसलां घेऊन । सर्व तुम्ही ? ७
स्वार्थसाधु जन । त्यांनींच हे शकुन ॥
उराशीं जपून । बाळगावे ! ८
भ्याड नामर्दांनीं । कर्तृत्वशून्यांनीं ॥
विश्वास शकुनीं । बाळगावा ! ९
मी तों शूरवीर । स्वकार्यतत्पर ॥
शकुन क्षणभर । मानींचना ! १०
क्षुद्र शकुनवंती । कालाचीच गती ॥
असेल दाविती । फार तर ! ११
परी कालकर्ता । मी कालनियंता ॥
कालान्तरकर्ता । सर्व मीच ! ८१२

कालाची कलांटी । जरी होय उलटी ॥
करीन मी सुलटी । पराक्रमें ! ८१३
अपशकुनकारी । क्षुद्र कोल्हीं कुत्रीं ॥
मारा एकसरीं । आतांच हीं ! १४
रडूं कां लागला । सूर्य ? हा मी त्याला ॥
लावितों शिक्षेला । याच क्षणीं ! १५
कापूं कां लागली । धरित्री बावळी ? ॥
इज रसातळीं । चेपीन मी ! ! १६
ग्रह सर्व पुंड । माजवूनी बंड ॥
छळिले उद्दंड । लोक त्यांनीं १७
फिरूं दे, फिरूं दे । शनी उलटूं दे ! ॥
मंगळ कोपूं दे । वाटे तरी ! १८
मूर्खांनो ! रडतां । निर्लज्जसे येतां ॥
लाज नाहीं चित्ता । तुम्हां का रे ! ? १९
या दुष्ट शनीला । ठेंचाया चांगला ॥
नाहीं का कोणाला । पराक्रम ? २०
राहु केतु नीच । तुडवी पायींच ॥
नाहीं का कोणीच । ऐसा येथें ? २१
बाळा इंद्रजिता ! ” । इतुकें बोलतां ॥
आला लंकानाथा । गहींवर ! २२
तत्काळ पुसून । स्वकरें नयन ॥
पुनरपी रावण । गर्जूं लागे ! २३
जा जा रे ! दुष्टांनो ! । स्वस्वामिद्रोह्यांनो ! ॥
स्वार्थसाधकांनो ! । पळा ! पळा ! २४
घरांत जाऊनी । कुलुपें ठोकूनी ।
बिछाने धरूनी । बसा सर्व ! ! २५
ग्रहमख दानें । स्वबुद्धीवंचनें ॥
आतां स्वस्थ मनें । करीत जा ! ८२६

एकटा मी एक । न भितां नावेक ।
तुटतों निःशंक । शत्रूंवरी ! ८२७
एकल्यानें बाणीं । अमित वीरमणी ॥
आज रणांगणीं । लोळवितों ! २८
वाजवा ! वाजवा ! । दुंदुभी वाजवा ! ॥
जगांत गाजवा ! । डंका माझा ! ! २९
एकला जगाला । कसा भारी झाला ॥
पाहूं दे सर्वांला । पराक्रम ! ! " ३०
महात्मा रावण । शब्द हे बोलून ॥
उडी रथांतून । खालीं टाकी ! ३१
अति अनिवार । आवेशें दुर्धर ॥
धांवला सत्वर । शत्रूंवरी ! ३२
सेनानी सगळे । भिउनी ते वेळे ॥
यत्नांनीं त्या बळें । सांवरीती ! ३३
अनुताप चित्तीं । धरूनी मागुती ॥
लोटांगणें घेती । रावणपदीं ! ३४
जोडूनीयां हस्त । राक्षस समस्त ॥
रावणा प्रार्थिति । क्षमेसाठीं ! ३५
कष्टें वळवीला । यत्नें शांतवीला ॥
रावण चढला । रथावरी ३६
जयशब्द थोर । अत्यंत गंभीर ॥
उठला सत्वर । दैत्यांतूनी ३७
आनंदी आनंद । सर्वत्र आनंद ॥
लोटे स्फूर्तिप्रद । राक्षसांना ३८
भ्रमाचा निरास । होऊनी राक्षस ॥
पुन्हां लढायास । सिद्ध झाले ३९
रावणवचन । ऐकतां स्फुरण ॥
पुन्हां तें दारुण । सर्वां आलें ८४०

## रावणाचें युद्धाला प्रयाण

पुन्हां धडाडत । रावणाचा रथ ॥
समरभूमींत । चालू झाला ! ८४१
रथी महारथी । असंख्य पादाती ॥
रावणासंगतीं । चालू झाले ४२
पुनरपी गंभीर । वाद्यांचा गजर ॥
कर्कश भेसूर । सुरू झाला ४३
ताशे कडाडती । नगारे झडती ॥
शंख भुंभुं करिती । चहूंकडे ४४
मृदंग पणव । दुंदुभींचा रव ॥
क्षुब्ध करी सर्व । आकाशाला ४५
रथखडखडाट । शस्त्रखणखणाट ॥
पद्दणद्णाट । चालू झाला ४६
गर्जना उद्भट । राक्षस करीत ॥
क्रुद्ध मदोन्मत्त । आवेशानें ४७

## वानर–राक्षसांची सलामी

इकडे वानर । रामाज्ञेनें थोर ॥
कराया समर । सिद्ध झाले ४८
धिप्पाड विशाळ । कपी कर्दनकाळ ॥
लोटले प्रबळ । दैत्यांवरी ४९
शिळा वृक्ष थोर । उगारूनी वर ॥
करित ' घे घे मार ! ' । कोसळले ५०
गर्दी एक झाली । रणांत सगळी ॥
सैन्यें मिसळलीं । एके ठायीं ५१
अपूर्व आवेश । चढला सर्वांस ॥
शेवट युद्धास । लावावया ५२
मारूं किंवा मरूं । जिंकूं किंवा हरूं ॥
हा एक विचारु । सर्वां दिसे ८५३

बाणांचा वर्षाव । दैत्यवीर सर्व ॥
करिती अपूर्व । कपींवरी ८५४
बाण सूं सूं करित । घुसतां देहांत ॥
कपी विह्वळत । कोसळती ५५
खड्ग लखलखीत । बसतां मानेंत ॥
तटतटां तुटत । कपीशिरें ५६
प्रास शक्ती शूळ । परिघ विशाळ ॥
भेदितां व्याकुळ । कपी होती ५७
घडघडां पडती । गडबडां लोळती ॥
भडभडां ओकीती । रक्त मुखीं ५८
मागुती उलट । कपिहि बलिष्ट ॥
करिती अचाट । पराक्रम ५९
प्रचंड पर्वत । झेलूनी हातांत ॥
घालिती डोक्यांत । राक्षसांच्या ! ६०
वृक्षहि विशाळ । घेऊनी समूळ ॥
झोडिती सकळ । राक्षसांना ६१
कोणी बलोन्मत । निःशस्त्र सेनेंत ॥
शिरुनी अनर्थ । मांडितातीं ६२
गजशुंडा हातीं । धरुनी मुष्टीघातीं ॥
गजांचीं फोडिती । गंडस्थळें ६३
हत्ती चीं चीं करित । सैराट पळत ॥
पायीं तुडवीत । कित्येकांना ६४
कोणी कपीपती । चढूनीयां रथीं ॥
फरफरां ओढिती । राक्षसांना ६५
रथ एकीकडे । अश्व दुजीकडे ॥
रथी भलतीकडे । भिरकाविती ६६
मागुती उड्डाण । करुनी कांहींजण ॥
करिती ताडण । राक्षसांना ८६७

लाथाबुक्या देती । ओरबाडे घेती ॥
छिन्नभिन्न करिती । अवयव ८६८
हातपाय भग्न । शिर शतचूर्ण ॥
राक्षस होऊन । कोसळती ! ६९
जिह्वा लळलळीत । मुखांतुनी येत ॥
भेसूर दिसत । दैत्यमुखें ७०
रक्तानें नहाले । कपि दैत्य सगळे ॥
देहभान उरलें । कोणालाहि ७१
"हाणा ! मारा ! ठोका !"। "चूर्ण करुनी टाका"॥
याच येती हांका । चोहोंकडे ७२
" ये असा पुढती ! । बघूं तुझी शक्ती ! " ॥
वीर गर्जताती । एकमेकां ७३
शत्रुकंठनाळ । छेदाया समूळ ॥
वीर उतावीळ । झगडती ७४
रक्तनद्या थोर । वाहवती स्वैर ॥
अति भयंकर । रणामध्यें ७५

## रणभूमीवर रावणाचें आगमन

मांस मज्जा हाडें । दिसती चहूंकडे ॥
मांसेच्छु गिधाडें । घोंघावती ७६
तोंच इतुक्यांत । रावणाचा रथ ॥
आला धडाडत । अग्रभागीं ७७
सुतेजसंपन्न । ध्वज शुभ्रवर्ण ॥
लागला संपूर्ण । दिसावया ७८
पडतां दृष्टीला । ध्वज तो सकळां ॥
वानरां सुटला । थरकांप ! ! ७९
दैत्य आनंदीत । गर्जना करीत ॥
धांवाया लागत । रथासवें ८८०
रथ तेजःपुंज । शस्त्रास्त्रांनीं सज्ज ॥

दिसतसे आज । रावणाचा ८८१
गर्दभ हजार । महाभयंकर ॥
ओढिती सत्वर । महारथ ८२
भूतप्रेतगण । पिशाच दारुण ॥
करिती रक्षण । रथाचें त्या ! ८३
घंटा अगणीत । सुरत्नमंडीत ॥
घणघणां वाजत । रथावरी ८४
रथचक्रें थोर । करीतां घर्घर ॥
प्रक्षुब्ध अंबर । सर्व होय ८५
महात्मा रावण । धनुष्य सज्जून ॥
कृतान्तासमान । खवळला ! ८६
ताडताड ध्वनी । प्रत्यंचेपासूनी ॥
क्षणक्षणां कानीं । भिडूं लागे ८७
हजारों हजार । बाण भयंकर ॥
पडती शिरांवर । वानरांच्या ८८
लाह्या तडतडती । अग्नीचे वरती ॥
तेंवि उडताती । कपीशिरें ८९
कंदुकासमान । नभीं उसळून ॥
भूमीसी फिरून । आदळती ९०
दृष्टीच्या टप्यांत । बाणांच्या घेरांत ॥
वानर जीवंत । उरेचना ! ९१
धडधडां पडती । तडफडां लोळती ॥
पटपटां सोडिती । निजप्राण ९२
युगान्ताचे वेळीं । व्हावी जगा होळी ॥
तेंवी हा निर्दाळी । कपीसैन्य ९३
बलाढ्य अत्यंत । कपी बलोन्मत्त ॥
तोहि भ्रांतचित्त । बावरती ८९४
काय या समर्थां । करावें कसोंहि ॥

कोणालाच कांहीं । शुद्ध नसे ८९५
हात हलवायाची । पाय उचलायाची ॥
शब्द काढायाची । सोय नाहीं ! ९६
शिळा उचलावी । हातांनीं तोलावी ॥
तोंच ती पडावी । हस्तांसह ! ९७
मूठ ती वळावी । लाथ झुगारावी ॥
तों काया पडावी । रणांगणीं ! ९८
कोणी धीर करुन । उंचलावी मान ॥
तोंच ती तुटून । यावी खालीं ! ९९
होतां हा अनर्थ । वानरसेनेंत ॥
सैन्य अस्ताव्यस्त । पळूं लागे ! ९००
आशा विजयाची । सुटूनी सर्वांची ॥
स्पर्धा पळायाची । सुरू झाली ! १
पडत झडत । रडत कुंथत ॥
वानर पळत । दाहीं दिशा ! २
पराभव अपुला । पाहुनी ते वेळां ॥
वीर खवळला । अंगद तो ३
हांक भयानक । फोडुनी निःशंक ॥
पातला सन्मुख । रावणाच्या ४
वळवळवूनी । चुचकुचकारोनी ॥
थोपथोपटूनी । सैन्य धरी ५

## अंगदाचें पळपुट्या वानरसेनेला प्रोत्साहन

म्हणे " रे मित्रांनो !। श्रेष्ठकुळजांनो ! ॥
वानरवीरांनो । फिरा ! फिरा ! ६
कुठें रे ! पळतां । निर्लज्जसे आतां ॥
पदरीं क्लैब्यता । धरूनीयां ? ७
बढाया मोठाल्या । मारिल्यात भल्या ॥
सर्वही त्या झाल्या । व्यर्थ कां रे ! ? ९०८

आतां लोकांतून । दुष्कीर्तीवांचून ॥
काय तुम्हां आन । उरलें आहे ? १०९

छी थू जगतांत । पावतां किंचित् ॥
कसें रे ! जीवंत । राहवतें ? १०

काळीमा तोंडाला । लागतां तुम्हांला ॥
कसें रे ! जीवाला । राखवतें ? ११

उद्यां घरीं जाल । बायका बघाल ॥
काय रे ! सांगाल । तेव्हां त्यांना ? १२

'घोर रणांतून । आलों मीं पळून' ॥
हेंचि तोंडांतून । काढाल ना ? १३

धिःकार ! धिःकार ! । कपीकुलांवर ॥
लाविला दुर्वार । डाग तुम्हीं ! १४

अरे ! कर्दनकाळ । वानरांचें कुळ ॥
ख्याती ही विफळ । केली तुम्हीं ! १५

आणि ती कशाला । स्वार्थ साधायाला ।
प्राण रक्षायाला । होयचना ! १६

रे ! जरी धुंडाल । स्वर्मृत्युपाताळ ॥
मृत्यु तो चुकेल । तरी काय ? १७

गुहा घोर दरीं । शिराल भीतरीं ॥
मृत्युघाव तरी । चुके काय ? १८

कोठेंही लपूनी । बसाल तेथूनी ॥
काढील खेंचूनी । मृत्यु तुम्हां ! ! १९

हें क्षणभंगुर । शरीर नश्वर ॥
नष्टचि होणार । केव्हां तरी ! २०

लाडका हा प्राण । ठेवीला कोंडून ॥
तरी तो निघून । जाईलच ! २१

मग मित्रकार्यीं । श्रीरामाचे पायीं ॥
का हा या समयीं । वेंचूं नये ? १२२

कां रे! हें अपूर्व । मग मुक्तीपर्व ॥
याच क्षणीं सर्व । साधूं नये? १२३
एकीकडे मुक्ती । वा सुखसंपत्ती ॥
ही पहा दुष्कीर्ती । दुजीकडे!! २४
यांतून कोणतें । तुम्हांला रुचतें ॥
सांगा रे! मज तें । निर्भयत्वें! २५
हा दुष्ट रावण । जिंकी एक क्षण ॥
म्हणूनी भिऊन । पळूं नका! २६
दीप जातां जातां । दावी तेजस्वीता ॥
याची बलाढ्यता । तैशीच ही! २७
सिंह न देखीला । तोंच गर्जायाला ॥
क्षुद्र जंबुकाला । बळ चढे! २८
श्रीराम राहीला । दुरी तोंच याला ॥
खेळ खेळायाला । संधी मिळे! २९
परी श्रीरामासीं । गांठी होतां यासीं ॥
हा जिता लंकेसी । जात नाहीं! ३०
आज रामबाणीं । विदीर्ण होऊनी ॥
मरेल हा रणीं । निःसंशय ३१
परी हें कशाला? । मींच आतां याला ॥
लावितों शिक्षेला । याच क्षणा! ३२
माझाच विक्रम । अचाट परम ॥
बघूं दे अधम । रणांत हा!" ३३
बोलूनी हे शब्द । महात्मा अंगद ॥
भिडला सावध । रावणासीं ३४
वानर सगळे । लाजूनी ते वेळे ॥
पुन्हां परतले । युद्धासाठीं! ३५
पुन्हां तो भीषण । संग्राम दारुण ॥
घोर पूर्वीहून । चालू झाला १३६

## अंगद-रावण-युद्ध

शिळा एक थोर । अंगद वानर ॥
फेंकी रथावर । रावणाच्या १३७
नगप्राय शिळा । येतांच ते वेळां ॥
वाटे घात झाला । रावणाचा ! ३८
परी लंकानाथ । हांसत हांसत ॥
शिळा ती मार्गांत । चूर्ण करी ! ३९
पुन्हां भयानक । सालवृक्ष एक ॥
अंगदें अचूक । झुगारीला ४०
परी तोही बाणीं । रावणानें रणीं ॥
खंडविखंडोनी । पाडीयेला ! ४१
मागुतीं दुर्धर । हजारों हजार ॥
बाण लंकावीर । सोडीतसे ४२
दशदिशांतरीं । स्वर्गभूमीवरी ॥
बाणांच्याच हारी । दिसताती ४३
मर्मस्थानीं बाण । घुसतां जाऊन ॥
अंगद फुलून । गेला सर्व ४४
रक्त भळभळां । स्वेद घळघळां ॥
सर्वांगीं ते वेळां । वाहूं लागे ४५
तरीही गंभीर । हांक भयंकर ॥
देऊनी वानर । उसळला ! ४६
तीव्रबाणप्राय । गणुनी तृणप्राय ॥
पोंचला निर्भय । रावणासी ४७
रागें रागें मूठ । वळूनीयां घट्ट ॥
मर्मी हाणी नीट । रावणाच्या ! ४८
वज्रमुष्टीघात । बसतां छातींत ॥
रावण रथांत । कोसळला ! १४९
लोके धडपड । करी चरफड ॥

रक्त भडाभड । ओकूं लागे ! ९५०
तथापि ऊठला ! । रावण ते वेळां ॥
शूल उगारीला । हातामध्यें ५१
आणि फुसफुसत । केश सांवरीत ॥
अंगदा छातींत । घाव हाणी ! ५२
शूल तो वरद । येतां भयप्रद ॥
थरकला अंगद । मनामध्यें ५३
चुकवाया घात । शूलाचा देहांत ॥
अंगद नभांत । उडूं पाहे ५४
तोंच तो वेगानें । छातींत जोरानें ॥
बसला नेमानें । अंगदाच्या ५५
शूळ धगधगीत । बसतां छातींत ॥
अंगद मूर्च्छीत । ढांसळला ! ५६
गात्रें तीं विकळ । होऊनी विह्वळ ॥
पडला निश्चळ । भूमीवरी ! ५७
सर्वांगीं जोराचा । उष्ण रुधिराचा ॥
प्रवाह वेगाचा । चालूं झाला ५८
शत्रु भयानक । आपणा सन्मुख ॥
क्षणैक विमुख । रणीं झाला ५९
यामध्येंचि आतां । मानूनी तृप्तता ॥
पळवी स्वरथा । लंकानाथ ! ! ६०
मनीं म्हणे, "दैव । उघडे अपूर्व ॥
म्हणूनीच जीव । बचावला !" ६१
मात्र बाहेरूनी । सिंहनाद करुनी ॥
आकाश मेदिनी । भरीतसे ! ६२
राक्षस सगळे । नाचाया लागले ! ॥
हर्षीत ते वेळे । होऊनीयां ९६३
जयजयकारध्वनी । उठला गगनीं ॥

दैत्यसेनेंतूनी । रावणाचा १६४
परी हें संपूर्ण । हर्षप्रदर्शन ॥
सुग्रीवा सहन । झालें नाहीं !! ६५
रागानें पिचत । दांत ओठ खात ॥
आला तो त्वरीत । रावणासी ६६
कृतान्तासमान । सन्मुख ठाकून ॥
धिःकारवचन । त्यासीं बोले ६७
म्हणे " रे गर्विष्ठा ! । रावणा ! पापिष्ठा ! ॥
थांब ! थांब ! दुष्टा ! । क्षणभरी ६८
सांपडतां येथ । माझ्या तडाख्यांत ॥
तुजला जीवंत । सोडीना मी ! ६९
डवचूनी सिंहासी । मग कासावीसी ॥
कोठें रे ! पळसी । जंबुका ! तूं ? ७०
नरडीला नख । लावूनी निःशंक ॥
तुज परलोक । दाखवितों ! ७१
कांहीं आंगवण । असेल अजून ॥
सोस हा दारुण । घाव तरी ! " ७२
म्हणुनी सुग्रीवानें । एकाच लाथेनें ॥
रथ तो जोरानें । उडवीला ७३
सारथी मारीले । अश्व संहारीले ॥
तुकडे उडवीले । धनुष्याचे ! ७४

## सुग्रीव–रावणांचें द्वंद्वयुद्ध

रावण विरथ । सुग्रीव संतप्त ॥
द्वंद्व त्या दोघांत । चालू झालें ७५
कपी-राक्षसांचें । मुख्य धुरीणांचें ॥
द्वंद्व आवेशाचें । सुरू झालें ७६
सोडूनी समर । राक्षस वानर ॥
द्वंद्व घनघोर । पहाताती १६७७

सामर्थ्य आवेश । युद्धाचा उल्हास ॥
तुल्यचि दोघांस । दिसतसे १९७८
दोघांचें शिक्षण । अनुभवज्ञान ॥
सर्वही समान । भासतसे ७९
सुपौरुष वृत्ति । धैर्य तेज कांती ॥
नाचतच होती । दोघांमध्यें ! ८०
दंड पीळदार । छाती कणखर ॥
मांड्या भरदार । दोघांच्याही ८१
डोळे फिरलेले । आंख चढलेले ॥
ओंठ चावलेले । दोघांचेही ! ८२
दोघेही उन्मत । वीर्यबलोद्धत ॥
दंड पवित्र्यांत । ठोकिताती ८३
घाव एकमेकां । हाणाया सारखा ॥
बघती आवांका । परस्परें ८४
मागेंपुढें होती । वांकती टेंकती ॥
पुनश्च ऊठती । आवेशानें ८५
मंडलें विचित्र । घेती चक्राकार ॥
कराया प्रहार । एकमेकां ८६
परस्परां हात । खेंचूनी त्वरीत ॥
पाडीती धूळींत । भूमीवरी ८७
मागुती उद्भट । उठूनी उत्कट ॥
एकमेकां घट्ट । आंवळीती ८८
रग मर्मस्थानीं । लावूनी गगनीं ॥
देती झुगारूनी । परस्परां ८९
पुन्हां आवेशानें । उठूनी वेगानें ॥
तडाखे जोरानें । देती घेती ९०
ढोंपरा ढोंपर । कोंपरा कोंपर ॥
ऊरालागीं ऊर । भिडवीती १९९१

लाथा झटाझट । बुक्या सटासट ॥
हाणीती उद्धट । परस्परें ९९२
सुग्रीव रावण । सामर्थ्यं समान ॥
हटती कोणी न । तिळभरी ९३
घामें डबडबले । रक्तानें माखले ॥
परी न कचले । कोणी सुद्धां ९४
पुन्हां जोजोरानें । दोघेही त्वेषानें ॥
अति निकरानें । झगडती ९५
युद्धविशारद । दोघेही प्रसिद्ध ॥
मल्लविद्या शुद्ध । दाविताती ९६
कागबागगती । मृगक्रौंचवृत्ति
दोघेही दाविती । रणांगणीं ९७
सरक् सरकणें । गरगरां फिरणें ॥
थबक् थबकणें । दावितातो ९८
टांग टोले देणें । हस्त उखाडणें ॥
दोघेही युक्तीनें । करितातो ९९
तोंच इतुक्यांत । राजा लंकानाथ ॥
उडूनी अद्भुत । कृत्य करी ! १०००
रागें रागें मूठ । वळूनीयां घट्ट ॥
सुग्रीवा निकट । वर्मीं हाणी १
वज्रमुष्टीघातें । बसतां छातींत ॥
सुग्रीवा किंचित । ग्लानी आली २
हिरवें पिवळें । दृष्टीपुढें झालें ॥
काजवे लागले । चमकाया ३
स्वेदपूर लोटे । अंग लटलटे ॥
तोल जातो वाटे । सुग्रीवाचा ४
परी तो धरणीं । गुडघे टेकूनी ॥
स्वनेत्र झांकूनी । स्थिर झाला १००५

सुग्रीवाची दशा । बघतां राक्षसां ॥
आनंद मानसां । सामावेना ! १००६
गर्जना गंभीर । करूनी ते थोर ॥
मेदिनी अंबर । दणाणीती ! ७
शत्रुसिंहनाद । ऐकतां दुःखद ॥
सुग्रीव सावध । मनीं झाला ८
डोळे उघडीले । तों दैत्य हर्पले ! ॥
दुःखांत देखीले । कपीगण ९
तसाच उठून । दांत करकरून ॥
धांवला रावण । वधावया १०
घोर मुष्टीघात । हाणूनी छातींत ॥
रावणा धूळींत । पाडीतसे ११
रावण चांचडे । भूमीवरी पडे ॥
मग कोलमडे । वारंवार ! १२
भडभडां रक्त । मुखांतूनी येत ॥
गात्रें विगलीत । सर्व झालीं । १३
हात उचलीना । पाय हालवीना ॥
डोळे उघडीना । लंकानाथ १४
शत्रु मूर्च्छापन्न । देखतां तेथून ॥
सुग्रीव निघून । जाऊं लागे ! १५
" भला सांपडला ! । ठेचा आतां याला " ॥
हें तों सुग्रीवाला । ठावें नाहीं ! १६
थोर तो कुलीन । युद्धनीतिनिपुण ॥
धर्म गेल्या प्राण । सोडीचना ! ! १७
तसाच सोडूनी । रावणाला रणीं ॥
जाय तो उडोनी । श्रीरामासी १८
गाहिवरं दाटून । श्रीरामचरण ॥
प्रेमादरपूर्ण । वंदीतसे १०१९

रामेंही देऊन । घट्ट आलिंगन ॥
केलें समाधान । सुग्रीवाचें १०२०
रक्तानें भरला । सुग्रीव तो त्याला ॥
प्रेमानें पुशीला । श्रीरामानें ! २१
लक्ष्मण मारुती । नल सेनापती ॥
सुग्रीवा भेटती । प्रेमभरें २२
वृद्ध जांबवान । अंगद सुषेण ॥
भेटती संपूर्ण । सुग्रीवाला २३
आनंदगजर । करूनी वानर ॥
नाचती सत्वर । प्रेमभरें २४
तोंच इकडे वीर । महाधनुर्धर ॥
आला शुद्धीवर । लंकानाथ ! २५
तत्क्षणीं त्वेषानें । अति आवेशानें ॥
उठला त्वरेनें । युद्धासाठीं २६
' घे माझाही घाव ! ' । म्हणुनी पाहे जंव ॥
तंव तो सुग्रीव । कोठें नाहीं ! ! २७
सुग्रीव पळाला । देखतां दृष्टीला ! ॥
दैत्य वरमला । मनामध्यें ! २८
क्रोधें जळफळत । आणवूनी रथ ॥
स्वारी अधिष्ठित । त्यांत झाली ! २९
पवनवेगानें । गरुडगतीनें ॥
रथ तो जोरानें । चालू झाला ३०
रथ सुग्रीवासी । पोंचतां मानसीं ॥
क्रोध रावणासी । सामावेना ! ३१
फोडूनीयां हांक । सुग्रीवासन्मुख ॥
रावण निःशंक । त्यासी बोले १०३२

## रावणानें केलेली सुग्रीवाची निर्भर्त्सना

म्हणे " रे ! रे ! दुष्टा ! । सुग्रीवा ! पापिष्टा ॥

थांब ! थांब ! नष्टा ! । क्षणभरी १०३३
तूं शुद्ध कपटी । पळूनी संकटीं ॥
राघवाचे पाठीं । दडालास ! ३४
विमुख होऊनी । या वीरापुढूनी ॥
तूं तोंड घेऊनी । येशी येथें ३५
परी हें शूराचें । समरधीराचें ॥
युद्धनिपुणाचें । काम नोहे ! ३६
अथवा लाचार । तूं भित्रें वानर ॥
आंगवण थोर । तुज कैंची ? ३७
शूर असतास । तरी कां वालीस ॥
तूं मारवितास । रामहस्तें ! ३८
कपट करूनी । बंधुवध रणीं ॥
होतां तूं कां मनीं । लाजसीना ? ३९
परी हीं कुकर्म-। निष्णात परम ॥
जातीच अधम । मर्कटांची ! ४०
लांगूलचालन । कपटी वर्तन ॥
तुम्हां यांवांचून । ठावें नाहीं ४१
आतां रामावर । विश्वासूनी थोर ॥
आलां येथवर । युद्धासाठीं ४२
परी त्यासकट । आप्तेष्टांनिकट ॥
तुम्हां स्वर्गवाट । दावीन मी " ४३

## रामरावणांची पहिली सलामी

शब्द हे बोलून । दुरात्मा रावण
अपूर्व विंदान । दावीतसे ! ४४
हजारों हजार । बाण भयंकर ॥
सोडी रामावर । एकसरें ४५
अद्भुत बाणांनीं । आकाश मेदिनी ॥
टाकिली भरूनी । सर्व त्यानें १०४६

मंडप बाणांचा । भल्लनाराचांचा ॥
करूनी प्रभूचा । देह झांकी १०४७
प्रभूनींहि अपुलें । धनुष्य सज्जीलें ॥
युद्धासी ठाकले । रणांगणीं ४८
घनःश्याम मूर्ती । धनुर्बाण हातीं ॥
राहिली पुढती । रावणाच्या ४९
कोटी सूर्यांहूनी । कोटी मदनांहूनी ॥
प्रभुतेज नयनीं । दिसतसे ५०
प्रळयकालाशी । रुद्र शूलपाणी ॥
प्रभु त्यांचेहूनी । घोर दिसती ५१
नेत्र ते आरक्त । बघतां संतप्त ॥
जग भस्मसात । झालें वाटे ! ५२
भिंवया चढतां । अंग थरारतां ॥
अंत या जगता । झाला वाटे ! ! ५३
धनुष्य खेंचून । ओढीतां आकर्ण ॥
वाटे हें गगन । कोसळतें ! ५४
प्रत्यंचेच्या ध्वनी । कडकडतां गगनीं ॥
थरथरां मेदिनी । कांपू लागे ५५
दिशा अंतराळ । स्वर्मृत्युपाताळ ॥
त्रैलोक्य सकळ । दणाणलें ! ५६
अंतकासमान । नेत्र वटारून ॥
प्रभु तो रावण । जाळूं जाती ५७
धन्य ! धन्य ! धन्य ! । रावण तो धन्य ॥
सत्य असामान्य । भाग्य याचें ! ५८
काय अधिकार ! । केवढा हा थोर ॥
सामर्थ्यविस्तार । रावणाचा ! ५९
काय हा पसारा ! । केवढा दरारा ॥
कर्तृत्वनगारा । याचा तरी ! १०६०

कोण दणदणाट ! । काय आटापेट ! ॥
किती हा अफाट । व्याप याचा ! १०६१
कोण ही भीषणा । साम्राज्याची तृष्णा ॥
धाक तरी जनां । किती याचा ! ६२
अव्यक्त ब्रह्मानें । व्यक्त स्वरूपानें ॥
याचेसाठीं रणें । झुंजावीं ! ! ६३
मुळीं जें निर्गुण । त्यानेंही सगुण ॥
घ्यावे चापबाण । याचेसाठीं ! ६४
वेदशास्त्रें नाना । लक्षितां लक्षेना ॥
त्यानें यावें रणा । याचेपुढें ! ६५
सर्व ब्रह्मांडज । ज्याचें पदरज ॥
त्यानें घ्यावी झुंज । याजसवें ! ! ६६
दोघेहि झुंजार । महाधनुर्धर ॥
युद्ध घनघोर । खेळतांती ६७
दोघेही संतप्त । बाण अगणीत ॥
हाणीती मर्मांत । परस्परें ६८
सैनिकहि सगळे । दो बाजूंकडले ॥
युद्धा मिसळले । एके ठायीं ६९
रथखडखडाट । शस्त्रखणखणाट ॥
पददणदणाट । चालू झाला ! ७०
सूंसूं सणणण । घुंघूं घणणण ॥
शब्द हे भीषण । ऐकूं येती ७१
गर्जना गंभीर । आरोळ्या भेसूर ॥
दीन आर्तस्वर । सुरू झाले ७२
घोड्यांच्या टापांनीं । रथांच्या धांवांनीं ॥
कानठळ्या कानीं । बसविल्या ७३
श्रीरामें कोपून । रावणाचे बाण ॥
खंडविखंडून । पाडियेले १०७४

एकेका बाणानें । शतसहस्रानें ॥
बाण तो वेगानें । खंडीतसे १०७५
धनुष्य अत्युग्र । श्रीरामाचें थोर ॥
रणीं गरगर । फिरूं लागे ७६
हजारों हजार । बाण भयंकर ॥
निघती सत्वर । चापाहूनी ७७
बाणांचा वर्षाव । हस्तांचें लाघव ॥
श्रीरामीं अपूर्व । दिसतसे ७८
बाण केव्हां जोडी । केव्हां ओढी सोडी ॥
कोणा ही तांतडी । कळेचिना ७९
दैत्य पटापट । मरती निकट ॥
तेंचि मात्र स्पष्ट । दिसतसे ८०
शिरें उसळती । दैत्यांचीं वरती ॥
तीं मात्र दिसतीं । रणांगणीं ! ८१
धुव्वा पायदळा । नाश घोडदळा ॥
उडे तो सकळां । मात्र दिसे ८२
मोठे मोठे रथ । कडकडां मोडत ॥
ते मात्र दिसत । सर्वत्रांना ८३
अनर्थ सगळे । पाहूनी ते वेळे ॥
राक्षस लागले । पळायाला ! ८४
सुसाट धांवती । कोणा नावरती ॥
शस्त्रें फेंकिताती । रणांगणीं ८५
पराजय अपुला । पाहूनी ते वेळां ॥
रागें लाल झाला । लंकानाथ ! ८६
मग उठाउठी । धरूनी चिकाटी ॥
श्रीरामा ललाटीं । वेध करी ८७
ललाटीं ते बाण । रुततां जाऊन ॥
श्रीराम फुलून । गेला सर्व १०८८

रक्त भळभळा । लागे गळायाला ॥
रक्तानें माखला । प्रभुदेह १०८९
परी तें साहूनी । रामें तीन बाणीं ॥
रावणाला रणीं । वेध केला ९०
बाण झटाझट । रावणललाट ॥
फोडूनी निकट । गुप्त झाले ! ९१
क्षणैक रावण । धुरेला टेंकून ॥
पडे भोवंडून । रथामध्यें ९२
मागूती उठूनी । रौद्रास्त्र मंत्रूनी ॥
श्रीरामाला रणीं । वेध करी ! ९३
हजारों दुर्धर । शूल शक्ती शर ॥
कपीसैन्यावर । कोसळती ९४
परीघ तोमर । गदा खड्ग थोर ॥
येती भराभर । कपीशिरीं ९५
तों रामें तत्काळ । गांधर्व प्रबळ ॥
रौद्रास्त्र विफळ । केलें रणीं ! ९६
मग रागें रागें । रावण निजांगें ॥
बाण अती वेगें । सोडूं लागे ९७
बाणवर्षावांनीं । कपी वीरमणी ॥
टाकीले खिळूनी । सर्व त्यानें ९८
बिभीषणा सात । लक्ष्मणाला शत ॥
रामा असंख्यात । बाण हाणी ९९
बाणांनीं भरला । श्रीराम सगळा ॥
वेदना मर्माला । झोंबूं जाती ११००
मग हें पाहून । महात्मा लक्ष्मण ॥
बाण उगारून । पुढें झाला ! १
अती भयानक । योजूनी सायक ॥
आश्चर्यकारक । कर्म करी ११०२

रावणाचा रथ । एक्याच बाणांत ॥
उडवी नभांत । आवेशानें १९०३
पुन्हां दुजा शर । सोडूनी सत्वर ॥
सारथ्याचें शीर । उडवीलें ४
ध्वज कोसळीले । भूमीसी पाडीले ॥
तुकडे उडवीले । धनुष्याचे ! ५
तोंच बिभीषणें । अश्वही गदेनें ॥
मध्येंच क्रोधानें । संहारीले ! ६
रावण विरथ । तत्क्षणीं नभांत ॥
उडाला अत्यंत । चापल्यानें ! ७
क्रोध सामावेना । रावणाच्या मनां ॥
मर्मांत वेदना । जागवती ! ८
लक्ष्मणानें नाश । केला स्वरथास ॥
याचें दुःख त्यास । फार नसे ९
परी बिभीषण । अश्व संहारून ॥
टाकी हें सहन । होईना त्या १०
भेदी हा घरचा । बघतां मनाचा ॥
क्रोध रावणाचा । आवरेना ! ! ११
बहु दिसांतला । राग जो सांचला ॥
तो आतां पेटला । अनिवार ! १२
करूं तरी काई । याचें या समयीं ॥
रावणाला होई । ऐसें मनीं ! १३
मग जळफळत । दांत ओंठ खात ॥
शक्ती एक घेत । हातांमध्यें १४
मयानें निर्मीली । आंदण मिळाली ॥
शक्ती ती काढीली । रावणानें ! १११५

## मयासुरदत्त शक्तीचा प्रयोग

जीवासी आधार । रावणासी थोर ॥

शक्ती ती दुर्धर । वाटतसे १११६
पूर्वीही मोठालीं । युद्धें जिंकीयेलीं ॥
शक्ती न योजिली । तेव्हां कधीं १७
मोठाले प्रसंग । लोटले सवेग ॥
नाहीं उपयोग । हिचा केला १८
यमदंड खास । भिडे काळजास ॥
तेव्हांही शक्तीस । रक्षीयेलें ! १९
इंद्र रणांगणीं । क्रोधें वज्र हाणी ॥
तेव्हांही जपूनी । ठेविली ही ! २०
वरुणाचा शूळ । पातला जवळ ॥
तरीही विफळ । केली नाहीं ! २१
अशी ही विख्यात । शक्ती अत्यद्भुत ॥
क्रुद्ध लंकानाथ । आतां काढी ! २२
घंटा आठ थोर । होत्या शक्तीवर ॥
पातीहि प्रखर । तळपती २३
कालाग्नीसमान । शक्ती धुमसून ॥
ठिणग्याही तीक्ष्ण । ओकीतसे २४
तशी ती क्रोधानें । शक्ती रावणानें ॥
अत्यंत वेगानें । झुगारिली २५
बिभीषण-रोख । धरूनी अचूक ॥
शक्ती भयानक । धांवूं लागे !! २६
धडधडा गर्जत । शक्ती ती रणांत ॥
धांवतां आकांत । ओढवला २७
वानर सगळे । भेदरूनी गेले ॥
मटूकन बसले । जागेवरी ! २८
श्रेष्ठ कपीपती । तेही भ्रांत चित्तीं ॥
टकमकां बघती । एकमेकां ! ११२९
हाहाःकार झाला । स्वर्गीही सगळा ॥

अनर्थ आगळा । पाहूनीयां १९३०
म्हणती "बिभीषण । पावतां निर्वाण ॥
त्रैलोक्या मरण । ओढवलें ! ३१
न्याय क्षमा शांती । सद्धर्मप्रवृत्ति ॥
आतांच गच्छंती । पावेल कीं !" ३२
बोलती हे बोल । सर्व भयाकुळ ॥
तों शक्ती जवळ । पोहोंचली ! ३३
शक्तीनिवारणा । स्वप्राणरक्षणा ॥
बळ बिभीषणा । नव्हतेंच ३४
जरी ती सत्वर । भेदिती शरीर ॥
तरी चक्काचूर । होता त्याचा ! ३५

## लक्ष्मणाची मूर्च्छा

परी हा जाणून । प्रसंग निर्वाण ॥
महात्मा लक्ष्मण । कळवळला ३६
बिभीषणा पाठीं । घालूनी निकटीं ॥
आपण संकटीं । पुढें झाला ! ३७
श्रीरामवचन । कराया रक्षण ॥
लक्ष्मण आपण । सरसावला ! ३८
जानकीची मुक्ती । साधाया पुढतीं ॥
दिली स्वार्थाहुती । लक्ष्मणानें ! ३९
शब्द सुग्रीवाचा । करावया साचा ॥
लक्ष्मणें सुखाचा । होम केला ! ४०
अयोध्या-आकांत । टाळण्या मुळांत ॥
लक्ष्मणें स्वहित । तुच्छ केलें ! ४१
त्रैलोक्याची आस । सफळ व्हायास ॥
लक्ष्मणें मोहास । झुगारीलें ! ४२
सद्धर्मविजया । शेवटीं साधाया ॥
लक्ष्मणें स्वकाया । दान केली ! ११४३

तरी धैर्य धरुनी । असंख्य बाणांनीं ॥
शक्तीला तो रणीं । वेध करी ! ११४४
प्रति कालदंड । शक्ती ती प्रचंड ॥
जाहली दुखंड । मार्गामध्यें ४५
लक्ष्मणाचे बाण । भिडतां जाऊन ॥
शक्ती छिन्नभिन्न । मार्गीं झाली ४६
परी ती वरद । शक्ती भयप्रद ॥
मागें एक पद । हटेचना ! ४७
तशी झणाणत । कडकडां मोडत ॥
बसली छातींत । लक्ष्मणाच्या ४८
छाती आरपार । फोडूनी समग्र ॥
शक्ती ती दुर्धर । आंत घुसे ४९
बरगड्या सगळ्या । फोडूनी निघाल्या ॥
अंतर्माळा गेल्या । तुटोनीयां ! ५०
सर्वांगीं जोराचा । उष्ण रुधिराचा ॥
प्रवाह वेगाचा । चालू झाला ! ५१
प्राणान्ताचा काळ । जाणूनी जवळ ॥
लक्ष्मणें अढळ । मन केलें ५२
सप्रेम आपुले । नेत्र वळवीले ॥
श्रीरामीं लाविले । एकवार! ५३
आणि हास्यवदन । कपी निरखून ॥
आंग धाडकन । टाकीतसे ! ! ५४
लक्ष्मण पडतां । राक्षसांच्या चित्तां ॥
आनंद सर्वथा । सामावेना ५५
वानर सगळे । हतबुद्ध झाले ॥
निष्क्रिय बैसले । जागेवरी ५६
काय या समयां । करावें कसें ही ॥
कोणालाच कांहीं । बुद्धी येना ११५७

आकाश फाटलें । शिरीं कोसळलें ॥
ऐसेंचि जहालें । वानरांना ११५८
श्रीरामही मनीं । सद्गद होऊनी ॥
घळघळां नयनीं । अश्रु गाळी ५९
बाप रघुनाथ । बंधुस्नेहयुक्त
हृदयीं अत्यंत । कळवळला ६०
अत्यंत विषण्ण । मानस होऊन ॥
चाप हातांतून । गळूं पाहे ६१
तोंच तो रावण । दुज्या रथांतून ॥
असंख्यात बाण । वर्षूं लागे ६२
भल्लनाराचांनीं । कंकपत्रबाणीं ॥
श्रीरामाला रणीं । वेध करी ६३
मर्मस्थानीं बाण । घुसतां जाऊन ॥
रामही फुलून । गेला सर्व ६४
मग श्रीरामानें । अत्यंत कष्टानें ॥
शोक विवेकानें । आवरीला ६५
प्रसंग दुर्धर । जाणूनी सत्वर ॥
श्रीरामें अंतर । घट्ट केलें ६६
कपी संरक्षणीं । लक्ष्मणा ठेवूनी ॥
धांवतसे रणीं । आवेशानें ! ६७
अश्रु एकीकडे । पुसूनी रोकडे ॥
बाण दुजीकडे । टाकीतसे ६८
वज्रप्राय घोर । वर्षूनीयां शर ॥
रावण जर्जर । केला रणीं ६९
धनुष्य तुटलें । कवच फुटलें ॥
सर्वांगीं रुतले । घोर बाण ७०
भडभडां रक्त । मुखानें ओकीत ॥
रावण मूर्च्छीत । पडे रथीं ११७१

तेथेंच गच्छंति । त्याची व्हावी होती ॥
परी केली युक्ती । सारथ्यानें ११७२
स्वनाथ संकटीं । पाहूनीयां पाठीं ॥
रथ उठाउठीं । नेला त्यानें ७३
विमुख रावण । होतां पुढ्यांतून ॥
प्रभु मग बाण । टाकिती ना ७४
अति कळवळोनी । लागवेगें रणीं ॥
आले ते धांवूनी । लक्ष्मणासीं ७५
दुःख अनावर । होऊनी अपार ॥
हंबरडा थोर । फोडिताती ७६
लक्ष्मणशिरासी । घेउनी मांडीसी ॥
प्रभु दुःखावेशीं । आक्रंदती ७७

## लक्ष्मणाची मूर्च्छा व प्रभूचा विलाप

म्हणती " हाय! हाय! । केवढा अद्य ॥
दुर्दैवाचा घाय । मजवरी ७८
बंधु मी जवळ । असतां प्रबळ ॥
लक्ष्मण विकळ । पडावाना! ७९
धिक् हा पुरुषार्थ! । धिक् हें स्वजीवित! ॥
धिक् हा भारभूत । देह माझा! ८०
धिक् हें माझें शौर्य! । धिक् हें माझें वीर्य! ॥
मृत्यु येतां आर्य । लक्ष्मणाला ८१
रावणबाणांनीं । सर्वांग फुटूनी ॥
कसा हो! या रणीं । पडला हा! ८२
राजशय्योचित । महात्मा संप्रत ॥
कसा हो! धूळींत । लोळतो हा! ८३
लक्ष्मणा! लक्ष्मणा! । सोडूनी आम्हांना ॥
याचसाठीं रणा । येशी का रे! ११८४
सर्वस्वाची होळी । बाबा! त्वां सगळी ॥

यासाठीं का केली । बंधुराया! ११८५
मित्र हो ! संचित । काय पूर्वार्जीत ॥
होतें तेंचि येथ । फळा आलें ८६
कधीं हो ! कोणाची । बंधुबंधु यांची ॥
केली क्यां प्रेमाची । ताटातूट ८७
मायलेंकरांना । वा पितापुत्रांना ॥
कधीं हो ! मीं कोणा । दुरावलें ! ८८
म्हणूनी मत्प्राण । बंधु लक्ष्मण ॥
मजला सोडून । जातो आज! ८९
पूर्वी जन्मकाळीं । देववाणी झाली ॥
ती सर्वही गेली । व्यर्थच ना ! ९०
भविष्यकथन । बोलले ब्राह्मण ॥
झालें तें संपूर्ण । खोटेंच ना ! ९१
सेवा वडिलांची । केली सद्गुरूची ॥
हीच ना तयाची । फलश्रुती ! ९२
वानर सगळे । अत्यंत कष्टले ॥
तें सर्वही गेलें । व्यर्थच ना ! ९३
समुद्र तरला । मारुती आगळा ॥
प्रताप तो झाला । निष्फळ ना ! ९४
लक्ष्मणा ! लक्ष्मणा ! । जीवींच्या जीवना ! ॥
बोल रे ! वचना । क्षण तरी ९५
कां रे ! हें निष्ठुर । करिसी अंतर ॥
कोप मजवर । धरूनीयां ? ९६
वनीं उपवासी । बाबा ! कष्टलासी ॥
म्हणूनी रुससी । आतां का रे ! ? ९७
जानकी वचन । बोलली टाकून ॥
यासाठीं का मन । घट्ट केलें ? ११९८
किंवा भागलास । करितां युद्धास ॥

म्हणूनी भूमीस । निजलासी ? ११९९
सागर अनंत । तरुनी इंद्रजीत ॥
कसा रे ! कूपांत । बुडालास ? १२००
तुज मृगेंद्राला । जिंकाया कोल्ह्याला ॥
कसें रावणाला । बळ आलें ? १
आतां अयोध्येसी । जाऊनी लोकांसी ॥
भेटेल जो त्यासी । काय सांगूं ? २
कौसल्यारुदन । सुमित्रावाग्बाण ॥
मजला सहन । होणें नाहीं ! ३
अहो ! माझा भ्राता । येथें हा मरतां ॥
कर्तव्य जीविता । काय आहे ? ४
युद्ध तें कशाला । विजय कशाला ॥
सीता ही कशाला । आतां मज ! ५
माझा हा लक्ष्मण । गेला त्यामागून ॥
मी आतां जाईन । निःसंशय ! ६
सुग्रीवा भूपती ! । अंगदा ! मारुती ! ।
बहु कष्टलेती । मजसाठीं ७
बाबांनो ! मित्रार्थ । साधाया उचीत ॥
शक्य तें केलेंत । सर्व तुम्हीं ८
नल जांबवान । शरभ सुषेण ॥
यांनींही कसून । युद्ध केलें ९
बाकीही कपींनीं । मजसाठीं रणीं ॥
स्वप्राण-अर्पणीं । शर्थ केली १०
करंटा मी दीन । झालों यशोहीन ॥
तयाचें दूषण । तुम्हां नाहीं ११
जा ! बाबांनो ! आतां । स्वगृहीं परता ॥
वचनमुक्तता । तुम्हां झाली १२१२
नका ! रडूं नका । अश्रू गाळूं नका ॥

शोक करूं नका । मजसाठीं १२१३
मित्रा ! बिभीषणा ! । स्वकार्यसाधना ॥
केली मीं वंचना । तुजसवें १४
राज्याशा मानसीं । लावनी तुजसी ॥
व्यर्थ तोंडघशीं । पाडिलें मीं १५
हा ! प्रिये जानकी ! । मजवीण लोकीं ॥
अनाथ एकाकी । झालीस तूं ! १६
गे ! पत्नीरक्षण । कर्तव्य असून ॥
तें मज हातून । झालें नाहीं १७
असो ! होवो कांहीं । निंदोत कोणीही ॥
परी मज नाहीं । धीर आतां १८
भोगीन भोगीन । दुर्गती भोगीन ॥
परी आतां क्षण । रहावेना ! १९
मानस भ्रमतें । अंग थरारतें ॥
अंधारी भासते । डोळ्यांपुढें २०
चाप हातांतून । जातसे गळून ॥
बाण भात्यांतून । स्रततात २१
लक्ष्मणा ! लक्ष्मणा ! । लक्ष्मणा ! लक्ष्मणा ! ॥
उघडीं रे ! नयनां । क्षण तरी २२
केव्हांचा मी येथ । बसलों रडत ॥
कां रे ! बा ! किंचित । द्रवसीना ? २३
अरे ! म्यां रडावें । वनांत हिंडावें ॥
तें तुवां बोधावें । नानापरी २४
मज दुःखितास । बा ! रात्रंदिवस ॥
त्वां धीर द्यावास । परोपरी २५
कधीं एक क्षण । जातां मी पुढून ॥
कासावीस मन । तुझें व्हावें १२२६
मग बंधुराया ! । स्वर्गांत जावया ॥

आतांच कासया । घाई केली? १२२७
प्रेमाचा पाझर । संकटीं दुर्धर ॥
आतां कां सत्वर । ओसरला ? २८
थांब ! थांब ! आतां । त्यागूनी जीविता ॥
येतों मी मागुता । तुजसवें ॥ २९
तुजवीण प्राण । करण्या रक्षण ॥
शक्त मी न क्षण । याजपुढें !" ३०
शब्द रघुनाथ । बोलूनी त्वरीत ॥
पडला मूर्च्छीत । धरेवरी ! ! ३१
वानर सगळे । स्तंभितचि झाले ॥
हताश बैसले । ठायीं ठायीं ३२
विषण्ण वृत्तीचें । साम्राज्य दुःखाचें ॥
माजलें कपींचे । कटकांत ३३
कंठ दुःखरुद्ध । होऊनी सद्गद ॥
कोणा एक शब्द । बोलवेना ३४
तोंडें लपवूनी । आपुलीं हातांनीं ॥
सर्वही स्फुंदूनी । रडताती ३५
शोक तो सगळा । पाहूनी ते वेळां ॥
सुषेण सर्वांला । धीर देई ३६

## लक्ष्मणाची मूर्च्छा व सुषेणाचा धीर

म्हणे " रघुनाथ ! । हा येथें मूर्च्छीत ॥
वानर समस्त । रडतसां ३७
प्रसंग कोणता । आपणा पुढता ॥
कोणीही हें चित्ता । आणाचना ३८
परी हें धुरेचें । मुत्सद्दीपणाचें ॥
कार्यकर्तृत्वाचें । चिन्ह नव्हे ! ३९
त्यांतूनी लक्ष्मण । नाहीं गतप्राण ॥
निश्चयें संपूर्ण । जाणतों मी १०२४

प्रसन्न वदन । हृदयस्फुरण ॥
मृत्यूचें लक्षण । मुळीं नव्हे १२४१
जरी कोणी वीर । द्रोणागिरीवर ॥
जाईल सत्वर । येथूनीयां ४२
उदया गभस्ती । न येतां मागूती ॥
महौषधी येती । येथें जरी ४३
तरी मी लक्ष्मण । लागतां न क्षण ॥
निश्चयेंकरून । उठवीन ! !" ४४
आनंद लोटला । सर्व वानरांला ॥
सुषेणवचाला । ऐकूनीयां ४५
सर्वत्रांचीं मनें । तशींच वदनें ॥
जाहलीं हर्षानें । प्रफुल्लित ४६
साम्राज्य शोकाचें । जाऊनी तेथींचें ॥
राज्य उल्हासाचें । चालू झालें ४७
मग सर्वत्रांनीं । स्वकार्यसाधनीं ॥
हनुमान रणीं । प्रार्थीयेला ४८

## द्रोणागिरीचें उच्चाटन !

वानरकार्याला । पुन्हां एक वेळां ॥
मारुती वाढला । रुद्ररूप ! ४९
रुद्ररूपी झाला । मारुती निघाला ॥
त्वरेनें पोंचला । द्रोणागिरीं ५०
तेथें तों गंधर्व । होते चार खर्व ॥
औषधींना सर्व । राखावया ५१
मूर्खशिरोमणी । प्रसंग नेणूनी ॥
औषधींलागूनी । देतीचना ५२
तेव्हां तेथें घोर । अति भयंकर ॥
संग्राम दुर्धर । ओढवला १२५३
एक हनुमंत । गंधर्व असित ॥

विषम युद्धांत । मिसळले १२५४
परी हनुमंतें । गंधर्व सर्व ते ॥
क्षणांत धुळीतें । मिळवीले ५५
जिंकूनी सर्वांना । मग कपी नाना- ।
यत्नें औषधींना । शोधूं लागे ५६
तों त्याही कार्यांत । एक अत्यद्भुत ॥
विघ्न अकस्मात । ओढवलें ५७
याचक देखोनी । मग औषधींनीं ॥
लपंडाव मनीं । आरंभीला ५८
क्षणक्षणा स्थान । भासवूनी भिन्न ॥
संभ्रम उत्पन्न । करितातीं ५९
स्पष्ट एके क्षणीं । गुप्त दुजे क्षणीं ॥
औषधी होऊनी । फसवीती ६०
पुढ्यांत दिसावें । कपी धरूं धांवे ॥
तोंच यांनीं व्हावें । अंतर्धान ! ६१
जणूं स्वप्नगत । द्रव्या द्यावा हात ॥
बघतां हातांत । कांहीं नाहीं !! ६२
हनुमंत भोळा । बहुत श्रमला ॥
संतप्तही झाला । मनामध्यें ६३
मग रागें रागें । पर्वताचि अंगें ॥
उपटूनी वेगें । चालूं लागे !! ६४
पाताळा भिडला । पर्वत तो त्याला ॥
कपीनें तोलिला । हातावरी ! ६५
कंदुकासमान । पर्वत झेलून ॥
मारुती उड्डाण । करूं लागे !! ६६
देखावा अद्भुत । पाहूनी अत्यंत ॥
त्रैलोक्य चकित । सर्व झालें १२६७
दुंदुभी वाजती । स्वर्लोकावरती ॥

पुष्पें वर्षताती । कपीशिरीं १२६८
"शाबास ! शाबास ! । धन्य ! रामदास !" ॥
हा दशदिशांस । नाद झाला ! ६९
" आश्चर्य ! आश्चर्य ! । अत्यद्भुत कार्य " ॥
सर्व सविस्मय । उद्गारती ७०
मारुती तुष्टला । स्तुतीनें लाजला ! ॥
परत चालला । सुवेळासी ७१
कपी सपर्वत । चालतां मार्गांत ॥
भेटला भरत । नांदिग्रामीं ७२
दोघांचें भाषण । होय प्रेमपूर्ण ॥
अमृताचें पान । तुच्छ तेथें ! ७३
परी ती नाथांनीं । कथा विस्तारूनी ॥
नाथरामायणीं । वर्णीलीसे ७४
श्रोते कथालुब्ध । त्या कथेचा स्वाद ॥
घेवोत विशुद्ध । तये ठायीं ७५
आम्हां एकतर । प्रसंग तो थोर ॥
गाण्या भरपूर । बळ नाहीं ७६
दुजें ग्रंथ फार । वाढतो अपार ॥
हीच आम्हां थोर । चिंता वाटे ७७
म्हणूनी कष्टानें । आपण त्वरेनें ॥
जाऊं या वेगानें । कपीमागें ७८
आपुला रावण । आहे मूर्च्छापन्न ॥
हेंहि तों स्मरण । आम्हां हवें ! ! ७९
रावण नुठतां । सूर्य नुगवतां ॥
लक्ष्मणजीवितां । वांचवावें ८०
या आशेनें मन । प्रफुल्ल होऊन ॥
मारुती गमन । करीतसे १२८१
पर्वत अरण्यें । नगरें उद्यानें ॥

कपीनें वेगानें । आक्रमिलीं १२८२
सरिता सागर । लंघुनियां थोर ॥
मारुती सत्वर । जाऊं लागे ८३
इकडे रणांत । प्रभु रघुनाथ ॥
झाले सावचित्त । यथाकाळीं ८४
कपींनीं सगळें । वृत्त सांगितलें ॥
तेणें संतोषलें । राममन ८५
मग सर्वजण । अधीर होऊन ॥
मारुतीदर्शन । वांछिताती ८६
बघतां बघतां । मध्यरात्र होतां ॥
मारुतीचा पत्ता । लागेचना ८७
पक्षी किलबिल । करूनी सकळ ॥
पहांटेची वेळ । जाणवती ८८
तरीहि कपीचें । परत येण्याचें ॥
कांहींच खात्रीचें । चिन्ह नाहीं ! ८९
तेव्हां मात्र मनीं । अती गांगरूनी ॥
वानर भिऊनी । गेले सर्व ९०
हजारों हजार । दुःखद विचार ॥
करीती काहूर । त्यांचे मनीं ९१

## मारुतीचें द्रोणागिरीसह आगमन

तोंच अकस्मात । गगनमार्गांत ॥
लागे हनुमंत । दिसावया ! ९२
बालार्कासमान । दिव्यतेजपूर्ण ॥
कपी सुप्रसन्न । दिसतसे ९३
हर्षाची आरोळी । वानरीं दिधली ॥
तेणें दणाणली । लंका सर्व ९४
सर्वत्रांचीं मनें । तशींच वदनें ॥
जाहलीं हर्षानें । प्रफुल्लीत १२९५

हनुमंत आला । खालीं उतरला ॥
पर्वत ठेविला । पृथ्वीवरी १२९६
मग भक्त लीन । त्वरीत धांवून ॥
श्रीरामचरण । वंदीतसे ९७
रामेंही आपुला । भक्त उचलीला ॥
सप्रेम धरिला । हृदयाशीं ९८
गोष्टी चारदोन । सांगूनी आपण ॥
केलें समाधान । मारुतीचें ९९

## लक्ष्मणास शुद्धी

मग त्या सुषेणें । वैद्यकज्ञानानें ॥
औषधी यत्नानें । धुंडाळील्या १३००
औषधींचा रस । लागतां नाकास ॥
लक्ष्मणदेहास । स्फूर्ती आली १
निद्रिस्त पुरुष । उठे सावकाश ॥
तेंवी लक्ष्मणास । वाटतसे २
क्षतें सर्व गेलीं । निःशेष बुझालीं ॥
दिव्य काया झाली । लक्ष्मणाची ३
लक्ष्मण उठतां । प्रभूच्याही चित्तां ॥
आनंद सर्वथा । सामावेना ४
मग ते धांवून । प्रेमें कडकडून ॥
देती आलिंगन । बंधुराया ५
जीवशिवा भेट । जणुं होय थेट ॥
तें प्रेम अवीट । कोण वर्णी ? ६
कपींनींही थोर । आनंदगजर ॥
करूनी अंबर । दणाणीलें ७
हर्षातिशयानें । उत्साहभरानें ॥
सर्वांचींच मनें । वेडावलीं १३०८
कोणी नाचताती । उंच उड्या घेती ॥

कोणी आलिंगीती । एकमेकां १३०९

## रावण–मूर्च्छा–निवारण

परि हा सैन्यांत । आनंद लोटत ॥
तंव अवचीत । विघ्न आलें १०
कपीशब्द थोर । ऐकूनी सत्वर ॥
आला शुद्धीवर । लंकानाथ ११
प्रभातींचा काळ । वायु सुशीतळ ॥
लागतां सकळ । मूर्च्छा गेली १२
मग सावचित्त । पाहे लंकानाथ ॥
तों दैन्य साक्षात । दृष्टी पडे १३
ध्वज कोसळला । रथ विध्वंसला ॥
सैन्यभार गेला । चहूंकडे १४
सारथी आपणा । लावी पलायना ॥
हेंही आलें ध्याना । रावणाच्या १५
मानधन अती । राजा लंकापती ॥
अत्यंत स्वचित्तीं । संतापला ! १६
मेल्याहूनी मेलें । झालेसें वाटलें ॥
अपमानामुळें । रावणाला १७
मग जळफळत । तशाच रागांत ॥
धांवला वधार्थ । सारथ्याच्या १८

## रावणानें केलेली सारथ्याची निर्भत्सना व त्याचें उत्तर.

म्हणे " रे उन्मत्ता ! । दैत्याधमा ! सूता ! ॥
तुज कोणी शास्ता । नाहीं कां रे ? १९
कोणा विचारूनी । कोणत्या कारणीं ॥
तुवां रथ रणीं । फिरविला ? १३२०
रे ! जरी पडता । देह हा लढतां ॥

तरी धन्य होता । जगत्त्रयीं ! १३२१
परी पलायनें । तुझ्या भ्याडपणें ॥
जगीं निंद्य जिणें । झालें माझें ! २२
मूर्खा ! लंकानाथ । जयाविरहित ॥
नसतो फिरत । रणांगणीं २३
विजयावांचूनी । अन्यशब्द कानीं ॥
याच्या तो अर्जुनी । आला नाहीं ! २४
आकाश फाटलें । शिरीं कोसळलें ॥
तरी हा स्वबळें । सांवरील ! २५
धरित्री फाटली । रसातळा गेली ॥
तरी हा सगळी । उद्धरील ! २६
अधमा ! तूं एक । पुराणा सेवक ॥
तुला हें ठाऊक । नाहीं कां रे ! ? २७
परी स्वशत्रूंनें । वाटतें लांचीनें ॥
तुजला युक्तीनें । वश केलें ! २८
म्हणूनीच अशी । प्रतारणा खाशी ॥
केलीस मजशीं । विपत्काळीं- २९
नीचा ! प्रायश्चित्त । तुजला देहांत ॥
या अपराधार्थ । हवें होतें ! ३०
परी पुरातन । सारथी तूं हीन ॥
म्हणूनीच प्राण । वांचवितों ३१
जा ! आण ते दोर । इकडे सत्वर ॥
आणि काळें कर । येथूनीयां ! ३२
तुज अधमाचें । स्वस्वामिद्रोह्याचें ॥
दर्शन मुखाचें । मला नको !" ३३
रावण थांबला । क्रोधें लाल झाला ॥
स्वतांच रथाला । जोडूं लागे ! १३३४
मुखावलोकना । त्या वेळीं रावणा ॥

त्रैलोक्यांत कोणा । धैर्य नसे ! १३३५
परी तो चतुर । सारथी सुमन्त्र ॥
हळूंच उत्तर । बोलूं लागे ३६
म्हणे " समर्थांनीं । क्रोध आंवरुनी ॥
दोन शब्द कानीं । घ्यावे माझे ३७
मी भ्यालोंही नाहीं । गांगरलों नाहीं ॥
कीं न फितुरही । शत्रूकडे ३८
फितूर व्हायास । कपटाचारास ॥
शक्यता कोणास । लंकेमध्यें ? ३९
आज बहु दिन । अत्यंत भीषण ॥
हें रणकंदन । चालू आहे ४०
हजारों लक्षांच्या । स्वामिसेवकांच्या ॥
आहुत्या प्राणांच्या । यांत झाल्या ४१
सर्व लंकेभर । प्रति घरोघर ॥
तीव्र हाहाःकार । चालू आहे ! ४२
तरिही अजुनी । कोणाच्याहि कानीं ॥
' फितुरी ' हा ध्वनि । आला नाहीं ! ४३
सर्वत्रांचीं मनें । अत्यंत प्रेमानें ॥
तशींच निष्ठेनें । स्फुरताती ४४
मारूं किंवा मरूं । स्वामिकार्य करूं ॥
हा एक निर्धारू । सर्वां दिसे ४५
ज्याला दृष्टीभेट । आपुली ना नीट ॥
त्याला ही अलोट । स्फूर्ती दाटे ४६
शब्द तो आपुला । ज्यानें नायकीला ॥
त्यालाही लोटला । निष्ठापूर । ४७
मग रात्रंदीस । ज्यासी सहवास ॥
देह तो शत्रूस । मिळे काय? १३४८
महाराज! श्रांत । झालेत रणांत ॥

सैन्य अस्ताव्यस्त । उधळलें १३४९
उद्वेग समस्तां । आपुली अवस्था ॥
पहातांच चित्ता । वाटूं लागे ५०
तशांत आधार । पाठीराखा वीर ॥
दृष्टीपथावर । कोणी येना ५१
तेव्हां मन शांत । ठेवूनी अत्यंत ॥
सारथ्या उचीत । तेंचि केलें! ५२
प्रभो! समरांत । पडावें मूर्च्छीत ॥
हे योग येतात । सर्वत्रांना ५३
आणि मग सूतें । विमुख युद्धातें ॥
होतां तो तयातें । दोष नाहीं! ५४
रणनीति शुद्ध । आहे ही प्रसिद्ध ॥
यांत कोणा शब्द । लागेचना ५५
तस्मात प्रभूंनीं । क्रोध आवरूनी ॥
या माझ्या हातांनीं । सेवा घ्यावी ५६
आतां हा स्वस्थ । कोणापुढें स्थित ॥
करूं तें निश्चित । सांगा मज ५७
ब्रह्म जगाधार । जरी ये समोर ॥
तरी आजि हार । घेणें नाहीं! ५८
त्रैलोक्य सगळें । युद्धासाठीं आलें ॥
तरी हा न वळे । रथ मागें! ५९
ही काया भंगली । शतचूर्ण झाली ॥
तरी रज्जू खालीं । ठेवीना मी!" ६०
रावण तुष्टला । सारथीवचनाला ॥
ऐकूनी हर्षला । मनामध्यें ६१
मग दिव्य रत्नें । दिव्य आभरणें ॥
उदार मनानें । वर्षूं लागे १३६२
हाताला जें आलें । देणें शक्य झालें ॥

तें सर्व दिधलें । सारथ्याला! १३६३

## रावणाचा निर्वाणयुद्धासाठीं रणप्रवेश व वानरांची वाताहात

मग दोघे वीर । आवेशें दुर्धर ॥
धांवले सत्वर । रणांगणीं ६४
हां हां हां म्हणतां । ही युद्धाची वार्ता ॥
राक्षसां समस्तां । कळों आली ६५
हजारों हजार । दैत्य भयंकर ॥
फिरले सत्वर । रणांगणीं ६६
गर्दी एक झाली । दैत्यांची सगळी ॥
रथाभोंवतालीं । रावणाच्या ६७
धडधडां वाजत । दुतर्फा सेनेंत ॥
रावणाचा रथ । चालूं झाला ६८
इकडे वानर । शिळावृक्ष थोर ॥
घेऊनी समर । करूं आले ६९
सैन्यें एक झालीं । दों बाजूंकडलीं ॥
युद्धीं मिसळलीं । आवेशानें ७०
निर्दय कत्तल । वीरांची सकळ ॥
पुन्हां एक वेळ । चालू झाली ७१
पुन्हां पूर्वींहून । अत्यंत भीषण ॥
मृत्यूचें थैमान । चालूं झालें ७२
रावणानें घोर । वर्षूनीयां शर ॥
कंदन भेसूर । आरंभीलें ७३
अद्भुत बाणांनीं । आकाशमेदिनी ॥
टाकिली भरूनी । सर्व त्यानें ७४
मर्मस्थानीं बाण । घुसतां जाऊन ॥
वानर खिळून । गेले सर्व १३७५
शर असंख्यात । वर्षतां देहांत ॥

झाली वाताहात । वानरांची १३७६
शिरें उसळलीं । कोणाचीं निराळीं ॥
कोणी भूमीतळीं । आदळले ७७
कोणी नेत्रहीन । हातपायभग्न ॥
नासिकाविहीन । कोणी झाले ७८
बरगड्या फुटल्या । कोणाच्या सगळ्या ॥
अंतर्माळा गेल्या । तुटोनीयां ७९
भग्नहृदय कोणी । वानर होऊनी ॥
गडबडां धरणीं । लोळताती ८०
रक्त भळभळां । स्वेद घळघळां ॥
लागे वहायाला । सर्वांआंगीं ८१
तेव्हां हा अनर्थ । देखतां पुढयांत ॥
धडकी भरत । वानरांना ८२
गांगरूनी गेले । कपी भ्रांत झाले ॥
पळाया लागले । सैरावैरा ८३
रावणालागुनीं । पहाया वळूनी ॥
एकालाही मनीं । धैर्य येना ८४
लंकानाथ तर । आवेशें दुर्धर ॥
चालला संहार । करीतची ८५
गजयूथांतरीं । शिरावा केसरी ॥
तैशीच ही परी । येथें झाली ८६
तेव्हां रागें रागें । श्रेष्ठ कपी वेगें ॥
धांवले निजांगें । रावणासी ८७
नल जांबवान । सुग्रीव सुषेण ॥
ठाकले रावण । अडवावया ८८
वृक्ष भले भले । घेऊनी सगळे ॥
वीर पुढें झाले । युद्धासाठीं १३८९
पर्वताग्रें शिळा । यांनीं तो सगळा ।

रथ आच्छादिला । रावणाचा १३९०
परी रावणानें । तितुकीं जोरानें ॥
स्वपराक्रमानें । उडविलीं ९१
शिळा भग्न झाल्या । वृक्षशाखा तुटल्या ॥
रांगोळ्या उडाल्या । पर्वतांच्या ९२
मागुती आणीक । रावणें अचूक ॥
कपी ते एकेक । विद्ध केले ९३
सुग्रीवाला दोन । मारुतीला तीन ॥
रागें रागें तीक्ष्ण । बाण हाणी ९४
वर्षाव बाणांचा । करूनी जोराचा ॥
नल-अंगदाचा । देह झांकी ९५
बाण रोरोमांत । घुसतां अमीत ॥
सर्व विह्वळत । कोसळले ९६
मग आनंदूनी । सिंहनाद करुनी ॥
दैत्य झटकूनी । पुढें गेला ! ९७
डोळ्याचें जों पातें । लवलें न लवतें ॥
तोंच हा रथातें । झटकावी ! ९८
हर्षाची आरोळी । राक्षसीं दिधली ॥
तेणें दणाणली । पृथ्वी सर्व ९९
वानर स्तंभीत । होऊनी चकीत ॥
अंगुली मुखांत । घालिताती ! १४००
रावण चालला । फेंकीत रथाला ॥
धडाडत गेला । श्रीरामासीं १
जातांना वाटेंत । कपी भयभीत ॥
त्यानें असंख्यात । लोळवीले २
कपींचा सागर । लंघितां सत्वर ॥
राजा 'रघुवीर' । दृष्टी पडे १४०३
घनःशाम मूर्ती । धनुर्बाण हातीं ॥

देखिली पुढती । रावणानें १४०४
अती आनंदीत । होउनीयां चित्त ॥
अंग रोमांचीत । सर्व झालें ५
अतर्क्य विचार । हजारों हजार ॥
उठले सत्वर । त्याचे मनीं ६
क्षणांत आनंद । क्षणांत विषाद ॥
लोटूनीयां क्रोध । अंतीं आला ७
नेत्र लाल झाले ! । ओष्ठ थरारले ॥
फुरफुरूं लागले । बाहुद्वय ८
श्रीरामें रावण । देखितां पुढून ॥
त्यालाही स्फुरण । थोर आलें ९
लोककार्याकरितां । कां होईना आतां ॥
क्रोध आला चित्ता । श्रीरामाच्या १०
धारण पोषण । जगाचें संपूर्ण ॥
व्हाया भगवान । खवळले ! ११
जटाभार थोर । बांधूनी सत्वर ॥
ठाण दिलें घोर । माहेश्वरीं १२
धनुष्य आपुलें । खेंचूनी ते वेळे ॥
प्रभु सरसावले । युद्धासाठीं १३
संग्राम अद्भुत । रामरावणांत ॥
अतर्क्य अभूत । सुरूं झाला ! १४

## रामरावणांचें निर्वाण युद्ध

ज्या युद्धें वेधिलें । त्रैलोक्य सगळें ॥
युद्ध तें पेटलें । दोघांमध्यें १५
दोघेही झुंजार । महाधनुर्धर ॥
गाजलेले वीर । जगत्त्रयीं १६
दोघांचा दरारा । कर्तृत्वनगारा ॥
जगत्त्रयीं पुरा । श्रुत लोकां १४१७
दोघेही कुलीन । युद्धनीतिनिपुण ॥

औदार्यसंपन्न । उभयही १४१८
संग्रामकेसरी । दोघेही सत्वरीं ॥
भीषण समरीं । मिसळले १९
रावणें कोपूनी । सहस्र बाणांनीं ॥
श्रीरामाला रणीं । वेध केला २०
भल्ल कंकपत्र । अर्धचंद्रक्षुर ॥
बाण अंगावर । वर्षताती २१
परी ते रामांनीं । नाराच बाणांनीं ॥
सर्वही खंडोनी । पाडीयेले २२
पुन्हां रावणानें । बाण वर्षावानें ॥
झांकीला वेगानें । प्रभुदेह २३
दिशादिशांतरीं । स्वर्गभूमीवरी ॥
बाणांच्याच हारी । दिसताती २४
तरीही अढळ । राहूनी सकळ ॥
रामें तें निष्फळ । बाण केले २५
मग रागें रागें । रामही निजांगें ॥
बाण अती वेगें । सोडूं लागे २६
हजारों हजार । बाण भयंकर ॥
रणभूमीवर । कोसळती २७
मागें पुढें बाण । वर खालीं बाण ॥
बाजूसही बाण । दिसताती २८
गहजब झाला । बाणांचा सगळा ॥
त्रैलोक्या सुटला । चळकांप ! २९
तथापि झुंजार । महा धनुर्धर ॥
घेती न माघार । कोणीसुद्धां ३०
सिंह मदोन्मत्त । झुंजती वनांत ॥
तैसे हे रणांत । झगडती १४३१
त्वेषानें धांवणें । डावी उजवी घेणें ॥

दोघेही युक्तीनें । दाविताती १४३२
मंडलें विचित्र । घेऊनी सुंदर ॥
समोरासमोर । पुन्हां येती ३३
यम वैवस्वत । वा रुद्र साक्षात ॥
दोघेही लढत । तैशापरी ३४
तों संधी साधूनी । रामें भल्लबाणीं ॥
रावणाला रणीं । वेध केला ३५
बाण झणाणत । घुसूनी छातींत ॥
तत्क्षणीं भूमींत । प्रवेशले ३६
रक्तानें भरला । रावण सगळा ॥
परी न कचला । तिळभरी ! ३७
धुरेवरी मान । टाकूनीयां क्षण ॥
पुन्हां घोर रण । करूं लागे ! ३८
तंव श्रीरामानें । अत्यंत वेगानें ॥
अश्व क्षुर बाणें । संहारीले ३९
ध्वज कोसळीला । भूमीसी पाडीला ॥
चेंदामेंदा केला । रथाचाही ४०
मग लंकानाथ । दुसऱ्या रथांत ॥
बसूनी नभांत । उसळला ४१
राहूनीयां वर । असुरास्त्र घोर ॥
अति भयंकर । प्रेरीतसे ४२
सिंह व्याघ्र वृक । तरस जंबूक ॥
रणीं भयानक । उठावले ! ४३
गर्दभ डुकर । श्वान सर्प घोर ॥
मांडिती संहार । वानरांचा ४४
गृध्र काक श्येन । हेही प्रवेशून ॥
अनर्थ दारुण । मांडीताती १४४५
लचके तोडीती । वानरां फाडीती ॥

सिंह व्याघ्र अती । आवेशानें १५४६
सविष उरग । डसूनी सवेग ॥
फोडीती सर्वांग । वानरांचें ४७
गृध्रही भीषण । चोंची मामारून ॥
व्रणविदारण । करिताती ४८
मग श्रीरामानें । घोर अग्न्यस्त्रानें ॥
अस्त्र तें वेगानें । संहारीलें ४९
हिंस्त्र मांसभक्ष । प्राणी ते समस्त ॥
झाले भस्मसात । अग्नीसंगें ५०
तळमळ करिती । गडबडां लोळिती ॥
धडधडां पडती । अग्नीमुखीं ५१
त्या सर्वां भक्षुनी । मग तो भडाग्नी ॥
उलटला रणीं । दैत्यांवरी ५२
हजारों हजार । दैत्य भयंकर ॥
होती स्वाहाकार । अग्नीमध्यें ५३
तेव्हां लंकापती । सौराख्राच्या युक्ती ।
अग्न्यस्त्रानिवृत्ती । करीतसे ५४
तेंजें एकवटलीं । एकमेकां भिडलीं ॥
विलीन जहालीं । परस्पर ५५
मग लंकानाथ । अस्त्राभिमंत्रित ॥
बाण असंख्यात । सोडीतसे ५६
मंडप बाणांचा । दिव्य शस्त्रास्त्रांचा ॥
झाला निकाराचा । रामावरी ५७
श्रीरामेंहि स्थीर । राहूनी सत्वर ॥
केला प्रतिकार । सर्वत्रांचा ॥ ५८
एक शस्त्रें एक । दशास्त्रीं दशक ॥
शत बाणीं शतक । विद्ध करी १५५९
तरी असमान । युद्ध हें पाहून ॥

प्रेक्षकांचें मन। कळवळलें ! १४६०
ऋषी देव सगळे। प्रेक्षक जमले ॥
ते करूं लागले ! कुजबुज ६१
राम भूमीवरी। रावण अंबरीं ॥
जोडी ही अपुरी। सर्वां वाटे ॥ ६२
मग इंद्र खालीं। सरथ मातली ॥
पाठवी भूतळीं। रामसाह्या ६३
तेजस्वी अत्यंत। महेंद्राचा रथ ॥
पातला त्वरीत। रामापाशीं ६४
कवच अभेद्। भातेही अक्षय्य ॥
ठेविले सहाय। करावया ६५
राजा श्रीरामानें। अती आदरानें ॥
रथ तो प्रेमानें। स्वीकारीला ६६
मग रघुनाथ। ‘ ब्रह्मास्त्रमंत्रीत ’ ॥
शीघ्र त्या रथांत। आरूढला ६७
मातली सारथी। राजाराम रथी ॥
धांवले पुढतीं। युद्धासाठीं ६८
युद्ध अनन्वीत। राम-रावणांत ॥
आकाशमार्गांत। चालू झालें ६९
शस्त्रें सर्व गेलीं। निष्फळ ठरलीं ॥
अस्त्रेंच सरलीं। पुढें आतां ७०
जगारंभाहून। अस्त्रें जीं निर्माण ॥
झालीं तीं संपूर्ण। येथें आलीं ७१
श्रेष्ठ सुरासुरीं। निर्मिलीं तीं सारीं ॥
दिव्यास्त्रे हजीरी। देतीं येथें ७२
त्या अस्त्रदेवता। थैमान घालतां ॥
कल्पांत जगता। झाला वाटे १४७३
लोकपाळ सगळे। भेदरूनी गेले ॥

तळमळूं लागलें । जगत्त्रय १४७४
कपीदैत्यां तर । हातचि समग्र ॥
धरिले सत्वर । कोणी वाटे ! ७५
कसें झगडावें । कोणाशीं लढावें ॥
एकाही नाठवें । मुलींसुद्धां ७६
स्मृती हरपली । संज्ञा कमी झाली ॥
कृतीहि बनली । लुप्तप्राय ७७
नयन वांसूनी । भयाकुल मनीं ॥
पहाती गगनीं । आश्चर्यानें ! ७८
तंव लंकानाथ । अती क्रोधतप्त ॥
मेघास्त्र सोडीत । रणरंगीं ७९
आकाश भरलें । ढगांनीं सगळें ॥
अंधारीं बुडालें । जगत्त्रय ८०
मुसळधारांनीं । मग नभांतूनी ॥
पर्जन्य धरणीं । पडूं लागे ८१
तत्काळ तें केलें । पर्जन्यें ते वेळे ॥
भूतल सगळें । जलमय ८२
तेव्हां रघुवीर । वायवास्त्रें घोर ॥
मेघास्त्रसंहार । करूं लागे ८३
लाखों वावटळी । सुटल्या निराळीं ॥
अभ्रें तीं पळालीं । दाही दिशा ८४
पर्जन्य थांबला ! । परी तो भूतळा ॥
वाराच सुटला । अनीवार ८५
कडे कोसळती । गोपुरें पडती ॥
वृक्ष उन्मळती । मूळासह ८६
सागर क्षोभला । फेनयुक्त झाला ॥
तडफडूं लागला । मत्स्यगण ! १४८७
रावणें ये वेळे । अस्त्रज्ञानबळें ॥

नगास्त्र प्रेरीलें । भयंकर १४८८
हजारों पर्वत । वरूनी सुटत ॥
धडधडां पडत । भूमीवरी ८९
किती प्राणी मेले । किती चेंगरले ॥
निःशेष जहाले । पत्ता नाहीं ! ९०
मग रघुवीरें । भीषण वज्रास्त्रें ॥
पर्वत ते सारे । चूर्ण केले ९१
हजारों पाल्यांनीं । पर्वत फोडूनी ॥
वज्रें तीं गगनीं । लीन झालीं ९२
तेव्हां रागें रागें । रावण निजांगें ॥
ब्रह्मास्त्र तें वेगें । प्रेरूं लागे ९३
श्रीराम अनर्थ । देखूनी पुढयांत ॥
ब्रह्मास्त्र प्रेरीत । आपणही ! ९४
अस्त्रें ती दुर्धर । निर्वाणींचीं घोर ॥
एकमेकांवर । आदळलीं ९५
घर्षणाचा ध्वनी । कडाडतां गगनीं ॥
थरथरां मेदिनी । कांपूं लागे ९६
ठिणग्यांचा लोळ । भेदितां खगोल ॥
ब्रह्मांड सकळ । उलों पाहे ९७
प्राणी चराचर । अनर्थ हा घोर ॥
पहातां अंतर- । शून्य झाले ९८
परी इतुक्यांत । अस्त्रें आपसांत ॥
झगडूनी शांत । दोन्ही झालीं ! ९९
पुन्हां ते इर्षेनें । अती संतापानें ॥
दोघेही त्वेषानें । झगडती १५००
बाणावरी बाण । टाकूनी निर्वाण ॥
करिताती ताण । परस्परें १५०१
बाणांनीं भरलें । त्रैलोक्य सगळें ॥

रितें न उरलें । स्थान एक १५०२
बाणमय सृष्टी । बाणमय दृष्टी ॥
बाणावीण गोष्टी । अन्य नाहीं ! ३
तरी सुद्धां त्यांत । रावण संतप्त ॥
मातली वेधीत । शतबाणीं ४
बाण झणाणत । धडाडा गर्जत ॥
घुसले देहांत । मातलीच्या ५
कवच फुटूनी । मातली तो रणीं ॥
रक्तानें भरूनी । गेला सर्व ६
पुन्हां चापल्यानें । लगेच त्वेषानें ॥
इंद्राश्व रावणें । विद्ध केले ७
अश्व विद्ध केले । रक्तानें न्हाणीले ॥
ध्वज ही पाडीले । भूमीवर ८
आणि हें अचाट । कृत्य होतां इष्ट ॥
सिंहनाद दुष्ट । करूं लागे ! ९
दैत्य आनंदले ! । ऋषी घाबरले ॥
देव खिन्न झाले । मनामध्यें १०
तेव्हां अपमान । आपुला पाहून ॥
राघव-नंदन । खवळला ! ११
सागर शोषिती । आकाश भेदिती ॥
ऐसे बाण हातीं । राम घेई १२
रौद्रास्त्रमंत्रित । बाण ते प्रदीप्त ॥
चालले गर्जत । रावणासी १३
धाडधाड ध्वनी । उठतां गगनीं ॥
गेलें भेदरूनी । जगत्त्रय ! १४
आकाश फाटतें । पृथ्वी दुभंगते ॥
ऐसेंच चित्तातें । सर्वां वाटे १५१५
परी रावणानें । अलोट धैर्यानें ॥

बाण ते शौर्यानें । विद्ध केले १५१६
हजारों बाणांनीं । असंख्य शस्त्रांनीं ॥
बाण तो तोडूनी । पाडूं पाहे १७
परी रुद्रदत्त । बाण झणाणत ॥
घुसले देहांत । अखेरीस ! १८
कवच फुटलें । धनुष्य सुटलें ॥
मर्मांत रुतले । घोर बाण १९
भळभळां रक्त । सर्वांगीं ओकीत ॥
रावण किंचित । चांचरला ! २०
तरी वीरमणी । दुसऱ्याच क्षणीं ॥
पुन्हां धांवे रणीं । आवेशानें !! २१
आतां त्याच्याकडे । पहायाही थोडें ॥
त्रैलोक्या सांकडें । पडूं लागे ! २२
लालबुंद झाला ! । रावण तापला ॥
ओंठही लागला । चावावया २३
अती क्रोधें मनीं । संतप्त होऊनी ॥
शब्दही तोंडूनी । त्याच्या येना ! २४
मग जळफळत । रागानें पिचत ॥
धावला वधार्थ । श्रीरामाच्या ! २५
रामेंही व्हायास । दक्ष मातलीस ॥
सांगूनी रथास । पुढें केलें २६
पुन्हां दोघे वीर । समोरासमोर ॥
येऊनीयां घोर । युद्ध झालें २७
असंख्य बाणांचा । दिव्य शस्त्रास्त्रांचा ॥
मारा निकराचा । चालू झाला २८
जीव मेले किती । उरले ते किती ॥
याला कांहीं मिती । नव्हतीच ! १५२९
प्रेतांनीं खचली । धरित्री सगळी ॥

रक्तानें न्हाली । आंगभर १५३०
अस्थि मांस चिखल । यांचाच सुकाळ ।
कोणा भूमीतळ । दिसेचना ३१
औषधाला तरी । प्राणी पृथ्वीवरी ॥
उरेल कां परी । शंका वाटे ! ! ३२
ऐसें भयंकर । सप्त दिनभर ॥
अहोरात्र घोर । युद्ध झालें ! ३३
एकाही पळाचा । वा अर्ध पळाचा ॥
विसांवा कोणाचा । नव्हता यांत ! ३४
तरीहि एकाचें । जयापजयाचें ॥
कांहींच खात्रीचें । चिन्ह नाहीं ! ३५
क्षणीं लंकापती । क्षणीं रघुपती ॥
वाटतें वरिती । जयश्रीला ३६
परी ती घातकी । जयश्री नर्तकी ॥
कोणा एकाएकीं । वळेचना ! ३७
तेव्हां ऋषीश्वर । देव थोर थोर ॥
झाले चिंतातुर । मनामध्यें ३८
कैसेनी मरण । पावेल रावण ॥
चिंता ही दारुण । सर्वां लागे ३९
म्हणती " नीलवर्णं । नभही तुळणें ॥
शक्य कांहीं गुणें । सागरासी ४०
परी युद्ध यांचें । रामरावणांचें ॥
तुल्य ठरायाचें । त्यांच्याशींच ! ! " ४१
बोलती हे बोल । सर्व भयाकुळ ॥
तों चित्त सकळ । युद्धीं वेधें ४२
राजा रघुवीर । लंकानाथावर ॥
करूं लागे थोर । गहजब ! १५४३
हजारों दुर्धर । वर्षूनीयां शर ॥

रावण जर्जर । केला रणीं १५४४
घोर दिव्यबाणीं । शिर उडवूनी ॥
सारथी धरणी । पाडीयेला ४५
आणि पुन्हां एक । योजूनी सायक ॥
रावण मस्तक । उडवीलें ! ! ४६
आनंद लोटला । त्रैलोक्या सकळा ॥
नाचाया लागला । देवगण ! ४७
ऋषि आनंदले । कपीश्रेष्ठ धाले ॥
दैत्य ते लागले । पळावया ४८
परी तितुक्यांत । धडावरी येत ॥
शिर अकस्मात । दुसरेंच ! ४९
तेंही रघुवीर । वज्रबाणीं घोर ॥
तत्क्षणीं सत्वर । छेदीतसे ५०
तरीहि तिसरें । चौथें या प्रकारें ॥
पुनःपुनः शिरें । उद्भवती ! ! ५१
श्रीराम तोडीत । शिरें अगणीत ॥
तरी तीं आहेत । जशीं तशीं ! ५२
हातांनीं बाणांचा । अमोघ शस्त्रांचा ॥
वर्षाव जोराचा । खळेचना ५३
तेव्हां मात्र पूर्ण । श्रीराम कोपून ॥
निर्वाणींचा बाण । सज्ज करी ५४
अगस्तींनीं दिला । पूर्वी श्रीरामाला ॥
बाण तो घेतला । हातामध्यें ५५
श्रीपैतामहास्त्र । मंत्रूनी त्यावर ॥
बाण रघुवीर । सोडूं लागे ५६
बाण तो सुटतां । चापाहूनी आतां ॥
आक्रान्त जगता । ओढवला १५५७
मेदिनी संपूर्ण । गेली हादरून ॥

आकाश विदीर्ण । होऊं पाहे १५५८
कैलास ढळला ! । शिव दचकला ॥
ब्रह्मया सुटला । चळकांप ! ५९
नग ढांसळले । सागर क्षोभले ॥
वायु बंद झाले । वहायाचें ६०
नक्षत्रें पडती । तडतडां क्षितीं ॥
सूर्यचंद्रगती । रुद्ध होय ६१
दिग्गजांना टाळी । बैसली निराळी ।
दांतखिळी झाली । कृतान्ताला ६२
कूर्माची ती मान । गेली दडपून ॥
जातसे वांकून । शेषफडा ६३
जलस्थलचर । स्वर्गस्थ अमर ॥
होय हाहाःकार । सर्वांमध्यें ६४
तंव तितक्यांत । ब्रह्मांड फोडीत ॥
बाण गगनांत । चालू झाला ६५
आकाश पाताळ । एकवटुनी सकळ ॥
बाण तो प्रबळ । धांवतसे ६६
किती भेदरले । भोंवंडूनी पडले ॥
मूर्च्छितहि झाले । कितीएक ६७

## रावणवध

इकडे रावण । होय तेजोहीन ॥
अस्त्रेंही संपूर्ण । विसरलीं ६८
दृष्टिरोध झाला । नेम भर्कटला ॥
पराक्रम झाला । व्यर्थ सर्व ६९
अश्वगती मंद । बाहुस्फुर्ती बंद ॥
जग सर्व धुंद । भासतसे ७०
स्वमृत्युचा काळ । पातला जवळ ॥
रावणें सकळ । ओळखीलें १५७१

मग सिंहवृत्ती । उभारूनी छाती ॥
दृष्टी बाणावरती । स्थिर करी १५७२
तोंच त्या बाणानें । अत्यंत वेगानें ॥
कवच जोरानें । उडविलें ७३
छाती आरपार । फोडूनी समग्र ॥
भूमींत सत्वर । प्रवेशला ७४
सर्वांग फुटून । महात्मा रावण ॥
शीघ्र रथांतून । कोसळला ! ७५
धैर्याचा पुतळा । तेजाचा हा गोळा ॥
धडाडां पडला । भूमीवरी ७६
अती मानधन । दिव्यास्त्रसंपन्न ॥
वीर हा वरून । ढांसळला ! ७७
हा त्रैलोक्यजेता । विश्वाचा गांजीता ॥
भूमीतळीं आतां । आदळला ! ७८
जग स्वस्थ झालें ! नभ उजळलें ॥
वहाया लागले । सौम्य वायु ७९
धरित्री सगळी । पुन्हां स्थिरावली ॥
शांतता लाधली । सागराला ८०
सूर्य चंद्रागती । लाधली मागुती ॥
अग्नीचीहि ज्योती । स्पष्ट झाली ८१
दुंदुभी वागल्या । स्वर्लोकावरल्या ॥
झडाया लागल्या । सुखावह ८२
दुर्लभ अत्यंत । नंदनवनस्थ ॥
सुपुष्पें वर्षत । रामावरी ८३
पुष्पांनीं भरला । श्रीराम सगळा ॥
आनंद लोटला । त्रैलोक्यासी ८४
गंधर्व गाताती । अप्सरा नाचती ॥
मुखीं रामकीर्ति । गात गात १५८५

सुग्रीव हर्षला । कृतकार्य झाला ॥
श्रीरामयशाला । पाहूनीयां १५८६
लक्ष्मण मारुती । घट्ट आलिंगीती ॥
राजा रघुपती । प्रेमभरें ८७
मग ते मूर्च्छीत । कपी शचीनाथ ।
उठवी त्वरीत । रामाज्ञेनें ८८
तत्काळ सगळे । वानर उठले ॥
अति आनंदले । मनामध्यें ८९
भुभुःकारध्वनी । करूनीयां त्यांनीं ॥
दाकिल्या भरूनी । दाही दिशा ९०
उल्हासें नाचती । आनंदें हांसती ॥
परस्परें देती । आलिंगन ९१
सर्वांचें अंतर । सौख्यरंगीं चूर ॥
सुखा पारावार । उरेचना ९२
आतां मातलीला । निरोप मिळाला ॥
देवगण गेला । स्वस्थानासी ९३
मुखीं रामयश । गात सावकाश ॥
चालले स्वर्गास । सर्वजण ९४
श्रीरामाची कीर्ति । सुग्रीवाची प्रीति ॥
मारुतीची भक्ति । वर्णीताती ९५
लक्ष्मणाचें धैर्य । रावणाचें शौर्य ॥
सर्व सविस्मय । मुखीं घेती ९६

## रावणस्त्रियांचा शोक

इकडे त्या घोर । वार्तेनें सत्वर ॥
केला हाहाःकार । लंकेमध्यें ९७
लंका ती सगळी । शोकांत बुडाली ॥
रडारड झाली । घरोघर १५९८

विलाप स्त्रियांचे । दीन अर्भकांचे ॥
भेदक स्वरांचे । ऐकूं येती १५९९
दैत्यांतःपुरस्थ । नारी अगणीत ॥
येती आक्रंदत । रणांगणीं १६००
रावणा देखूनी । मग स्वनयनी ॥
गोंधळ रडूनी । घालीताती १
कोणी केश हातीं । मोकळे सोडीती ॥
कोणी लोळताती । गडबडां २
'हे आर्य ! हे नाथ !' । यापरी रडत ॥
कोणी कोसळत । धरेवरी ३
कोणी आलिंगीती । मुख चुंबिताती ॥
अश्रूंनीं न्हाणीती । रावणाला ४
कोणी आठवून । तयाचे सद्गुण ॥
मागुती बेभान । आक्रंदती ५
आक्रोशें भरला । भूगोल सगळा ॥
विलाप कानांला । ऐकवेना ६
शत्रुमित्र सगळे । दयेनें दाटले ॥
कंठ रुद्ध झाले । सर्वत्रांचे ७
बिभीषणा तर । शोक तो अपार ॥
चित्तीं क्षणभर । आवरेना ८
हृदय पोळलें । चित्त बावरलें ॥
अश्रूंनीं भरले । नेत्र त्याचे ९
दुःखाचा उमाळा । येऊनी ते वेळां ॥
लागे रडायाला । बिभीषण १०
एवढा विचारी । महात्मा हा तरी ॥
झालाच अखेरीं । मोहबद्ध ! ११
कंठ सद्गदीत । करूनीयां मुक्त ॥
रडाया लागत । हळहळां १६१२

## रावणवधानंतर बिभीषणाचें सांत्वन

मग श्रीरामानें । अमृतवाणीनें ॥
शांतवन यत्नें । केलें त्याचें १६१३
म्हणे, "रे ! दुर्धर । महात्मा हा वीर ॥
पडला भूवर । यदृच्छेनें १४
अत्यंत उत्साही । हा लोकविजयी ॥
झाला या समयीं । कालहत १५
हा स्वकर्तव्याला । विमुख न झाला ॥
किंवा न निमाला । दुर्बलत्वें १६
लढतां लढतां । शौर्य गाजवीतां ॥
जहाला हा आतां । गतप्राण ! १७
बाबारे ! सगळीं । युद्धं सर्व काळीं ॥
आहेत ही मुळीं । अनिश्चित १८
यशापयशाचा । वा निजप्राणांचा ॥
यांत तो कांडीचा । नेम नाहीं ! १९
क्षत्रधर्मस्थित । यांत जे मरत ॥
त्यां मिळे निश्चित । शुभ लोक २०
तेव्हां याकरीतां । बिभीषणा ! आतां ॥
विलाप तूं वृथा । करूं नको २१
अरे ! ज्यानें बळें । त्रैलोक्य गांजीलें ॥
देव लोळवीले । इंद्रासह २२
प्रत्यक्ष यमास । रणीं भिडायास ॥
ज्यासी न चित्तास । शंका कधीं २३
तोचि हा रावण । उचीत मरण ॥
पावतां रूदन । व्यर्थ आहे ! २४
तरी शोक याचा ! टाकुनी फुकाचा ॥
यत्न तूं पुढचा । करीं आतां" १६२५

श्रीरामवचनाला । ऐकूनी तुष्टला ॥
मनीं शांत झाला । विभीषण १६२६
मग 'सहेतुक' । तो चित्तभेदक ॥
भाषण सम्यक् । करूं लागे २७

## रावणाच्या उत्तरकार्यासंबंधीं श्रीराम-विभीषणांचा संवाद

म्हणे, "हा दुर्धर । धर्मवेत्ता वीर ॥
आज भूमीवर । पडला आहे २८
पद शत्रुशिरीं । स्नेह मित्रांवरी ॥
यानें आजवरी । बाळगीला २९
दासांचें पोषण । प्रजेचें पालन ॥
केलें यानें पूर्ण । यथान्याय ३०
सत्ता जगभर । गाजवीली थोर ॥
भोगही अपार । भोगीयेले ३१
असंख्य यजनें । अमर्याद दानें ॥
आजवरी यानें । अर्पीयेलीं ३२
हा विद्यासंपन्न । षट्शास्त्रनिपुण ॥
वेदान्ताध्ययन । थोर याचें ३३
अग्निहोत्री श्रेष्ठ । महातपोनिष्ठ ॥
अशी याची स्पष्ट । कीर्ती आहे ३४
तेव्हां रामराया ! । प्रसादें तुझीया ॥
इच्छितों कराया । कार्य याचें ३५
जगत्सम्राटाचें । या महावीराचें ॥
होऊं द्या थाटाचें । क्रियाकर्म ३६
अथवा कशाला । दुष्ट या सगळा ॥
धर्म बुडवीला । जगत्त्रयीं १६३७
ज्येष्ठ बंधु खरा । आणि त्या आधारा ।

आहे वंद्य पुरा । मजलागीं १६३८
परी दुराचारी । पापी हा अंतरीं ॥
क्रियाकर्म तरी । कसें करूं ३९
खरेंच नष्टाचें । परस्त्रीचोराचें ॥
नाहीं करायाचें । कार्य मज ! ४०
लोक निंदितील । दुष्ट म्हणतील ॥
परी वानितील । मागाहूनी ४१
कांहीं झालें तरी । या दुरात्म्यावरी ॥
न देणें अखेरीं । तिळांजली " ४२
बोलतां थांबूनी । बिभीषण क्षणीं ॥
पाहे निरखूनी । राममुख ४३
श्रीराम हांसला ! । चातुर्यें तुष्टला ॥
भाव उमजला । सर्व त्याचा ४४
मग तो गंभीर । तत्त्वार्थप्रचुर ॥
त्यासी प्रत्युत्तर । देऊं लागे ४५
म्हणे " बाबा ! नष्ट । रावण हा दुष्ट ॥
होता हे तों स्पष्ट । जाणतों मीं ४६
स्वार्थसंगतींत । याचा तो वेदान्त ॥
झाला विपर्यस्त । सर्व खरा ४७
याचें सर्व दान । वा प्रजापालन ॥
रजोगुण पूर्ण । होतें खरें ४८
परी हा अंतरीं । मृत्युकालवरीं ॥
उदात्त विचारीं । मग्न होता ! ४९
स्वार्थ सुद्धां याचा । विस्तृत क्षेत्राचा ।
उदार वृत्तीचा । सर्व होता ५०
आणि त्याचकरितां । कां होईना आतां॥
तुच्छ स्वजीविता । यानें केलें १६५१
सर्व दैत्यहित । स्वार्थाच्या कक्षेंत ॥

घेऊनी जीवित । वेंचियेलें ! १६५२
आतां याचे ठायीं । घोर दुर्गुणही ॥
होते कांहीं कांहीं । निःसंशय ५३
आणि त्याचमुळें । आमुचें सगळें ॥
शत्रुत्व वाढलें । याजपाशीं ५४
परी वैरें सारीं । शत्रु मेल्यावरी ॥
सुटती अंतरीं । सज्जनांच्या ५५
आणखी आमुचें । कार्यही येथींचें ॥
कांहींच पुढचें । उरलें नाहीं ५६
तेव्हां आतां तुझा । तसाच हा माझा ॥
मानितों मी दूजा । प्रियबंधु ! ५७
जा ! आतां सत्वर । बिभीषणा ! कर ॥
अंत्यविधी कर । सर्व याचा ५८
राजवैभवानें । उत्तम थाटानें ॥
होऊं द्या त्वरेनें । विधी सर्व ५९
ही माझी विनंती । वा आज्ञा निश्चितीं ।
मानूनी मागुतीं । टाकूं नको ! " ६०
सद्गदितचित्त । बिभीषण होत ॥
लोकही चकीत । सर्व झाले ! ६१
'धन्य ! रामराय । धन्य ! हें औदार्य' ॥
सर्व सविस्मय । उद्गारती ६२

## रावणाची उत्तरक्रिया व बिभीषणास राज्याभिषेक

मग बिभीषणें । योग्य सन्मानानें ॥
केली ती थाटानें । बंधुक्रिया ६३
क्रिया पूर्ण होतां । रावणाची आतां ॥
राक्षसां समस्तां । सुख झालें १६६४

मग रघुपति । लक्षुमणहस्तीं ॥
देतसे लंका ती । बिभीषणा १६६५
राक्षस वानर । मिळूनी सत्वर ॥
करीती त्यावर । अभिषेक ६६
आनंद लोटला । आबालवृद्धांला
बिभीषण झाला । लंकानाथ ! ६७
रामेंही आपण । क्रोध झुगारून ॥
सौम्यवृत्ती पूर्ण । आदरिली ६८
धनुष्य ठेविलें । प्रभूंनीं ते वेळें ॥
निवृत्त जहालें । युद्धांतूनी ६९

## जानकीचें लंकेतून आगमन

मग जानकीस । शीघ्र आणायास ॥
उत्कंठा सर्वांस । चित्तीं लागे ७०
तें काम अर्थात् । ओघानेंच प्राप्त ॥
होतसे निश्चीत । हनुमंता ७१
हनुमान लंकेला । जाऊनी सीतेला ।
सांगे वध झाला । रावणाचा ७२
सीता आनंदली । सद्गदीत झाली ॥
वार्ता ती सगळी । ऐकूनीयां ७३
मग बिभीषणें । जानकीकारणें ॥
शिबिका त्वरेनें । आणविली ७४
वहान तयार । होतांच त्यावर ॥
जानकी सत्वर । आरूढली ७५
आणि आनंदांत । वाद्यगजरांत ॥
निघाली स्वनाथ-। दर्शनाला ७६
इकडे वानर । जहाले अधीर ॥
जानकी सुंदर । पहावया १६७७
डोळयांचें पारणें । जानकीदर्शनें ॥

फिटाया त्वरनें । जुळती ते १६७८
तोंच सीता सती । मारुतीसह ती ॥
आली दृष्टीपथीं । वानरांच्या ७९
आनंदगजर । करिती वानर ॥
तेणें लंकापुर । दणाणलें ८०
जो तो जानकीला । पहाया ते वेळां ॥
घुसाया लागला । पुढें पुढें ८१
गर्दी एक झाली । कपींची सगळी ॥
तेणें रुद्ध झाली । सीतावाट ८२
तेव्हां बिभीषण-। दूत ते भीषण ॥
देती धुडकून । वानरांना ८३
काठ्या सटासट । मारूनी उद्भट ॥
काढिती ते वाट । कपींतूनी ८४
श्रीरामें देखिलें । कृत्य हें जे वेळें ॥
तत्काल द्रवलें । चित्त त्याचें ८५
मग निवारून । त्यानें बिभीषण ॥
सीता ती वरून । उतरविली ८६
आणखी पहात । असतां समस्त ॥
तिला वानरांत । चालविली ८७
वानरां सकळां । अत्यानंद झाला ॥
जानकी वेल्हाळा । पाहूनीयां ८८
संचित सुदैव । उदेलें अपूर्व ॥
असेंचि ते सर्व । मानिताती ८९

## लंकेतून आलेल्या सीतेचा धिःकार

तंव तितुक्यांत । सर्व आनंदांत ॥
विरजण होत । दुर्दैवानें ९०
जानकीचें मुख । पहातां सन्मुख ॥
श्रीराम साशंक । मनीं झाला १६९१

लोकपवादास । भिऊनीच खास ॥
कठोर मानस । त्याचें झालें १६९१
आणि जानकीला । त्या महासतीला ॥
तो बोलूं लागला । कटु शब्द ९२
म्हणे रघुनाथ । " सीते ! हा समस्त ।
व्याप न खचित । तुझेसाठीं ९४
पूर्वजकीर्तीला । डाग जो लागला ॥
तोच धुवायाला । झटलों मीं ९५
अपमानकुण । सव्याज देऊन ॥
झालों तयांतून । मुक्त आतां ९६
शत्रूवध अंतीं । होतां माझे हातीं ॥
जहाली निवृत्ती । कर्तव्याची ९७
आतां तुझी आस । किंवा अभिलाष ।
तिळही मनास । माझ्या नाहीं ! ९८
गृहीं बहु दिन । शत्रूच्या राहून ॥
स्वीकारील कोण । बरें तुज ? ९९
जा ! आतां परत । सीते ! तूं लंकेंत ।
रहा समवेत । बिभीषणा १७००
किंवा तो लक्ष्मण । भरत शत्रुघ्न ॥
वा सुग्रीव पूर्ण । रक्षो तुज ! ! " १

## सीतेचें दिव्य व तिचा स्वीकार

शब्द हे ऐकिले । सीतेनें ते वेळें ।
करपूनी गेलें । चित्त तिचें २
ती नखशिखान्त । झाली क्रोधतप्त ॥
वचन अनृत । ऐकूनीयां ३
परी न बोलतां । सीता फार आतां ॥
रचावया चिता । आज्ञा करी ! १७०४
आणि ती प्रदीप्त । होतां चिता तेथ ।

प्रतिज्ञा निश्चित । उच्चारी हीं १७०५
" मी शुद्ध असून । रामा वाटे हीन ॥
अग्निनारायण । रक्षो तरी ! " ६
ऐसे शब्द घोर । बोलूनी सत्वर ॥
सीता चितेवर । उडी टाकी ७
कल्लोळ माजला । लोकांत सगळा ॥
गाळाया लागला । अश्रु जो तो ! ८
हाय ! हाय ! हाय ! । असा दुःखमय ॥
शब्द सुरू होय । जेथें तेथें ९
तंव इतुक्यांत । अग्नीच साक्षात ॥
चितेंतूनी तेथ । प्रगटला ! १०
आणखी निर्दोष । त्या सीतादेवीस ॥
पुन्हा श्रीरामास । अर्पीतसे ! ! ११
आनंदीत झाली । प्रेक्षकमंडळी ॥
पाहूनी सगळी । सीताशुद्धी १२
आश्चर्य ! आश्चर्य ! । अत्यद्भुत कार्य ॥
सर्व सविस्मय । उद्गारती १३

## विजयी वानरांना तैलाभ्यंग स्नानें

मग बिभीषणें । वानरां त्वरेनें ॥
तैलाभ्यंग स्नानें । घालविलीं १४
दिव्य अलंकार । अर्पूनी सुंदर ॥
सर्व कपीवीर । गौरवीले १५
रत्नांचा मोत्यांचा । दिव्याभरणांचा ॥
भारा नवलाचा । पडतसे १६
त्यांतूनी वांछीत । घेऊनी समस्त ॥
वानर मनांत । संतोषले १७१७

## पुष्पकविमानारोहण

आतां बिभीषण । रामाज्ञेवरून ॥

पुष्पक विमान । आणूं सांगे १७१८
विमान तें प्राप्त । होतांच त्वरीत ॥
सर्वही तयांत । आरूढले १९
सकपी सुग्रीव । लक्ष्मण राघव ॥
ऐसपैस सर्व । स्थिर झाले २०
राजा बिभीषण । अमात्य घेऊन ॥
विमानीं आपण । आरूढला २१
आणि तें विमान । मग वेगवान ॥
अंतरिक्षांतून । चालूं झाले २२

### विमानस्थ सीताराम

गोष्टी सांगायाला । जो तो गुंग झाला ।
जीवांच्या मित्राला । जिव्हाळ्याच्या ! २३
कोणा भीति नाहीं । वा शंकाही नाहीं ।
झाली प्रेममयी । सृष्टी सर्व २४
त्यांतचि श्रीराम । सीतेसी सप्रेम ॥
स्थानें महत्तम । दर्शवीती २५
" ही पहा सत्वरी । सीते ! लंकापुरी ॥
कशी शैलावरी । शोभतसे ! २६
हे पहा उन्मत्त । दुष्ट लंकानाथ ॥
आणि इंद्रजीत । गेले येथें २७
पहा कुंभकर्ण ! । हा येथें वासून ॥
आपुलें वदन । पडला आहे ! २८
तसाच कपींचा । आणि राक्षसांचा ॥
हा पहा रक्ताचा । चिखलहि २९
आतां हा सागर । पहा भयंकर ॥
होतों कांठावर । येथें आम्ही ३०
पहा ! या सेतूला । सीते ! हा सगळा ।
नळें बांधविला । तुजसाठीं १७३१

आलों पैलपार ! येथेंच त्रिरात्र ॥
सीते ! म्यां समुद्र । आराधीला १७३२
राजा बिभीषण । येथेंच भेटून ॥
राहिला मिळून । आम्हांकडे ३३
वहावा ! सुखदा । आलीच किष्किंधा ॥
पहा ही एकदां । सीते ! पुन्हां ३४
येथें वालीवध । करूनी प्रसिद्ध ॥
झालों स्नेहबद्ध । सुग्रीवा मी ३५
किष्किंधेचें नांव । ऐकतां अपूर्व ॥
झाला हर्षभाव । जानकीला ! ३६
मग श्रीरामानें । सीतेच्या इच्छेनें ॥
यान तें वेगानें । उतरवीलें ३७
तारारुमादिक । वानरी प्रमुख ॥
घेतल्या एकेक । विमानांत ३८
आणि रघुपती । पुन्हां सीतेप्रती ॥
देखावे दाविती । मनोहर ! ३९
" हा पहा ! पर्वत । ऋष्यमूक ख्यात ॥
सुग्रीव भेटत । येथें मज ४०
हें पहा सुंदर । पंपा सरोवर ! ॥
शोक मीं अपार । येथें केला ४१
रम्य जनस्थान । हें लागे येथून ! ॥
जटायू मरण । पावे येथें ४२
अत्री महामती । अनसूया सती ॥
येथेंच भेटती । सीते ! तुज ४३
ही पहा ! सत्वरी । प्रिये ! गोदावरी ॥
पावन जी करी । त्रैलोक्याला ४४
पुढें चित्रकूट । पहा दिसे स्पष्ट ॥
भरताची भेट । येथें झाली १७४५

या गंगा-यमुना । सरिता आपणा ॥
अहा ! किती मना । तोष देती ! १७४६
शृंगवेरपुर । हेंच तें सुंदर ! ॥
गुह माझा मित्र । येथें आहे ४७
हीच माझी पुरी । अयोध्या नगरी ॥
नमस्कार करीं । सीते ! इज ४८
चवदा वर्षांनीं । सुखरूपपणीं ॥
जननी फिरूनी । देखिली ही ! ४९
हेंच नंदिग्राम ! भरताचें धाम ॥
विमान विश्राम । पावो येथें" ५०
इच्छा अशी होतां । श्रीरामाच्या चित्ता ॥
यान तेथें आतां । उतरलें ५१

## नंदिग्रामीं भरताची भेट

इकडे भरत । अती उत्कंठीत ॥
प्रतीक्षा करीत । श्रीरामाची ५२
जटाधारी दीन । वल्कलें नेसून ॥
भरत आपण । बैसलासे ५३
मंत्रिही सगळे । वल्कलें नेसले ॥
आश्रमीं राहिले । जितेंद्रिय ५४
वर्षं चतुर्दश । झालीं आज खास ॥
तरी कां रामास । दया नये ? ५५
केव्हां रघुवीर । भेटे हीच घोर ॥
भरताला थोर । चिंता लागे ५६
तंव इतुक्यांत । राम विमानस्थ ॥
भरता लागत । दिसावया ! ५७
मग भरतास । हर्ष होय त्यास ॥
वर्णाया कोणास । बळ आहे ? १७५८
तत्काळ धावूनी । त्यानें रामचरणीं ॥

मिठी दृढपणीं । घातीयेली ! १७५९
रामेंही आपण । त्यासी उचलून ॥
दिलें आलिंगन । प्रेमभरें ६०
लक्ष्मण मारुती । सुग्रीव भूपती ॥
सर्वही भेटती । भरताला ६१
राजा बिभीषण । तो सुद्धां उठून ॥
देई आलिंगन । भरतासी ६२
आनंदी आनंद । सर्वां अत्यानंद ॥
झाला या सुखद । प्रसंगानें ६३
तशाच सुखांत । सोडूनी हें येथ ॥
जाऊं अयोध्येंत । पुढें आम्ही ! ६४
युद्धकांड सरतें । जहालें आतां तें ॥
ग्रंथसार येथें । हातां आलें १७६५

युद्धकांड समाप्त

# उत्तरकांड

## श्रीरामाच्या स्वागताची तयारी

कायहो ! सगळी । अयोध्या ये वेळीं ॥
आज शृंगारिली । पौरजनीं ! १
केशराचे सडे । दिले चहूंकडे ॥
गंध सारीकडे । पसरला २
तोरणें सुंदर । ध्वज मनोहर ॥
पहा ! घरोघर । दिसताती ! ३
लाह्या पुष्पें किती । पहा ! रस्तोरस्तीं ॥
पौर उधळीती । आनंदानें ४
श्रीरामागमन । होणार म्हणून ॥
तयारी संपूर्ण । दिसते ही ! ५
पहा ! सेनापती । प्रधान हे जाती ॥
सामोरे पुढतीं । श्रीरामाला ६
बाल वृद्ध थोर । सर्व नारीनर ॥
चालती सत्वर । त्यांच्यामागें ७
कोणी रथावरी । कोणी अश्वावरी ॥
कोणी गजावरी । आरूढती ८
तारो कडाडती । नगारे झडती ॥
शंख भुं भुं करिती । चहूंकडे ९
मृदंग पणव । दुंदुभींचा रव ॥
क्षुब्ध करी सर्व । गगनाला १०

## श्रीरामाचें स्वागत

अशा या थाटांत । जनते सीमान्त ॥
जातां रघुनाथ । दृष्टी पडे ११

हर्षाची आरोळी । लोकांनीं दिधली ॥
तेणें दणाणली । पृथ्वी सर्व ! १२
"स्वागत ! स्वागत ! । श्रीरामा ! स्वागत !" ॥
असे शब्द होत । चहूंकडे १३

## रामचंद्राची अयोध्येंतून मिरवणूक

मग पौरजन । श्रीरामा आपण ॥
राजमार्गांतून । मिरविती १४
अंगद सुग्रीव । कपी श्रेष्ठ सर्व ॥
चालती राघव-। रथापुढें १५
अश्व-रज्जू हातीं । धरूनीयां रथीं ॥
वसे रामापुढती । भरत तो ! १६
लक्ष्मण शत्रुघ्न । राजा बिभीषण ॥
करिती रक्षण । रामदेह १७
चारीहि बाजूंनीं । दुतर्फा रांगांनीं ॥
रस्ते प्रेक्षकांनीं । चिकारले १८
मंगल वाद्यांचा । मंगल गीतांचा ॥
घोष तो जोराचा । चालू झाला १९
गंधाक्षता थोर । पुष्पें मनोहर ॥
रामरथावर । कोसळती ! २०
सुवासिनी नारी । स्वर्णपात्रें करीं ॥
ओंवाळीती हारीं । श्रीरामाला २१
" धन्य ! धन्य ! धन्य ! । राजाराम धन्य !" ॥
ध्वनी ऐसा होय । जेथें तेथें २२

## रामचंद्राचा गृहप्रवेश

शेवटीं वेंचक । मंडळी एकेक ॥
शिरली निःशंक । राजद्वारीं २३
तेथें राजमाता । कौसल्यादि आतां ॥

भेटल्या समस्तां । निजपुत्रां २४
ते सुग्रीवादिक । कपीही ओळख ॥
पावले प्रमुख ॥ मंडळींशीं २५
राजा बिभीषण । सर्वत्र सन्मान ॥
आपुला पाहून । संतोषला २६
मग आनंदांत । दैत्यकपी तेथ ॥
अयोध्यापुरींत । स्थिरावले २७

## रामराज्याभिषेक

पुढें श्रीरामाला । शुभमुहूर्ताला ॥
यथाविधी झाला । अभिषेक २८
ब्रह्मर्षी राजर्षी । देवर्षी महर्षी ॥
सर्व अयोध्येसी । प्राप्त झाले २९
असंख्य भूपाळ । सुर लोकपाळ ॥
पातले सकळ । हेही तेथें ३०
दिव्य अहेरांची । वा नजराण्यांची ॥
गर्दी कमालीची । रामा झाली ३१
रामेंहि आपण । अगणीत धन ॥
वेंचूनीयां जन । तृप्त केले ३२
"शाबास ! शाबास ! । धन्य ! श्रीरामास !" ॥
हा दशदिशांस । नाद झाला ३३
ऋषी सुरपती । भूपहि स्वचित्तीं ॥
यश वाखाणीती । राघवाचें ३४

## पाहुण्यांचें प्रयाण

मग बिभीषण । तेथें कांहीं दिन ॥
राहूनी प्रयाण । लंके करी ३५
ते सुग्रीवादिक । कपीहि प्रमुख ॥
गेले एक एक । निजधामीं ३६

फक्त हनुमान । अयोध्ये राहून ॥
करी विलोकन । रामराज्य ३७

## रामराज्य

रामराज्य होतां । पृथ्वीवरी आतां ॥
लोकांस समस्तां । सुख झालें ३८
भूमी धान्ययुक्त । वृक्ष फलयुक्त ॥
होऊनी रहात । सर्वकाळीं ३९
अपमृत्यु व्याधी । बालवैधव्यादि ॥
नव्हत्या उपाधी । लोकांमध्यें ४०
जन हृष्टपुष्ट । निजधर्मनिष्ठ ॥
तेजस्वी बलिष्ठ । सारे होते ४१
चोर किंवा जार । दुष्ट बळजोर ॥
नव्हता भूवर । कोणी सुद्धां ४२
दीर्घायु संतती । अपार संपत्ती ॥
रामराज्यीं होती । प्रत्येकाला ४३

## सीतात्याग

परंतु सुखांत । या रामराज्यांत ॥
पुढें अकस्मात । विघ्न आलें ४४
"रावण तो सीता । लंकेसी ठेवितां ॥
राम कसा आतां । स्वीकारी ती?" ४५
अशी निंदा थोर । रामाची दुर्धर ॥
सर्व जगभर । चालू झाली!! ४६
तेव्हां रघुपती । लक्ष्मण-हस्तीं ॥
सीता गर्भवती । वनीं टाकी! ४७
बिचारी रडत । जातां वनीं तेथ ॥
वाल्मीकि भेटत । तिजलागीं ४८
वाल्मीकिऋषींनीं । सीता रामपत्नी ॥
रडतां पाहूनी । गृहीं नेली ४९

तेथें दोन जुळे । पुत्र तिला झाले ॥
लवकुश भले । म्हणती त्यां ५०

## श्रीरामाचा यज्ञ व पुनर्मीलन

बहुत दिवस । होतां या गोष्टीस ॥
यज्ञ अयोध्येस । रामें केला ५१
त्या यज्ञामधून । सीतापुत्र दोन ॥
'गायक' म्हणून । ख्यात झाले ५२
"रामायण-गीत । उत्कृष्ट गातात" ॥
अशी कीर्ति होत । कुमारांची ५३
मग श्रीरामांनीं । कुमार ते दोनी ॥
नेले बोलावूनी । सभेमध्यें ५४
तेथें रामायण । गातां ते संपूर्ण ॥
श्रोते सुप्रसन्न । सर्व झाले ५५
तेव्हां ती साधूनी । संधि वाल्मीकींनीं ॥
पुत्र दिले दोनी । रामा हातीं ५६
जानकीहि पूर्ण । निर्दोष म्हणून ॥
शपथ वाहून । रामा दिली ५७

## सीतेचें दिव्य व भूप्रवेश

परी जानकीनें । पुन्हां दिव्य करणें ॥
हट्ट श्रीरामानें । धरिला हा!! ५८
त्या हट्टें ती सीता । पुन्हां दिव्य होतां ॥
भूमी अवचितां । दुभंगली ५९
आणखी साक्षात । भूदेवीच तेथ ॥
सीता करी गुप्त । निजोदरीं!! ६०
हाहाःकार झाला । त्रैलोक्यीं सगळा ॥
गाळाया लागला । अश्रु जो तो ६१
रामाचेंहि मन । आतां कंटाळून ॥
वैकुंठीं प्रयाण । करूं इच्छी! ६२

## श्रीरामाचें अयोध्येसह वैकुंठीं प्रयाण

सुमित्रा कौसल्या । कैकयादि होत्या ॥
आधींच जहाल्या । स्वर्गवासी ६३
लक्ष्मणें आपण । समाधी लावून ॥
शेषरूपीं लीन । काया केली ६४
भरत शत्रुघ्न । पुत्रां राज्यदान ॥
करूनी प्रयाण । करूं आले ६५
सुग्रीवादि थोर । कपीहि सत्वर ॥
जहाले तयार । प्रयाणाला ६६
राजा बिभीषण । सुद्धां दैत्यगण ॥
घेऊनी प्रयाण । करूं आला ६७
अयोध्या नगरी । तर जाया सारी ॥
एका पायावरी । सिद्ध झाली! ६८
बालवृद्ध थोर । सर्व नारीनर ॥
"न्या! न्या! बरोबर" । ओरडती ६९
रामें हनुमान । आणि बिभीषण ॥
ठेविले मागून । चिरंजीव ७०
आणि बाकीच्यांना । झाडूनी सर्वांना ॥
वैकुंठभुवना । सर्व नेलें!! ७१
अयोध्या सगळी । ओस ही जी झाली ॥
ती पुन्हां भरिली । ऋषभानें! ७२

उत्तरकांड समाप्त

# श्रीरामायणनिरीक्षण

## प्रास्ताविक विचार

झाली ! कथा झाली ! । पुरी ही सगळी ॥
संक्षेपें या स्थळीं । श्रीरामाची ! १
असेल विस्तृत । ती मूळ काव्यांत ॥
प्राकृत ग्रन्थांत । त्याचेहूनी २
परंतु विस्तार । कथेचा अपार ॥
व्हावा हा विचार । नसे येथें ! ३
आबालवृद्धांस । ठाउक्या सर्वांस ॥
वर्ण्य या स्थळास । त्याच व्यक्ती ४
आणखी कथाही । ऐकिल्या सर्वांहीं ॥
वर्णिल्या ये ठायीं । तेवढ्याच ! ५
आतां 'वर्णनीय' । भाग पुरा होय ॥
तेव्हां 'चिंतनीय' । भाग पाहूं ६
कथा ज्या अनेक । वर्णिल्या बोधक ॥
चिंतन नावेक । त्यांचें करूं ७
तसाच ग्रंथांत । 'आत्मा' जो अव्यक्त ॥
त्याचा चिंतनांत । ठाव घेऊं ८
कारण चिंतन । श्रेष्ठ सर्वांहून ॥
नुसतें वर्णन । गौण आहे ! ९
वर्णन प्रेमळ । असू द्या रसाळ ॥
परी तें विफळ । 'तत्त्वा'वीण १०
जरी नवरस । येती वर्णनास ॥
तरी तें निरस । 'ध्येया' वीण ११

म्हणूनीयां आतां । चित्तएकाग्रता ॥
करूनी तत्त्वार्थी । ग्रंथीं पाहूं १२
सर्व रामायण । संक्षेपेंकरून ॥
करूं निरीक्षण । येथें आतां ! १३

## श्रोत्यांस विनंती

प्रथम निक्षून । श्रोतयांकारण ॥
सांगणें या तीन । गोष्टी आम्हां १४
कोणालाच कांहीं । बोधाया लवही ॥
अधिकार नाहीं । आम्हांपाशीं १५
दुसरें, विद्वत्ता । किंवा बुद्धिमत्ता ॥
आम्हांठायीं स्वतां । थोडी आहे १६
तेव्हां विचारांचे । वा कोटिक्रमांचे ॥
दुर्ग रचायाचे । नाहीं येथें १७
अथवा निश्चीत । देऊं कांहीं मत ॥
हीहि आशा व्यर्थ । करूं नये ! १८
अती लीनतेनें । विद्यार्थीवृत्तीनें ॥
परी स्पष्टपणें । बोलूं आम्ही १९
तिसरें, आम्हांस । प्रेम या ग्रंथास ॥
अत्यंत मनास । वाटतसे २०
काव्यमय मन । नसतां साधन ॥
इतुकें वर्णन । आम्हीं केलें २१
याहूनी पुरावा । ये अर्थी बरवा ॥
नलगे सांगावा । कोणालाही २२
रुचिभिन्नत्वानें । वा दृष्टीभेदानें ॥
मतभेद होणें । शक्य आहे २३
परी नास्तिक्याचा । कीं वावदुकीचा ॥
आरोप फुकाचा । करूं नका ! २४

## रामायणाकडे पहाण्याच्या द्विविध दृष्टी

असो; ज्या दृष्टीनें । ग्रंथ हा पहाणें ॥
तेंचि स्पष्टपणें । सांगूं आतां २५
कोणी म्हणतात । "ग्रन्थ हा कल्पीत ॥
मनोरंजनार्थ । रचिलेला २६
भाकड कथांचा । अशक्य गोष्टींचा ॥
सुकाळ गप्पांचा । यांत आहे २७
कादंबऱ्या ज्यास । रुचती मनास ॥
त्यानें या ग्रंथास । हातीं घ्यावें !" २८
दुजे म्हणती कोणी । "ग्रन्थ वाल्मीकींनीं ।
ठेविला लिहूनी । रामाआधीं २९
यांत जें लिहिलें । पूर्वींच सगळें ॥
श्रीराम वर्तले । तैशापरी ३०
सारांश पूर्वींचा । ग्रंथ हा आधींचा ॥
जन्म श्रीरामाचा । मागाहूनी ३१
तेव्हां जें अक्षर । आहे ग्रंथावर ॥
तें प्रतिअक्षर । सत्य आहे ३२
अन्यथा जे कोण । बोलती याहून ॥
नास्तीक दुर्जन । जाणावे ते !!" ३३
या दुज्या पक्षाचें । आणखी मुद्द्याचें ॥
मत महत्त्वाचें । एक आहे ३४
"कथा रामायणीं । वर्णिल्या ऋषींनीं ॥
सर्व त्या योजूनी । देवादिकां ! ३५
रामप्रभु तर । अर्थात ईश्वर ॥
बाकीही वानर । देव सारे ३६
आणि ते दानव । नव्हते जे देव ॥
तेहि होते सर्व । अमानुष ! ३७
तेव्हां या सर्वांच्या । कथा नवलाच्या ॥

फक्त गावयाच्या । मुखीं आम्हीं ३८
यांतचि जें पुण्य । लागे असामान्य ॥
तेणें होऊं धन्य । परलोकीं " ३९
म्हणणें मुद्द्याचें । दोन्हीही पक्षांचें ॥
दिलें महत्त्वाचें । सर्व येथें ४०
परंतु हे दोनी । पक्ष दोंबाजूंनीं ॥
मिळती येऊनी । एकत्रचि ४१
दोघांचेंही मत । या रामायणांत ॥
व्यवहार्य अर्थ । कांहीं नाहीं ! ४२
असेल सुरेख । नीतिग्रंथ एक ॥
याहूनी अधिक । मोल नाहीं ! ४३

## रामायणाकडे पहाण्याची आमची दृष्टी

आतां जें दिसतें । स्वतःच्या दृष्टीतें ॥
स्पष्टपणानें तें । सांगूं आम्ही ४४
वाक्यानेंच एक । म्हणूं या निःशंक ॥
"हें ऐतिहासीक । काव्य आहे !" ४५
इतिहास खरा । परी आहे पुरा ॥
वर्णिलेला सारा । काव्यमय ४६
सत्तत्व परम । काव्य मनोरम ॥
यांचा तो संगम । येथें आहे ४७
अर्थात शकांचा । अथवा मित्यांचा ॥
घोटाळा कशाचा । यांत नाहीं ४८
येथून तेथून । सत्काव्यजीवन ॥
धों धों धों करून । वहातसे ४९
तें अर्थगांभीर्य । तें भाषासौंदर्य ॥
पहातां आश्चर्य । चित्ता वाटे ५०
रम्य अलंकार । काव्यचमत्कार ॥
ग्रंथीं भरपूर । आढळती ५१

नवरस येत । दृष्टीस साक्षात ॥
या महाकाव्यांत । पदोपदीं ५२
आणि विलक्षण । या सर्वांहीहून ॥
आहे एक गुण । याचेमध्यें ५३
हा काव्येतिहास । बैसवीला खास ॥
कोंदणीं सरस । अध्यात्माच्या ५४
आध्यात्मिक ज्ञान । प्रवृत्तीलक्षण ॥
आहे मूळांतून । ग्रंथामध्यें ५५
वेदान्त सगळा । प्रवृत्तिमार्गाला ॥
धरूनी दाविला । प्रत्यक्षत्वें ! ५६
म्हणूनीच पूर्ण । जग रात्रंदिन ॥
जातसे मोहून । ग्रंथानें या ५७
म्हणूनीच अती । या ग्रंथावरती ॥
उड्या पडताती । सज्जनांच्या ५८
जों जों या ग्रंथांत । जावें आंत आंत ॥
तों हर्ष अभूत । चित्ता वाटे ५९
नाहीं दुजीकडे । ऐसेंच रोकडें ॥
सत्तत्त्व सांपडे । याच्यामध्यें ६०
ज्यासाठीं सकळ । जीवां तळमळ ॥
त्या वस्तूचें मूळ । येथें दिसे ६१
तेव्हां शांतचित्तें । अशा या ग्रंथातें ॥
करूं या आतां तें । निरीक्षण ६२

## रामायणनिरीक्षणाचे तीन भाग

या निरीक्षणाचे । वा अध्ययनाचे ॥
करूं या सोईचे । तीन भाग ६३
प्रथमीं प्रमुख । विभूती एकेक ॥
घेऊनी बोधक । चर्चा करूं ६४

त्या त्या विभूतींचे । गुण महत्त्वाचे ॥
ठेवूं या आमुचे । दृष्टीपुढें ६५
मग त्यानंतर । व्यापक विचार ॥
करूनी समग्र । ग्रंथ शोधूं ६६
रामरावणांचें । कर्तृत्व दोघांचें ॥
तोलूं रहस्याचें । दृष्टीनेंच ६७
अवतारकारण । मुळांत शोधून ॥
करूं विवरण । कार्याचेंही ६८
हें झाल्या समाप्त । मग या कथेंत ॥
शोधूं मूलभूत । तत्त्व कांहीं ६९
ज्या अध्यात्मावर । हा कथाविस्तार ॥
त्याला थोडा फार । स्पर्श करूं ७०
कथेचें रहस्य । जेणें स्पष्ट होय ॥
पाहूं ऐशी सोय । कांहीं तरी ७१

भाग पहिला

## निरीक्ष्य विभूती १ महात्मा दशरथ

आतां जी विभूती । ये दृष्टीपुढतीं ॥
तो हा पृथ्वीपती । दशरथ ७२
महात्मा राजर्षी । पुत्र न पोटासी ॥
म्हणूनि मानसीं । खिन्न बहु ७३
पट्टराण्या तीन । परंतु त्यांतून ॥
कोणाहि संतान- । लाभ नाहीं ७४
तेव्हां सुहृदांनीं । सहाय होऊनी ॥
केला त्याकडोनी । इष्ट यज्ञ ७५
यज्ञ सांग झाला । अग्नी संतोषला ॥
प्रसाद दिधला । निजहस्तें ७६
रायें सुप्रसन्न । प्रसाद घेऊन ॥
दिधला वांटून । तिन्ही राण्यां ७७

पुत्रलाभआस । लागतां मनास ॥
जहाला तिघींस । अत्यानंद ७८
परि इतुक्यांत । घार एक नेत ॥
भाग अकस्मात । कैकेयीचा ! ७९
कैकेयी कोपली । मनीं कष्टी झाली ॥
ढळढळां लागली । रडावया ८०
मग कौसल्येनें । तसे सुमित्रेनें ॥
दिले संतोषानें । अर्ध भाग ८१
एक कौसल्येला । एक सुमित्रेला ॥
दोन कैकेयीला । भाग झाले ८२
कौसल्येचे पोटीं । राम जगजेठी ॥
सुमित्रेचे पोटीं । लक्षुमण ८३
कैकेयी आपण । पुत्र दोघेजण ॥
भरत शत्रुघ्न । प्रसवली ८४
इकडे ती घार । उडतांना वर ॥
भाग भूमीवर । पडीयेला ८५
वरूनी सुटला । प्रसाद सगळा ॥
मुखांत पडला । अंजनीच्या ८६
अंजना वानरी । प्रसादाचे थोरीं ॥
प्रसवे उदरीं । मारुतीला ८७
राम लक्षुमण । भरत शत्रुघ्न ॥
वीर हनुमान । जन्मा आले ! ८८
अशी या पांचांची । पीठिका जन्माची ॥
दिली नवलाची । ग्रंथांतरीं ८९
थोडासा फरक । असेल शाब्दीक ॥
परी अर्थ एक । स्पष्ट आहे ९०
या पांच विभूती । विशिष्ट कार्यार्थी ॥
या जगावरती । अवतरल्या ९१

कार्य होतें त्यांचें । अती महत्त्वाचें ॥
जें न साधायाचें । सामान्यांना ९२
आणि त्या कार्यांत । हे सर्व मदत ॥
सुयशप्राप्त्यर्थ । हवे होते ९३
येवढें यांतून । तात्पर्य घेऊन ॥
जाऊं या आपण । पुढें आतां ९४

## दशरथाची पुत्रप्रीति

पुढें विश्वामित्र । दशरथ पुत्र ॥
श्रीराम सौमित्र । नेऊं आले ९५
राव कष्टी झाला । पुत्र धाडायाला ॥
वियोगें पोळला । मनामध्यें ९६
हा तों पुत्रमोह । वृद्धांसी दुःसह ॥
होय निःसंदेह । सर्व काळीं ९७
ही सुपुत्रप्रीति । सामान्य जगतीं ॥
विशिष्ट नव्हे ती । दशरथा ९८

## दशरथाचें बहुपत्नीत्व

याच प्रीतीमुळें । पुढें राज्य भलें ॥
रायें ठरवीलें । रामासाठीं ९९
तयारी सगळी । कडेकोट झाली ॥
परी मार्गीं आली । धोंड एक १००
बहुभार्याप्राप्त । दारुण अनर्थ ॥
लागला पुढयांत । दिसायाला १
कैकेयीनें डाव । साधूनी अपूर्व ॥
नृप-बेत सर्व । ढांसळीला २
'राज्य भरतास । रामा वनवास' ॥
हेचि वर तीस । हवे झाले ! ३
असेल ती खाष्ट । कैकेयी गर्विष्ठ ॥
अती दुष्ट नष्ट । मनामध्यें १०४

परी या इच्छेंत । तिच्या तें अद्भुत ॥
जगा विपरीत । काय होतें ? १०५
या सुज्ञ राजानें । कां दशरथानें ॥
करावीं हीं लग्नें । बहुविध ? ६
असाच तो प्रश्न । विचारील मन ॥
सर्व रामायण-। वाचकांचें ७
आम्हां या प्रश्नाचें । निःशंकपणाचें ॥
उत्तर खात्रीचें । देतां नये ८
एकपत्नीव्रता । तेव्हांही मान्यता ॥
होती लोकमतां । निःसंशय ९
हेंचि श्रेष्ठ व्रत । श्रीरामगुणांत ॥
प्रमुख गणीत । सर्व लोक १०
परी दशरथें । तरी अनेकींतें ॥
कां वरावें ? येथें । प्रश्न आहे ११
स्त्रीजातितुच्छता । कीं भोगलुब्धता ॥
आम्हांला न स्वतां । दिसे यांत १२
कारण सर्वत्र । स्त्रिया मानपात्र ॥
मानिती पवित्र । तेव्हां सुद्धां १३
आणि धीरोदात्त । नृप भोगासक्त ॥
व्हावा हेंही येथ । संभवेना ! १४
बाष्कळ विचार । उच्चार आचार ॥
नव्हता प्रचार । यांचा तेव्हां १५
शुद्ध सत्त्वगुणी । लोक आत्मज्ञानी ॥
उदात्तवर्तनी । सर्व होते १६
तेव्हां या लोकांचा । राजा मान्यतेचा ॥
दास विषयांचा । होणें नाहीं १७
एकचि उत्तर । सुचतें यावर ॥
देऊनी तें दूर । प्रश्न सारूं ११८

" पुत्रावीण व्यर्थ । जन्म " ही आर्यांत ।
कल्पना प्रसृत । पूर्वींहूनी ११९
तशांत राजांचे । श्रेष्ठकुलजांचे ॥
विचार तेव्हांचे । भिन्न होते २०
स्वकुलाभिमान । हा तों मुख्य गुण ॥
येतसे दिसून । सर्वां ठायीं २१
अर्थात स्वकुल- । वृद्ध्यर्थ प्रबळ ॥
पुत्रेच्छा सकळ । राजां लागे २२
आणि या चालीस । बहुपत्नीत्वास ॥
हीच इच्छा खास । मुळीं दिसे २३
परंतु हा प्रश्न । तसाच सोडून ॥
जाऊं या आपण । पुढें आतां २४

## दशरथाची वचनबद्धता

आतां हें वेधक । हृदयभेदक ॥
दृश्य भयानक । दिसूं लागे २५
सुप्रभात झाली । अयोध्या सगळी ॥
आज शृंगारीली । पौरजनीं २६
जन असंख्यात । आनंदभरीत ॥
जमले समस्त । राजद्वारीं २७
हजारों हजार । हर्षांचे उद्गार ॥
कर्णपथावर । आदळती २८
परी या हर्षांत । राजमंदिरस्थ ॥
काय हा अनर्थ । दिसे पहा ! २९
राय दों हातांनीं । नयन झांकूनी ॥
पडला शयनीं । हतबुद्ध ३०
कैकेयी पापीण । मुर्वत सोडून ॥
हर्षक्रोधपूर्ण । पाहताहे १३१
श्रीराम अंजली । जोडूनी आपुली ॥

सोत्कंठ जवळी । उभा आहे १३२
लक्ष्मण संतप्त । रागानें पिचत ॥
राहिला तिष्ठत । मुरडोनी ३३
मंत्री घाबरूनी । सर्व दीनवाणी ॥
पहाती दुरूनी । कैकेयीसी ! ३४
रामप्रतिज्ञेचा । कैकेयीवराचा ॥
उच्चार केव्हांचा । झाला आहे ३५
अशांत जी स्थिती । दशरथाची होती ॥
वर्णावी एक ती । वाल्मीकींनीं ! ! ३६
फक्त असंमती ! । त्यानें द्यावी होती ॥
अप्रत्यक्षत्वें ती । वरदाना ३७
तत्काळ तो सारा । आशेचा डोलारा ॥
कैकेयीचा पुरा । ढांसळता ! ! ३८
परी महात्म्यास । या दशरथास ॥
सोसेना मनास । तेवढेंही ! ३९
देवदानवांत । युद्धें झालीं त्यांत ॥
साह्य दशरथ । इंद्रा झाला ४०
कैकेयी ती शूर । रणांगणावर ॥
राजाबरोबर । तेव्हां होती ४१
रथाचा लढतां । कणा अवचितां ॥
मोडे दशरथा । न कळोनी ४२
परी कैकेयीनें । तत्क्षणीं शौर्यानें ॥
पतीस शर्तीनें । वांचवीलें ४३
कोमल स्वहस्त । घालूनी कण्यांत ॥
चालू केला रथ । रणांगणीं !! ४४
राजा संतोषला ! । शौर्यें धन्य झाला ॥
प्रसाद बोलला । दोन वर १४५
त्या दोन वरांस । भोळ्या प्रतिज्ञेस ॥

आज हा स्वतांस । बद्ध मानी ! १४६
देहान्ताचा काळ । येतांही जवळ ॥
प्रतिज्ञा ती फोल । करवेना ४७
प्राणांचाही प्राण । श्रीराम टाकून ॥
जातां तें वचन । मोडवेना । ४८
शब्द मोडवेना । "जा" ही म्हणवेना ॥
लागे पंचप्राणा । तळमळ ४९
युक्तता वादार्थी । कीं शहाण्या स्वार्थी ॥
बापुडा नव्हता । परीचीत ५०
'पुष्कळांचें हित' । 'पुष्कळांचें हित' ॥
हेंहि तों माहीत । नव्हतें त्याला ५१
शब्द पाळायाला । द्यावें सर्वस्वाला ॥
एवढेंच त्याला । ठावें होतें ५२
धन्य ! धन्य ! धन्य ! । दशरथा धन्य ! ।
सत्य असामान्य । कृत्य तुझें ५३
बा ! तुझेसमान । नृप सत्यधन ॥
घ्यावेत पाहून । आर्यांतची ५४
आर्यांनींच एक । शब्द बेअटक ॥
बोलूनी अचूक । पाळावे ते ! ५५
इतरां हें कार्य । योग्य कीं अयोग्य ॥
याचाही निर्णय । होणें नाहीं ५६
त्यांच्या दृष्टीपुढां । दशरथ बापुडा ॥
अविचारी वेडा । ठरायाचा ! ५७
आध्यात्मिक ज्ञान । खेळे रक्तांतून ॥
त्यालाचि वर्तन । कळेल हें ५८

## अयोध्यावासीयांचें रामावरील प्रेम

असो; पुढें आतां । राम वना जातां ॥
आला दशरथा । दुःखपूर १५९

त्या दुःखावेगाचें । वर्णन ग्रंथींचें ॥
पहावें मुळींचें । पुनरपी १६०
शोक तो यथार्थ । वर्णावया तेथ ॥
वाल्मीकींनीं शर्थ । केली आहे ! ६१
परी लोकप्रीति । रामीं ही जी होती ॥
आम्हांला भासे ती । निराळीच ! ६२
कारण इतर । प्रेमांहूनी फार ॥
हिचा तो प्रकार । भिन्न आहे ६३
एक तर यांत । जगा विपरीत ॥
उत्कटता ज्यास्त । स्पष्ट दिसे ६४
पितर वत्सल । वा बंधु प्रेमळ ॥
जगीं असतील । कोट्यवधी ६५
परी या तऱ्हेचा । जिव्हाळा तयांचा ॥
नाहीं दिसायाचा । कोठेंसुद्धां ६६
हजारों राजांनीं । पाळिली मेदिनी ॥
असेल खर्चूनी । सर्वस्वाला ६७
परी या तऱ्हेचें । प्रेम तें प्रजेचें ॥
नाहीं मिळायाचें । कोणालाही ६८
परंतु लौकीक । वा औपचारीक ॥
नाहींच हें एक । प्रेम मुळीं ६९
ईश्वरी तेजाचें । दिव्येच्छाशक्तीचें ॥
हें तों सहजींचें । कार्य आहे ! ७०
ईश्वरावतार । होती जे भूवर ॥
आकर्षण थोर । त्यांचे अंगीं ७१
नुसत्या दर्शनें । खेंचिती ते मनें ॥
अत्यंत वेगानें । त्रैलोक्याचीं ७२
त्यांची हालचाल । वा शब्द रसाळ ॥
करी खळबळ । जगामध्यें १७३

कोणा मित्रभाव । कोणा शत्रुभाव ॥
वाटेल अपूर्व । त्याचे ठायीं १७४
परी जें वाटेल । दृढ तें असेल ॥
कदापी नसेल । डळमळीत ७५
काकतालीयाचा । कीं उपचाराचा ॥
भाग नसायाचा । त्यांत कधीं ७६
प्रेम किंवा वैर । जडे जें त्यावर ॥
जाय तें अंतर । भेदोनीयां ७७
अशाच तऱ्हेची । कांहींशी आतांची ॥
स्थिती अयोध्येची । झाली होती ७८
श्रीराम चालला । ऐकतां वार्तेला ॥
हाहाःकार झाला । अयोध्येसी ७९
झाडूनी सगळे । जन गोळा झाले ॥
वनांत चालले । रामासवें ८०
सर्व नारीनर । बाल वृद्ध थोर ॥
रामाबरोबर । चालू झाले ८१
मथुरे श्रीकृष्ण । निघतां आपण ॥
गोकुळ संपूर्ण । शून्य झालें ८२
तसाच प्रकार । राजा रघुवीर ॥
सोडितां नगर । येथें झाला ८३
अक्रूराभोंवतीं । गोपी गोळा होती ॥
तशीच ती स्थिती । येथें झाली ८४
सुमंता वेढूनी । सर्व दीनवाणी ॥
'थांब! थांब!' म्हणूनी । आक्रंदती ८५
'नको रे! वनास । नेऊं राघवास' ॥
सर्व कासावीस । विनवीती ८६
परी या मोहांत । सांपडतां येथ ॥
विघ्न प्रतिज्ञेत । येऊं पाहे १८७

म्हणूनी तयानें । पवनवेगानें ॥
रथ रामाज्ञेनें । हांकवीला १८८
धडाडां वाजत । लोकांतूनी रथ ॥
चालला वनांत । नैष्ठुर्यानें ८९
बापुडे पादाती । मट्कन बैसती ॥
पळूं न शकती । रथासवें ९०
'सुमंता ! सुमंता !' । या हाका मारितां ॥
कंठशोष आतां । त्यांना झाला ९१
रथधूलीकण । दिसे तो दुरून ॥
सर्वही बेभान । ओरडती ९२
दशरथा तर । वार्ता कानांवर ॥
येतां श्रम थोर । चित्ता झाला ९३
आहों कोण्या स्थळा । जाणें कोण्या स्थळा ॥
हेंहि कांहीं त्याला । उमजेना ९४
दृष्टी राममय । मन राममय ॥
जग राममय । सर्व झालें ९५
मीनसा लोळत । 'राम ! राम !' म्हणत ॥
बापुडा मृत्यूंत । लीन झाला !! ९६
कोणी कांहीं म्हणा । आमुच्या नयना ॥
हा कांहीं दिसेना । पुत्रमोह ! ९७
आधीं या रीतीनें । स्वपुत्रमोहानें ॥
कोणा मृत्यु येणें । सोपें नाहीं ९८
आणि दशरथीं । आत्मज्ञान्याचित्तीं ॥
तर हें निश्चितीं । असंभाव्य ९९
शिवाय याहून । आहेच कठीण ॥
प्रेमाचा तो प्रश्न । अयोध्येच्या ! २००
स्वनृपीं अत्यंत । निष्ठा पौर्वात्यांत ॥
असते तयांत । शंका नाहीं २०१

गोष्टी राक्षसांच्या । रावणनिष्ठेच्या ॥
वर्णिल्या आमुच्या । वाणीनेंच २०२
परि त्या निष्ठेंत । आणि या प्रेमांत ॥
अंतर खचित । थोर आहे ३
दोन्ही तुलनेनें । पाही सूक्ष्मपणें ॥
त्याला हें कळणें । आपोआप ४

### या मुद्द्यावर विस्तार कां केला ?

आम्हीं या मुद्द्यांत । विस्तार बहुत ॥
केला आहे त्यांत । एक हेतु ५
ईश्वरावतार । लौकर होणार ॥
असा घोष फार । चालू आहे ६
सामान्य व्यक्तींत । ईश्वर संभूत ॥
होणार म्हणत । याजपुढें ७
कांहींच ज्या तेज । दिसेना तें आज ॥
तोचि देवकाज- । कर्ता बने! ८
होईल होईल । तसेंही होईल ॥
आग्रह तो तिळ । आम्हां नाहीं ९
मात्र स्पष्टपणें । आम्हांला मांडणें ॥
विभूतीवर्णनें । पौराणीक १०
राम यदुवीर । मुख्य अवतार ॥
झाले जगावर । आजवरी ११
परी यांचा आधीं । सर्व जगामधीं ॥
डांगोरा तो कधीं । झाला नाहीं १२
सर्वचि जीवन । बालपणाहून ॥
सुतेजसंपन्न । यांचें होतें १३
असतांना बाळ । अयोध्या गोकुळ ॥
स्वप्रेमविव्हळ । यांनीं केलें २१४
आणि मोठेपणीं । जगा गवसणी ॥

घातली दोघांनीं । सामर्थ्यानें २१५
एवढें ठेवून । चित्तांत स्मरण ॥
जाऊं या आपण । पुढें आतां १६

## निरीक्ष्य विभूती २ भगवती सीतादेवी

दुसरी विभूती । ये दृष्टीपुढतीं ॥
आतां भगवती । सीतादेवी १७
कोणी म्हणतात । कृष्णावतारांत ॥
व्याप तो विस्तृत । भगवंतांचा १८
तेव्हां रघुवीर । हा अंशावतार ॥
तो पूर्णावतार । वासुदेव १९
असो कांहींहि तें । परी या सीतेतें ॥
तुल्य भारतीं तें । कोणी नाहीं ! २०
ही जगज्जननी । पूर्णांशें जन्मूनी ॥
गेली उद्धरूनी । जगत्त्रय २१
तिच्या त्या अनंत । गुणसागरांत ॥
पातिव्रत्य होत । मुख्य गुण २२
आर्यपतिव्रता- । आदर्श धुंडीतां ॥
सीताच मुख्यतां । दृष्टी पडे २३
सतीत्व तें काय । याचा तो निर्णय ॥
हिचेंचि चारित्र्य । लावील तें २४
आर्यभगिनींनीं । सुनम्रभावांनीं ॥
चारित्र्यचिंतनीं । चित्त द्यावें २५

### सीतेचें जन्म व बाळपण

जनक यज्ञार्थी । भूमी नांगरीतां ॥
सांपडे ही सीता । भूगर्भांत २६
या कथेमधून । जन्माच्या आपण ॥
करूं या ग्रहण । पूर्वोक्तचि २२७

ही दिव्य विभूती । प्रचंड कार्यार्थी ॥
या जगावरतीं । अवतरली २२८
अतिमहत्त्वाचें । कार्य होतें हिचें ॥
जें न साधायाचें । सामान्यांना २९
अर्थात जन्माचें । नियम सृष्टीचे ॥
ढिले झाले हिचे । बाबतींत ३०
पुढें बाळपणीं । जनकसदनीं ॥
करी ही करणी । अत्यद्भुत ३१
प्रचंड अत्यंत । चाप शिवदत्त ॥
होतें अंगणांत । जनकाच्या ३२
तेथें ही खेळतां । साहजीक सीता ॥
धनुष्याचा आतां । घोडा करी ! ३३
बल जें अद्भुत । हें दिसे सीतेंत ॥
होतें तें उचित । तिजलाच ३४
जोडा विभूतींचा । हा सीतारामांचा ॥
दिव्य सामर्थ्याचा । व्हायाचाच ! ३५

## सीतेचें लग्नवृत्त

आतां लग्नवृत । घेतां दिसे त्यांत ॥
बोध तो अत्यंत । मननार्ह ३६
रानटी चालीचे । मार्ग विवाहाचे ॥
काढूं विचाराचे । कक्षेंतूनी ३७
तरीहि सांप्रत । मार्ग प्रचारांत ॥
दोन हे आहेत । शिष्टमान्य ३८
कोणी बालपणीं । कन्या उजवोनी ॥
पतीचे सदनीं । दवडीती ३९
जितुकी लहान । कन्यका वा सून ॥
तितुकी खुलून । दिसे त्यांना २४०

दुज्या कोणा मोह । पडे निःसंदेह ।
या प्रौढविवाह– । मार्गामध्यें २४१
प्रौढ वाढलेली । कन्याच चांगली ।
लग्ना योग्य झाली । त्यांना वाटे ४२
वास्तवीक आतां । सूक्ष्मत्वें पहातां ।
दिसे सदोषता । दोन्हीकडे ४३
क्षीणब्रह्मचर्य । प्रजेचें दौर्बल्य ॥
दोष दुर्निवार्य । बाललग्नीं ४४
कंटाळा प्रजेचा । हव्यास चैनीचा ।
बहुधा व्हायाचा । प्रौढांमध्यें ४५
घटस्फोट भारी । वा वृद्धा कुमारी
प्रौढलग्नावरी । ओळंगती ४६
बाला ती रुसेल । दागिने मागेल ॥
प्रौढा ती भांडेल । हक्कासाठीं ! ४७
पतीचें हृद्गत । बाला ती नेणत ॥
प्रौढा समजत । तुच्छ त्याला ! ४८
सारांश दृष्टीस । आमुच्या हे खास ।
दिसती सदोष । दोन्ही मार्ग ४९
गुणही चांगले । आहेत त्यांतले ॥
परी ते जहाले । दोषग्रस्त ५०
निदान दृष्टीतें । स्वरूप जें येतें ॥
मना पटणें तें । शक्य नाहीं ! ५१
सर्व दोषस्थळां । टाळुनी चांगला ॥
मार्ग तो मधला । येथें हवा ५२
आणि या सीतेचें । चरित्र गाण्याचें
कारण मुळींचें । हेंचि आहे ५३
सीता लग्नकाळीं । प्रौढ वाढलेली ॥
सुदृढ झालेली । अशी दिसे २५४

निदान पतीची । पारख होण्याची ॥
पात्रता तियेची । स्पष्ट आहे ! २५५
तथापिहि तिनें । पती निवडणें ॥
स्वतांचे मर्जीनें । केलें नाहीं ! ५६
लज्जावगुंठन । पार झुगारून ॥
स्वप्रियाराधन । नारंभीलें ५७
जनक ज्या कोणा । अर्पील आपणा ॥
त्यासींच ती लग्ना । सिद्ध होती ५८
आणखीहि एक । गोष्ट ही बोधक ॥
ठेवूं या तात्त्वीक । दृढापुढें ५९
सीता बालपणीं । जनकसदनीं ॥
उदात्त वर्तनीं । मग्न होती ६०
बाष्कळ भाषणें । शृंगारवर्णनें ॥
शक्य न ऐकणें । तिला कधीं ६१
कर्तव्यलालसा । वृद्धांची शुश्रूषा ॥
अभ्यास मानसा । तिच्या होता ६२
प्रवृत्ति वेदान्त । जनकगृहांत ॥
दिसे वर्तनांत । प्रत्यक्षत्वें ६३
राया जनकाला । हस्त तो जळाला ॥
कीं गंधें माखिला । सम वाटे ! ६४
अशा जनकाची । या परंपरेची ॥
कन्या आदर्शाची । जगा झाली ६५

## सीतेचें विवाहोत्तर आचरण

विवाहानंतर । सीता रघुवीर ॥
दोघांचें अंतर । एक झालें ६६
देह मात्र दोन । परी दोन्ही प्राण ॥
जहाले संलग्न । एकमेकां २६७
धर्म अर्थ काम । मोक्ष परंधाम ॥

साध्य तें अंतिम । दोघां झालें २६८
स्वमनःप्रवृत्ती । वा विवेकशक्ती ॥
सीता न विकी ती । पतीलागीं ६९
सुप्रसंगोपात्त । अधिकारयुक्त ॥
बोधही उचीत । तिनें केला ७०
परंतु हक्काचें । स्तोम स्वातंत्र्याचें ॥
हातूनी सीतेचे । झालें नाहीं !! ७१
या लग्नसंस्थेंत । हेतु हा उदात्त ॥
कीं द्वंद्व क्षणांत । नष्ट व्हावें ७२
स्वार्थनिर्मूलन । होऊनी संपूर्ण ॥
हक्काचा तो प्रश्न । उरूं नये ७३
विश्वकुटुंबास । पोषक व्हायास ॥
लागावी चुरस । दोघांमध्यें ७४
त्याही चुरशींत । प्रेमाची मदत ॥
व्हावी अविरत । प्रत्येकाला ७५
आणि आचरून । ऐसें आचरण ॥
ब्रह्मात्मैक्यज्ञान । ओळखावें ! ७६
सीतावर्तनांत । तत्त्व हें उदात्त ॥
दिसतें साक्षात । पदोपदीं ७७
राज्यहीन पती । होतां त्यामागूती ॥
धैर्यें निघाली ती । वनामध्यें ७८
राज्याचें वैभव । तुच्छ केलें सर्व ॥
वनासीं राघव । रिघूं जातां ७९
आणखी पुढेंही । दाविली समयीं ॥
निष्ठा पतीठायीं । अलौकीक ८०
अयोध्याकांडांत । सीता जें बोलत ॥
वाचा तें एकान्त । करूनीयां २८१
ती अशोकवनीं । मारुतीलागूनी ॥

बोलली तें ध्यानीं । पुन्हां आणा २८२
किंवा 'दिव्य' काळीं । स्थिती जी जहाली ॥
आणा ती सगळी । मनामध्यें ८३
कांहीं केलें तरी । एकचि अखेरीं ॥
तात्पर्य अंतरीं । ठसावेल ८४
कीं या दंपत्यास । सर्व आयुष्यास ॥
प्राप्त सुखलेश । झाला नाहीं ८५
लोककार्य जनीं । साधायालागुनी ॥
या पतीपत्नींनीं । शर्थ केली ! ८६
जन्मचि आपणा । लोकानुरंजना ॥
ही श्रीराममना । निष्ठा वाटे ८७
आणी जानकीनें । स्वसुखत्यागानें ॥
निष्ठा ती प्रयत्नें । पुरी केली !! ८८

## सीताचरित्राचा निष्कर्ष

आजच्या स्त्रियांत । किंवा पुरुषांत ॥
निष्ठा ही स्वप्नांत । आढळेना ! ८९
जेव्हां ईशेच्छेनें । जगताचीं मनें ॥
धर्मभावनेनें । भरतील ९०
रम्य कल्पनांत । दडलेला स्वार्थ ॥
जेव्हां अजीबात । नष्ट होय ९१
शृंगारकथांचा । पांचट गोष्टींचा ॥
भार वाङ्मयाचा । जेव्हां झडे ९२
बापुड्या धर्मास । तोंड काढायास ॥
जें जाती लयास । बाललग्नें ९३
तसेंच वराचें । गृह शोधायाचें ॥
ओझें स्त्रीशिरींचें । जेव्हां टळे ९४
आणि जें अनेक । तदनुषंगीक ॥
अनर्थ घातुक । टळतील २९५

लज्जावगुंठीत । कन्या जेव्हां देत ॥
बाप धीरोदात्त । वराहातीं २९६
तेव्हांच हा पूर्ण । मनु पालटून ॥
विवाहबंधन । सार्थ होय ९७
तेव्हांच या सीता- । आदि पतिव्रता ॥
पुन्हां या जगतां । जन्मतील ९८
एवढा इत्यर्थ । ठेवूनी चित्तांत ॥
जाऊं या त्वरीत । पुढें आतां ९९

## निरीक्ष्य विभूति ३ वाली

पुढतीं येथून । वालीप्रकरण ॥
सुराजकारण । लागे आतां ३००
म्हणतात कोणी । 'वालीप्रकरणीं ॥
अन्याय प्रभूंनीं । थोर केला ' १
परी या मुद्द्यांत । वा दीर्घशंकेत ॥
फारसा तत्त्वार्थ । मुळीं नाहीं २
या दुष्ट वालीनें । सामर्थ्यदर्पानें ॥
सुनीतिबंधनें । तुडवीलीं ३
बंधु सुग्रीवास । निरपराध्यास ॥
हट्टानें वनास । दवडीलें ४
आणि बंधुपत्नी- । नातें विसरूनी ॥
भोगी त्याची पत्नी । निर्लज्जसा ! ५
सारांश हा येथ । किष्किंधापुरींत ॥
वाली दुजा होत । रावणाचि ६
तेव्हां अधमाला । या शिरजोराला ॥
कोणी दंडायाला । हवें होतें ७
परंतु हें कार्य । करावया धैर्य ॥
कोणा असामान्य । नव्हतेंच ३०८

ईश्वरी विभूती । येईल केव्हां ती ॥
याची ते पहाती । वाट जन ३०९
रामें सुग्रीवाला । पूर्ण आश्वासीला ॥
कीं 'वाली मजला । वध्य होय' १०
तरीहि धूर्ताचें । तया सुग्रीवाचें ॥
झालें न चित्ताचें । समाधान ! ११
जेव्हां 'सप्त ताल' । छेदिले समूळ ॥
संशयपटल । तेव्हां गेलें १२
राम असामान्य । विभूती हा होय ॥
तेव्हांचि निश्चय । त्याचे मनीं ! १३
मग श्रीरामास । टाकूनी विश्वास ॥
गेला तो युद्धास । वालीसंगें १४
श्रीरामें आपण । बाजूला राहून ॥
वालीचें हनन । उरकीलें ! १५
कोणी म्हणतील । " कृत्य हें सकळ ॥
शोभतें न तीळ । प्रभुठायीं १६
सर्वांच्या देखतां । लढतां लढतां ॥
वधायाचा होता । वाली त्यांनीं !" १७
परी लौकिकाचा । कीं बाह्य कृतीचा ॥
हा तों न मुद्द्याचा । प्रश्न येथें १८
वालीवधकृत्य । न्याय्य कीं अन्याय्य ॥
हाचि प्रश्न मुख्य । येथें आहे १९
शिखंडीकडून । भीष्मांचें हनन ॥
झालें तेव्हां प्रश्न । हाच आला २०
त्या दुर्योधनाला । जेव्हां मारवीला ॥
तेव्हांही हा आला । प्रश्न तेथें २१
अती अर्वाचीन । इतिहासांतून ॥
सुद्धां ऐसे प्रश्न । उद्भवती ३२२

परी सर्व स्थळीं । पाहिजे लाविली ॥
कसोटी ही भली । सद्धेतूची ३२३
कोणी धर्मवेत्ता । कर्म आचरीतां ॥
हेतुच मुख्यता । त्याचा घ्यावा २४
हेतु तो असेल । निःस्वार्थी निर्मळ ॥
कर्म न बाधेल । तरी त्याला २५
मग तो कसाही । वागो करो कांहीं ॥
त्याला दोष नाहीं । तिळभरी २६
तो जसा वागेल । जें जें आचरील ॥
तें तेंच होईल । नीतितत्त्व २७
प्रत्येक कर्मांत । त्याला नकळत ॥
सर्वभूतहित । ठसावेल २८
जगाचें धारण । अथवा पोषण ॥
पावेल वर्धन । कर्मानें त्या ! २९
आतां तें असेल । कल्पनेवेगळ ॥
तर निंदितील । स्वार्थी जन ३०
परी अखेरीस । विचारी लोकांस ॥
निर्दोषता खास । पटे त्याची ३१
हीच निर्दोषता । रामाचीहि आतां ॥
वानरांच्या चित्ता । पटतसे ! ३२
किष्किंधेचे तळीं । पडतां तो वाली ॥
सामसूम झाली । कपींमध्यें ! ! ३३
वालीचा कैवार । घेऊनी सत्वर ॥
उठेना वानर । एक सुद्धां ३४
नल जांबवान । शरभ सुषेण ॥
हालती कोणी न । तिळभरी ३५
बाकीहि समग्र । वालीपक्षी वीर ॥
सर्व जागेवर । स्थिर झाले ३३६

अंगदही आतां । शोक तो थांवतां ॥
रामपदीं स्वतां । लीन झाला ! ३३७
इतुकेंच नाहीं । तर त्या कपींहीं ॥
दिली किष्किंधाहि । सुग्रीवाला ३८
पूर्ण एकमत । होऊनी कपींत ॥
सुग्रीवाला प्राप्त । राज्य झालें ३९
आतां एकवेळ । सुग्रीव मानेल ॥
यांत तों नवल । मोठें नाहीं ४०
परी या रामास । वालीच्या शत्रूस ॥
त्यांनीं सर्वस्वास । अर्पियेलें ! ४१
सुग्रीववचन । निमित्त करून ॥
रामकार्या प्राण । पुढें केले ! ४२
रामकार्य जर । वाटतें अघोर ॥
तर हा प्रकार । होताचना ४३
जिंकिती काळास । ऐसे कपी खास ॥
राघवाला वश । होतेचना ४४
आणि जरी होते । तरी तत्कार्यातें ॥
कधीं न झटते । एकनिष्ठ ! ४५
सारांश इत्यर्थ । एवढाच येथ ॥
कीं वाली कपींत । प्रिय नसे ४६
त्याचें कुवर्तन । बंधूशीं भांडण ॥
सर्वही जाणून । चित्तीं होते ४७
परंतु तयाला । दंड लावायाला ॥
नव्हतें कोणाला । धैर्य मनीं ! ४८
आतां परभारें । जेधवां हा मरे ॥
तेव्हां कपी सारे । स्वस्थ झाले ४९
भार उतरला । जगाचा थोरला ॥
असेंच सर्वांला । चित्तीं वाटे ३५०

अर्थात नंतर । रामकृत्यावर ॥
टीका कोणी फार । केली नाहीं ३५१
पुढें रामकार्य । जेव्हां स्पष्ट होय ॥
आनंद न माय । सर्वत्रांसी ५२
'जगच्छळकास । रणीं रावणास ॥
जिंकाया रामास । बळ आहे ५३
आणि पक्ष त्याचा । आहे तो न्यायाचा ॥
जगदुद्धाराचा । निःसंशय' ५४
एवढ्या खात्रीनें । वानरांचीं मनें ॥
श्रीरामबाजूनें । उठावलीं ५५
श्रीरामतेजाचा । दिव्याकर्षणाचा ॥
होता महत्त्वाचा । भाग त्यांत ५६
आणि जें कपींत । राजनिष्ठाव्रत ॥
त्याचीहि मदत । याला झाली ५७
पुढें वानरांनीं । हजारों बाजूंनीं ॥
टाकिली भरूनी । किष्किंधा ती ५८
आणि जें लंकेत । युद्ध झालें त्यांत ॥
अमूल्य मदत । रामा केली ५९

## निरीक्ष्य विभूति ४ महासती सुलोचना

आतां येथूनीयां । कोणत्या न ठायां ॥
थांबतां जाऊं या । लंकापुरीं ६०
आणि मननार्थीं । ती दृष्टीपुढती ॥
घेऊं महासती । सुलोचना ६१
कोणी म्हणतील । "बहु झाला वेळ ॥
सतींचा तो काळ । जाऊनीयां ६२
सुदैवें संप्रतीं । राजाज्ञेनें सती ॥
बंद आर्यावर्तीं । झाली आहे ३६३

आणखी लोकांच्या । वृत्तीहि मनाच्या ॥
नाहींत सतीच्या । अनुकूळ ३६४
तेव्हां हें वर्णन । सतीचें करून ॥
कोणतें साधन । तुम्हीं केलें ?" ६५
प्रश्न बरोबर ! । राजाज्ञाही थोर ॥
झाली वेळेवर । निर्विवाद ६६
लोकांचीहि वृत्ती । पाहूनी निश्चितीं ॥
अत्यानंद चित्तीं । आम्हां होय ६७
मायभगिनींना । चिते जळतांना ॥
आम्हां तरी मना । आवडे का ? ६८
अमूल्य स्त्रीकाया । जळतां ही वायां ॥
नाहींच का दया । येत आम्हां ? ६९
परंतु दयेचा । किंवा लौकिकाचा ॥
नाहींच मुद्दयाचा । प्रश्न येथें ७०
वैधव्यानंतर । 'त्याग' कीं 'संसार' ॥
प्रश्न खरोखर । हाच आहे ! ७१
मग कोणी सती । जावो न जावो ती ॥
आम्हां त्याची क्षिती । नाहीं मुळीं ७२
रणांगणावर । मरती जे शूर ॥
त्यांचेंचि यावर । साम्य घेऊं ७३
युद्धें नित्य व्हावीं । डोकींहि फुटावीं ॥
कोणी न हें भावी । मनामध्यें ७४
माना कापायाचें । कृत्य धन्यतेचें ॥
नाहीं वाटायाचें । कोणालाही ७५
परी जे तयांत । यशस्वी होतात ॥
होते ना जगांत । कीर्ति त्यांची ? ७६
त्यांना स्वर्गवास । भोगूं लावायास ॥
होते ना जगास । थोर घाई ? ३७७

तत्कृतीनिंद्यत्व । लोपूनीयां सर्व ॥
होतो ना गौरव । वृत्तींचाच ? ३७८
पौरुषाची चाड । स्वधर्मी आवड ॥
यांचीच ना गोड । स्तुती होते ? ७९
तर मग आम्हीं । सतीचे गुणही ॥
गाइले या ठायीं । त्याच अर्थी !! ८०
देह जाळायाचें । कृत्य नैष्ठुर्याचें ॥
त्याज्य ठरायाचें । नेहमींच ८१
परी त्या कृत्यांत । हेतु जो उदात्त ॥
त्याचेंचि अत्यंत । मोल आहे ८२
प्रेमाची दृढता । स्वार्थविमुखता ॥
याचीचि ती चित्ता । प्रौढी वाटे ८३
आणि त्याचवर । ठेवूनी नजर ॥
इतुका विस्तार । आम्हीं केला ८४
आतां 'सती' गेली । रायें बंद केली ॥
हे तों गोष्ट झाली । अत्युत्तम ८५
उदात्त वृत्तीचें । परी नैष्ठुर्याचें ॥
दृश्य एकदाचें । बंद झालें ८६
परंतु पूर्वींहि । सती-चाल कांहीं ॥
नसे सर्वांठायीं । आवश्यक ८७
सती न जाऊनी । सुद्धां बहुजणी ॥
होत्या तेव्हां जनीं । शिष्टमान्य ८८
वैधव्याचे धर्म । पाळितां उत्तम ॥
सतीत्व परम । लाधे तयां ८९
आणि आतां तर । स्त्रिया त्या सुकर ॥
याच मार्गावर । विसंबती ९०
'सतीधर्म' काय । वा 'वैधव्य' काय ॥
तत्त्व एक होय । दोन्हीकडे ३९१

स्थितिभिन्नत्वानें । वा वृत्तिभेदानें ॥
फक्त हीं वर्तनें । भिन्न होतीं ३९२

## भगिनींस चार शब्द

आतां भगिनींस । हेच शेवटास ॥
सांगणें आम्हांस । चार शब्द ९३
माईनो ! तुमचें । सौभाग्य जन्माचें ॥
टिको ईश्वराचे । आशीर्वादें ९४
पतीबरोबर । सुखाचा संसार ॥
करा जन्मभर । सर्व तुम्हीं ९५
पतीचें सदन । प्रती स्वर्भुवन ॥
दाखवा करून । जगताला ९६
परी कधीं काळीं । जर दैवें भाळीं ॥
कुऱ्हाड पडली । आकाशींची ९७
पतिप्राणांवर । दुर्दैवाचा जर ॥
कधीं तो निष्ठुर । घाला आला ९८
तर मात्र शांत । ठेवूनीयां चित्त ॥
संसारनिवृत्त । तुम्हीं व्हावें ! ९९
संसारच कांहीं । नित्य ध्येय नाहीं ॥
विषयभोगहि । तुच्छ सारे ४००
तेव्हां तयांतून । हळुहळू मन ॥
निश्चयेंकरून । परतावें १
अंतर गंभीर । करूनी सुस्थीर ॥
झटावें ईश्वर । ओळखाया २
मात्र गुरु-आस । लागूनी मनास ॥
व्यर्थ कासावीस । होऊं नका ! ! ३
' गुरु तो येईल । क्षणांत तारील ' ॥
हे तों वेडगळ । आशा आहे ४०४

अनधिकाऱ्यास । उद्धरावयास ॥
कोणाही गुरूस । बळ नाहीं ४०५
आणि अधिकार । प्राप्त झाल्यावर ॥
गुरूसाठीं दूर । जाणें नको ! ६
सारांश स्वायत्त । यत्न मुख्य येथ ॥
गुरु तो निमित्त-। मात्र आहे ७
यापेक्षां जे संत । उघडे बोलत ॥
त्यांचेचि सद्ग्रन्थ । अभ्यासावे ८
त्यांचें आचरण । सूक्ष्मत्वें पाहून ॥
करावें वर्तन । तैशापरी ९
'भूतमात्रीं ईश' । जाणाया अभ्यास ॥
लावावा मनास । निश्चयानें १०
जीव पसरले । स्वतांभोंवताले ॥
जाणावे सगळे । आत्मवत ११
आणि त्यानंतर । योग्यतेनुसार ॥
कर्तृत्वविस्तार । वाढवावा १२
योग्यता असेल । तर हें सकळ ॥
जगचि होईल । कार्यक्षेत्र १३
मग दुर्बळांचा । पक्ष तो न्यायाचा ॥
घेऊनी दुष्टांचा । मोड करा १४
जगाचें धारण । होईल पोषण ॥
ऐसेंचि वर्तन । जगीं करा १५
हें नसेल होत । तर जे दुःखीत ॥
त्यां तरी द्या हात । वात्सल्यानें १६
रोगांनीं ग्रासले । अज्ञानीं बुडाले ॥
काढा ते सगळे । तयांतूनी १७
अन्न क्षुधितांना । वस्त्र उघड्यांना ॥
द्या प्रयत्न नाना । करूनियां ! ४१८

मात्र येथें एक । गोष्ट ही सूचक ॥
ठेवावी तात्त्वीक । दृष्टीपुढें ४१९
जें कांहीं करणें । दुसऱ्याकारणें ॥
करावें तें मनें । निरपेक्ष २०
त्यांत तो स्वार्थाचा । वा आत्मप्रौढीचा ।
नसावा कशाचा । भाग मुळीं २१
वा पर-वर्तन । पाहिलें म्हणून ॥
अंधानुकरण । कामा नये ! २२
स्त्रीशालीनतेला । आर्यसंस्कृतीला ॥
पाहिजे शोभला । व्याप सारा २३
कोणी म्हणतील । कर्तृत्व सकळ ॥
कसें हें साधेल । अज्ञान्यांना ? २४
अज्ञानच जर । आलें मार्गावर ॥
करावें तें दूर । आवश्यक २५
परंतु सांप्रत । ज्ञान ज्या म्हणत ॥
आहे तें मूळांत । शब्दमय २६
वेव्हार कळेल । तयानें सकळ ॥
परी न बाणेल । आत्मज्ञान २७
उलट कोमल । वृत्ती चवचाल ॥
होण्या अनुकूळ । होईल तें ! २८
अर्थात तयाचें । आणि वैराग्याचें ॥
न अर्थाअर्थीचें । नातें कांहीं २९
आणखी ' वैराग्य ' । हेंचि मुख्य होय ॥
तो आत्मप्रत्यय । आंगीं येण्या ३०
तें जिला बाणलें । तिनेंच जाणिलें ॥
पाहिजे म्हटलें । आत्मतत्त्व ३१
तिनेंच स्वतांस । उद्धरूनी खास ॥
सर्व जगतास । उद्धरीलें ४३२

तिचाच वैधव्य-। धर्म सांग होय ॥
येविशीं संशय । कांहीं नाहीं ४३३
मग ती वपन । देहविटंबन ॥
करो वा करो न । सारखेंच ! ३४
जरी ती नटली । भूषणीं सजली ॥
तरी ती जहाली । जगद्वंद्य ३५
कारण अंतर । शुद्ध झाल्यावर ॥
हें बाह्य आचार । गौण होत ! ३६
शेवटीं तत्त्वार्थ । येण्या थोडक्यांत ॥
आम्ही आतां येथ । असें म्हणूं ३७
कीं पतीसदनीं । जानकी होऊनी ॥
व्हावें त्यामागोनी । ' सुलोचना ' ! ३८
अर्थात दोघींच्या । वृत्ती ज्या मनाच्या ॥
त्याच ठेवायाच्या । दृष्टीपुढें ३९
वल्कलें नेसणें । वा देह जाळणें ॥
कोणा हें करणें । इष्ट नाहीं ! ! ४०
आतां ज्या स्त्रियांना । कांहींच साधेना ॥
मोकळे तयांना । अन्य मार्ग ४१
त्यांचा तिरस्कार । न करितां वर ॥
कींव थोडी फार । सुद्धां करूं ! ४२
परी हें तयांचें । कृत्य चांचल्याचें ॥
नाहीं ठरायाचें । उच्च ध्येय ४३
आणखी तयांनीं । मानावें लोकांनीं ॥
हीहि आशा मनीं । करूं नये ! ४४

## निरीक्ष्यविभूती ५ प्रतापी इंद्रजित्

आतां इंद्रजीत । रावणाचा सुत ॥
ठेवूं मननार्थ । दृष्टीपुढें ४४५

सती मंदोदरी । मातेच्या उदरीं ॥
वीर हा भूवरी । जन्मा आला ४४६
हा बाल्यापासून । प्रतापी म्हणून ॥
होता जगांतून । गाजलेला ४७
दिव्य अस्त्रें घोर । मायेचे प्रकार ॥
सर्वही हा वीर । जाणतसे ४८
रावण दिग्विजय । करी त्यांत होय ॥
पुत्र हा सहाय । प्रामुख्यानें ४९
यानें महेंद्राला । बांधूनी आणिला ॥
म्हणूनी हा झाला । इंद्रजीत ५०
हा निजपित्याचा । निर्वाणकाळींचा ॥
होता महत्त्वाचा । सहायक ५१
परी यानें त्याला । दुर्बुद्धिग्रस्ताला ॥
कधीं नाहीं केला । हितबोध ! ! ५२
महाभारतांत । कर्ण जें करीत ॥
तेंचि इंद्रजीत । येथें करी ५३
त्या दुर्योधनाला । कर्णें चढवीला ॥
तसा रावणाला । चढवी हा ५४
कोणा 'पितृभक्ती' । भासेल ही कृती ॥
आम्हां न परी ती । तैशी दिसे ५५
सामर्थ्यदर्पाचा । साम्राज्यतृष्णेचा ॥
हा खोट्या मनाचा । परिणाम ५६
फक्त संघभक्ती । ठेविल्या पुढतीं ॥
ठरे हा निश्चितीं । महात्माच ! ५७
परंतु तात्त्विक । दृष्टीनें हा एक ॥
ठरेल निःशंक । आगलाव्या ! ४५८

## निरीक्ष्य विभूती ६ बिभीषण

भक्त बिभीषण- । चारित्रशोधन ॥

आहे हें कठीण । थोडकेंसें ४५९
बंधु कुमार्गाला । लागतां त्याजला ॥
यानें बोध केला । शिकस्तीचा ६०
आणि तो विफल । होतांच सकळ ॥
सोडिला तत्काळ । पक्ष त्याचा ६१
श्रीरामभेटीला । हा जेव्हां पातला ॥
तेव्हां किंतु आला । वानरांना ६२
परी खात्री देतां । हनुमंत स्वतां ॥
झालें त्यांच्या चित्ता । समाधान ६३
पुढें मग यानें । दैत्यमर्मस्थानें ॥
रामा विश्वासानें । दाखविलीं ६४
होमा इंद्रजीत । जातां विवरांत ॥
यानेंच निश्चित । जाणविलें ६५
आणि लक्ष्मण । संगतीं घेऊन ॥
तयाचें हनन । उरकीलें ! ६६
संघभक्ती घ्याल । कसोटी केवळ ॥
तर हा ठरेल । लोकनिंद्य ६७
परी घ्याल जर । तात्त्विक विचार ॥
तर दोष फार । याला नाहीं ६८

भाग दुसरा

## श्रीरामाला ईश्वरावतार कां म्हणतात ?

येथवर ग्रंथीं । एकेक विभूती ॥
घेऊनी त्यावरती । चर्चा केली ६९
आतां सूक्ष्मपणें । व्यापक दृष्टीनें ॥
ग्रंथ हा पहाणें । पुनरपी ७०
राम रघुवीर । ईश्वरावतार ॥
सिद्धान्त हा थोर । सर्वमान्य ४७१
परंतु आर्यांनीं । कोणत्या गुणांनीं ॥

पारख ही मनीं । केली त्याची ? ४७२
काय त्याचे गुण । आर्यांनीं पाहून ॥
हें अत्युच्च स्थान । याला दिलें ? ७३
त्यासम भूपती । शांत दांत चित्तीं ॥
झाले भूवरती । किती तरी ! ७४
तो ' सत्यपालनीं ' । सुद्धां नृपमणी ॥
हरिश्चंद्राहूनी । श्रेष्ठ नाहीं ! ७५
' एकपत्नीव्रत ' । म्हणावें अद्भुत ॥
तर तें न यांत । लोकोत्तर ७६
व्रत हें चांगलें । आजन्म पाळिलें ॥
रामाच्याहि वेळे । पुष्कळांनीं ७७
शिवाय अंगना । भोगूनी त्या नाना ॥
कृष्ण झालेच ना । अवतार ? ७८
अर्थांत हें व्रत । अवतारगुणांत ॥
आवश्यक होत । नाहीं मुळीं ७९
मग अवतारी । व्हावया भूवरी ॥
आहे काय तरी । आवश्यक ? ८०
त्या अवतारांत । करील चकीत ॥
असें अत्यद्भुत । तेज हवें ! ८१
त्याचा जगड्व्याळ । व्याप भूमंडळ ॥
पुरूनी उरेल । असा हवा ! ८२
उलटापालट । जगताची स्पष्ट ॥
व्हाया हवी नीट । त्याच्या हस्तें ! ८३
दुष्टांचें शासन । साधूंचें पोषण ॥
विस्तृत प्रमाण । व्हाया हवें ८४
सारांश अशक्य । जगाला जें होय ॥
पाहिजे तें शक्य । केलें यानें ४८५
आणि श्रीरामांनीं । हेंच केलें जनीं ॥

झाले ते म्हणूनी । अवतार ४८६
पृथ्वी रसातळा । रिघतां तिजला ॥
यांनीं हात दिला । कळवळोनी ८७
जग वहावलें । भलतीकडे गेलें ॥
यांनीं तें काढिलें । भ्रमांतूनी ८८
सज्जनकैवार । घेऊनी सत्वर ॥
दुर्जनांचा जोर । कमी केला ८९
छाप लोकांवरची । काढूनी स्वार्थाची ।
प्रतिष्ठा धर्माची । वाढविली ९०
हेंचि मुख्य कार्य । श्रीरामाचें होय ॥
दुय्यम अनित्य । बाकी सारीं ९१
पित्राज्ञापालन । अरण्यगमन ॥
हीं सर्वही गौण । तुलनेनें ९२
सेतुबंधयुक्ती । जानकीची मुक्ती ॥
हींहि यापुढती । तुच्छ सारीं ९३
तशा अन्य व्यक्ती । वर्णिल्या ज्या ग्रंथीं ॥
त्याहि धनी होती । नांवाच्याच ९४
दशरथ नसता । जनक न होता ॥
तरीहि हा होता । अवतार ९५
कैकेयी नसती । मंथरा मरती ॥
तरी प्रभुकृती । घडतीच ९६
शूर्पणखा भोळी । नसती भाळली ॥
होतीच रांगोळी । लंका तरी ! ९७
रावण ती सीता । लंकेसी न नेता ॥
तरी तो मरता । प्रभुहस्तें ९८
किंबहुना राम । नसतें हें नाम ॥
तरी प्रभुकाम । थांबतें ना ! ! ४९९
स्थितीच जगतीं । अशी झाली होती ।

कीं व्हावाच अंतीं । अवतार ५००
उष्माच तो होता । इतुका वाढता ॥
कीं पाऊस आतां । पडावाच १
तो उष्मा कसला । होय जगताला ॥
पाहिजे पाहिला । आतां सारा २
अशी ती दुःस्थिती । तरी काय होती ॥
तेंच स्वस्थचित्तीं । पाहूं आतां ३

## रावणचरित्राचें महत्त्व

हें ज्ञान सत्वर । व्हाया हवें तर ॥
रावणचरित्र । अभ्यासावें ४
हा दुष्ट म्हणूनी । तच्चरित्रध्यानीं ॥
हयगय मनीं । करूं नये ५
कांहीं झालें तरी । महात्मा अखेरी ॥
आहे हा निर्धारीं । श्रेष्ठ आम्हां ६
दोषांबरोबर । गुणही अपार ॥
होते थोरथोर । त्याचे अंगीं ७
रामचरित्राचा । तर महत्त्वाचा ॥
रहस्यदृष्टीचा । आत्माच हा ८
रामगुणगान । सारें याव्याचीण ॥
एकांगीं अपूर्ण । होईल तें ९
ज्यानें हा जाणिला । रावण सगळा ॥
त्यालाच कळला । श्रीरामही १०
तेव्हां आतां येथ । अतिसंक्षेपांत ॥
रावणचरित्र । वर्णूं आम्ही ५११

## निरीक्षणान्तर्गत रावणचरित्र

### कुलपरंपरा

मूळारंभीं दोन । ब्रह्मयापासून ॥

जाहले निर्माण । देवदैत्य ५१२
दैत्यांचे वरती । दैत्य नामें हेती ॥
झाला अधिपती । सर्वमान्य १३
त्या हेती दैत्याला । मयेठायीं झाला ॥
पुत्र एक भला । विद्युत्केश १४
हाच विद्युत्केशी । पुढें त्या राक्षसी ॥
सालकटंकटेसी । लग्न करी १५
त्या दोघां उदरीं । पर्वतशिखरीं ॥
पुत्र झाला भारी । मनोहर १६
परी त्या मातेनें । विषयासक्तीनें ॥
पुत्राचा स्वेच्छेनें । त्याग केला १७
बाळ तें अर्थात । आंगठे चोखीत ॥
पडलें रडत । नगावरी ! १८
उमा महेश्वर । फिरतांना वर ॥
त्यांना हा प्रकार । दृष्टी आला १९
तत्काळ उमेनें । जाऊनी त्वरेनें ॥
मूल तें प्रेमानें । उचलीलें २०
आणि आनंदीत । होऊनी मनांत ॥
त्याजला गृहांत । वाढवीलें २१
पुढें त्या पुत्राला । सुकेश दैत्याला ॥
देववती बाला । लग्नीं दिली २२
गंधर्वीपासून । सुकेशा त्या तीन ॥
सुतेजसंपन्न । पुत्र झाले २३
एक झाला माली । दुसरा सुमाली ॥
तिजा संज्ञा झाली । माल्यवान २४
या पुत्रांनीं वस्ती । कराया लंका ती ॥
विश्वकर्म्याहातीं । बांधविली ५२५
आणि मग लग्नें । करूनी थाटानें ॥

तेथें स्वस्थ मनें । स्थिरावले ५२६
शुभमुहूर्तासी । तिघांहि राक्षसीं ॥
गंधर्वकन्यांशीं । लग्नें केलीं २७
सुंदरीचे ठायीं । माल्यवानदेहीं ॥
झाले वज्रदेही । सात पुत्र २८
विरूपाक्ष एक । मत्त व दुर्मुख ॥
चवथा प्रमुख । वज्रमुष्टी २९
सुमालीलागूनी । केतुमती पत्नी ॥
होती तीपासूनी । पुत्र झाले ३०
धूम्राक्ष प्रहस्त । अकंपन ख्यात ॥
सुपार्श्व हीं होत । मुख्य नांवें ३१
शिवाय तयाला । सुमाली दैत्याला ॥
लाभल्या सुशीला । कन्या चार ३२
तयांत केकसी । प्रमुख सर्वांसी ॥
संबंध कथेसी । तिचा आहे ३३
मालीलाही तीन । वसुधेपासून ॥
थोर सुलक्षण । पुत्र झाले ३४
अनल अनिल । संपाती प्रबळ ॥
अशीं हीं सकळ । त्यांचीं नांवें ३५
बंधु हे पुढचे । त्या विभीषणाचे ॥
अति विश्वासाचे । मंत्री होत ३६

## श्रीविष्णूचें सुमालीप्रमुख दैत्यांशीं युद्ध

पुढें या सर्वांनीं । उन्मत्त होऊनी ॥
सोडिलें त्रासूनी । जगत्त्रय ३७
स्वर्गांत शिरले । बंधु हे सगळे ॥
रणीं लोळवीले । देव सारे ५३८
गंधर्व किन्नर । लोकपाल थोर ॥

नाश भयंकर । केला त्यांचा ५३९
‘ महेंद्र आम्हीच ’ । ‘ उपेंद्र आम्हीच ’ ॥
‘ यमही आम्हीच ’ । सांगती हे ! ४०
तेव्हां ही बंडाळी । दैत्यांची सगळी ॥
देवांनीं मांडिली । विष्णूपुढें ४१
विष्णु सुदर्शन । घेऊनी आपण ॥
दैत्यांचें शासन । करूं आला ४२
मग त्या दैत्यांत । आणि या विष्णूंत ॥
घोर अत्यद्भुत । युद्ध झालें ४३
विष्णुभयामुळें । प्रथम सगळे ॥
दैत्य ते लागले । पळावया ४४
धडकी अत्यंत । भरूनी चित्तांत ॥
पळती समस्त । दाही दिशा ४५
तेव्हां तो सुमाली । वीर आतुर्बळी ॥
धांवला जवळी । श्रीविष्णूच्या ४६
हजारों हजार । बाण भयंकर ॥
सोडी विष्णूवर । एकसरें ४७
तरी ते विष्णूनीं । सर्व बाण रणीं ॥
खंडविखंडूनी । पाडियेले ४८
आणि दैत्यावर । कोपूनी दुर्धर ॥
सारथ्याचें शिर । उडवीलें ! ! ४९
अश्व इतस्ततां । रणांत धांवतां ॥
सुमाली तो आतां । परतला ५०
मग त्या मालीनें । भ्रातृकैवारानें ॥
विष्णूला धैर्यानें । तोंड दिलें ५१
एक भयंकर । गदेचा प्रहार ॥
केला हरीवर । आवेशानें ५५२
आणखी ताडण । यथेष्ट करून ॥

गरुडही दीन । पळवीला ! ५५३
गरुड चोंचावत । पळतां रणांत ॥
उडाला आकांत । लोकांमध्यें ५४
राक्षस सगळे । आनंदित झाले ॥
देव ते लागले । पळायाला ५५
मग तो श्रीहरी । कोपूनी अंतरीं ॥
फिरला माघारी । रणामध्यें ५६
आणि सुदर्शन । सोडूनी निर्वाण ॥
टाकिलें तोडून । मालीशिर ! ५७
माली तो पडतां । रणामध्यें आतां ॥
दैत्य इतस्ततां । भडकले ! ५८
पूर्ण तारांबळ । होऊनी सकळ ॥
वाट सांपडेल । तसे जाती ५९
तरीहि विष्णूनीं । पाठलाग करुनी ॥
असंख्य ते रणीं । वधिलेच ६०
जितही दैत्यांना । जैं विष्णु सोडीना ॥
तेव्हां माल्यवाना । क्रोध आला ६१
विष्णूला निंदूनी । कठोर वचनीं ॥
सजला तो रणीं । युद्धासाठीं ६२
रागें रागें एक । शक्ती भयानक ॥
विष्णूला अचूक । वर्मी हाणी ६३
परंतु विष्णूनें । शक्ती ती त्वरेनें ॥
परत वेगानें । झुगारिली !! ६४
शक्ती झणाणत । बसतां छातींत ॥
माल्यवान पडत । भूमीवरी ६५
युद्ध तें संपलें ! । देव आनंदले ॥
दैत्य परतले । निराशेनें ५६६
मग त्या सर्वांनीं । विष्णूला भिऊनी ॥

दिधली सोडूनी । लंकापुरी ५६७
आणि पाताळांत । क्रोधानें जळत ॥
राहिले पहात । योग्य संधी ६८
विष्णूला अजिंक्य । दैत्य जेणें होय ॥
असाच उपाय । शोधिती ते ! ६९

## कुबेराची कुलकथा

बहुत लोटला । काळ या गोष्टीला ॥
मग दैत्यां झाला । भाग्योदय ७०
प्रजापतीपुत्र । पुलस्त्य पवित्र ॥
ऋषी श्रेष्ठ थोर । एक होते ७१
यदृच्छेनें झाला । पुत्र त्यांना भला ॥
विश्रवा त्याजला । म्हणताती ७२
विश्रव्याची पत्नी । ती देववर्णिनी ॥
झाला तीपासूनी । वैश्रवण ७३
त्या वैश्रवणानें । अत्युग्र तपानें ॥
ब्रह्मयाकारणें । तोषवीलें ७४
आणि त्यापासून । प्रयत्नेंकरून ॥
कुबेरत्व पूर्ण । संपादिलें ७५
यम इंद्र वरुण । लोकपाल तीन ॥
हा त्यांचेसमान । चौथा झाला ७६
यक्ष ते सगळे । अनुचर झाले ॥
द्रव्यही मिळालें । अगणीत ७७

## कुबेराला लंकाप्राप्ति

मग एके दिवशीं । त्यानें पित्यापाशीं ॥
स्थान आश्रयासी । मागीतलें ७८
पित्यानें विचार । न करितां दूर ॥
लंकाचि सत्वर । याला दिली ! ५७९

दैत्यांनीं आपण । दिली जी सोडून ॥
तीच झाली दान । लंका याला ! ! ५८०
कुबेराला काय ! । राहण्याची सोय ॥
हवीतशी होय । अनायासें ! ८१
मग त्यामागूनी । असंख्य यक्षांनीं ॥
टाकिली भरूनी । लंका सर्व ८२
त्यांच्या गर्जनेनें । वा उच्च हास्यानें ॥
लंका पूर्णपणें । गजबजली ! ८३
पूर्वी शुकशुकाट । जेथें होता स्पष्ट ॥
तेथें दणदणाट । चालू झाला ८४
विलासाचीं स्थानें ! वा क्रीडाभुवनें ॥
यक्षसंमर्दानें । व्याप्त झालीं ८५
तरुणीविलास । प्रेमाचा हैदोस ॥
आतां भरघोंस । चालू झाला ८६

## सुमालीची आपदा

दैत्य तो सुमाली । राहूनी पाताळीं ॥
येई कधीं काळीं । पृथ्वीवरी ८७
आल्याबरोबर । एकदां सत्वर ॥
पाही डोळेभर । लंकापुरी ८८
तिची ती दुर्दशा । पाहतां निराशा ॥
वाहूनी उसासा । दीर्घ सोडी ८९
प्रासाद विस्तीर्ण । पाहूनी भयाण ॥
येई भडभडून । त्यांचे मनीं ९०
मग अश्रु चार । लंकावेशीवर ॥
गाळूनी माघार । जाई पुन्हां ! ९१

## सुमालीचा जळफळाट

अशी ही आपदा । अत्यंत दुःखदा ॥
आली अनेकदां । सुमालीसी ५९२

परंतु ये वेळां । तो जेव्हां पातला ॥
तेव्हां तो जहाला । चकीताचि ! ५९३
हीच कां लंका ती । भयाण जी होती
विचारी तो चित्तीं । पुनःपुन्हा ९४
‘ लंका हीच होय ’ । असा तो निश्चय ।
मग जेव्हां होय । त्याचे मनीं ९५
तेव्हां मात्र मन । होऊनीयां खिन्न ॥
गेला भडकून । राग त्याचा ! ९६
यक्षांचे विलास । येतां नजरेस ॥
आग मस्तकास । त्याच्या गेली ! ९७
दैत्यांची हीनता । यक्षांची धृष्टता ॥
मुळीं त्याला आतां । पहावेना ! ९८
दांत करकरून । मूठ उगारून ॥
सजला कंदन । करावया ! ९९
यक्ष हे येथले । जाळावे सगळे ॥
असेंहि वाटलें । चित्तीं त्याच्या ! ६००
परी त्याचा कांहीं । अशा या समयीं ।
उपाय तिळही । नव्हताच ! १
यक्ष आधीं थोर । रणबहाद्दर ॥
शिवाय आधार । विष्णु त्यांना २
आणि विष्णूमुळें । तर हें सगळें ॥
दैन्य ओढवलें । दैत्यांवरी ३
तेव्हां या विष्णूस । नाहीं जिंकिल्यास ।
त्यांचा तो उद्देश । साधताना ! ४
सुमाली म्हणूनी । मग लंकेंतूनी ॥
गेला परतूनी । आल्या पायीं ६०५

## सुमालीचें कारस्थान

पाताळांत गेला । सुमाली ये वेळां ॥

परी न शमला । राग त्याचा ६०६
दैत्यांचा उत्कर्ष । पुन्हां साधायास ॥
तळमळ त्यास । फार लागे ७
मग स्वस्थमनीं । विचार करूनी ॥
बेत केला मनीं । एक त्यानें ८
' स्वहेतुपूर्तीस । बळ विश्रव्यास ' ॥
हें त्या सुमालीस । उमजलें ९
कुबेराआगळ । नातू निपजेल ॥
तरच होईल । कार्यभाग १०
हा हेतु मानसीं । धरूनी कैकसी ॥
नामक कन्येसी । पाचारीलें ११
आणि ती कुमारी । घेऊनी सत्वरीं ॥
पुन्हां तो भूवरी । प्रवेशला ! १२
विश्रव्याश्रमांत । जाऊनी त्वरीत ॥
युक्तीनें ती देत । कन्या त्यांना १३
आणि युक्तकाळीं । मग तो सुमाली ॥
शिरला पाताळीं । हर्षयुक्त १४

## रावणादिबंधूंचे जन्म व बाळपण

पुढें शुभकाळीं । शुभलग्नमेळीं ॥
कैकसी राहिली । गर्भवती १५
आणि तीपासून । सुतेजसंपन्न ॥
पुत्र झाले तीन । विश्रव्यांना १६
एक कुंभकर्ण । दुजा बिभीषण ॥
तिसरा रावण । म्हणताती १७
होतां दिनमास । शुक्लेंदूपरीस ॥
तिघेही वाढीस । लागले ते ६१८
तिघेही खंबीर । बलाढ्य दुर्धर ॥

सुदृढ शरीर । तिघांचेंही ६१९
परी तो तिघांत । रावण अत्यंत ॥
नजरें भरत । सर्वत्रांच्या २०
त्याची ती प्रखर । मुद्रा पाणीदार ॥
पहातां आदर । चित्तीं वाटे २१
सुगंभीर वृत्ति । डौलदार गति ॥
पहातां त्याची ती । प्रेम दाटे २२
असें कांहीं गुप्त । होतें त्या दृष्टींत ॥
कीं लोक चकीत । सर्व व्हावे २३
'जग खेळवील । लीलेनें हा बाळ' ॥
वाटावें सकळ । लोकां ऐसें ! २४

## सुमालीच्या वाणीचा रावणावर प्रयोग

असो; स्वकन्येला । पुत्रलाभ झाला ॥
ऐकूनी पातला । सुमाली तो २५
चाणाक्षपणानें । थोडक्यांत त्यानें ॥
नातवांचीं मनें । पारखिलीं २६
आणि तयांतून । स्वकार्या साधन ॥
व्हावया रावण । निवडीला २७
मग उभयांनीं । त्या पितापुत्रींनीं ॥
रावणा नेऊनी । पढवीला २८
भाग्य कुबेराचें । वर्णूनी भावाचें ॥
आधीं मन त्याचें । चांचपीलें २९
आणि "त्यासमान । कां नाहींस?" म्हणून ॥
त्याला हिणावून । लाजवीलें ३०
परी तो निर्दोष । बालक भावास ॥
सिद्ध भांडायास । होईचना ! ६३१
मग सुमालीनें । अती चातुर्यानें ॥

कोंडी निश्चयानें । फोडिली ती! ६३२
देवदैत्यांमधलें । भावांभावांतलें ॥
वैर सांगितलें । विस्तारूनी ३३
लंका मुळांतली । कोणाची सगळी ॥
तीहि सांगितली । कुळकथा ३४
कसें त्या देवांनीं । त्या विष्णूकडुनी ॥
दैत्य लंकेंतूनी । हांकवीले' ३५
आणि त्या दैत्यांचें । नातें रावणाचें ॥
कसें; चित्र याचें । रेखाटीलें ३६
तथापि रावण । कांहीं केल्या यत्न ॥
त्या वश म्हणून । होईचना!! ३७
मग अखेरीचा । प्रयोग बाणीचा ॥
केला निर्वाणींचा । सुमालीनें ३८
" लंका ती सगळी । परत मिळाली ॥
तर सारी झाली । तुझीच ती ३९
आम्ही सारेजण । प्रधान होऊन ॥
सर्वदां वचन । पाळूं तुझें " ४०
शब्द हा ऐकिला । रावणें ते वेळां ॥
कार्यभाग झाला । सुमालीचा! ४१
राक्षसाधिपती । व्हावया मग ती ॥
दिली अनुमती । रावणानें ४२
" तनुमनधन । दैत्यार्थीं वेंचीन " ॥
प्रतिज्ञा रावण । करी ऐशी ४३

## रावणाची बंधूंसह तपश्चर्या

नंतर सगळे । बंधु एकमेळें ॥
गोकर्णा निघाले । तपासाठीं ६४४
तेथें तप पूर्ण । होतां त्यांकडून ॥

झाला सुप्रसन्न । ब्रह्मदेव ६४५
ब्रह्मयापासून । प्रत्येकाला भिन्न ॥
प्राप्त झाले तीन । श्रेष्ठ वर ४६
'झोंप' कुंभकर्णें । 'धर्म' बिभीषणें ॥
'विजय' रावणें । संपादीला ४७
"यक्ष वा गंधर्व । विष्णूसह देव ॥
व्हावे जिंक्य सर्व । मजलागीं ४८
आणि त्रैलोक्यांत । धरी माझा हात ॥
नसावा समर्थ । कोणी ऐसा" ४९
ऐसें वरदान । लाधूनी रावण ॥
आला परतून । गृहाप्रती ५०

## रावणाभोंवतीं राक्षसांचा जमाव व लंकाप्राप्ति

पुढें दैत्य सगळे । पाताळामधले ॥
भराभर आले । भूमीवरी ५१
सुमाली प्रहस्त । महोदर मत्त ॥
पातले समस्त । रावणासी ५२
धूम्राक्ष सारण । मारीच दूषण ॥
टाकिती वेढून । रावणाला ५३
जम सर्व बसला । रावणें ते वेळां ॥
दूत पाठविला । कुबेरासी ५४
आणखी आपुली । लंका ती सगळी ॥
पुन्हां मागीतली । त्याजपाशीं ५५
कुबेर तो भला । मनीं उमजला ॥
मुळीं न धारिला । हट्ट त्यानें ५६
लंका ती सोडून । सयक्ष आपण ॥
गेला तो निघून । कैलासासी ६५७
रावण हर्षला ! । गर्वें फुशारला ॥

पाहूनी आपुला । पराक्रम ६५८
आणखी समस्त । राक्षसांसहीत ॥
थाटानें लंकेत । प्रवेशला ५९
तेथें मंदोदरी । सतीच्या उदरीं ॥
जन्मला सुरारी । इंद्रजित ६०
त्याचें कांहीं दिन । करूनी लालन ॥
निघाला रावण । दिग्विजया ६१

## रावणाचा अत्याचार व कुबेराचा उपदेश

स्वर्गांत शिरला । रावण जे वेळां ॥
अनर्थ मांडिला । तेथें त्यानें ६२
देवांची गाळण । दिली उडवून ॥
महेंद्राचें वन । विध्वंसीलें ६३
ऋषीतपस्व्यांना । यक्षगंधर्वांना ॥
छळियेलें नाना । प्रकारांनीं ६४
कृत्य हें ऐकिलें । कुबेरें जे वेळें ॥
स्नेहें कळवळे । चित्त त्याचें ६५
बंधु रावणास । बोधाया लंकेस ॥
दूत त्यानें खास । पाठवीला ६६
परी रावणानें । अत्यंत क्रोधानें ॥
दूत तो गदेनें । चूर्ण केला ६७
आणखी ससैन्य । जाऊनी निर्भय ॥
केला पराजय । कुबेराचा ६८
यक्ष ते सगळे । रणीं लोळवीले ॥
पुष्पकही नेलें । हिरावूनी ६९
आणि सिंहनाद । करीत सानंद ॥
चालला मदांध । लंकेकडे ६७०

## उमामहेश्वरांची क्रीडा व रावण

पुढें जातां जातां । मार्गीच तें आतां ॥

यान अवचितां । अडकलें ! ६७१
रावण चकीत । विचारी मनांत ॥
तंव नंदी तेथ । प्रगटला ७२
त्यानें सौम्यपणें । रावणाकारणें ॥
कारण रीतीनें । सांगितलें ७३
म्हणे "नगावर । उमा–महेश्वर ॥
यांची क्रीडा स्वैर । चालू आहे ७४
ऋषी श्रेष्ठ सर्व । इंद्रादिक देव ॥
झालासे मज्जाव । यांना सुद्धां ७५
तेव्हां थोडा वेळ । घडी किंवा पळ ॥
थांबावें लागेल । तुला येथें !" ७६
रावण हांसला । आणि त्या नंदीला ॥
बोलाया लागला । कुचेष्टेनें ! ७७
म्हणे "नंदीराज ! । सांगतां जें मज ॥
असेल, तें काज । सत्य सारें ७८
परी दिनभर । कां हो ! हा शंकर ॥
नाचे नगावर । निर्लज्जसा ! ७९
असा मोठा कोण । हा गौरीरमण ॥
राहिला लागून । दुष्टाचार्य ? ८०
राजा लंकानाथ । ठाकलों मी येथ ॥
नाहीं का माहित । याजला हें ? ८१
आणिं तें नसेल । तर कां सकळ ॥
अटक ही फोल । अस्मादिकां !! ८२
छे ! छे ! नंदीबैला ! । आहेस तूं खुळा ॥
मज रावणाला । अडवाया ! ८३
हा जो आहे येथ । पर्वत वाटेंत ॥
त्यालाचि दिगंत । फेंकितों मी ६८४
म्हणजे शंकर । तुझा स्वेच्छाचार ॥

तेथें कल्पवर । क्रीडा करो ! ” ६८५
म्हणूनी रावणें । अत्यंत जोरानें ॥
पर्वत हातानें । उचलीला ८६
पाताळीं भिडला । पर्वत तो त्याला ॥
रावणें तोलिला । हातावरी ! ८७
देव गडबडले । ऋषी दचकले ॥
पर्वतावरलें । एकदम !! ८८
गौरीहि खेळांत । होतां भयभीत ॥
व्यत्यय क्रीडेंत । सर्व आला ८९
मग शंकरांनीं । अंगुष्ठ दाबूनी ॥
नग तो स्वस्थानीं । स्थिर केला ९०
अर्थात ते वेळें । रावणाचे बळें ॥
हात चेंगारले । नगाखालीं ! ९१
तेव्हां तो रावण । किंकाळी फोडून ॥
लागला रुदन । करावया ॥ ९२
रडतां रडतां । रुदना त्या स्वतां ॥
गायनाचें आतां । रूप आलें ९३
सामवेद सर्व । गाऊनी अपूर्व ॥
स्तवी शंभूदेव । लंकानाथ ९४
हजारों सुंदर । स्तोत्रें मनोहर ॥
रची शंभूवर । काव्यमय ९५
भूगोल सगळा । डोलाया लागला ॥
गातां रावणाला । ऐकूनीयां ॥ ९६
मग ते हजार । असे संवत्सर
जातां गौरीहर । तुष्ट झाले ! ९७
आज्ञा रावणाला । देऊनी जाण्याला ॥
वरी खुष केला । वरदानें ६९८
अमोघ वरांस । मेळवूनी खास ॥

रावण लंकेस । परतला ६९९
तेथें मिळवून । अपूर्व सन्मान ॥
निघाला फिरून । सैन्यासह ७००

### रावणाचा जगभर धुमाकूळ

या खेपेला मात्र । सर्व जगभर ॥
अनर्थ दुर्धर । केला त्यानें १
प्रत्येक राजास । लहानथोरास ॥
बोलावी युद्धास । मदांध हा २
'निघा लढायाला । कीं मुका राज्याला' ॥
असाचि जहाला । न्याय येथें ! ३
अर्थात राजांना । क्षात्रिय वीरांना ॥
न्याय झाला मना । दुःसह हा ४
युद्धा जावें तर । गदा प्राणांवर ॥
यायाची अखेर । ठरलेली ! ५
आणि 'जित' म्हणुनी । द्यावें या लिहूनी ॥
तर अब्रू जनीं । नष्ट होत्ये ! ६
शेवटीं सर्वांस । वेंचूनी प्राणांस ॥
करणें युद्धास । भाग झालें ७
कांहीं थोडेजण । 'क्षमस्व' म्हणून ॥
राहिले रक्षून । निजप्राण ८
गाधी पुरुरवा । दुष्यंत या सर्वां ॥
मार्ग हा बरवा । चित्तीं वाटे ९
परी बहुतेक । अनरण्यादिक ॥
रणकुंडीं खाक । सर्व झाले ! १०
हजारों राजांचा । असंख्य प्रजेचा ॥
जहाला प्राणांचा । स्वाहाकार ११
धरित्री सगळी । प्रेतांनीं खचली ॥
रक्तानें नहाली । आंगभर ७१२

आणि हें भीषण । दुष्कृत्य करून ॥
चालला रावण । यमपुरीं ७१३

## यमपुरीं रावण

तेथें जातांक्षणीं । नरकीं जाऊनी ॥
पापात्मे सोडूनी । दिले त्यानें १४
होते खिचपत । स्वकर्में जे तेथ ॥
ते यानें क्षणांत । मुक्त केले १५
तेव्हां यमदूत । आणि हा उन्मत्त ॥
संग्राम दोघांत । चालू झाला १६
हजारों बाजूंनीं । शस्त्रें उगारूनी ॥
आले खवळूनी । यमदूत १७
परी ते उन्मत्त । रावणाचे दूत ॥
तितुक्यां लावीत । पळवूनी ! १८
कोणा नावरतां । यमदूत आतां ॥
रणीं इतस्ततां । भडकले १९
तेव्हां तो साक्षात । यम वैवस्वत ॥
आवेशें रणांत । प्रगटला ! २०
त्यानें मर्मस्थानीं । असंख्य बाणांनीं ॥
रावणाला रणीं । वेध केला २१
रावण सगळा । रक्तानें भरला ॥
परी न कचला । तिळभरी ! २२
उलट निजांगें । तोहि रागें रागें ॥
बाण अति वेगें । सोडूं लागे २३
लक्षावधी बाण । सोडूनी निर्वाण ।
टाकिला फोडून । यम त्यानें २४
बाण मर्मस्थानीं । घुसतां जाऊनी ॥
गेला खवळूनी । प्रेतराज ७२५

मग प्रळयांचा । अंतक जगाचा ॥
काढी निर्वाणींचा । कालदंड ! ! ७२६
दंड भयंकर । दिसतां तो घोर ॥
सर्व चराचर । त्रस्त झालें २७
राक्षसही मनीं । अती भेदरूनी ॥
लागले तत्क्षणीं । पळावया २८
सुमाली प्रहस्त । मारीच उन्मत्त ॥
पळाया लागत । दाही दिशा २९
एकटा रावण । छाती उभारून ॥
राहिला स्वस्थान । धरूनीयां ! ३०
आणि दंड घोर । भेदाया सत्वर ॥
तें 'पाशुपतास्त्र' । सज्ज करी ! ३१
अस्त्रें तीं निर्वाण । घेतां दोघेजण ॥
त्रैलोक्य संपूर्ण । हडबडलें ३२
लोकपाळ सगळे । भेदरूनी गेले ॥
तळमळूं लागलें । जगत्त्रय ! ३३
मग तो साक्षात । ब्रह्मदेव तेथ ॥
यमासी निवृत्त । रणीं करी ३४
यम गुप्त झाला । पाहूनी ते वेळां ॥
सिंहनाद केला । रावणानें ३५
आणि आनंदीत । होऊनी मनांत ॥
निघाला गर्जत । तेथूनीयां ३६

## पाताळीं रावण

मग पाताळांत । जाऊनीयां तेथ ॥
करी पादाक्रांत । नाग सर्व ३७
निवातकवचा । दैत्याशीं तयाचा ॥
संग्राम त्वेषाचा । आधीं झाला ७३८

परी मग दोनी । पक्ष उमजोनी ॥
प्रेमाच्या रज्जूंनीं । बद्ध झाले ७३९
त्या दैत्यापासूनी । माया संपादूनी ॥
रावण तेथूनी । पुढें गेला ४०
'अश्म' नगरांत । जाऊनी रणांत ॥
वधिले समस्त । कालकेय ४१
आणि मग स्वारी । युद्धोन्मादभरीं ॥
त्या वरुणावरी । घसरली ! ४२
वरुणाचे पुत्र । निघतां बाहेर ॥
युद्ध भयंकर । तेथें झालें ४३
आणखी रणांत । पुत्र ते समस्त ॥
केले पराभूत । राक्षसांनीं ४४
" वरुण कोठें गेला ? " । पुसतां मंत्र्याला ॥
तो म्हणे " तो गेला । ब्रह्मलोकीं ! " ४५
ऐशा रीती पूर्ण । जय संपादून ॥
निघाला रावण । तेथूनीयां ४६

## सूर्यचंद्रलोकीं रावण

पुढें सूर्यलोक । आणि चंद्रलोक ॥
रावणें एकेक । जिंकियले ४७
आणि मग स्वारी । करूनी ही पुरी ॥
रावण माघारीं । परतला ४८
येतां येतां त्यानें । जबरदस्तीनें ॥
बहु कन्यारत्नें । उपटिलीं ! ४९
यक्षांच्या नागांच्या । कन्या दानवांच्या ॥
घातल्या स्वतांच्या । विमानांत ५०
आणि त्या रडत । असतां समस्त ॥
खेंचिल्या लंकेंत । जुलुमानें !! ७५१

## रावण आणि रंभा

लंकेंत रावण । थोडासा थांबून ॥
निघाला फिरून । देवलोकीं ७५२
त्यानें या खेपेला । साह्य व्हावयाला ॥
सांगातीं घेतला । इंद्रजीत ५३
प्रधान समस्त । सैन्य अगणीत ॥
होतेंच अर्थात । समागमें ५४
जातां स्वर्लोकाला । सैन्याचा पहिला ॥
तळ तो पडला । कैलासासी ५५
तेथें निशाकाळ । होतां एकवेळ ॥
सैन्य तें सकळ । झोंपीं गेलें ५६
फक्त लंकानाथ । एकटा सचिंत ॥
राहिला पहात । वनशोभा ५७
तंव रंभा तेथ । चंद्रप्रकाशांत ॥
जातां अकस्मात । दिसे त्याला ५८
रावणें उठूनी । घट्ट दों हातांनीं ॥
तिजला धरूनी । थांबविली ५९
आणखी स्वतांस । वश व्हावयास ॥
परोपरी तीस । प्रार्थीतसे ! ६०
रंभा म्हणे त्याला । "कुबेरपुत्राला ॥
संकेत ठरला । आज माझा ६१
त्या श्रेष्ठावांचून । अन्य जे कां हीन ॥
त्यांच्या ठायीं मन । नाहीं माझें ६२
तुम्हीहि चुलते । त्याचे ; तेव्हां नातें ॥
तुमचें मशीं तें । सासऱ्याचें ६३
तेव्हां या सुनेला । दीन अबलेला ॥
जाऊं द्या; तिष्ठला । पती माझा" ७६४

ऐकतां ते शब्द । असे असंबद्ध ॥
हांसे खदाखद । लंकानाथ ! ७६५
म्हणे, "पातिव्रत्य-। प्रौढी तुझी होय ॥
साजेशी सन्मान्य । कुलजांना ६६
परी वारांगना । भोग्य तूं सर्वांना ॥
तुज 'पत्नीपणा' । कोठें आहे ! ६७
आणि 'पत्नीपणा' । जर न ठिकाणा ॥
तर 'सूनपणा' । कैंचा तुज ? ६८
छे ! तें कांहीं नाहीं । रंभे ! याच ठायीं ॥
भोग्य तूं मज ही । सत्य गोष्ट !" ६९
म्हणूनी रावणें । जबरदस्तीनें ॥
रंभा ती हातानें । उचलीली ७०
आणि शिळातळां । घेऊनी ते वेळां ॥
तेथंच तो तिला । भोगीतसे ! ! ७१

## रावण आणि वेदवती

ही झाली रंभेची । वारयोषितेची ॥
कहाणी दुःखाची । येथवरी ७२
परी हा दुर्धर । दुष्ट बलात्कार ॥
तपस्विनीवर । सुद्धां करी ! ७३
हिमालयावरती । कन्या वेदवती ॥
व्हाया विष्णुप्राप्ती । तप करी ७४
तेथें हा रावण । एकदां जाऊन ॥
तपाचें कारण । तिला पुसे ७५
तिनें "विष्णूकरितां" । म्हणूनी सांगतां ॥
क्रोध आला चित्ता । त्याच्या फार ७६
'हा विष्णु गे ! कोण ?' । म्हणूनी रावण ॥
केशांनीं धरून । ओढी तिला ! ७७७

वेद्वती मनीं । गेली संतापूनी ॥
कृत्य हें पाहूनी । अनावर ७७८
रावणें धरिले । केश ते सगळे ॥
तिनें तोडियेले । क्रोधावेशीं ७९
आणि लंकानाथ । दृष्टीनें जाळीत ॥
सती ती अग्नींत । प्रवेशली ! ८०

## स्वर्गलोकीं रावण व इंद्राचा पराजय

पुढें हा येथून । युद्धांध रावण ॥
स्वर्लोकीं प्रयाण । करीतसे ८१
तेथें हा दिसतां । महेंद्र तो स्वतां ॥
युद्धासाठीं आतां । सिद्ध झाला ८२
वसु मरुद्गण । साध्य विवस्वान ॥
पातले संपूर्ण । इंद्रसाह्या ८३
भानु आणि रुद्र । अश्विनीकुमार ॥
हेही रणावर । प्राप्त झाले ८४
आरंभीं दैत्यांनीं । शौर्य गाजवूनी ॥
गांजिले ते रणीं । देव सारे ८५
सुमाली देवांत । शिरूनीयां तेथ ॥
भीषण अनर्थ । मांडूं लागे ८६
तेव्हां सावित्रानें । आठव्या वसूनें ॥
दैत्य तो गदेनें । चूर्ण केला !! ८७
मग तो दुर्धर । इंद्रजीत वीर ॥
देवसैन्यावर । उसळला ! ८८
हजारों शरांनीं । असंख्य अस्त्रांनीं ॥
टाकिले खिळूनी । देव त्यानें ८९
मंडप बाणांचा । अमोघ शस्त्रांचा ॥
झाला नवलाचा । देवशिरीं ७९०

तेव्हां इंद्रसुत । जयंत विख्यात ॥
तुटला रणांत । त्याजवरी ७९१
परी इंद्रजीतें । योजूनी मायेतें ॥
रणीं केलें त्यातें । मूर्च्छापन्न ! ९२
पुत्र तो पडतां । मूर्छापन्न आतां ॥
महेंद्रचि स्वतां । प्रगटला ! ९३
मग त्या इंद्राचें । आणि रावणाचें ॥
युद्ध निकराचें । तेथें झालें ९४
त्यांत एकट्याला । त्या लंकानाथाला ॥
वेढूनी टाकिला । सुरश्रेष्ठीं ९५
परंतु दुर्धर । महात्मा हा वीर ॥
मुळीं तिळभर । हटेचना !! ९६
पण पिता श्रांत । पाहूनी रणांत ॥
साह्या इंद्रजीत । धावियला ९७
मायाजाळ घोर । पसरूनी थोर ॥
त्यानें देववीर । भ्रांत केले ९८
आणि इंद्र रणीं । मोहित करूनी ॥
घेतला बांधूनी । रथावरी ! ९९
कृत्य हें देखतां । स्वपुत्राचें आतां ॥
आला लंकानाथा । गहींवर ! ८००
दैत्य आनंदले । ऋषी घाबरले ॥
देव ते पळाले । सैरावैरा १
मग त्या इंद्राला । रावणानें नेला ॥
लंकेंत राखिला । बंदिवान !! २
पुढें ब्रह्मयानीं । मध्यस्थी करूनी ॥
नेला सोडवूनी । महेंद्र तो ३
परी तैंपासून । रावणाला कोण ॥
शत्रु तो म्हणून । उरला नाहीं ८०४

सर्व लोकांवर । लोकपाळांवर ॥
त्याचा अधिकार । चालू झाला ८०५
जेथें जाई तेथें । पहातांच यातें ॥
धडकी सर्वांतें । चित्तीं भरे ६
' नमो नमो ' म्हणुन । सर्व या भिऊन ॥
काढिताती दिन । कसेबसे ! ७

## पूर्वविवेचनानुसंधान

आतां चरित्र तें । संपवूनी येथें ॥
मूळच्या प्रश्नातें । पुन्हा वळूं ८
मूळ आरंभांत । या सूक्ष्म चर्चेत ॥
प्रश्न उपस्थीत । असा झाला ९
कीं "काय म्हणुनी । श्रीरामा आर्यांनीं ॥
मानिला स्वमनीं । अवतार !" १०
" जगा जें अशक्य । तें हा करी शक्य " ॥
उत्तर तें होय । याजवरी ११
" अशक्य कोणतें । केलें रघुनाथें ? " ॥
असा प्रश्न येथें । पुन्हा आला १२
" रावण मातला । भूमीभार झाला ॥
श्रीरामें हरिला । येऊनीयां " १३
" हेंचि कार्य पूर्ण । अशक्य " म्हणून ॥
उत्तर निक्षून । दिलें आम्हीं १४
आणि तयावर । समर्थनपर ॥
वर्णिलें चारित्र । रावणाचें १५
आतां गुणदोष । त्याचे या स्थळास ॥
ते यथावकाश । आधीं पाहूं १६
आणि त्यानंतर । कसा भूमीभार ॥
झाला तो प्रकार । स्पष्ट करूं ८१७

## रावणाचें गुणदोषविवेचन

वास्तवीक बघतां । रावण हा स्वतां ॥
नव्हता सर्वथा । दोषमय ८१८
दोषांबरोबर । गुणही अपार ॥
होते थोर थोर ॥ त्याचे अंगीं १९
हा कर्तृत्ववान । विद्वान श्रीमान ॥
महाबुद्धिमान । असा होता २०
युद्धीं शौर्य धैर्य । स्वजनीं औदार्य ॥
होतें असामान्य । त्याचे अंगीं २१
शस्त्रास्त्रज्ञानांत । तर त्याचा हात ॥
कोणाला जगांत । धरवेना ! २२
राजव्यवहार । कौशल्यही थोर ॥
होतें भरपूर । याचे अंगीं २३
याची प्रजा सारी । प्रेम तें अंतरीं ॥
याजवरी करी । पितृवत २४
आणखी सतत । हाही पुत्रवत ॥
प्रजा ती पाळीत । यथान्याय २५
कल्लोळ माजला । युद्धाचा ते वेळां ॥
दैत्य न फितला । एकसुद्धां ! २६
आणि तो पुढ्यांत । दिसतां कृतान्त ॥
मेले ते समस्त । याजसवें २७
एवढी मुद्द्याची । रावणातर्फेची ॥
गोष्ट महत्त्वाची । विसरूं नये ! २८

## रावणाचे दोष-अविचार

आतां जे दुर्धर । दोष याचे घोर ॥
त्यांचाहि विचार । येथें करूं २९
जरी निःसंशय । शूर हा निर्भय ॥
तरी थोडा होय । अविचारी ८३०

ज्ञानाबरोबर। अंगशक्तीजोर ॥
पुढें पुढें फार। याला झाला ८३१
शस्त्रास्त्रज्ञानांत। तसाच शक्तींत ॥
स्वतांला मानीत। अजिंक्य हा! ३२
अर्थात ही फोल। घमेंड पोकळ ॥
हरिली समूळ। कित्येकांनीं ३३
हैहय राजानें। सहस्रार्जुनानें ॥
याजला लीलेनें। बद्ध केलें ३४
तसाच वालीस। स्पर्शितां हा यास ॥
त्यानें शेपटीस। गुंडाळीलें ३५
आणि स्वस्थपणीं। सर्व जगांतूनी ॥
धिंड दीनवाणी। नेली याची!! ३६
परी या सर्वांत। दिसोनियां येत ॥
याचाच अत्यंत। अविचार ३७
प्रतिपक्षीयांचा। वाली आदिकांचा ॥
भाग श्रेष्ठत्वाचा। थोडा आहे ३८
तें अंगशक्तींत। याचेहूनी ज्यास्त ॥
याहूनी निश्चित। कांहीं नाहीं! ३९
त्यांना रावणाला। ससैन्य लंकेला ॥
बळ जिंकायाला। नव्हतेंच! ४०
आणि ही जाणीव। ठेवूनीच सर्व ॥
त्यांनीं तें सख्यत्व। याशीं केलें ४१

## रावणाची कामांधता

दुजा याचा आतां। दुर्गुण पहातां ॥
दिसे कामांधता। प्रामुख्यानें ४२
हा होता कामांध। ही तों सुप्रसिद्ध ॥
गोष्ट आहे सिद्ध। निःसंशय ८४३

परी या दोषांत । सुद्धां तो मिश्रीत ॥
दिसोनीयां येत । सत्तामद ८४४
रावण ती सीता । लंकेसी आणितां ॥
त्याकारण होता । हाचि दोष ४५
कसा तें निश्चित । जाणण्या ध्यानांत ॥
आणा ती समस्त । परिस्थिती ! ४६
' जन्म श्रीरामातें । रावणवधातें ' ॥
ही गोष्ट सर्वांतें । ठावी होती ४७
राम जातां वनीं । भरतालागूनी ॥
हेंच त्या ऋषींनीं । निवेदीलें ४८
आणि अत्यद्भुत । जीं एकंदरींत ॥
कृत्यें कानीं येत । श्रीरामाचीं ४९
त्यावरुनि सगळा । हाच तर्क झाला ॥
चित्तीं रावणाला । बहुतेक ५०
पुढें अरण्यांत । जातां सुद्धां तेथ ॥
राम आरंभीत । " प्रतिकार " ५१
अगस्त्याश्रमाला । राहतां त्याजला ॥
नसता जहाला । त्रास कांहीं ५२
परी ऋषीगण । मुद्दाम सोडून ॥
पंचवटीगमन । रामें केलें ५३
आणि विटंबून । शूर्पणखा पूर्ण ॥
दिधलें आह्वान । रावणाला ! ५४
रावणाला तरी । रामाशीं समरीं ॥
गांठ केव्हांतरी । घेणें होतें ! ५५
शत्रु हा संपूर्ण । निवटिल्यावीण ॥
त्याचेंही आसन । स्थिर नव्हतें ५६
तेव्हां या स्थितींत । त्यानेंही त्वरीत ॥
दिधलें निश्चित । प्रत्याह्वान ८५७

सीता पळवून । लंकेत आपण ॥
श्रीरामा आह्वान । केलें यानें ! ८५८
आजकाल कोणी । शत्रु या रीतीनीं ॥
खेचणार रणीं । नाहीं खरें ५९
परी स्थिती घेतां । तत्कालीन चित्ता ॥
नाहीं हें सर्वथा । विलक्षण ६०
सारांश दिसत । या सीताचोरींत ॥
आम्हां न ती फक्त । कामांधता ६१
पुढें जें वर्तन । सीतेसीं रावण ॥
करी त्यावरून । हेंच ठरे ६२
लंकेच्या स्त्रियांशीं । वागणूक कशी ॥
याची; तें ध्या यासी । प्रत्यंतर ६३
आणखी रंभेला । वा वेद्‌वतीला ॥
हा काय बोलला । तेंही स्मरा ६४

## रावणाचा खरा दुर्गुण व श्रीरामाचें कार्य

खरा जो दुर्गुण । रावणांगीं पूर्ण ॥
आहे तो याहून । निराळाच ! ६५
अवतारकार्य । घडावया योग्य ॥
कारण तें होय । वेगळेंच ! ६६
रावणाची मती । वा विवेकशक्ती ॥
भडकली होती । भलतीकडे ६७
जग हें खेळणें । स्वतःकारणें ॥
प्रामाणीकपणें । त्याला वाटे ६८
जगाची संपत्ती । हरावया चित्तीं ॥
शंका किंचित ती । याला नये ६९
जगींच्या ललना । स्वरूपसंपन्ना ॥
दुष्ट हा आपणा । भोग्य मानी ८७०

कारण अधिक । बळ हाचि हक्क ॥
ऐसें हें सुरेख । तत्त्व याचें ! ८७१
जगीं जे सबळ । तेचि जगतील ॥
दुर्बळीं समूळ । नष्ट व्हावें ७२
हाचि याचा न्याय । हेंचि याचें ध्येय ॥
यावरीच होय । भिस्त याची ! ७३
राक्षसांची जात । मात्र ती समस्त ॥
रावण मानीत । आत्मतुल्य ! ७४
कधीं त्यांचेवरी । मात्र बळजोरी ॥
यानें जन्मभरी । केली नाहीं ७५
त्याला वाटे खास । " मी माझे राक्षस ॥
मालक होण्यास । जन्मा आलों ! ७६
इतरांच्याहून । कांहीं विलक्षण ।
आहेत ते गुण । आम्हां ठायीं ७७
तेव्हां इतरांनीं । अंकित होऊनी ॥
वागावें नमूनी । आम्हांपुढें, ७८
यांत 'दोष' नाहीं । 'अन्याय' ही नाहीं ॥
दिसते सर्व ही । 'ईश्वरेच्छा' !! " ७९
विचारसरणी । हीच श्रीरामांनीं ॥
केली मूळांतूनी । नष्टप्राय ८०
रावणाचि होता । इचा पुरस्कर्ता ॥
तर कांहीं चिंता । नव्हती फार ८१
परंतु ऐकूनी । त्याचें यश कानीं ॥
जगही फिरूनी । गेलें सर्व !! ८२
बलाची महती । सत्तेचीच स्तुती ॥
सर्वत्र जगतीं । चालू झाली ८३
'धर्म' म्हणूनि कांहीं । आहे; भावना ही ॥
बहुतांच्या ठायीं । आढळेना ८८४

"बळी कान पिळी । रडावें दुर्बळीं" ॥
अशीच ती झाली । स्थिती येथें ८८५
तात्त्विक ज्ञानाचीं । पुस्तकें मोलाचीं ॥
गुंडाळावयाची । पाळी आली ८६
तत्त्वज्ञानी खुळा । वेदान्ती बावळा ॥
असाच तो झाला । न्याय येथें ! ८७
बरें; या स्थितीस । आळा घालायास ॥
बळही कोणास । नव्हतेंच ८८
अगस्ती वसिष्ठ । कौशिक कोपिष्ट ॥
ऋषी श्रेष्ठ श्रेष्ठ । होते तेव्हां ८९
परंतु समस्त । ते एकंदरींत ॥
निवृत्तिमार्गांत । मग्न होते ९०
ससैन्य मारणें । रावणा युद्धानें ॥
नव्हतें त्यांच्यानें । शक्य कधीं ९१
युद्ध करी घोर । असा कर्मवीर ॥
कोणी जगावर । हवा होता ! ९२
घोर शस्त्रास्त्रांनीं । उद्धरी मेदिनी ॥
असा वीरमणी । हवा होता ९३
पूर्ण ब्रह्मवेत्ता । परी 'कर्म' कर्ता ॥
कोणी हवा होता । जगावरी ९४
आणि श्रीरामांनीं । केलें हें येऊनी ॥
झाले ते म्हणूनी । अवतार ९५
'बळाहूनी श्रेष्ठ । धर्म' हीच गोष्ट ॥
त्यांनीं केली स्पष्ट । जगामध्यें ९६
'अमुकच जात । वरिष्ठ जगांत' ॥
कल्पना ही व्यर्थ । केली त्यांनीं ९७
आणि 'जगायाला' । बळीदुर्बळांला ॥
हक्क ठरवीला । समानचि ! ८९८

## लक्ष्मणचरित्र

या रामकार्यांत । साह्य जे जे होत ॥
त्यांचेंहि चरित । पाहूं आतां ८९९
लक्ष्मण मारुती । याच त्या विभूती ॥
मुख्य साह्य होती । श्रीरामाला ९००
यांतील लक्ष्मण । होईल वर्णन ॥
एकाचि संपूर्ण । वाक्यामध्यें ! १
' हा रामकार्याला । जगांत जन्मला ॥
आणखी निमाला । त्याच कार्यीं ' २
एवढ्या वाक्यांत । चरित्र समस्त ॥
होईल उद्धृत । लक्ष्मणाचें ! ३
कोणा याची कृती । भासे ' भ्रातृप्रीति ' ॥
आम्हां न परी ती । तैशी दिसे ४
'भ्रातृप्रीति' फक्त । असती याच्यांत ॥
तर कां भरत । द्वेष्य याला ? ५
आणि पित्याहूनी । श्रीरामचरणीं ॥
प्रेम शतगुणीं । याचें कां तें ? ६
छे ! तें कांहीं नाहीं । भक्ती रामाठायीं ॥
दिसते याची ही । निराळीच ! ७
श्रीरामतेजाला । पहातां याजला ॥
मोह तो पडला । अनिवार ८
केवढें सत्कार्य । रामाहातीं होय ॥
याचाहि निश्चय ! त्याला झाला ९
आणि श्रीरामाला । जगदुद्धाराला ॥
तत्काळ अर्पिला । देह यानें ! १०
त्या कार्याची चिंता । लागतां हा आतां ॥
विसरला स्वतां । भूकतान ९११
पत्नीची मातेची । कीं गृहसौख्याची ॥

परवा तिळाची । केली नाहीं ११२
आणखी दुष्कर । कृतीनें तें थोर ॥
महत्कार्य पार । केलें यानें ! १३
पूर्ण स्थितप्रज्ञ । उदार धर्मज्ञ ॥
असा असामान्य । महात्मा हा १४
तयासी वंदन । शतशः करून ॥
जाऊं या आपण । पुढें आतां ! १५

### मारुतीचरित्र—बालपण

भक्त मारुतीचें । वृत्त आयुष्याचें ॥
निराळ्या तऱ्हेचें । आहे थोडें १६
अंजनी-उदरीं । पर्वतशिखरीं ॥
वीर हा भूवरी । जन्मा आला १७
असतांना बाळ । एकदां भुकाळ ॥
हा सूर्यमंडळ । भक्षूं गेला १८
राहुही ते वेळां । ग्रासितां सूर्याला ॥
यानें तो लाविला । पळवूनी ! १९
तेव्हां तो महेंद्र । राहूचा कैवार ॥
घेऊनी सत्वर । युद्धा आला २०
इंद्र-ऐरावत । देखतां पुढ्यांत ॥
मारुती वळत । त्याजकडे २१
आणि ‘मोठें फळ’ । मानूनी तत्काळ ॥
त्याचाचि कवळ । घेऊं इच्छी ! २२
मारुती झोंबतां । ऐरावता आतां ॥
महेंद्र तो चित्ता । दचकला ! २३
परी त्या भ्याडानें । मग नैष्ठुर्यानें ॥
ताडिलें वज्रानें । मारुतीला २४
कसें झालें तरी । बाळ हें अखेरीं ॥
त्या वज्राची सरी । कशी पावे ? ११५

अर्थात रडत । मारुती कण्हत ॥
पडला मूर्च्छित । धरेवरी ! १२६
मग त्याचा पिता । वायु हें पाहतां ॥
संतापला चित्तां । अनिवार २७
आणि क्रोधतप्त । स्वबळें क्षणांत ॥
निरोध करीत । जगताचा २८
श्वासोच्छ्‌वास सुद्धां । न होतां एकदां ॥
त्रैलोक्या आपदा । ओढवली ! २९
कावरेबावरे । प्राणी झाले सारे ॥
वायूच्या निर्धारें । क्षणामध्यें ३०
तेव्हां ब्रह्मदेव । सुद्धां सर्व देव ॥
झाले हतगर्व । वायूपुढें ३१
आणि मारुतीस । आणूनी शुद्धीस ॥
अर्पिले तयास । वर त्यांनीं १३२

## मारुतीचा पुंडावा व शाप

पुढें हनुमंत । हा अति उद्धत ॥
लागला अनर्थ । करावया ३३
यज्ञांत शिरावें । यानें बाळभावें ॥
आणि ते मोडावे । यज्ञ सर्व ३४
ऋषीपुत्रां त्रोप । देऊनीयां खूप ॥
पळावें निष्पाप । बाळानें या ! ३५
तेधवां ऋषीनें । भृगुवंशजानें ॥
याला सौम्यपणें । शाप दिला ३६
म्हणे " बळावर । ज्या तुझा हा जोर ॥
त्याचाचि विसर । पडो तुज ! ३७
सौम्य बलहीन । स्वतांला मानून ॥
रहा तूं येथून । कांहीं काळ १३८

जेव्हां श्रीरामाला । पहाशी ते वेळां ॥
स्मरेल तुजला । तुझें बळ " १३९
असा शाप होतां । मग हनुमंता ॥
आली सौम्यावस्था । अनिवार ४०
वालीचे दारुण । अन्याय पाहून ॥
सुद्धां त्या स्फुरण । आलें नाहीं ४१
परी रघुवीर । नजरेसमोर ॥
येतांच हा वीर । जागा झाला ! ४२
सामर्थ्य केवढें । निजांगीं रोकडें ॥
याचें ज्ञान पुढें । झालें तया ४३
जन्म आपणाला । जगांत कशाला ।
याचाही तयाला । बोध झाला ४४
आणि मग त्यानें । दृढ निश्चयानें ॥
श्रीरामा निष्ठेनें । साह्य केलें ४५
मुख्यत्वेंकरून । याच्याचकडून ॥
रामकार्या पूर्ण । साह्य झालें ४६
परी अयोध्येसी । देतां धनराशी ॥
हा काय रामासी । म्हणे पहा ! १४७

## मारुतीची वरयाचना

" भगवन् ! कशास । ही रत्नांची रास ॥
प्रेमाचि आम्हांस । तुझें असो ! ४८
जंव तुझी कीर्ति । राहे या जगती ॥
तोंवरी निश्चितीं । जगेन मी ४९
प्रत्येक पाऊल । टाकितां ते वेळ ॥
स्मरण अढळ । राहो तुझें ५०
तूंच भूतमात्रीं । आहेस ही खरी ॥
भावना अंतरीं । दृढ होवो १५१

आणखी भूतस्थ । तूं, तुझ्या सेवेंत ॥
असो व्यग्र चित्त । नित्य माझें १५२
हीच माझी भक्ती । हीच माझी वृत्ती ॥
वा पूजा-अर्चा ती । रघुराजा !" ५३

भाग तिसरा

## बोधग्रहण

आम्हां तरी कसली । मागणी या वेळीं ॥
रुचेल निराळी । याचेहूनी ? ५४
आम्हां तरी काय । याहूनी सन्मान्य ॥
दिसे बोध अन्य । रामायणीं ? ५५
लक्ष्मण मारुती । यांचीच ही भक्ती ॥
आहे या जगती । श्रेष्ठतम ५६
तर मग आम्ही । सुद्धां रामपायीं ॥
ठेवूं या हृदयीं । हीच भक्ती ! ५७
भक्ती ती चित्तास । असावी डोळस ॥
अंधभक्तीरस । कामा नये ५८
राम निजचित्तीं । तसा सर्व भूतीं ॥
भावना हीच ती । बाळगावी ५९
भूतस्थ रामास । ओळखावयास ॥
करावा अभ्यास । निश्चयानें ६०
आणि ज्ञान चित्तीं । जाहल्या हे मुक्ती ।
कांहीं यापरती । भिन्न नाहीं ! ६१
मुक्तीचें गांठोळें । देवाजवळलें ॥
नाहीं तें निराळें । हातीं द्याया ६२
ब्रह्मात्मैक्यज्ञान । जाहल्या हें पूर्ण ॥
प्राणी तेच क्षण । मुक्त झाला ! १६३

आतां शुद्ध चित्त । व्हाया कांहीं येथ॥
साधनें हवींत । आम्हांलाही ९६४
संतचरित्रांची । साधुवचनांची ॥
आवड सर्वांची । बाळगावी ६५
पुराणें कीर्तनें । उत्सव भजनें ॥
आपुल्या परीनें । श्रेष्ठच हीं ६६
परी हीं समस्त । आचरीतां त्यांत ॥
तत्त्व मूलभूत । सोडूं नये ! ६७
कोठें जावयाचें । शेवटीं तयाचें ॥
स्मरण आमुचें । ढळूं नये ६८
ब्रह्मात्मैक्यज्ञान । हेंचि ध्येय पूर्ण ॥
हृदयीं आपण । बाळगावें ६९
आतां प्रश्न येथें । येइ विचारातें ॥
कीं, "ब्रह्मज्ञान्यातें । कार्य काय ? ७०
त्यानें या जगांत । अज्ञानी लोकांत ॥
वागावें निश्चीत । कैशापरी ?" ७१
या प्रश्नावरून । मोठी ओढाताण ॥
तार्किकांमधून । चालू आहे ! ७२
परंतु भक्ताला । रामवर्तनाला ॥
पहाणें मनाला । पुरें आहे ! ७३
श्रीराम जगतीं । वागले ज्या रीतीं ॥
भक्तें तीच रीती । उचलावी ७४
मारुतीरायाला । जो मार्ग पटला ॥
पाहिजे पटला । त्यालाही तो ! ७५
निष्काम बुद्धीनें । निर्मम वृत्तीनें ॥
'कर्म' सद्भक्तानें । आचरावें ७६
जगाचें धारण । होईल पोषण ॥
ऐसेंचि वर्तन । योग्य त्याला ९७७

संघभक्ती होत । जर क्रमप्राप्त ॥
तर आचारांत । आणावी ती १७८
परंतु ती कांहीं । ध्येय होत नाहीं ॥
ठेवाया सर्वांहीं । दृष्टीपुढें ! ७९
परी तो विषय । नव्हे प्रतिपाद्य ॥
या रामायणीय । अभ्यासांत ८०

## फलश्रुति

असो; ग्रंथावरी । मर्यादा अंतरीं ॥
घातली ती पुरी । झाली आहे ८१
हां हां हां म्हणतां । कसा न कळतां ॥
ग्रंथ विस्तारता । जहाला हा !! ८२
तरी फलश्रुती । सांगूनी ही अंतीं ॥
ग्रंथाची समाप्ती । येथें करूं ८३
हा ग्रंथ गाईल । तयाचा वाढेल ॥
आदर अढळ । रामायणीं ८४
पुराणें निरर्थ । अशी कोणा होत ॥
दुर्दैवें मनांत । खात्री जरी ८५
तरी तीहि खात्री । हा ग्रंथ अखेरीं ॥
लावील निर्धारीं । डळमळाया ! ८६
तसेंच मूळांत । काव्य जें उदात्त ॥
तेंही हा किंचित । दर्शवील ८७
विचारभांडार । मुळींचें अपार ॥
तें हा थोडेंफार । उकलील ८८
आणि रामायण-। संबधीं अपूर्ण ॥
विचारां चालन । देईल हा ! ८९
हें जाहल्या प्राप्त । याहूनी ती जास्त ॥
अपेक्षा किंचित । नाहीं येथें १९०

मग श्रोतयांनीं । मूळ रामायणीं ॥
संचार करूनी । धन्य व्हावें ! ९९१
मूळ ग्रंथ स्वतां । अभ्यासीतां आतां ॥
बोध जो तच्चित्ता । प्राप्त होय ९२
त्या बोधानुसार । ' कृती ' घडे जर ॥
तरी भवपार । होतील ते ! ९३
' तथास्तु ! ' म्हणून । अंबेचा नंदन ॥
ग्रंथ हा संपूर्ण । करी येथें ९९४

समाप्त.

REFBK-0001566
REFBK-0001566
९५६६

# शुद्धिपत्रक

—:०:—

| पृष्ठ. | ओंवी. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३१ | ५१ | गंगेंत | गोदेंत |
| ३३ | ८४ | बाप | शासक |
| ५४ | | अशोकवन | अशोकवनस्थ सीतादेवी |
| ५४ | ७ | जागृतीं | जागृतींत |
| ११६ | ९८ व ९९ | यांच्यामध्यें | 'दैत्यसेनापतींचा वध' हेडिंग |
| १३६ | ७३ | ३ व ४ चरण 'वादा घेती प्रश्न।' | 'चमत्कार' |
| १३९ | ४०६ | तरी | पती |
| १४० | ३२ | शुद्धभावें | शुद्धभाव |
| १५१ | ८० | कवळून | कळवळून |

१६५ रणभूमीवर रावणाचें आगमन हें हेडिंग ७६ ओंवीपुढें.

| पृष्ठ. | ओंवी. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २०८ | ६५ | अभेद | अभेद्य |
| २२२ | ६० | टाकूं | शंकूं |
| २२५ | १६९५ | लोकपवादास | लोकापवादास |
| २८९ | ९ | दुष्यंत | दुष्कंत |
| २९५ | ८७ | सावित्रानें | सावित्र्यानें |